# भूदान - गंगा

## (४)

९५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १२८६

★

विनोबा

• • •

REFBK-0009795

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# भूदान-गंगा

[ चौथा भाग ]

★

विनोबा

REFBK-0009795

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

किंमत एक रुपया

प्रकाशक :

**भाऊ पानसे**
ग्राम सेवा मंडळ
परंधाम विद्यापीठ
पो. पवनार ( वर्धा )

प्रथम आवृत्ति ३०००
१ जानेवारी १९५८

मुद्रक :

**र. भ. निगुडकर**
प्रकाश मुद्रणालय
३९५/४ सदाशिव, पुणें २

# लेखिकेचें निवेदन

पूज्य विनोबांच्या गेल्या पांच वर्षांत दिलेल्या प्रवचनांपैकीं कांहीं महत्त्वाचीं प्रवचनें तसें च कांहीं प्रवचनांचा महत्त्वाचा भाग निवडून हें संकलन तयार केलें आहे. संकलनाच्या कामांत पूज्य विनोबांचें मार्गदर्शन लाभलें. १८ एप्रिल १९५१ पासून ३० जानेवारी १९५६ पर्यंत झालेल्या यात्रेचा काल त्यांच्या सल्ल्यावरून च निवडण्यांत आला आहे. गंगा तर सतत वाहत च आहे.

संकलनाकरितां अधिकांत अधिक मजकूर प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. तरी हि कांहीं भाग मिळाला नाहीं.

भू-दान आरोहणाचा इतिहास, सर्वोदयविचारांचें सर्व बाजूंनीं दर्शन तसें च शंका-समाधान वगैरे दृष्टिकोनांकडे ध्यान ठेवून हें संकलन तयार केलें आहे. त्यांत कोठें कोठें पुनरुक्ति हि दिसेल परंतु रसहानि होऊं नये या दृष्टीनें ती ठेवावी लागली.

संकलनाचा आकार मर्यादेपेक्षां वाढूं नये याकडे हि लक्ष द्यावें लागलें. हें संकलन एका दृष्टीनें पूर्ण असें मानावयास हरकत नाहीं. तरी हि तें परिपूर्ण करण्यासाठीं जिज्ञासू वाचकांनीं दुसरें कांहीं भूदानसाहित्याचें अध्ययन केलें पाहिजे.

(१) कार्यकर्त्यांची शिदोरी. (२) साहित्यिकांशीं हितगूज. (३) सर्वोदयाचे आधार. (४) संपत्ति-दान-यज्ञ. (५) जीवनदान. (६) शिक्षणविचार. (७) सर्वोदयाचें घोषणापत्र. (८) सर्वोदयसेवकांना.—हीं पुस्तकें भूदान-गंगेचीं परिशिष्टें मानावीं. संकलनाच्या कार्यांत पूज्य विनोबांचें नेहमीं मार्गदर्शन मिळालें तरी हि त्यांच्या विचारसमुद्रांतलीं रत्नें निवडण्याचें काम जिला करावें लागलें ती या कामाला मुळीं च योग्य नव्हती. म्हणून त्यांतल्या उणीवांकरितां वाचकांनीं क्षमा करावी.

**—निर्मला देशपांडे**

## प्रकाशकाचें निवेदन

या भूदान-गंगेचे सहा भाग हिन्दीमधून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचें भाषान्तर मराठी वाचकांकरितां या पुस्तकरूपानें सादर करण्यांत येत आहे. त्यांतील हा चौथा भाग आहे. पुढील भाग हि क्रमानें छापण्यांत येतील.

**—प्रकाशक**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | अहिंसक कर्मयोग | १ |
| २ | अहिंसेचे तीन अर्थ | ८ |
| ३ | भूदान-यज्ञ म्हणजे सामाजिक समाधीचें कार्य | १४ |
| ४ | कर्म, ज्ञान व भक्तीचा त्रिवेणीसंगम | १६ |
| ५ | शांति स्थापूं इच्छिणारांचे प्रकार | २५ |
| ६ | सत्य : आध्यात्मिक साधनेची पहिली शर्त | ३२ |
| ७ | सर्व प्रकारच्या दास्यांतून मुक्तीची प्रतिज्ञा | ४५ |
| ८ | अपरिग्रह समाजाचीं पांच लक्षणें | ४८ |
| ९ | भारतांतील श्रीमंतांनीं गांधीजींची अपेक्षा पुरी करावी | ५२ |
| १० | मालकी सोडण्यानें च आनंदवृद्धि | ५८ |
| ११ | धर्मनिष्ठेनें संपत्ती हि वाढेल | ६६ |
| १२ | त्रिवर्गांचें समान प्रमाणांत साधन आणि अंतिम ध्येयमुक्ति | ६७ |
| १३ | चरखा अहिंसक क्रांतीचा झेंडा | ७६ |
| १४ | शिक्षणाची योजना | ८२ |
| १५ | आदर्श राज्यकर्ता | ८८ |
| १६ | धर्मस्थानांना तुरुंग बनवूं देऊं नका | १०५ |
| १७ | खरी धर्मदृष्टि | १११ |
| १८ | समन्वयावर प्रहार होऊं देऊं नका | ११५ |
| १९ | अहिंसेचे राज्याची स्थापना कशी होईल | ११८ |
| २० | प्रत्येक दानपत्र हें विश्वशांतीकरितां मतदान | १४३ |
| २१ | भारतीय समाजशास्त्रांत दानप्रक्रियेचें महत्त्व | १५९ |
| २२ | नई तालीमद्वारां नवा समाज | १६४ |
| २३ | सात अमोल रत्नें | १६८ |
| २४ | भूदान आणि विश्वशांति | १७४ |
| २५ | शासनहीनता : सुशासन : शासनमुक्ति | १९२ |
| २६ | आजचा भक्तिमार्ग | १९७ |

e६e४

# भूदान-गंगा

## ( चौथा भाग )

### अहिंसक कर्मयोग : १ :

बंगालच्या प्रेममय भूमींत सभास्थानीं लोक शांत चित्तानें व एकाग्र वृत्तीनें माझें म्हणणें ऐकून घेतात असें दृष्टोत्पत्तीस येतें. श्री. चारुबाबू म्हणतात कीं याचें कारण लोकांना तहान लागली आहे व त्यांना पाणी पाजण्याचें कार्य सुरू झालें आहे. त्यांचें हें म्हणणें खरें आहे. या वेळीं फक्त बंगालच्या लोकांना तहान लागली आहे इतकें च नव्हे तर सर्व भारतवर्षाला तहान लागली आहे. वास्तविक पहातां जमिनीचा प्रश्न भारताचा च आहे असें नव्हे; सबंध आशिया खंडाचा आहे. परंतु भारतांतील खेड्यांपाड्यांतील उद्योगधंदे नष्ट झाल्यामुळें या ठिकाणीं जमिनीची तहान फार च वाढली आहे. आपल्याला गांवांतील उद्योगधंदे उभारावे च लागतील व जमिनीची तहान हि भागवावी लागेल. त्याशिवाय शांतता नांदणार नाहीं व लक्ष्मी हि वाढणार नाहीं.

### जमिनीच्या वांटणीबरोबर च प्रेमाची वांटणी

बंगालमध्यें तर ह्याची फार च आवश्यकता आहे. कारण येथें बऱ्या च समस्या उत्पन्न झाल्या आहेत. येथें आलेल्या निर्वासित लोकांना रहाण्याकरतां वसाहती देण्याचें काम करावयाचें आहे. केवळ जमिनी वांटल्या जात आहेत म्हणून येथल्या लोकांचें लक्ष आमचे कार्याकडे जात नाहीं, तर भूमि प्रेमाचे बळावर वांटली जात आहे म्हणून. जमीन वांटून देण्याचें काम

पुष्कळ तऱ्हेनें होऊं शकतें. पहिला प्रकार रक्तपातानें– ज्याप्रमाणें इतर देशांत घडून आलें आणि येथें हि सुरुवात झाली होती त्याप्रमाणें. परंतु या मार्गानें गेल्यास जगाचें कल्याण होणार नाहीं. हें त्यांचे लक्षांत आलें व म्हणून च ते भूदानचळवळीकडे मोठ्या आस्थेनें पहातात.

दुसरा प्रकार कायद्याचे जोरावर जमीन कब्ज्यांत घ्यावी व ती गरिबांना वांटून द्यावी. कायद्यानें जमीन मिळूं शकेल परंतु अंतःकरण मिळणार नाहीं. पण भूदानयज्ञांत फक्त जमीन च वांटली जात नाहीं तर प्रेम हि वांटलें जातें. शिवाय जमीन कायद्यानें घेतली गेली तर सरकार म्हणेल कीं चार लक्ष एकरांपेक्षां जास्त जमीन मिळण्यासारखी नाहीं. आम्ही तर सर्व जमिनीचा सहावा हिस्सा मिळविण्याची आशा बाळगतों.

कायद्याची कांस धरणारे लोक विचारतात कीं आम्ही त्यांना सहावा हिस्सा मागतों पण देतो कोण ? त्यावर आम्ही म्हणतों कीं परमेश्वर आम्हांला मागण्याची हिंमत देतो तर तो लोकांना देण्याची हि बुद्धि जरूर देईल. आपल्याला माहीत आहे कीं आतांपर्यंत हक्क म्हणून जमीन मागणारा कोणी च निघाला नाहीं. आतां एक व्यक्ति निघाली. त्याला जमीन मागण्याची प्रेरणा झाली आणि त्याचा परिणाम असा झाला कीं त्याला पागल समजून रांचीचे पागलखान्यांत न पाठवितां त्याला लोकांनीं छत्तीस लक्ष एकर जमीन देऊन टाकली. केवढें आश्चर्य ! ज्याचे हातांत मुळीं च अधिकार नाहीं व ज्याची कोणती हि संस्था नाहीं त्याला लोक लाखों एकर जमीन देत आहेत. अर्थात् आम्हांला सर्व पक्षांचे लोक व सर्व-सेवा-संघवाले मदत करीत आहेत. पण त्या कोणत्या हि संस्थांवर माझा कांहीं हक्क नाहीं. शेवटीं असें म्हणावें लागतें कीं परमेश्वराची इच्छा आहे म्हणून च लोक जमिनी देतात. अशा तऱ्हेनें लोकांनीं दान देणें आवश्यक आहे. माझा विश्वास आहे कीं लोकांचे कानांवर हा संदेश गेल्यास जमिनीचें दान लक्षावधि लोकांकडून होईल व तेव्हां दान घेतां घेतां आमची पुरेवाट होईल.

### वंदे मातरम्‌चा अर्थ काय ?

आम्हीं जें हें कार्य हातीं घेतलें आहे तें बंगालकरितां नवीन नाहीं. हा प्रश्न तर बंगालमध्यें च आधीं उपस्थित झाला असें मी समजतों. आपल्याला

माहीत आहे कीं ऋषि बंकिमनें एक मंत्र दिला व त्याचा साऱ्या हिंदुस्तानांत प्रसार झाला. त्याचा परिणाम म्हणून हिंदुस्तानला राजकीय स्वातंत्र्य मिळालें. मी येथें बरेच दिवसांनीं आलों तरी हि मला हा मंत्र खेडोपाडीं ऐकावयाला मिळतो. तो मंत्र म्हणजे "वंदे मातरम्". मी हें च म्हणतों कीं वंदे मातरम्‌चा अर्थ समजून घ्या – माता जमीन आहे व आम्ही सर्व तिचे पुत्र आहोंत. हें च वेदांत सांगितलें आहे आणि ती च गोष्ट ऋषि बंकिमचे मुखांतून बाहेर पडली. आई जर मुलांजवळ न राहतां त्यांना सोडून दूर राहिली तर तिला किती दुःख होईल ! ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. मी म्हणतों कीं 'माता भूमिः' जमीन आई आहे. पण आज ज्यांच्याशीं व्यवहार करावयाचा आहे ते 'भूमिपति' आहेत. किती हा निर्लज्जपणा व गैरकायदेशीरपणा. जिला आपण 'माता' आई म्हणून म्हणतों तिचे च आम्ही स्वामी म्हणजे पति व्हावें ! आम्ही तर असें म्हणतों कीं 'भूपति' किंवा 'भू-स्वामी' ही घाणेरडी शिवी आहे. भूमि जर 'माता' आई आहे तर तिला वंदन केलें पाहिजे. आम्ही 'वन्दे मातरम्' म्हणतों तर तिची सेवा करण्याचा योग सर्वांना मिळाला पाहिजे. येथें बसलेल्या पुत्रांपैकीं कांहीं भूमिहीन आहेत तर त्यांना मातेचें स्तनपान करणेचा अधिकार कां मिळूं नये ? मी तर असें समजतों कीं जे लोक भूमीची मालकी न सोडतां तिला बळकावून बसले आहेत ते मोठे अधर्मी व निरीश्वरवादी आहेत. याकरितां च जमीन सर्वांना वांटून दिली पाहिजे.

### 'वंदे मातरम्' सुद्धां आवश्यक

लोक मला सांगतात कीं आमचेजवळ जमीन थोडी आहे, आम्ही गरीब आहोंत, तर गरिबी वांटण्यांत काय फायदा होईल ? आम्ही श्रीमंत असतों व आमचेजवळ संपत्ति असती तर ती वांटून देण्यांत आनंद झाला असता. कांहीं लोक असें म्हणतात कीं प्रथम हिंदुस्तानांत संपत्ति वाढूं द्या; नंतर वांटण्याची गोष्ट काढा. पण ही गोष्ट आपण आपल्या कुटुंबाचा विचार करतांना करीत नाहीं. कुटुंबांत दूध थोडें आहे तर तें फक्त आई पिऊन टाकील व मुलांना म्हणेल कीं दूध थोडें होतें म्हणून मी प्यालें. दूध जास्त होईल तेव्हां तुम्हां सर्वांना मिळेल. तुम्ही अशा आईला आई म्हणाल कीं

राक्षसीण ? संपत्ति वाढल्यानंतर वांटण्यांत येईल असें म्हणणें म्हणजे केवळ आसुरी विचार च आहे. आम्ही जर श्रीमंत असूं तर श्रीमंती वांटून देऊं, बलवान असूं तर बल वांटून देऊं. दरिद्री असूं तर दारिद्र्य वांटून देऊं. आमचेजवळ जें जें आहे तें वांटून च संपत्तीची वाढ होईल. आम्ही वांटून च आपला हिस्सा घेऊं. आम्ही आपले शेजाऱ्यावर प्रेम करून च जिवंत राहूं शकतों हा धर्म आहे. रवींद्रनाथ ठाकूर म्हणाले होते, " आम्ही वंदे मातरम् तर म्हणतों, पण जरूर आहे ' वंदे भ्रातरम् 'ची." आम्हीं जर आपल्या शेजाऱ्याची काळजी घेतली नाहीं, आपल्या भावावर प्रेम केलें नाहीं, तर सर्व देश, जगत् व विश्व यांवर प्रेम करण्याची गोष्ट करण्यांत काय अर्थ आहे ? बंगालमध्यें प्रेमाची भावना कमी प्रमाणांत नाहीं पण तें अंतःकरणांतील प्रेम प्रकट होणेकरितां त्यांचेपुढें कांहीं कार्यक्रम नसल्यामुळें ती प्रकट होऊं शकत नाहीं.

## क्रांतीचा स्वस्त सौदा

प्रेम जेव्हां क्रियाशील होतें तेव्हां च तें शक्तिशाली बनतें. आपल्या या वंगभूमींत प्रेमाच्या नद्या वाहत आहेत. पण त्यांचा शेतीला फायदा मिळाला नाहीं. आतां त्या प्रेमभावनांना व भक्तिभावनांना कार्य करण्याची संधि मिळाली आहे. कोणत्या हि आईला पौष्टिक अन्न मिळालें तर तिचे स्तनांत दूध पुष्कळ राहतें आणि जर तसें अन्न मिळालें नाहीं तर तिला दूध थोडें येतें. तरी जिला दूध अधिक असतें ती हि आपल्या मुलाला पाजते व जिला थोडें असतें ती हि पाजते च. कारण अंतःकरणांत प्रेम भरून आहे व त्यामुळें मुलांना पाजल्याशिवाय तिच्यानें राहवत नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं ज्याचेपाशीं अधिक जमीन आहे त्यानें अधिक द्यावी व ज्याचेजवळ थोडी जमीन आहे त्यानें थोडी द्यावी.

ज्याच्याजवळ जी जमीन असेल तिचा सहावा हिस्सा दिला च पाहिजे. क्रांतीचा इतका स्वस्त सौदा कोठें च झाला नसेल. जगामध्यें जी जी म्हणून क्रांति झाली ती सत्यानाश करून च झाली. पण ही क्रांति फक्त सहावा हिस्सा घेऊन च शांत होणार आहे. असें समजा कीं प्रत्येक घरांत पांच

पांडव आहेत, पण मी म्हणतों कीं त्यांचेबरोबर एक सहावा हि आहे. त्याला त्याचा हिस्सा द्यावा लागेल. आपल्याला माहीत च आहे कीं पांडव पांच नव्हते तर एक सहावा हि होता. त्याचें नांव होतें कर्ण. परंतु त्याची कांहीं च तरतूद केली गेली नाहीं; व त्याचा परिणाम म्हणजे महाभारतांतील घनघोर युद्ध. मी प्रत्येक घरवाल्या लोकांना सांगतों कीं पांडवांनो, तुमचा एक सहावा भाऊ आहे. तो तुम्हांला दिसत नाहीं. त्याला हि तुम्हीं हिस्सा द्या व त्याची काळजी वहा. जर त्या भावाची काळजी वहाल तर गांवची शक्ति वाढेल.

## दारिद्र्य नष्ट करून नारायणाची स्थापना

'दरिद्रनारायण' हा शब्द हि या च प्रदेशांतून निघाला. हा प्रथम स्वामि विवेकानंदांनीं उच्चारला; नंतर हा च शब्द देशबंधु चित्तरंजन दास यांनीं उपयोगांत आणला. त्यानंतर या शब्दाचा गांधीजींनीं उपयोग केला व हिंदुस्थानांतील सर्व घराघरांत तो पोंचवला. आतां हा शब्द प्रत्येक घरांत पोंचला आहे. परंतु त्याप्रमाणें कार्य होणें शिल्लक राहिलें आहे. आम्ही जर सर्व मनोभावानें दरिद्रनारायणाची सेवा करूं तर 'नारायण' शिल्लक राहील व दारिद्र्य नाहींसें होईल. त्यानंतर जे लोक राहतील ते सर्व नारायण-रूप होतील. सर्व समान होतील. हें सर्व करण्याची जी तऱ्हा ती च भारतीय संस्कृति होय. दानाचा प्रकार हा प्रेमाचा च प्रकार आहे.

## बंगालला अहिंसक कर्मयोग आवश्यक

येथें वैष्णवांनीं भक्तीची भावना उत्पन्न केली. पण तिच्यांत निष्क्रियता होती. म्हणून च देशांत कार्य करण्याची इच्छा उत्पन्न झाली पाहिजे, कर्मयोगाची प्रेरणा मिळाली पाहिजे. ही कल्पना बंगालमध्यें कोणाला हि सुचली नाहीं अशी गोष्ट नाहीं. येथें क्रियाशीलपणा आला तो हिंसक होता. त्याचें रूपांतर अत्याचारांत झालें. वैष्णवांच्या ओथंबलेल्या भक्तिभावानें कार्य होऊं शकत नाहीं असें तरुण पिढीनें पाहिल्यावर त्यांनीं हिंसक कर्मयोग सुरू केला. आमच्यांतून निष्क्रियतेचा एक दोष निघाला तर दुसऱ्या दोषानें आमच्यांत घर केलें. निष्क्रियता तर गेली पण अहिंसेच्या ऐवजीं हिंसा आली.

मला वाटतें कीं हिंसेनें शक्ति वाढण्याऐवजीं क्षीण झाली. आतां आम्हांला वैष्णवांची अहिंसा आणि तरुणांचा क्रियाशीलपणा मिळवून अहिंसक कर्मयोग चालवावा लागेल. भूदानाची ही चळवळ अहिंसक कर्मयोग आहे. यामुळें सर्व बंगालची चित्तशुद्धि होईल व प्राणशक्ति वाढेल. चित्ताची शुद्धि करण्याचें व प्राणशक्ति वाढविण्याचें काम कोणता हि कायदा करूं शकत नाहीं. तें कार्य जनशक्तिद्वारें धर्मप्रचारानें च होऊं शकेल. लोक मला वारंवार विचारतात व आज हि विचारलें गेलें कीं जमीन जर कायद्यानें वांटली गेली तर पायीं फिरण्याची आवश्यकता राहणार नाहीं. पण हें ध्यानांत असूं द्या कीं कायदा किंवा दंडशक्तींत कांहीं जादू किंवा सामर्थ्य नाहीं. समाजांत कोणतें हि शांतिकार्य केव्हां च कायद्यानें झालें नाहीं व होणार नाहीं. क्रांति नेहमीं च जनशक्तीकडून होत असते व नंतर त्याप्रमाणें कायदा बनत असतो. या वेळीं हिंदुस्थानला शांतिमय क्रांतीची आवश्यकता आहे. त्यापेक्षां कमी गोष्टीनें काम होऊं शकणार नाहीं.

## दानानें च संपत्ति वाढेल

बंगालमध्यें जवळ जवळ १५० लक्ष एकर जमीन आहे. जनसंख्येच्या मानानें ही कांहीं जास्त नाहीं हें कबूल. पण ही गोष्ट फक्त बंगालची च आहे असें नव्हे तर उत्तर बिहारची हि ही च स्थिति आहे. सबंध सारन जिल्ह्यांत दर चौरस मैलांत एक हजारपेक्षां जास्त लोकसंख्या आहे. याचा अर्थ असा कीं प्रत्येक मनुष्याला अर्धा एकर जमीन. परंतु आम्ही असें म्हणतों कीं १५० लक्ष एकर जमिनीपैकीं २५ लक्ष एकर जमीन आम्हांला द्या. असें कोणी म्हणेल कीं ज्याचेजवळ सहा एकर जमीन आहे त्यांपैकीं त्यानें एक एकर जमीन दिल्यास त्याचें कसें निभेल? पण आम्ही म्हणतों कीं जमिनीचें क्षेत्रफळ कमी झालें म्हणून एक एकर जमीन दिल्यानंतर उरलेल्या उत्पन्नांत घट होण्याचें कांहीं कारण नाहीं. शेतकरी हें जाणतो कीं पांच एकर जमिनींत तो तितकें च खत टाकून व तितकी च मेहनत करून सहा एकर जमिनीचें पीक काढूं शकतो. जपानमध्यें हिंदुस्थानपेक्षां कमी जमीन आहे. तेथें प्रत्येक एकर जमिनीमध्यें दुप्पट पीक काढण्यांत येतें. याकरितां मागें हटण्याची आवश्यकता नाहीं. ‘हरिनाम ले, अपना छेटा

हिस्सा दान दे ' परमेश्वराचें नांव घेऊन त्यानें आपले जमिनीचा सहावा हिस्सा द्यावा. परमेश्वरकृपेनें त्याची संपत्ति वाढेल च. आणि हें हि समजलें पाहिजे कीं गांवांत प्रेमाची वृद्धि झाली आणि दान देणारा व घेणारे यांची एकी झाली तर मजूर अधिक प्रेमानें काम करतील.

बिहारमध्यें असें पाहण्यांत आलें कीं मजुरांजवळ जमीन थोडी पण त्यांत त्यांना इतकें पीक होतें कीं तितकें मोठमोठ्या शेतींत सुद्धां होत नाहीं. कारण मजुरांना जमीन मिळाल्यावर ते स्वतः च तेथें काम करतील इतकें च नव्हे तर त्यांचीं बायका-पोरें हि शेतांत राबतील.

## जमीन मालक कायदा करण्याकरितां तयार होवोत

लोक असें विचारतात कीं आम्हीं जमीन दिली तर बाकी राहिलेल्या जमिनीची उस्तवारी कोण करील ? आम्ही त्यांना म्हणतों कीं लोकांना भूमिहीन करून तुम्हांला मजूर नेहमीं च मिळत राहतील असा तुम्हांला विश्वास वाटतो काय ? अनुभव तर असा आहे कीं ज्याला जमीन मिळते तो आपले जमिनीवर काम करील च आणि तुमच्या हि पण जमिनीवर तो काम करील. त्याला हिश्श्याप्रमाणें काम करावें लागेल आणि तो खुषीनें करील हि. अशा तऱ्हेनें तो तुमची जमीन कृतज्ञतापूर्वक कसून देईल.

परंतु एक गोष्ट कबूल करावी लागेल कीं नेहमीं च मरेपर्यंत तो तुमचे शेतीवर काम करील ही गोष्ट होणार नाहीं. तुम्हांला तुमचे मुलाला शेतीचें काम व त्याबद्दलचें प्रेम शिकवावें लागेल. आज लोक जमिनीचे मालक होतात व शहरांत रहातात. जमीन खेड्यांत आहे त्याकडे ते पहात सुद्धां नाहींत. जमिनीचें दान केल्यास सर्व दृष्टीनें कल्याण होईल. जेव्हां मजूर दुसऱ्याचे जमिनीवर काम करावयास जातात तेव्हां त्याला पूर्ण मजुरी मिळत नाहीं आणि म्हणून च ते काम हि पुरें करीत नाहींत. फार झालें तर आठ तासांपैकीं चार तास काम करतात. मजुरांचे हातांत काम असतें. तो त्या कामाची चोरी करतो आणि मालकाचे हातांत पैसे असतात तो त्याची चोरी करतो. दोघे हि एकमेकांला फसवितात. आणि दोघे मिळून देशाला फसवितात. याचा परिणाम हा होतो कीं आपले देशाचें

पीक कमी होतें. माझें म्हणणें आहे कीं भूदानामुळें हिंदुस्थानची संपत्ति वाढेल, प्रेम वाढेल. ज्या ठिकाणीं लक्ष्मी, शक्ति व प्रेम या तिन हि गोष्टी आहेत त्या ठिकाणीं जगांत अशी कोणती गोष्ट आहे कीं ती मिळूं शकणार नाहीं ?

**बनसुरिया**
४–१–'५५

## अहिंसेचे तीन अर्थ : २ :

आज जगांत हिंसेची शक्ति वाढत आहे. बहुतेक सर्व देश प्राणघातक शस्त्रास्त्रें वाढविण्याकरितां प्रवृत्त झाले आहेत. अशा परिस्थितींत आपण काय करावयाला पाहिजे ? एक तर आम्हीं सुद्धां शस्त्रास्त्रें वाढविलीं पाहिजेत किंवा आम्हीं शस्त्रशक्तीपेक्षां अधिक प्रभावी शक्ति निर्माण केली पाहिजे. आम्ही शस्त्रास्त्रानें सज्ज होण्याकरितां देशाची सर्व शक्ति खर्च करूं तर सैन्यावर कोट्यवधि रुपये खर्च करावे लागतील. अमेरिका किंवा रशियाला गुरु करावें लागेल. त्यांचे पायांपाशीं बसून त्यांचें शिष्यत्व पत्करावें लागेल. त्यांचे तालावर नाचावें लागेल. येथल्या गरीब दरिद्री लोकांची काळजी व त्यांच्या उन्नतीची काळजी वाहणें सोडून द्यावें लागेल. किंबहुना आपलें सर्व लक्ष सैन्याकडे च लावावें लागेल. शिवाय आपला देश दरिद्री आहे म्हणून सर्व जगाशीं झुंजण्याइतकें सैन्य आपण तयार करूं शकणार नाहीं. तेव्हां दुसऱ्या देशाची मदत घ्यावी लागेल. याचा अर्थ हा कीं आमचें स्वातंत्र्य नांवाचें च राहील. वास्तविक दुसऱ्याचे गुलाम म्हणून च रहावें लागेल. आपण जर हिंसेच्या शक्तीवर भरंवसा ठेवला तर आपल्याला हें च करावें लागणार. परंतु हें जर भयानक वाटत असेल तर आपल्याला दुसरी नवी शक्ति वाढवावयाला हवी आणि ती म्हणजे अहिंसा शक्ति.

## अहिंसेचे तीन अर्थ

अलीकडे आम्ही अहिंसेचा अर्थ हिंसा न करणें एवढा च समजतों. परंतु त्याचा इतका च ‘ निगेटिव्ह ’ ( अभावात्मक ) अर्थ नाहीं. त्याचे तीन अर्थ आहेत. पहिला आहे निर्भयता म्हणजे बेडर होणें; दुसरा आहे प्रेम आणि सहकार करणें; तिसरा अर्थ आहे रचनात्मक कार्यांवर विश्वास ठेवणें. आम्ही जर निर्भय होऊन आत्मशक्तीवर विश्वास ठेवूं, प्रेमानें व सहकार्यानें सर्व समाजांत एकी निर्माण करूं व रचनात्मक कार्याला वाहून घेऊं, तर च खऱ्या अर्थानें आमची शक्ति वाढेल. म्हणून या तीन हि गोष्टी आम्हीं केल्या पाहिजेत.

## आम्ही कोणाला भिणार नाहीं व कोणाला भिवविणार हि नाहीं

हिंसेवर भरंवसा ठेवणारे नेहमीं भयभीत असतात. ते शरीराला च आत्मा समजतात. शरीराला कोणीं मारलें किंवा पिटलें तर मारणाराला किंवा पिटणाराला लवकर च शरण जातात. बाप जेव्हां मुलांना मारतो किंवा मास्तर विद्यार्थ्यांना मारतात, तेव्हां ते त्यांना हिंसेला भिण्याचें शिक्षण देतात. हें खरें कीं बाप मुलाला मारतो तो त्याचे बऱ्याकरितां मारतो. परंतु त्यामुळें मुलगा भित्रा होतो. शरीराला कोणी पीडा देईल तर तूं त्याला शरण जा ‘असें च वडीलधारी मंडळी लहान मुलांना शिकवितात. या शिक्षणामुळें मुलें भित्रीं होतात. भिववून जर कोणतें हि चांगलें कार्य झालें तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. निर्भय होऊन च पुढें चाललें पाहिजे. आपल्याला जर अहिंसा वाढविण्याची इच्छा असेल तर आम्ही कुणाला भिणार नाहीं व भिवविणार हि नाहीं. ‘ न भिणें व न भिवविणें ’ हें व्रत घ्यावें लागेल. जो दुसऱ्याला भिववील किंवा धमकी देईल तो स्वतः हि भिईल. म्हणून आम्ही दुसऱ्याला भिवविणार नाहीं व त्याला भिणार हि नाहीं. आम्हांला शाळेंत व विद्यालयांत हें च शिक्षण द्यावें लागेल. गुरुजीनें विद्यार्थ्यांना सांगावयास हवें कीं तुम्हांला भीति दाखवून किंवा धमकी देऊन कोणी हि शिकवील तर तुम्ही त्याचें ऐकूं नका. बाप हि मुलाला सांगेल कीं कोणी धमकी देऊन किंवा सोट्यानें बडवून सांगेल तर त्याचें ऐकूं नका. जर विचारपूर्वक सांगत असेल तर ऐका. कोणीं मारलें, झोडलें, इतकें च नव्हे

कोणीं तुमचा प्राण हि घेतला तरी त्याचें ऐकूं नका. कारण तुम्ही म्हणजे तुमचें शरीर नव्हे. शरीरापासून आत्मा भिन्न आहे. शरीर तर मरणार आहे. जो डॉक्टर औषध देतो त्याचें हि शरीर त्याला सोडून जातें. तेव्हां शरीरावर प्रेम करूं नका. आत्मा म्हणजे मी असें समजून रहा. सारांश, कोणी हि मला मारूं शकत नाहीं, झोडूं, दाबूं शकत नाहीं, असें जो समजतो तो च दुसऱ्याला धमकी देणार नाहीं, दाबांत ठेवणार नाहीं व भिवविणार हि नाहीं. याला म्हणतात अहिंसा.

निर्भयतेचे प्रकार दोन—(१) दुसऱ्याला न मारणें, न भिवविणें आणि (२) दुसऱ्याला न भिणें. इंग्रजांच्या राज्यांत आम्ही इतके भ्यालों होतों कीं साहेबाचें नांव निघतां च आम्ही घाबरत होतों. परंतु एकीकडे इंग्रजांना भीत होतों तर दुसरीकडे हरिजनांना दाबांत ठेवीत होतों. एका बाजूला नमायचें व दुसऱ्या बाजूला नमवायचें. इकडे भीत होतों तर दुसरीकडे भिववीत होतों. उदाहरणार्थ—मांजर उंदराला भिववितें व कुत्र्याला भितें. तर आम्हांला भिणें व भिवविणें ह्या दोन्ही गोष्टी सोडल्या पाहिजेत. देशाला हें च शिक्षण दिलें पाहिजे. याला च 'वेदान्त' किंवा 'आत्मविद्या' म्हणतात. हें च आमच्या भारताचें तत्त्वज्ञान. आम्ही आपल्याला शरीर समजत नाहीं. आम्ही अशीं शेंकडों शरीरें घेतलीं असतील आणि घेऊं हि. शेंकडों शरीरें सोडलीं व सोडूं हि. शरिरांची आम्हांला कांहीं किंमत नाहीं. आम्ही त्याला कपड्यासारखें लेखतों. फाटला तर आम्ही त्याला फेकून देऊं व दुसरा घालूं. थंडीचे दिवस असल्यास कपडा घालूं. उन्हाळ्याचे दिवस असल्यास त्याला फेकून देऊं. आम्ही देशाला सांगूं इच्छितों कीं आपण निर्भय बनूं या. न कोणाला भीति दाखवूं, न कोणाला भिऊं. हा अहिंसेचा विचार आहे. दुसऱ्या देशांत हा विचार नाहीं. तेथें तर बॉंब आहेत व युद्धनौका आहेत. परंतु आपण निर्भय होऊं तेव्हां च आमचें रक्षण होईल व आम्ही सुरक्षित राहूं शकूं. मी बंगालचे तरुणांना विचारतों कीं तुम्हांला भारताची शक्ति वाढविण्याची इच्छा आहे ना? तर निर्भयतेचे च आधारावर ती वाढवितां येईल. 'टेरॉरिझम' दहशतवाद असें शस्त्र आहे कीं कोणी बलिष्ठ येईल तर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत

तो आम्हांला टेरराइझ करील ( भिववील ). म्हणून दहशतवाद सोडून देऊन आपल्याला निर्भय झालें पाहिजे.

## प्रेम व सहयोग वाढवा

आम्हांला प्रेम व सहकारिता वाढविली पाहिजे. आमच्या देशांत युरोपमधून डेमॉक्रसी किंवा गणतंत्र राज्यपद्धति आली आहे. वास्तविक ही पद्धति गणतंत्र नाहीं तर बहुजनतंत्र आहे. त्यानें साऱ्या दुनियेंत मेजॉरिटी व मायनॉरिटी हे दोन पक्ष उत्पन्न केले आहेत. एका पक्षाचें राज्य चालतें तर दुसऱ्याचा विरोध होतो; आणि दोघांचे विरोधानें आग धुमसते. आमचे देशांत आधीं च भाषाभेद, प्रांतभेद, जातिभेद इत्यादि निरनिराळे भेद आहेत. त्यांत आणखी पक्षभेदांची भर पडली. 'पार्टी' म्हणजे 'पार्ट', खंड किंवा तुकडा. वास्तविक मी पूर्ण आहें, अखंड आहें, तुकडा नाहीं. पूर्णमिदं पूर्णमदः । परंतु जेव्हां मी आपल्याला सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट, कॉंग्रेसी, हिंदु, मुसलमान, रामानुजपंथी, नाथपंथी किंवा इतर कोणी आहें असें म्हणतों, किंवा नाहीं असें म्हणतों, तेव्हां मी आपल्याला तुकडा म्हणवून घेतों. असें चालतें तेव्हां सहयोग व प्रेम राहूं शकत नाहीं. मी मानवाहून भिन्न नाहीं. मी फक्त मानव आहें. मला कोणतें लेबल चिकटवलें नाहीं अशी वृत्ति झाली पाहिजे. आम्हांला अशी सर्वोदयाचे तत्त्वाप्रमाणें डेमॉक्रसी बनवायची आहे. ही सर्वांचे मतावर चालेल. त्या च वेळीं निःपक्ष तंत्र किंवा पक्षविहीन तंत्र होईल. याचा च आम्हांला विकास करायला हवा. नाहीं तर आपल्याला दिसून येईल कीं हिंदुस्थानची सर्व शक्ति इलेक्शनमध्यें नाहींशी होईल. मीं एक श्लोक रचला आहे. "यत्र यत्र इलेक्शनं तत्र कार्यं न विद्यते ।" म्हणजे जेथें जेथें इलेक्शन तेथें कार्य होणार नाहीं, कार्याचा नाश होईल. परस्परप्रेम रहाणार नाहीं. एकमेकांविषयीं मनांत संशय व किल्मिष निर्माण होईल. अंतःकरणें जुळणार नाहींत, विरुद्ध जातील, अलग अलग होतील. आम्हीं तर म्हटलें आहे कीं भारतांत आर्य, अनार्य सर्वजण या– "एशो हे आर्य एशो अनार्य शुचि कर मन." पण एवढी च शर्त आहे कीं मन शुद्ध, पवित्र असूं द्या. सगळे या. आमचें सर्वांवर प्रेम आहे. हा प्रेमविचार भारताचे मोठे ऋषि रवींद्रनाथ ठाकूर यांनीं दिला

आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं परस्परसहयोगानें रहा, प्रेमानें रहा, तेव्हां च आम्ही पुढें जाऊं. त्यांनीं याप्रमाणें पक्षभेद, पंथभेद, इत्यादि भेदांना सडकून काढलें आहे. आम्हीं सुद्धां भेदासुराचा नाश करायला हवा. येथें दुर्गा-देवीची भक्ति करतात. ती भेदासुराचा नाश करणारी आहे. तिला महिषासुरमर्दिनी म्हणतात. आम्हांला या भेदरूपी महिषासुराचा नाश करायचा आहे. दुर्गा ही भारताची देवता आहे. तिच्यासाठीं च आम्हीं वंदे मातरम् हा मंत्र निर्माण केला आहे. आमची अशी इच्छा आहे कीं ही च दुर्गादेवी भेदासुरमर्दिनी व्हावी.

**गणतंत्र नाहीं, गुणतंत्र**

आम्ही जर मनुष्यामनुष्यांत भेद करणार नाहीं तर हें ‘ गणतंत्र ’, ‘ गुणतंत्र ’, ‘ सद्गुणतंत्र ’ होईल. तेव्हां सद्गुणांची किंमत केली जाईल. फक्त संख्येची नाहीं. आज ५१ विरुद्ध ४९ असे ठराव पास होत असतात. ह्या गणतंत्राला मी अवगुणतंत्र म्हणतों. ४९ आणि ५१ मिळून १०० होतात. आणि आमची इच्छा आहे कीं १०० मिळून काम करावें. आमचेकडे पूर्वीं ग्रामपंचायत असे. ती आमच्या देशाची फार मोठी देणगी आहे. आज जगांत ज्या राजनीतीच्या परंपरा चालल्या आहेत त्या सर्वांहून हिंदुस्थानची ग्रामपंचायत आपलें वैशिष्ट्य राखते. यांत पांचां-मुखीं परमेश्वराची गोष्ट मान्य केली जात असे. त्या वेळीं सर्व हिंदुस्थान देशांत ही च तऱ्हा चालू होती. पांच मिळून जर बोलले तर ठराव पास होत असे. परंतु आतां पाहतों तर ‘ चारमुखीं परमेश्वर ’. ‘ तीनमुखीं परमेश्वर ’ म्हणजे तीन विरुद्ध दोननीं ठराव पास होत असतात. आम्ही म्हणतों असा ठराव फेल आहे. पांच मिळून च ठराव पास झाला पाहिजे. ही च गोष्ट फिरून हिंदुस्थानांत आणायला हवी. प्रेम व सहकार्यानें च गणतंत्र चालेल. प्रेम व सहयोगानें च सर्व कारभार चालला पाहिजे. याशिवाय हिंदुस्थानांत आणि जगांत अहिंसा टिकणार नाहीं.

हिंदुस्थानांत चौदा भाषा आहेत. त्या सर्व मिळून एक देश झाला आहे. कन्याकुमारीपासून कैलासपर्यंत ह्या चौदा भाषायुक्त एक देश बनविला आहे. तेथल्या लोकांवर युरोपची नकल न करण्याची जबाबदारी

आहे. युरोप आमचे मागें आहे. आम्ही त्यांचे पुढें आहों. युरोपमधला स्वित्झरलंड बांकुरा व मेदिनीपुर या दोन जिल्ह्यांच्या एवढा भाग होतो. बेल्जियम म्हणजे आणखी दोन चार जिल्हे मिळून एक भाग. तेथें असे लहान लहान भाग राष्ट्र समजले जातात. युरोपमध्यें एक लिपी व एक धर्म आहे. एका भाषेहून दुसऱ्या भाषेंत फार च थोडा फरक आहे. कोणी हि इटालियन फ्रेंच शिकतों म्हणेल तर १५ दिवसांत शिकूं शकतो. तेथें इतकें साम्य आहे. तरी निरनिराळीं राष्ट्रें निर्माण झालीं आहेत. आणि आपण तर एक देश निर्माण केला आहे. अशा रीतीनें सामाजिक विचारांत आम्ही पुढें आहोंत आणि युरोप मागें आहे. म्हणून च आम्हांला युरोपचें अनुकरण करावयाचें नाहीं. आम्हांला सर्वोदय, लोकशाही, सर्वगणतंत्र बनवावें लागेल. तेव्हां च अहिंसेची शक्ति वाढेल. सारांश, प्रथम आम्हांला निर्भय झालें पाहिजे, व दुसरी गोष्ट ही कीं प्रेम व सहकाराचे आधारावर सरकार स्थापन केलें पाहिजे.

### रचनात्मक कार्यावर श्रद्धा

तिसरी गोष्ट ही कीं रचनात्मक कार्यावर श्रद्धा ठेवणें. त्यांचीं शस्त्रें डिस्ट्रक्टिव्ह ( विनाशक ) तर आमचीं शस्त्रें कन्स्ट्रक्टिव्ह ( रचनात्मक ). ते तलवार घेऊन येतील तर आम्ही त्यांचेसमोर वीणा घेऊन जाऊं. ते रागानें बोलतील, आम्ही प्रेमानें उत्तर देऊं. त्यांची वाणी कठोर राहील तर आम्ही मधुर भाषण करूं. आम्हांला असत्याला सत्यानें, शस्त्राला वीणेनें, मोठमोठ्यानें ओरडणाऱ्यांना गायन व भजनानें आणि विध्वंसक कार्याला रचनात्मक कार्यानें जिंकावें लागेल. आम्हांला अशा रीतीनें रचनात्मक श्रद्धा ठेवावी लागेल. सारांश, निर्भयता, प्रेमयुक्त सहयोग व रचनात्मक कार्यांत श्रद्धा या तिन्ही गोष्टी जेव्हां एकत्र होतील तेव्हां च अहिंसेची शक्ति वाढेल. ह्या शक्तीची आम्ही या देशांत वाढ करूं तर च आम्ही जगाशीं टक्कर देऊं शकूं.

**बांकुरा**
७-१-'५५

# भूदान-यज्ञ म्हणजे सामाजिक समाधीचें कार्य : ३ :

[ ज्या ठिकाणीं श्रीरामकृष्णपरमहंसांस समाधि लागली होती त्या स्थानावर बसून विनोबाजींनीं खालीं दिलेले उद्‌गार प्रकट केले. ]

आम्ही अशा स्थानावर बसलों आहोंत कीं जेथें आम्हां सर्वांची समाधि लागली पाहिजे. महापुरुषांच्या जीवनांतील अनुभवांना सामाजिक रूप देणें हें माझ्यासारख्या सेवकाचें काम आहे. समाधीमध्यें जसें कांहीं दुःख नसतें तसें च सामाजिक समाधींत हि क्लेश नसायला हवेत. आज आमच्या समाजांत व दुनियेंत किती प्रकारचे क्लेश, संघर्ष व झगडे चालू आहेत ! आम्ही जर या झगड्यांपासून मोकळे होऊं तर आम्हांला सामाजिक समाधीचें समाधान मिळूं शकेल.

## श्रीरामकृष्ण संग्रहाला पाप मानीत असत

भांडवलशाही समाजांतल्याप्रमाणें एका ठिकाणीं सांचलेल्या संपत्तीनें समाजाचें काम होत नाहीं. पण प्रत्येकाचे घरीं ती पोंचविण्यानें च समाजाला कल्याणकारक होऊं शकतें. त्याप्रमाणें च व्यक्तीच्या समाधीनें मार्गदर्शन तर मिळेल पण त्याचा लाभ जर समाजाला मिळाला तर त्याची पातळी उंच होईल. रामकृष्णपरमहंस सोन्याला शिवत नसत. सोन्याचा स्पर्श होतां च त्यांना विंचूनें दंश केल्याप्रमाणें वेदना होत असत. सोन्याचा कांहीं च दोष नाहीं. सारी दुनिया च परमेश्वररूप आहे. तेव्हां सोन्यांत हि परमेश्वराचें रूप आहे. म्हणून तें निर्दोष आहे. तरी सुद्धां रामकृष्णांना सोन्याचा स्पर्श सहन होत नव्हता. म्हणजे ते सोन्याचे संग्रहाला किंवा एका च ठिकाणीं सांठून ठेवण्याला पाप समजत होते. म्हणून त्यांना त्यापासून वेदना होत असत.

## वितरित कांचन म्हणजे परमेश्वराची विभूति

एखाद्या आळशी माणसाला जर जंगलांत एक शेर सोन्याचा दगड मिळाला तर तो आपले आयुष्यभर श्रम न करतां च राहील. त्याचें जीवन

कांहीं काम केल्याशिवाय च जाईल. अशानें आळशी माणसाला उत्तेजन च मिळेल आणि समाजाची संपत्ति एका ठिकाणीं च जमल्यामुळें समाजाला त्रास होईल.

परंतु जर धन वांटलें गेलें तर प्रत्येक घरांत त्याचा लाभ होईल, आणि हानि तर मुळीं च होणार नाहीं. धनाचे वटवड्यामुळें तें परमेश्वराची विभूति बनेल. त्यांत तुम्ही परमेश्वराचें रूप पहाल. त्या वेळीं सोन्याचा स्पर्श हा विंचवाच्या नांगीप्रमाणें न होतां नारायणाप्रमाणें होईल.

आम्ही संपत्तीला द्रव्य म्हणतों. द्रव्य याचा अर्थ वाहणारा, द्रवरूप, म्हणजे पातळ पदार्थ. जर पाण्याचा प्रवाह वाहत असेल तर तें स्वच्छ निर्मळ होतें. त्या च प्रमाणें धन जर द्रवरूप धरून वाहत असेल तर तें स्वच्छ, निर्मळ होईल. पाण्याचें वहाणें बंद होऊन तें जर डबक्यांत सांचेल तर त्याची घाण सुटेल. त्या च प्रमाणें धन न सांचतां जर वाहत राहून दुसऱ्या जागीं पोहोंचेल तर तें गंगानदीप्रमाणें पवित्र होईल.

सारांश, या महापुरुषानें ( रामकृष्णपरमहंसांनीं ) आपल्या जीवनापासून आम्हांला अशी शिकवण दिली कीं क्लेशरहित समाधि मिळूं शकते आणि धनाचे संचयापासून आम्ही मुक्त होऊं शकतों. आमचा असा दावा आहे कीं आम्ही समाजांतील दुःखाचा नाश व त्या च प्रमाणें समाजांत संपत्तीची वांटणी हीं कामें करीत आहोंत. म्हणून च आम्हांला भगवान् रामकृष्ण-परमहंसांचा मंगल आशीर्वाद अवश्य मिळेल.

**विष्णुपूर**

१०-१-'५५

## कर्म, ज्ञान व भक्तीचा त्रिवेणीसंगम : ४ :

आतां येथें एक पत्र वाचून दाखविण्यांत आलें. त्यांत येथल्या वैष्णव-बंधूंकडून दुःख प्रकट करण्यांत आलें आहे. बंगालमध्यें च काय पण सर्व हिंदुस्थानभर वैष्णवसमाजानें भक्तिभावाची गंगा वाहवली आहे. बंगालमध्यें तर साधी एक विशेष वृत्ति च प्रकट झाली. त्यासंबंधीं मीं कांहीं गोष्टी सांगितल्या. त्यामुळें येथल्या वैष्णवसमाजाला दुःख झालें असें दिसतें. शक्य आहे कीं बंगालच्या आणखी हि कांहीं ठिकाणीं असा च परिणाम झाला असेल. म्हणून उत्तरें देण्यापूर्वीं माझें पहिलें काम वैष्णवसमाजाची क्षमा मागणें हें आहे.

### भक्ति आणि विवेकाची भाषा

आपल्याला माहीत आहे कीं मीं जेव्हां बंगालमध्यें प्रवेश केला त्या च वेळीं पहिल्या दिवशींच्या व्याख्यानांत सांगितलें कीं बुद्ध भगवानांची भूमि सोडून आतां चैतन्यमहाप्रभूचे भूमीवर मी येत आहें. म्हणून मी येथल्या वैष्णवसमाजाला दिलासा देतों कीं त्यांचा चैतन्यमहाप्रभूबद्दल जितका आदरभाव असेल त्यांत मी सुद्धां सामील आहें. मी तर स्वतःला त्यांचे चरणांचा रजःकण समजतों. जरी मी कोणत्या हि व्यक्तीला परिपूर्ण मानत नाहीं तरी चैतन्यमहाप्रभूविषयीं माझे मनांत अत्यंत आदर आहे. महमद पैगंबरचे अनुयायी ( मुसलमान ) म्हणतात कीं महमद पूर्ण पुरुष होते, आणि त्यांच्यांत कोणत्या हि तऱ्हेनें पूर्णतेचा विकास होण्याचें राहिलें नव्हतें. खिस्ताचे अनुयायी ( खिस्ती ) हि खिस्ताला परिपूर्ण मानीत होते. अशा तऱ्हेनें निरनिराळ्या महापुरुषांचे अनुयायी आपापल्या महापुरुषास परिपूर्ण समजतात, जवळ जवळ परमेश्वरस्वरूप च मानतात. परंतु शिष्याचे मनांत आपले गुरुविषयीं पूर्ण भावना असणें मी समजूं शकतों. लहान मुलाचे मनांत आपले आईविषयीं अशी च परिपूर्णतेची भावना असूं शकते व ती त्याला शोभते हि. या बाबतींत इस्लामनें ज्या गोष्टी सांगितल्या

त्या मला अत्यंत महत्त्वाच्या वाटतात. त्यानें म्हटलें आहे कीं महमद एक मनुष्य होता. त्याला ईश्वराची पदवी लागूं शकत नाहीं. **'ला एलाहा इल्लल्लाह, महमद अलरसूल अल्लाह'** म्हणजे अल्ला एक च आहे. त्याची जागा कोणी च घेऊं शकत नाहीं. महमद पैगंबर सुद्धां त्याचा संदेश आणणारा सेवक मात्र आहे.

परंतु आमच्या भारतामध्यें जी गुरुपरंपरा चालू आहे त्यांत असा समज आहे कीं त्या त्या परंपरांचे गुरु हे सर्व तऱ्हेनें परिपूर्ण व ईश्वर च होते. ही भाषा किंवा असें म्हणणें हे भक्तीचें लक्षण आहे. इस्लाममध्यें जी भाषा बोलली आहे ती विवेकाची आहे. मी विवेकाचे भाषेला प्राधान्य देतों आणि भक्तीचे भाषेला गौण मानतों. मला गांधीजींचे कांहीं असे अनुयायी मिळाले कीं ज्यांचा असा विश्वास होता कीं गांधीजींत परिपूर्ण मानवता उमटली होती यापेक्षां जास्त विकास होण्याला अवकाश नव्हता. मला हें कबूल आहे कीं अशा तऱ्हेनें कोणत्या हि मनुष्याला अत्यंत परिपूर्ण मानण्याला माझी बुद्धि तयार नाहीं. तरी सुद्धां शिष्य या नात्यानें मी आपल्या गुरूला किंवा आईला परिपूर्ण मानावयास तयार आहें. आम्ही दगडाला सुद्धां परिपूर्ण समजून त्याला भगवानाची मूर्ति म्हणतों व पूजा करतों. तेव्हां लोक महापुरुषांना परिपूर्ण समजतात तर त्यांना विरोध करण्याची कांहीं च आवश्यकता नाहीं.

## विचार उत्तरोत्तर विकासशील असतो

एवढें स्पष्टीकरण केल्यानंतर मला म्हणावयाचें आहे कीं महाप्रभूनें जो प्रवाह वाहविला तो गंगेप्रमाणें पवित्र आहे. परंतु गंगाप्रवाह होणें आणि समुद्र होणें या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. गंगा-प्रवाह समुद्र होऊं शकत नाहीं म्हणून दुनियेंत जे कांहीं जीवनविचार प्रकट होतात त्यांच्या एकेक अंगाचा विकास होत असतो व कांहींचा विकास होण्याचें बाकी राहतें. कोणत्या हि एका चिंतनप्रवाहानें किंवा एका पंथानें च विचार परिपूर्ण दशेला प्राप्त झाला असता तर मानवसृष्टीकरतां कांहीं काम करण्याचें बाकी राहिलें नसतें, मानवसमाज मुक्त झाला असता आणि समाज नष्ट झाला

असता. या च कारणामुळें आणि भगवान् बुद्धाचे उपदेशानंतर चैतन्यमहाप्रभूची गरज भासूं लागली.

भगवान् बुद्धांत जर संपूर्ण परिपूर्णता राहती तर चैतन्यमहाप्रभूची गरज च नसती. म्हणून असें समजलें पाहिजे कीं समाजांत विचारांचा उत्तरोत्तर विकास होत असतो. एकेका विभागाचे विकासानें परिपूर्णतेकडे जाण्याचा प्रयत्न होत आहे. आज कोणत्या हि विचारांत परिपूर्णता आली असें नाहीं. या बाबतींत वैज्ञानिकांचा दृष्टिकोण समजून घेऊन अनुकरण करण्यासारखें आहे. वैज्ञानिक समजतात कीं विज्ञान हें अनंत आहे आणि आम्हांला त्यांतील फार च थोडें कळलें आहे. आजच्या उत्तमोत्तम वैज्ञानिकाजवळ हि विज्ञानाचा एक अंश च आहे. आत्मानुभवाबद्दल हि असें च म्हणावें लागेल. म्हणून आत्मानुभव हा सर्वांगानें परिपूर्ण झाला व त्यांत प्रगति किंवा विकास होण्याची जरूरी नाहीं असें समजूं नये.

## भक्तीचे आधारावर मुक्तीची शक्यता

भक्तिभावाचे आधारावर शेवटच्या सीमेवर पोचणें शक्य आहे हें मला मान्य आहे. जशी नदी समुद्राला मिळाल्यावर ती अंतिम सीमा गांठूं शकते तद्वत् मनुष्य सुद्धां चिंतनप्रवाहांत वाहून पूर्णतेपर्यंत पोंचूं शकतो. म्हणून कीर्तनाची हि परिपूर्णता कोणाचे जीवनांत जर येईल तर त्याच्यांत इंद्रियनिग्रह व योगभक्ति उत्तम दिसेल हें मी मानतों. त्या वेळीं ज्ञानाचा उत्तम अनुभव येईल आणि कर्मयोग हि बऱ्या च प्रमाणांत दिसून येईल. आणि तो म्हणेल कीं मला नामसंकीर्तन च पुरेसें आहे तर मला तें मान्य आहे. परंतु असें जेव्हां म्हटलें जातें त्याचा अर्थ हा च कीं त्या व्यक्तीचे जीवनांत नामसंकीर्तनाशिवाय दुसरी कोणती हि गोष्ट बसली पाहिजे. तो जेवील तर नामभोजन च करील, पाणी पिईल तर नाम च पिईल आणि विचार करील तर नामाचा च विचार करील. त्या मनुष्याच्या जीवनांत कोणत्या हि तऱ्हेची माया, मोह व आसक्ति राहणार नाहीं. तो जें जें पाहील त्यांत त्याला हरिरूप च दिसेल. त्याला जर कडू रस दिला तर तो म्हणेल कीं 'मी नामरस च पीत आहें' आणि गोड रस प्यायला दिला तर

तो म्हणेल, ' नामरस च पीत आहें.' त्याच्यावर अपमानाचा पाऊस पडत असला तरी तो म्हणेल कीं, ' हरिकृपेचा च पाऊस पडतो ' आणि त्याचा मानसन्मान झाला तरी म्हणेल, ' हरिकृपेचा पाऊस पडत आहे. ' खरोखरी च असा मनुष्य फार च धन्य होय. आणि त्याचेसंबंधीं माझी पूज्य भावना च राहील आणि मनांत दुसरी कोणती हि भावना त्याचे-विषयीं येणार नाहीं.

### ज्ञान, भक्ति व कर्म यांचे समन्वयानें समाजाची प्रगति

परंतु सर्व समाजाच्या प्रगतीचा प्रश्न येतो तेव्हां कोणत्या हि एका विचाराला व गुणाला समोर ठेवून काम चालत नाहीं. एका गुणाचे विकासानें समाजांत एककल्लीपणा येईल. मीं सांगितलें च आहे कीं भक्ति-भावनेंत मग्न होऊन स्वतःला विसरण्यानें व नामसंकीर्तनांत रंगून जाण्यानें जीवन परिपूर्ण होऊं शकत नाहीं. त्याचें समाजांत प्रत्यक्ष परिवर्तन पुरुषार्थांत झालें पाहिजे ही गोष्ट मीं पहिल्यादां च सांगितली किंवा नव्यानें सांगितली असें नव्हे. उपनिषदांत हि म्हटलें आहे कीं ' ब्रह्मज्ञानी हा सर्वांत श्रेष्ठ व परिपूर्ण पुरुष आहे. ' तरी हि या च संबंधांत तेथें असें एक वाक्य आहे. त्यामुळें च त्यांतली सूक्ष्म बुद्धि दिसून येते. तेथें म्हटलें आहे कीं ब्रह्मज्ञाना-मध्यें जो क्रियावान तो च श्रेष्ठ, " **क्रियावान एव ब्रह्मविदां वरिष्ठः ।** " सारांश, ज्ञानयोगामध्यें जर फलत्यागाची दृष्टि नसेल आणि त्याच्या ज्ञानाची कर्मयोगांत परिणति झालेली दिसणार नाहीं तर त्याला अपूर्ण च समजलें पाहिजे. ज्ञानरहित केवल भक्ति निष्क्रिय किंवा जड होऊं शकते. केवळ भक्तिरहित ज्ञान शुष्क, रूक्ष व क्रियाहीन होऊं शकतें. मला जर कोणी असें म्हणेल कीं आपण क्रियाशीलतेचा इतका महिमा सांगतां तर जो कोणी क्रियाशील तो परिपूर्ण होईल काय ? तर मी सांगेन कीं ' नाहीं. ' क्रियाशील मनुष्यसुद्धां भक्तिभावानें व ज्ञानानें युक्त नसला तर त्याच्यांत अहंकार व आसक्ति येऊं शकते, अशा क्रियाशीलतेंत परिपूर्णता नाहीं, ती अपूर्ण च आहे.

### युरोपला ज्ञानभक्तीची आवश्यकता

याचें उदाहरण युरोपांत पहावयाला मिळतें. तेथें क्रियाशीलता इतकी वाढली आहे कीं लोकांना वेळ च मिळत नाहीं. ते म्हणतात, ' टाईम इज

मनी ' म्हणजे वेळ हें धन आहे. ते प्रत्येक क्षण कांहीं तरी काम करण्यांत घालवितात. तरी हि अमेरिकनांची किंवा युरोपियनांची हीं क्रियाशील शक्ति अहंकारमय झाली आहे. कारण त्यांत भक्तीनें येणारी नम्रता नाहीं. किंवा आत्मज्ञानाची निष्ठा हि नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं अमेरिकन मनुष्य तमाम दुनियेला वांचविण्याची बढाई मारतो. अमेरिकेचा प्रेसिडेंट म्हणतो कीं, ' आशियांतील राष्ट्रांना वांचविण्याची व त्यांची स्वतंत्रता कायम ठेवण्याची जबाबदारी आमचेवर आहे.' याचा अर्थ दुनियेंत परमेश्वर नाहीं च व दुनियेचें जीवनचक्र चालविण्याची जबाबदारी युरोप व अमेरिकेवर च आहे. आणि आशिया खंडांतील देशांना अक्कल नाहीं व सर्व अक्कलेचें भांडार अमेरिका व युरोपला परमेश्वरानें देऊन ठेवलें आहे. सारांश, फक्त क्रियाशील होऊन विकास होत नाहीं. उलट जीवन एकांगी व विकृत होईल. मी जर युरोप-अमेरिकेंत फिरतों आणि मला बोलण्याची संधि मिळाली असती तर मीं तेथें वैष्णव धर्म व आत्मनिष्ठा यांचा महिमा गायिला असता. पण मी तर अशा देशांत हिंडत आहें कीं जेथें भक्तीचा प्रवाह वाहिला आहे व आत्मज्ञानाचा हि विकास झाला आहे. म्हणून येथें ज्याची कमतरता आहे त्याकडे लक्ष देणें व वेधणें हें माझें कर्तव्य आहे.

### चैतन्यांचे युगाला धरून भव्य कार्य

आतां एका श्लोकांत म्हटलें आहे कीं कलियुगांत हरिकीर्तनानेंच काम होऊन जातें. " **कलौ तत् हरिकीर्तनात् ।** " याचा अर्थ हा च कीं कलियुग दुबळ्यांचें युग आहे. ज्या युगांत दुबळेपणा व आसक्ति वाढली आहे त्या युगांत कीर्तनानें आसक्तीपासून मुक्त झालें पाहिजे. दुर्बळ मनुष्यांना म्हटलें कीं बंधूंनो, या युगांत आणखी कांहीं करूं शकत नसाल तर हरकत नाहीं, निदान हरिनामसंकीर्तन करा. त्याबरोबर च आणखी हि कांहीं गोष्टी येतील. याचा अर्थ एवढा च कीं आम्हांला एक आश्वासन दिलें गेलें. याचा निरनिराळ्या युगांकरितां गुणांची वांटणी केली आहे असा अर्थ केव्हां हि करतां उपयोगी नाहीं. कलियुगांत हा, द्वापारांत हा, अशा तऱ्हेनें गुणांची वांटणी कधीं च करूं नये. समाजाच्या स्थितीचें निरीक्षण करून कोणत्या ना कोणत्या गुणाला महत्त्व द्यावयाचें एवढा च त्याचा अर्थ !

ज्या युगांत अध्यात्माची जरूरी आहे त्या युगांत त्याला च महत्त्व दिलें जातें. ज्या युगामध्यें आमच्या देशांत जेथें पहावें तेथें लोक भोग-विलासांत डुंबून गेले होते, शृंगार हा श्रेष्ठ रस समजला जात होता, आणि त्यामुळें सर्व लोक निर्वीर्य झाले होते, त्या युगांत त्यांना राधा-कृष्णाचे भक्तीची प्रेरणा देऊन फार मोठें कार्य करण्यांत आलें. ज्यांना हिंदुस्थानांतील साहित्याचा परिचय असेल त्यांना माहीत आहे कीं मध्ययुगांत संस्कृत साहित्यांत जितका अश्लील प्रवाह वाहत होता तितका इतर कोणत्या हि भाषेंत दिसणें अशक्य आहे. ह्या परिस्थितींत ज्यांनीं शृंगारभाषेला भक्तिभाषेचें रूप दिलें त्यांनीं खरोखरी च मानवजातीला ऱ्हासापासून वांचविलें. ज्या काळांत सर्वत्र उच्चनीचभाव होता, ब्राह्मण श्रेष्ठ व शूद्र कनिष्ठ असे भेदभाव होते, म्हणजे जातिभेद रूढ होता, आणि त्यांचेवर मुसलमान हल्ला करीत होते, त्या काळांत भक्तीचे नांवाखालीं समता स्थापन करणाऱ्यांनीं खरोखरी च मानवजातीवर उपकार केले आहेत. आसक्त मनुष्याला भक्तीची प्रेरणा देण्याचें व उच्चनीचभाव बाळगणारांना समतेची दृष्टि देण्याचें महान् कार्य चैतन्यमहाप्रभूनें मध्ययुगांत केलें हिंदुस्थान देशावर त्यांचा हा मोठा उपकार आहे.

**मामनुस्मर युद्धच च**

चैतन्यमहाप्रभूनें आपणांला जे उत्तम गुण दिले त्यांना अंतःकरणांत बळकट धरून त्यांचा पुढें विकास करायला हवा. पूर्वजांनीं जो आम्हांला ठेवा दिला त्यांत आम्हीं अधिक भर घातली पाहिजे. आपणां सर्वांनीं गीतेंतलें तें वाक्य ऐकलें असेल. वैष्णव सुद्धां गीता मानतात. गीता म्हणते, " **मामनुस्मर युद्धच च** " म्हणजे 'माझें स्मरण कर व झुंझत रहा.' अशा रीतीनें त्यांत परमेश्वर-स्मरणाबरोबर च युद्धाला, कर्मयोगाला जोडून दिलें. कोणी म्हणेल कीं ईश्वरस्मरण च पुरे आहे. त्यांत सर्व कांहीं आलें. तर हें व्यक्ति या नात्यानें ठीक आहे असें मी समजायला तयार आहें. पण सर्व समाजासमोर एखादी गोष्ट ठेवावयाची तर असें च म्हणावें लागेल कीं ईश्वरस्मरणाबरोबर त्यानें जी आम्हांला बुद्धि दिली आहे तिचा उपयोग करून सतत कर्म करायला हवें आणि गीतेनें हि म्हटलें आहे कीं " सततं

कीर्तयन्तो माम् " भक्त सतत कीर्तन करतात. एवढें च म्हणून गीता स्तब्ध राहिली नाहीं तर पुढें जोडून दिलें, "यतन्तश्च दृढव्रताः" म्हणजे जो अत्यंत निश्चयपूर्वक प्रयत्न करतो, पौरुष करतो. तर नारदमुनि माझे-समोर उभे राहिले असते आणि म्हणाले असते कीं, "तूं काय म्हणतोस ? मी सतत कीर्तन करतों, तें काय पुरेसें नाहीं ?" तर मी त्यांचे चरणांवर मस्तक ठेवून म्हटलें असतें कीं, "हें आपल्याकरितां पुरेसें आहे." पण मी नारदांना असें हि म्हणण्याचें धारिष्ट करीन कीं जर सर्व समाजाकरितां कीर्तन करावयाचें तर त्याबरोबर च कर्मयोग जोडून द्या. मला विश्वास आहे कीं नारदमहाराजांनीं माझें म्हणणें कबूल केलें असतें.

## भक्तिमार्गाचे विचारांत सुधारणा आवश्यक

जेव्हां मी सामाजिक जीवनासंबंधीं बोलतों तेव्हां त्यांतील गुणांचा समन्वय करावा लागेल. केवळ एका गुणाचे वृद्धीनें व्यक्तीचें कल्याण होईल पण समाजाचें होणार नाहीं. 'कीर्तन च पुरे नाहीं का ?' असें जे लोक विचारतात त्यांना मी विचारूं इच्छितों कीं आपण कीर्तन करतां मग जेवतां काय म्हणून ? कीर्तन च करा. जर कीर्तनाबरोबर जेवण्याची गरज आहे तर जेवूं घालण्याची हि जरूरी नाहीं काय ? वैष्णव कीर्तनांत तन्मय होऊन दंग होतात तर मी त्यांना विचारीन कीं आपण लग्न काय म्हणून करतां ? जर कीर्तनाबरोबर लग्न होऊं शकतें तर संयमाची हि आवश्यकता नाहीं काय ? मी असे कीर्तन करणारे पाहिले आहेत कीं जे भक्ति करतां करतां नाचतात, उड्या मारतात. परंतु मी जेव्हां दान मागतों तेव्हां ते इतके कंजूष होतात कीं त्यांचे हातून दान सुटूं शकत नाहीं.

हें फक्त हिंदुस्थानला च लागू नाहीं. जितके भक्तिसंप्रदाय आहेत त्या सर्वांत ही च गोष्ट दिसून येते. युरोपमध्यें सुद्धां असे ख्रिस्ती दिसतात कीं जे म्हणतात कीं ख्रिस्ताला शरण गेलां तर च मुक्ति मिळेल, इतरांना मिळणार नाहीं. मी त्यांना विचारतों कीं ख्रिस्ताला शरण जाण्यांत असें काय आहे कीं ज्यामुळें मुक्ति मिळते व इतरांना शरण गेल्यावर मिळत नाहीं ? यावर ते म्हणतात कीं जे ख्रिस्ती होत नाहींत त्यांना सतत पुण्याचें आचरण करावें लागतें व जे ख्रिस्ती होतात त्यांनीं पाप केलें तरी त्यांना पुण्य मिळेल.

दुनियेच्या पापाकरितां खिस्तानें आपलें बलिदान दिलें. म्हणून त्याच्या अनुयायांना पुण्याचरणाची जरूरी नाहीं; सबब तो पाप करीत असतांना सुद्धां त्याला मुक्ति मिळेल. अशा रीतीनें असल्या विचारांचा दोष सर्व भक्तिमार्गांत आला आहे. बंगालचा भक्तिमार्ग याला अपवाद नाहीं. म्हणून मी नम्रतापूर्वक सांगूं इच्छितों कीं भक्तिमार्गाचे विचारांत सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

कलियुगांत कीर्तन करण्याबद्दल जें म्हटलें आहे त्यांत ' कीर्तन ' याचा अर्थ ' कृति करण्याची प्रेरणा.' ' कृति ' शब्दापासून ' कीर्ति ', ' कीर्तन ' शब्द बनले आहेत. ज्या कोणाला प्रेरणा होईल तो कीर्तन करील. कीर्तनाबरोबर कर्मयोग हि केला पाहिजे. कीर्तन करून आम्हांला कृतीची प्रेरणा मिळेल. आपण पाहिलें आहे कीं चैतन्यमहाप्रभूचें जीवन किती पवित्र होतें. ते सबंध हिंदुस्थानांत जागोजागीं जाऊन चित्तशुद्धि करण्याकरतां सांगत असत. आणि सतत हें कार्य करून आत्मप्रभुमय झाले. म्हणून माझें असें नम्र मत आहे, अशी नम्र प्रार्थना आहे, कीं आम्हां हिंदवासीयांना ही जी शिदोरी मिळाली आहे, जी संपत्ति मिळाली आहे, ती जरी समृद्ध आहे तरी हि त्यांत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

## सर्व गुणांचा विकास हें कर्तव्य

गीतेंत म्हटलें आहे कीं, " **श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ।** " लोक शुष्क यम, नियम, प्राणायाम करीत बसतात. त्यापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे. आसन-प्राणायामानें व्यायाम होतो. हा सात्त्विक व्यायाम आहे. चांगला आहे. पण एवढ्यानें च बुद्धीची जडता दूर होत नाहीं. म्हणून म्हटलें आहे कीं त्यापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे. परंतु ज्ञानाचें नांव काढल्याबरोबर मनुष्य निष्क्रिय होतो. तो तर्क करीत बसतो. त्यांत शुष्क वादविवाद व पांडित्य येतें. म्हणून च ज्ञान्यांपेक्षां भक्त पुढें आहे. " **ज्ञानात् ध्यानं विशिष्यते ।** " परंतु ध्यानांत मनुष्य मग्न असला कीं तो निष्क्रिय होतो आणि जेव्हां ध्यानभंग होतो तेव्हां त्याला क्रिया करावी लागते. गीता पुढें सांगते, " **ध्यानात् कर्मफलत्यागः ।** " म्हणून ध्यानापेक्षां सुद्धां फलत्यागयुक्त कर्म श्रेष्ठ आहे. मी मान्य करितों कीं श्रेष्ठकनिष्ठ हा भाषाप्रयोग ठीक नाहीं. त्यापेक्षां अनेक

गुणांचा विकास करावयाला पाहिजे ही भाषा च योग्य. आत्म्यामध्यें अनेक शक्ति आहेत. तेव्हां आम्हांला एका च गुणाचा विकास करावयाचा नाहीं.

## स्वतःला संपत्तीचे मालक समजणारे वैष्णव नव्हेत

आज सकाळीं रामकृष्णांच्या समाधिस्थानावर मीं म्हटलें होतें कीं, रामकृष्णपरमहंसांना कांचन म्हणजे सोन्याचा स्पर्श सहन होत नसे. त्यांच्या च मार्गाचें अनुकरण करून मी सामूहिक 'कांचनमुक्ती' चा प्रयोग करीत आहें. म्हणून मीं म्हटलें होतें कीं भगवान् रामकृष्ण-परमहंसांचा आमच्या कामांत आशीर्वाद मिळेल. हें च मी चैतन्यमहा-प्रभूसंबंधानें हि म्हणत आहें. त्यांचा हि आशीर्वाद या कामांत मिळेल. त्यांची जर प्रेरणा नसती तर बंगालमध्यें इतके सर्व बंधु माझें म्हणणें ऐकण्याकारितां आले नसते. म्हणून ज्या वैष्णवशिष्यांना माझे शब्दामुळें दुःख झालें असेल त्यांची मी पुन्हा क्षमा मागतों आणि आशा करतों कीं ते या भूदानयज्ञांत पूर्ण सहयोग देऊन आपली वैष्णवता सिद्ध करतील. मी असें म्हणतों कीं जे स्वतःला जमिनीचे व संपत्तीचे मालक समजतात ते ईश्वराची च जागा पटकावीत आहेत. आणि म्हणून च ते अवैष्णव आहेत. वैष्णव तर ते च कीं जे सर्वांना विष्णुमय समजून कोणापासून कोणती हि गोष्ट राखून ठेवणार नाहींत. ते सतत असें च समजतील कीं आमच्या सर्व वस्तु भगवानाच्या आहेत, विष्णूच्या आणि समाजाच्या आहेत.

**विष्णुपूर**
१०-१-'५५

# शांति स्थापूं इच्छिणारांचे प्रकार



वर्तमानपत्र वाचणाऱ्यांना माहीत आहे कीं आज जगांत जर कोणता शब्द सर्वांत अधिक उच्चारला जात असेल तर तो शांति हा आहे. हा शब्द आम्हांला नवीन नाहीं. भारतांतील अत्यंत प्राचीन शब्दांत याची गणना आहे. आम्हीं जें कांहीं सत्कर्म किंवा धर्मकार्य करतों त्या सर्वांचे प्रारंभीं व शेवटीं ' शांतिः शांतिः शांतिः ' या शब्दाचा तीन वेळां उच्चार करून जयघोष करीत आलों आहोंत. पण अलीकडे फक्त धर्म-कार्य करण्याचे वेळेस च शान्तीचा उच्चार होत नाहीं तर अधर्मकृत्य करीत असतांना हि त्या शब्दाचा उच्चार होत आहे.

## शस्त्रास्त्रांनीं शांतिस्थापनेचा प्रयत्न

आज शस्त्रास्त्रांची वाढ करण्याची तयारी प्रत्येक राष्ट्र करीत आहे. वैज्ञानिकांचे मदतीनें अति भयंकर शस्त्रें निर्माण करण्यांत येत आहेत. आणि या सर्वांत शांतीचें नांव घेण्यांत येत आहे. अशा रीतीनें शस्त्रास्त्रांच्या शर्यतींत भाग घेणाऱ्या देशांचे पुढारी त्याबरोबर च ' शांती 'चें नांव घेऊन ढोंग करीत आहेत असें मी म्हणत नाहीं. वास्तविक हा जुना च भ्रम आहे आणि आश्चर्य हें कीं या विज्ञानयुगांत हि तो चालला आहे. आज सुद्धां असें मानलें जातें कीं शांतता राखण्याकरितां शस्त्रास्त्रें वाढविण्याची आवश्यकता आहे. आज हि लोकांचा असा पूर्ण विश्वास आहे कीं अशक्त लोकांचा संहार बकऱ्यांचे बलिदानाप्रमाणें केला जाईल पण वाघांचा बळी घेण्यांत येणार नाहीं. म्हणून वाघाची शक्ति मिळविणारा च वांचूं शकेल.

अनुभव मात्र असा आहे कीं बकऱ्यांसारखा वाघांचा बळी देण्यांत येत नाहीं. पण त्यांची शिकार मात्र होते. आज वाघ-सिंहसुद्धां केवळ मनुष्याचे करुणेमुळें वांचले आहेत. नाहीं तर असा काळ आला असता कीं त्यांची जात नष्ट च झाली असती. विशेषतः विज्ञानयुगांत हिंसाशक्तींत वाढ याचा अर्थ

समाजनाश हा च होतो. म्हणून हा भ्रम दूर झाला पाहिजे. पण म्हणतात ना कीं जुनीपुराणी संवय व भ्रम लवकर जात नाहींत. म्हणून सर्व राष्ट्रें जेव्हां शस्त्रास्त्रानें सुसज्ज व बलवान् होतील तेव्हां च त्यांच्यांत शांति नांदू शकेल हा केवळ भ्रम आहे.

वास्तविक शांततेकरितां अशांतिजनक व निर्भयतेकरितां भयानक वस्तूंची निर्मिति म्हणजे अगदीं च विरोधात्मक आहे. आज अमेरिकेचे प्रेसिडेन्टाला हा भ्रम झाला आहे तर पूर्वींचे काळांत परशुरामाला हि झाला होता. ब्राह्मण असून सुद्धां क्षत्रियांचा अन्याय नाहींसा करण्याकरितां तो स्वतः क्षत्रिय झाला. परंतु शांतिस्थापनेचा हा प्रयोग त्याला साधला नाहीं. शेवटीं त्याला शस्त्रांचा त्याग करून जमीन लागवड करून पीक काढण्याचें काम हातीं घेणें भाग पडलें. म्हणून परशुरामासारख्या ज्ञानी पुरुषाला हा भ्रम होता तर अमेरिकेचे प्रेसिडेन्ट आणि पाकिस्तानचे मिनिस्टर यांना तसा भ्रम असणें ही आश्चर्याची गोष्ट नाहीं. परंतु आश्चर्य हें आहे कीं या विज्ञानाचे काळांत तो नाहींसा व्हायला हवा तरी पण तो नाहींसा झाला नाहीं. सारांश, हिंसेनें अहिंसा स्थापन करण्याचे प्रयत्न पन्नास वेळां झाले व फसले. पुढें हि ते निष्फळ च होणार नाहींत इतकें च नव्हे तर सर्व मानवतेला हि निष्फळ बनवितील.

### अविश्वासानें शांतता अशक्य

म्हणून शांतीच्या निमित्त दुसरा प्रयत्न सुरू आहे. कांहीं राष्ट्रांचे नेते शांतीसाठीं सल्लामसलत करण्याकरितां टेबलाभोंवतीं समोरासमोर बसून चर्चा करीत असतात. याला यू. एन्. ओ. म्हणतात. अर्थात् हिंसेनें अहिंसा स्थापन करण्याचा प्रयत्न जसा ' मूर्खांचा यत्न ' म्हटला जाईल तसा हा नाहीं. परंतु समोरासमोर बसून चर्चा करणाऱ्या या लोकांत एक मोठी कमतरता आहे. ते परस्परांवर विश्वास ठेवीत नाहींत. अविश्वास ठेवून केलेल्या चर्चेनें शांति स्थापन होणें अशक्य. तेथें अगोदर तर कांहीं निवडक राष्ट्रांना स्थान मिळालें आहे. चीनसारख्या मोठ्या राष्ट्राला हि तेथें स्थान नाहीं. कारण त्याच्यावर विश्वास च नाहीं. आणि ज्यांना स्थान मिळालें व जे तेथें भाग घेतात ते एकमेकांना धूर्त आणि ठक समजून चर्चा

करतात. शांतीचें अधिष्ठान तर विश्वास च आहे. अविश्वासानें कधीं च शांति होऊं शकत नाहीं.

## शांतीचा निर्णय घेणें आवश्यक

आणखी एक प्रयत्न जगांत शांतिस्थापनेचा चालला आहे. तो हा कीं कांहीं भले लोक एकत्र जमून ' नैतिक सैन्यसंवर्धन हि ( मॉरल रिआर्मामेंट ) करीत आहेत. त्यांचा असा प्रयत्न आहे कीं जगांतील इतर कोणत्या हि देशांत जाऊन कांहीं चांगलें काम करावें. त्यामुळें एकमेकांत प्रेम उत्पन्न होईल आणि बंधुत्वाची भावना वाढेल. त्यांच्यापैकीं एकजण मला भेटण्यास आला होता. माझ्याशीं त्याचें बोलणें झालें. मीं त्याला विचारलें, परस्परांत प्रेम वाढण्याकरितां आपण लहान मोठी सेवा करीत राहणें ही गोष्ट उत्तम. पण या संघटनेचा असा निर्णय आहे काय कीं कोणतें हि राष्ट्र लढाईचा प्रसंग आला तरी शस्त्र घेणार च नाहीं? त्याला म्हटलें कीं, ' नाहीं. असा कांहीं निर्णय झाला नाहीं. ' तरी ' आक्रमक युद्धा ' ( ऑफेन्सिव्ह वॉर ) मध्यें भाग घेण्याचा निश्चय झाला आहे. त्यावर मीं म्हटलें, ' आजच्या काळांत हल्ला न करणें व बचाव करणें या दोहोंत फरक नाहीं. ' ऑफेसिव्ह वॉर ' आणि डिफेन्सिव्ह वॉर ( संरक्षणात्मक युद्ध ) एकरूप होतात.

तात्पर्य एवढें च कीं हे लोक भले आहेत पण यांच्या मनाचा निश्चय नाहीं. शस्त्रबळ वाढवून शांतता स्थापन करणाऱ्यापाशीं ' विचार ' नाहीं व परस्परविचार व चर्चा करून शांतता स्थापन करणाऱ्याजवळ ' विश्वास ' नाहीं आणि चांगलें काम करून शांतता स्थापन करणाऱ्याजवळ ' निर्णय ' नाहीं. जगांत अशांति आणि हिंसा इतकी व्यवस्थित रीतीनें वाढत आहेत कीं आम्ही कांहीं निर्णय न घेतां सामना करण्याची इच्छा करूं तर तें हि करणें शक्य नाहीं.

## केवळ अभावात्मक कार्य पुरें होऊं शकत नाहीं

कांहीं लोक असे आहेत कीं त्यांनीं शांतता राखण्याकरितां शस्त्रांचा उपयोग न करण्याचा निर्णय घेतला आहे. असे लोक आपल्याला पॅसिफिस्ट ( शांततावादी ) म्हणवितात. त्यांचेजवळ निर्णय आहे ही एक उत्तम गोष्ट त्यांनीं

प्राप्त केली. परंतु युद्धाचे प्रसंगीं आम्ही हातांत शस्त्र घेणार नाहीं एवढ्यानें च काम होत नाहीं. त्याकरितां विधायक अर्थात् रचनात्मक कार्य निर्माण करावें लागेल. विधायक ( पॉझिटिव्ह ) शक्ति च निर्माण करावी लागेल. त्याशिवाय फक्त अभावात्मक ( निगेटिव्ह ) शक्तीनें भागणार नाहीं. याचा अर्थ हा च कीं त्यांच्याजवळ निर्णय तर आहे पण सक्रियता म्हणजे कृति मात्र नाहीं.

## देशाच्या विकासाकरितां शांततेची आवश्यकता

कांहीं शांततावादी म्हणतात कीं जगांतील पुष्कळ राष्ट्रांत शांतीची जरूरी आहे. कारण त्याशिवाय त्यांचा विकास होऊं शकत नाहीं. म्हणून ते जगांत शांतता रहावी अशी इच्छा करितात. त्यांच्या चळवळीला ' जागतिक शांति आंदोलन ' ( वर्ल्ड पीस मुव्हमेंट ) म्हणतात. युरोपांत असे कांहीं देश आहेत कीं जेथें कम्युनिस्टांचा बराच जोर आहे. तरी ते शांतीची इच्छा करतात. कारण शांति स्थापन झाल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाहीं. अशी शांति चीनला, पाकिस्तानला व भारताला हि पाहिजे. पण हे लोक म्हणतात कीं त्यांना शांतीची जी जास्त आवश्यकता आहे ती याकरितां च कीं त्यांना देशांत जीवनमान वाढवावयाचें आहे, दारिद्र्य नष्ट करावयाचें आहे. परंतु एवढ्यानें शांति स्थापन होऊं शकत नाहीं. कारण त्यांना शांतीची स्वतंत्र किंमत नाहीं. त्यांना दुसऱ्या कामाकरितां तिची जरूरी आहे एवढी च त्यांना शांतीची किंमत. देशाचा विकास होण्याकरितां व तेथील संपत्ति वाढण्याकरितां त्यांना शांति स्थापन करण्याची इच्छा आहे. ही तर सर्व च देशांची इच्छा आहे आणि या दिशेनें सर्व देशांत हि प्रयत्न झाले आहेत.

## शांततेची स्वतंत्र तहान लागली पाहिजे

परंतु शांति ही पाण्यासारखी आहे. त्याचे दोन उपयोग होऊं शकतात. एक, पीक काढण्याकरितां पाण्याची जरूरी असते आणि दोन, मनुष्याची तहान भागविण्याकरितां. ज्याला तहान लागते त्याला पाण्याची नेहमीं च आवश्यकता असते. त्याला पाण्याची स्वतंत्र किंमत आहे. शांतीचा

उपयोग देशाची भरभराट करण्याकडे, देशाचें जीवनमान वाढविण्याकडे आणि मानसिक समाधानाकरितां सुद्धां होऊं शकतो. ज्याला पिकाकरितां पाणी पाहिजे तो पीक निघाल्यावर पाण्याची जरूरी नाहीं असें म्हणूं शकतो. त्या च प्रमाणें ज्या देशाला समृद्ध होण्याकरितां शांति पाहिजे तो असें म्हणूं शकतो कीं देशांत समृद्धि झाली, आतां शांततेची जरूरी नाहीं. परंतु ज्यांना तहान भागविण्याकरितां पाणी पाहिजे त्याला पाण्याची गरज नेहमीं च लागेल. याप्रमाणें सबंध मानवजातीला जोंपर्यंत शांतीची स्वतंत्र तहान लागत नाहीं तोंपर्यंत जगांत शांति स्थापन होऊं शकत नाहीं.

भूदानाचे बाबतींत मी जेव्हां सांगतों तेव्हां लोक विचारतात, " आपण लोकांना समजावून सांगतां हें चांगलें आहे पण कायदा झाल्यास किती लवकर हें कार्य होईल." त्यावर मी असें च म्हणतों कीं कायदा करण्याचे आड मी नाहीं: आपण कायदा करावा. ज्यांना तुम्हीं आपलें मत दिलें त्यांचेकडून तो करून घ्या. पण लक्षांत असूं द्या कीं आमचा हा भूदानाचा प्रयत्न फक्त जमीन प्राप्त करणें व त्याची वांटणी करणें एवढ्यापुरता च नाहीं तर शांतीचें एक नवीन शस्त्र निर्माण करण्याचा आहे. लोक शांतीला स्वतंत्र किंमत देऊन आपले जमिनीबाबत प्रश्न व इतर हि प्रश्न शांतीचे च मार्गानें सोडवितील. शांतीची स्वतंत्र किंमत स्थापन करण्याकरितां आज भारताला फार च चांगली संधि मिळत आहे.

### शांतिशक्तीची उपासना

जेव्हां आम्हीं स्वातंत्र्याची चळवळ केली त्या वेळीं आम्ही हिंसेनें पुढें जाऊं शकत नव्हतों कारण येथें जें राज्यशासन होतें त्याच्याजवळ खूप शस्त्रास्त्रें होतीं. म्हणून च आम्हीं शांतीचा, अहिंसेचा उपयोग केला. परंतु ही अहिंसा नाइलाजास्तव होती. पण यापेक्षां आज भारत तर वाटेल तेवढें शस्त्रबळ वाढवूं शकतो. ज्याप्रमाणें पाकिस्ताननें केलें तसें तो हि करूं शकतो, स्वतःच्या पायावर उभें राहून किंवा इतरांची मदत घेऊन. अशा तऱ्हेनें आज हिंदुस्थान शांतिशक्ति किंवा शस्त्रशक्ति वाढविण्याचा निर्णय घेण्याकरितां स्वतंत्र आहे. तो बुद्धिपुरस्सर वाटेल तो निर्णय घेऊं शकतो.

परंतु भारतानें शांतीचा रस्ता अवलंबिला ही त्याचेवर एक ईश्वरी कृपा च आहे. सुदैवानें त्याला उत्तम नेतृत्व लाभलें आहे.

परंतु आमची भावना अशी व्हायला नको कीं आमचा देश फार मागासला आहे आणि त्याचा विकास होण्याकरितां आम्ही शांतिमंत्राचा जप करीत आहोंत. आम्ही जर अशा रीतीनें विचार करीत राहिलों तर शांतिशक्तीची वाढ होणार नाहीं. ती केवळ व्यावहारिक साधनरूप च होईल. केवळ व्यावहारिक साधन म्हणून आम्ही शांतीचा जप करूं लागलों तर आमचा देश सर्व जगावर नैतिक प्रभाव पाडूं शकणार नाहीं. हिंदुस्थानांत दारिद्र्य आहे व शस्त्रबळ वाढविण्याकरितां पैसा त्याचेजवळ नाहीं हें सर्व दुनिया जाणते. परंतु समजा कीं त्यानें किती हि बळ वाढविलें किंवा तो किती हि समृद्ध झाला किंवा शस्त्रास्त्र वाढविण्याची ताकद त्याच्यांत असली तरी हि तो शांत राहील आणि शस्त्र उगारणार नाहीं, तर च शांतीचा नैतिक प्रभाव तमाम दुनियेवर पडेल. भौतिक शक्ति व समृद्धि प्राप्त झाल्यावर सुद्धां शांतीचा दृढनिश्चय न सोडण्याची निष्ठा तेव्हां च आमच्यांत येईल जेव्हां अनुभवानें आम्हांला कळून येईल कीं शांति ही एक स्वतंत्र शक्ति आहे आणि तिनें च कठीण प्रश्न हि सुटूं शकतात.

असें म्हणतात कीं 'आम्हीं शांतीनें च स्वराज्य मिळविलें.' पण हें पूर्ण सत्य नाहीं. तें जर पूर्ण सत्य असतें तर आज आमच्याजवळ शांतीच्या शक्तीचा अवश्य अनुभव असता. आज आमच्यांत शांतीवर निष्ठा असती तर आज ज्या तऱ्हेनें देशाची दुर्दशा झाली तशी झाली नसती. आजचे पक्षभेद एकमेकांवर अविश्वास आणि जातिजातींत स्पर्धा हें सर्व दिसलें नसतें. आम्हीं जो शांतीचा रस्ता अवलंबिला होता तो निर्णय आम्हीं नाइलाजानें घेतला होता. गांधीजी लाचारी शिकवीत नव्हते. पण आम्ही त्यांचेमागें नाइलाजानें गेलों म्हणून आम्हीं शांतीचा जो उपयोग केला तो अगदीं च तोकडा होता. पण तेवढ्यावरून च यश प्राप्त झालें. कारण कीं जगाची परिस्थिति च अशी होती कीं इंग्रज आपले कबजांत भारत ठेवूं शकत नव्हते. म्हणून भारत जर कोणता हि प्रश्न शांतीनें च सोडवील तेव्हां च आमचा शांतिशक्तीवर विश्वास बसेल.

## शांतिशक्तीशिवाय भारत दुर्बल

समजा कीं आम्हीं कायद्याचे जोरावर किंवा जबरदस्तीनें लोकांपासून जमीन काढून घेतली तरी पण मला माहीत आहे कीं अशा तऱ्हेनें लोकांत जमीन वांटून देण्याचा अधिकार आजच्या सरकारला नाहीं कारण या सरकारांत जे लोक आहेत त्यांत जमिनमालक बऱ्या च संख्येनें आहेत. ज्या फांदीवर ते बसले आहेत ते ती च फांदी तोडतील हें शक्य नाहीं. बंगाल सरकारनें कायदा केला आहे कीं सव्वाशें लक्ष एकरांमधून चार लक्ष एकर जमीन मिळवावी. याचा अर्थ च हा कीं ते समाजाची आजची स्थिति जशीची तशी च ठेवणारे आहेत. याचें कारण ते देतात कीं जमीन जास्त नाहीं. तेव्हां ती ज्यांचे कब्जांत आहे त्यांचे च कबजांत ती राहूं देणें चांगलें.

अशा तऱ्हेनें ते सर्वांना जमीन देऊं शकत नाहींत. ज्या लोकांची बुद्धि अशा तऱ्हेची आहे ते जमिनीची वांटणी काय करूं शकतील? ते गांवची सर्व जमीन गांवच्या लोकांची करून देण्याचा संभव नाहीं. आणखी समजा कीं कायद्याचे जोरावर सरकारनें जमीन जशी वांटायला पाहिजे तशी वांटून दिली तरी अंतःकरणाशीं अंतःकरण मिळणार नाहीं. कटुता निर्माण होईल. शांति राहणार नाहीं. अशा तऱ्हेनें जमिनीचा प्रश्न जरी सुटला आणि जर तो शांतिशक्तीनें सुटला नाहीं तर भारत दुबळा च राहील. समाजाला शांतीचें स्वतंत्र महत्त्व समजणार नाहीं तोंपर्यंत शांतता स्थापन होऊं शकणार नाहीं, दुनियेंतून हिंसेचा नायनाट होणार नाहीं. भूदानाची चळवळ सुरू झाली आहे हा तर प्रारंभ च आहे. पण चार वर्षांत जी फलप्राप्ति झाली ती पुष्कळ च आहे. परंतु हें जें थोडेंसें काम झालें त्याचें अधिष्ठान एका मोठ्या विचारांत आहे आणि तो म्हणजे शांति-शक्तीची स्थापना करणें.

भेटिया ( मेदिनीपूर )
२०–१–'५५

## सत्य : आध्यात्मिक साधनेची पहिली शर्त : ६ :

आज आशादेवीनें सूचना केली कीं आध्यात्मिक साधनेचा आरंभ कोठून होतो व पहिल्यांदा महत्त्व कोणते गोष्टीला द्यावें लागतें यावर मीं कांहीं बोलावें. या प्रश्नाचें उत्तर निरनिराळ्या प्रकारानें दिलें जाऊं शकतें. सर्वांकरतां एक च उत्तर लागू होणार नाहीं. जें होऊं शकतें तें मी नंतर सांगणार आहें.

### आत्मपरीक्षण

प्रथम च मला असें सांगायचें आहे कीं प्रत्येकानें आपले मनाचें परीक्षण केलें पाहिजे. आमच्यांत किती गुणांची कमतरता आहे किंवा कोणत्या दोषांचा प्रभाव आमचे चित्तांत ठाण मांडून बसला आहे हें आपल्याला पहावें लागेल. शरीरप्रकृतीचें निदान केलें जातें आणि मग त्यानंतर या शरीरांत काय कमी आहे किंवा अमका रोग आहे असा निर्णय दिला जातो. तेव्हां ती कमतरता भरून काढण्याकरितां उपाय करावा लागतो. वैद्य तें काम करतो. त्या च प्रमाणें आपल्या मनाचे दोष आणि उणीवा प्रत्येक माणसानें पहाव्या. ह्या कामांत दुसऱ्याची म्हणजे मित्रांची मदत घेतां येते. परंतु निर्णयाचें काम त्याला स्वतःला च करावें लागतें. जे दोष दिसून येतील ते नाहींसे करणें हें साधनेंतील पहिलें पाऊल आहे.

समजा, आपल्यांत अहंकार दिसून आला. त्याचा त्याग करण्याकरितां जे मार्ग अवश्य आहेत ते पत्करावे लागतील अगर आपल्यांत क्रोधाचें प्रमाण जास्त दिसून आलें तर दया-क्षमेचे प्रसंग अधिक येतील याचा प्रयत्न करावा लागेल आणि त्या गुणांकडे लक्ष द्यावें लागेल. म्हणून अशा प्रश्नाचें उत्तर सर्वांकरितां एक होऊं शकत नाहीं. परंतु सर्वसाधारणपणें कांहीं उणीवा असतात आणि म्हणून च एक साधारण धर्म होऊं शकतो आणि एक साधारण उपदेश दिला जातो. परंतु ज्या भक्ताचें जें लक्षण असेल त्या-प्रमाणें च तो कार्य करील. ज्याला जी गोष्ट पसंत पडते तो त्या दृष्टीनें च

त्याची उपासना करितो. मीं ‘ उपासना ’ हा शब्द योजला आहे. उपासनेंत गुणांचे विकासाचा समावेश होतो. आमच्यांत जर क्रोध आहे तर दया-गुणाचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यांत आला पाहिजे.

### तीन प्रकारचा कार्यक्रम

हें काम तीन प्रकारचें आहे : (१) आमच्यांत जर क्रोध अधिक असेल तर दयाळू स्वरूपांत परमेश्वराची भक्ति करावयाला हवी. मुसलमानांत ईश्वराला ‘ रहीम ’ आणि ‘ रहमान ’ म्हटलें आहे. त्या रूपाची उपासना करावी लागेल. ईश्वराचे तर अनंत गुण आहेत. परंतु आमच्यांत ज्या गुणांची कमतरता आहे त्यांची उपासना आम्ही करतों. ह्या करितां च आम्ही ‘ रहीम ’ची उपासना करतों. त्या च प्रमाणें आमच्यांत जर निर्दयता असेल तर आम्ही दयाळू परमेश्वराची व सत्याची कमतरता असेल तर सत्यरूप परमेश्वराची आम्हांला उपासना करावी लागेल. (२) आम्हीं सृष्टीचें निरीक्षण करावें. तें असें करावयास पाहिजे कीं सृष्टीमधें जेवढी म्हणून दया दिसेल तिचें चिंतन करावयास पाहिजे. याप्रमाणें आपल्यांत ज्या गुणांची कमतरता आहे त्या गुणांचा विकास होण्याकरितां सृष्टीपासून मदत घ्यावी. याला ‘ सांख्य ’ असें म्हणतात. परमेश्वरानें सृष्टींत दया कोठें व कशी ठेवली आहे या दृष्टीनें सृष्टीचें निरीक्षण व्हायला पाहिजे. याला ज्ञान-मार्ग म्हणतात. ईश्वरानें सृष्टीमधें जी प्रेमाची योजना केली आहे त्याचें चिंतन करावें. (३) हे गुण आपल्यांत आणण्याचा प्रयत्न करणें याला ‘ कर्मयोग ’ असें म्हणतात. अशा रीतीनें हा त्रिविध कार्यक्रम होईल.

### उपासनेचे निरनिराळे मार्ग

कांहीं संप्रदाय प्रेमावर जोर देतात. खिस्तानें म्हटलें आहे कीं “ गॉड इज लव्ह ” म्हणजे प्रेम हा च परमेश्वर. मुसलमानी धर्मांत म्हटलें आहे कीं परमेश्वर “ रहीम ” आणि “ रहमान ” आहे. उपनिषदांत म्हटलें आहे कीं “ **सत्यं ज्ञानमनंतम् ।** ” अशा तऱ्हेनें उपनिषदानें सत्यावर भर दिला आहे. बापूंनीं सत्य आणि अहिंसा यांवर जोर दिला आहे. त्यांनीं

म्हटलें आहे कीं सत्य आणि अहिंसा एक समजा. अशा रीतीनें उपासनेचे भिन्न भिन्न मार्ग समजले जातात. बहुधा मनुष्यांत लोभाचें प्रमाण अधिक असतें म्हणून दानाचा उपदेश केला जातो. आणि औदार्यरूपानें परमेश्वराचें चिंतन करण्यास सांगितलें जातें. तसें च जर मनुष्यांत क्रोध असेल तर त्यानें परमेश्वराचे दया गुणाचें आराधन करावें. त्यांत जर कामाचें प्रमाण जास्त असेल तर त्यानें संयमाची उपासना केली पाहिजे. आणि परमेश्वरानें नियम करून जग कसें नियमबद्ध केलें आहे याचें त्यानें चिंतन करावें. याप्रमाणें काम, क्रोध, लोभ इत्यादींपासून मुक्त होण्याकरितां जी सर्व-साधारण दृष्टि ती मीं आपणांसमोर ठेविली आहे.

## मुख्य दोष : असत्य

परंतु मी आपल्या दृष्टीनें ज्याला अधिक महत्त्व देतों आणि सर्वांकरितां जी गोष्ट अत्यंत महत्त्वाची मला वाटते ती मी आतां आपल्यासमोर ठेवतों. हिरालालशास्त्री, वनस्थली ( जयपूर ) विद्यापीठाचे अध्यक्ष, मला भेटण्याला आले होते. माझी त्यांच्याशीं पंधरा दिवस दररोज चर्चा होत असे. त्यांच्याशीं ह्या गोष्टीसंबंधीं बोललों. मीं म्हटलें कीं आज समाजांत ज्याला किंमत दिली जाते त्यांत फार च बदल करण्याची जरूरी आहे. आज कांहीं 'महापातकें' समजलीं जातात. उदाहरणार्थ, सोन्याची चोरी करणें, दारू पिणें, व्यभिचार करणें, खून करणें इत्यादि. या सर्वांची 'महापातकां'त गणना केली जाते. आणि बाकीचीं सर्व 'उपपातकें' समजलीं जातात. परंतु मला वाटतें कीं जोंपर्यंत दुनियेंतील दोष– जसें खून, व्यभिचार वगैरे, ज्यांना जगांत अत्यंत मोठे दोष म्हणून समजतात– ते सर्व दोष गौण आणि मुख्य दोष 'असत्य' असें समजलें जात नाहीं तोंपर्यंत आमची साधना अधिक बळकट होऊन पुढें जाणार नाहीं. असत्य हा नैतिक दोष आहे आणि बाकी सर्व व्यावहारिक दोष आहेत. ही दृष्टि जर समाजांत रूढ झाली तर आम्ही आज सुद्धां संकटमुक्त होऊं शकतों.

## मानसिक रोग

समजा कीं एक मनुष्य आजारी झाला आणि त्यानें आपला आजार

दुसऱ्याला सांगितला, लपवून ठेवला नाहीं, कारण रोग डॉक्टरला समजला तर त्याला डॉक्टर मदत करूं शकेल आणि त्यामुळें तो आजारांतून बरा होईल. ज्यामुळें त्याची जगांत निंदा होईल असें जर कोणीं चुकीचें काम केलें तर तें तो लपवून ठेवतो. अशा तऱ्हेनें मनुष्य आपले मानसिक दोष लपवून ठेवतो. त्यामुळें ते दोष नाहींसे करण्याचा मार्ग मिळूं शकत नाहीं. त्यांत त्याला दुसऱ्याकडून मदत मिळूं शकत नाहीं. म्हणून च माझें म्हणणें आहे कीं जितकीं म्हणून पातकें समजलीं जातात तीं सर्व शरीराचे स्थूल रोगाप्रमाणें मानसिक रोग आहेत. अशा तऱ्हेचा विचार समाजांत दृढ झाला पाहिजे.

## रोगी दयापात्र आहे

रोग्याचा आम्ही तिटकारा करीत नाहीं. उलट त्याचेकडे आम्ही दयार्द्र दृष्टीनें पाहतों. मनुष्यांतील बरेचसे रोग हे त्यांत असलेल्या अवगुणांमुळें होतात हें स्पष्ट आहे. परंतु सर्व रोगांसंबंधीं मी असें म्हणूं शकत नाहीं. कारण कांहीं याला अपवाद असूं शकतात कीं त्यांत मनुष्याचा कांहीं दोष नसतो. मी आपली गोष्ट सांगतों. अगदीं च लहानपणची नाहीं कारण त्या वेळचें मला कांहीं आठवत नाहीं. परंतु ज्या वेळेपासून मला समजावयाला लागलें त्यानंतरची गोष्ट मी सांगत आहें. त्या वेळेपासून मी पहातों कीं मला जे रोग झाले त्याला कारण माझे दोष च होते. एखादा रोग झाला तर तो कोणत्या दोषामुळें झाला हें मला विचार केल्यावर समजून येई. दोष माहीत होईपर्यंत मला चैन च पडत नसे आणि विचार केल्यावर कांहीं ना कांहीं दोष, वागण्यांतली चूक, दिसून येई च. म्हणून रोगाकरितां रोगी च जबाबदार असतो. तरी आम्ही त्याला अपराधी समजत नाहीं, उलट त्याला आम्ही दयेला पात्र असें समजतों.

## तिटकाऱ्यामुळें वाईट परिणाम

दवाखान्यांत कोणा रोग्याला भरती करतात. त्याचा रोग भयंकर स्वरूपाचा असला तरी तेथील सर्व लोक त्याचा तिटकारा करण्याचे दृष्टीनें त्याकडे न पाहतां उलट त्याचेवर दयेच्या दृष्टीनें पाहतात आणि समजतात

कीं आम्हांला याची सेवा करावयाची आहे. तो सुद्धां आपला रोग झांकून ठेवीत नाहीं. त्या च प्रमाणें मला वाटतें कीं मानसिक रोगासंबंधीं झालें पाहिजे. आवश्यकता जेथें नाहीं तेथें तो प्रकट करूं नये. आज तर सर्व लोकांसमोर तो प्रकट करण्याची मनुष्याला प्रेरणा किंवा हिंमत नाहीं. याचें कारण समाजांत त्याची निंदा होते. आणि त्या वाईट खोडीचा तिटकारा हि केला जातो असें दिसून येतें. कांहीं रोगांकडे हि तिटकाऱ्याचे दृष्टीनें पाहिलें जातें. मनुष्य त्याला हि झांकण्याचा प्रयत्न करतो. जसें कोड. माझे पोटांत अल्सर आहे तर त्याला छपविण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं, उघड सांगतों. परंतु कोणाला जर कोड उठलें तर तो छपविण्याचा प्रयत्न करतो. यामुळें त्याचा रोग दुरुस्त होऊं शकत नाहीं. परंतु याचा परिणाम असा होतो कीं त्याचा रोग वाढत जातो. आणि ज्या अर्थीं समाजांत तो उघड उघड वावरून व्यवहार करूं शकतो त्या अर्थीं त्याचा रोग दुसऱ्याला ही लागण्याचा संभव असतो. असा यांत धोका आहे.

## मूल्य बदलण्याची आवश्यकता

अशा च प्रकारें आज समाजांत मानसिक दोषांविषयीं तिटकारा आहे. म्हणून मनुष्य त्याला प्रकट करीत नाहीं. व्हायला तर असें पाहिजे कीं समाजांत जेवढे दोष समजले जातात– जसें दारू पिणें, व्यभिचार करणें इत्यादि दोष मामुली आहेत. नैतिक दोष एक च आहे. आणि तो म्हणजे ‘ छपविणें ’, ‘ असत्य ’. अशा रीतीनें मूल्यांत फरक झाला तर समाजांत लवकर सुधारणा होईल. म्हणून सत्य व अहिंसा यांत फरक केला जातो. विशिष्ट परिस्थितींत कोणीं हिंसा केली तर तो त्याचा अपराध होईल. पण असत्य मात्र मौलिक नैतिक दोष आहे. आणि बाकीचे सर्व शारीरिक किंवा मानसिक आहेत. हें विचारांचें मूल्य रूढ झालें पाहिजे.

## दोष प्रकट करावे

म्हणून माझी इच्छा आहे कीं आम्हीं आपले दोष बिनधोक उघडकीस आणले पाहिजेत. कांहीं लोकांना अशानें दोष वाढत जातील अशी भीति वाटते. म्हणून च ते म्हणतात कीं याला लोकनिंदेची आवश्यकता आहे.

आणि म्हणून च लोकनिंदेचे प्रकार वाढत गेले. परंतु त्यावर इतका भर दिला जात आहे कीं आज कांहीं दोष जरी कमी झाले असें दिसत असलें तरी त्या दोषांचे मागें असत्याची वाढ होत आहे. असत्य हा फार च मोठा गुन्हा आहे. अशा तऱ्हेनें लहान गुन्ह्याऐवजीं मोठा गुन्हा जर झाला तर धोका उत्पन्न होईल. आज लहान मुलें आपला अपराध छपवितात पण त्यांना जर शिकवण्यांत आलें कीं अपराध छपविणें हा सर्वांत मोठा अपराध आहे, हा सर्वांत मोठा गुन्हा आहे, तर तीं तसें करणार नाहींत. आज या अपराधांकडे पाहण्याची समाजाची दृष्टि आहे ती बदलायला पाहिजे. आम्ही ज्या अपराधांना भयंकर पाप समजतों तसें जर समजलें नाहीं तर पापापासून समाजाची मुक्ति लवकर होईल. पण त्याला लपवून ठेवलें तर मुक्तीचा मार्ग च बंद होईल. म्हणून सर्वांत श्रेष्ठ मूल्य सत्य आहे. आध्यात्मिक दृष्टीनें विचार करणाऱ्यांना ही च मुख्य वस्तु आहे.

## सत्य हा मौलिक गुण

मोठ्या पुरुषांत हि कांहीं दोष असतात. आम्ही ऐकतों कीं ऋषी रागावत असत. परंतु कोणी असत्यवादी असून हि सत्पुरुष होऊं शकत नाहीं. सत्य तर मौलिक वस्तु आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत त्याला महत्त्व दिलें गेलें आहे. आणि ही मूळ वस्तु समजली गेली आहे. परंतु मौलिक वस्तु याचा अर्थ त्याला महत्त्व देणें असा हि होतो. आणि ‘ बुनियादी ’ याचा अर्थ ‘ सामान्य ’ असा हि होतो. जसें बुनियादी शाला म्हणजे प्राथमिक शाळा. या च दृष्टीनें सत्याला प्राथमिक म्हणजे सामान्य मानतात आणि समजतात कीं प्राथमिक शाळेंतला गुण आहे पण कॉलेजचा गुण नाहीं. म्हणून जे लोक आपले जीवनांत असत्याला स्थान देतात व आपला सारा कारभार असत्यावर उभारतात त्यांची सुद्धां इच्छा असते कीं आपल्या मुलांना शाळेंत सत्य शिकविलें जावें. असत्य शिकवूं नये. कारण ते असें समजतात कीं सत्य हा लहानपणचा गुण आहे. कदाचित् त्यांना असें हि वाटत असेल कीं मुलें कॉलेजांत गेल्यावर असत्य शिकून घेतील. परंतु प्राथमिक शाळेंत सत्य असलें च पाहिजे असें त्यांना वाटतें. अशा तऱ्हेनें आम्ही सत्य फक्त मुलांकरितां व संन्याशांकरितां ठेवलें आहे.

आणि बाकी सर्व ठिकाणीं त्याला अपवाद म्हणून मानलें आहे. हे अपवाद इतके जास्त आहेत कीं ज्याप्रमाणें संस्कृत व्याकरणांत नियम असतो आणि त्याला अपवाद इतके असतात कीं त्यांची लांबलचक यादी असते त्या च प्रमाणें सत्याचा उपयोग केव्हां करूं नये याची एक लांबलचक यादी च तयार होते. राजकारणांत, व्यापारांत, कोर्टांत आणि लग्नांत सुद्धां असत्य चालूं शकतें आणि त्याला असत्य म्हणूं नये असें स्पष्टीकरण हि करण्यांत येतें. म्हणजे हे लोक असत्याची व्याख्या च बदलूं इच्छितात.

## सत्य ही एक च साधना

सत्याला मौलिक ( एलिमेंटरी ) गुण मानलें आहे एवढें पुरे नाहीं. 'सत्य हें च मात्र नैतिक तत्त्व आहे, इतर सर्व नैतिक तत्त्वें नाहींत, सामान्य गुण अथवा दोष आहेत' असा विचार नीतिशास्त्रांत रूढ होईल तर समाजांत सुधारणा होईल व आध्यात्मिक साधनेंत त्याची मदत मिळेल. जेव्हां मनुष्य सत्याला छपवितो तेव्हां तो शिक्षा टाळण्याकरितां तसें करतो. त्याचें छपविणें सुद्धां मोठी कला समजली जाते. म्हणून आमची इच्छा आहे कीं अपराध्याकरितां शिक्षा असूं नये. उलट त्याची सुधारणा झाली पाहिजे. कोणी आजारी पडतो. आम्ही त्याला शिक्षा थोडी च देतों ? हां, त्याला उपवास करण्याला सांगतों, कडू औषध पाजतों आणि कधीं कधीं ऑपरेशन हि करतों. या उपायांना शिक्षा म्हणावयाचें असेल तर म्हणा. परंतु हें तर 'ट्रीटमेंट' उपचार आहेत, सेवा आहे. म्हणून समाजांत जितका वाईटपणा असेल त्याकरितां उपचार च हवा, शिक्षा नको. ही गोष्ट समाजांत रूढ झाली पाहिजे म्हणजे सहज मन दुरुस्त होईल आणि समाजांत बदल होईल. कांहीं लोकांना असें करण्यांत धोका आहे असें वाटतें. तें म्हणतात कीं शिक्षा करण्याची प्रथा जर काढून टाकली तर मनुष्य उघड उघड अपराध करील. परंतु हा विचार चूक आहे. आज दंड करण्यामुळें सर्व अपराधांना दाबून ठेवण्याची किंवा लपवून ठेवण्याची प्रवृत्ति वाढली आहे. त्यामुळें अंतःकरण शुद्ध होत नाहीं आणि याचा परिणाम गुन्हा वाढण्यांत होतो. म्हणून माझें म्हणणें आहे कीं सर्व लोकांनीं— विशेषतः आध्यात्मिक साधना करणारांनीं— सत्य कधीं च

छपवितां कामा नये. ही च सर्वांत उत्तम साधना आहे. ही च पहिली, मधली व शेवटची साधना आहे. ही फक्त एक च साधना आहे. उपनिषदांत कवि म्हणतो.—

> ' हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापि हितं मुखम् ।
> तत् त्वं पूषन्नपावृणु सत्य धर्माय दृष्टये ॥

म्हणजे "सत्याचें मुख हिरण्मय पात्रानें झांकलें आहे. मी सत्यधर्मी आहें. म्हणून, हे प्रभो, तो असत्याचा पडदा दूर कर."

## आरंभ कोठून करावयाचा ?

म्हणून ही च सर्वोत्तम किंवा सर्वप्रथम साधना आहे. याची सुरुवात शाळा आणि घर येथून झाली पाहिजे. आज तर असें होत असतें कीं मुलें आपले आई-बापांपासून आपले अपराध छपवून ठेवतात आणि मित्रांना सांगतात. आई-बाप त्यांचे लाड करतात, त्यांच्याकरितां त्याग करितात, त्यांची सेवा करतात, त्यांचेपासून लपवून ठेवण्याची मुलांची प्रवृत्ति व्हावी आणि ज्यांच्याशीं ते फक्त खेळतात मात्र त्या सवंगड्यांना अंतःकरण उघडें करून अपराध सांगूं शकतात ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! सवंगडी फक्त त्यांचेशीं खेळणारे असतात, त्यांना वांचविणारे नाहींत. तरी सुद्धां आई-बापांजवळ तीं मुलें अपराध कबूल करत नाहींत याचें कारण त्यांनीं कधीं त्यांना मारपीट केली असेल, भीति दाखविली असेल, किंवा धमकी दिली असेल.

मुलांना माहीत आहे कीं आईबाप आपले अत्यंत लाड करतात हें जाणून सुद्धां ते आई-बापांपासून अपराध छपवितात. मुलें जर आई-बापांपासून च गोष्ट छपवून ठेवतात तर ते सर्वांपासून च लपवून ठेवतील. कारण कीं आम्ही जर आपली गोष्ट सर्वांत अधिक कोणाला उघड करून सांगत असूं तर ती आईबापांना. समाजांत आई-बापांसारखे प्रेम करणारे दुसरे कोणी च नसतात. म्हणून त्यांच्यापासून जो मुलगा लपवितो तो सर्व दुनियेपासून छपवाछपवी करील. कधीं कधीं अशीं मुलें मित्रांजवळ प्रकट करतात पण तें अज्ञानामुळें. पण जर त्यांना समजलें कीं मित्र हि त्यांची

नालस्ती करतात तर ते त्यांचेजवळ हि उघड बोलणार नाहींत. म्हणून सत्य आचरणाची सुरुवात शाळांतून व घरांतून झाली पाहिजे. शाळेंत त्यांना शिक्षा करणें किंवा मारणें हें होऊं नये.

जर कोणाकडून कांहीं अपराध झाला तर तो झाला च नाहीं असें समजलें पाहिजे. कोणाचें नाक घाणेरडें असेल तर तें आम्ही स्वच्छ करतों. त्याला दोषी समजत नाहीं. कोणी आजारी झाला तर आम्ही म्हणतों कीं दोन दिवस कांहीं खाऊं नकोस. त्या च प्रमाणें कोणीं अपराध केला तर असें म्हणावयाला पाहिजे कीं कांहीं हरकत नाहीं, फिरून असें करूं नकोस. अशा तऱ्हेची उदात्त वृत्ति ठेवावयाला हवी. असल्या वाईट खोडींपासून काय हानि होईल हें त्याला समजावून द्यावयास हवें. ज्याप्रमाणें आरोग्य-शास्त्रांत मनुष्याला कोणता रोग झाला व कसा झाला हें समजावून द्यावयाचें असतें व त्यामुळें तो त्यापासून बचावतो त्या च प्रमाणें घरांत, शाळेंत, नीतिशास्त्रांत व अध्यात्मविचारांत सत्य असावयास पाहिजे. नीति-शास्त्र आणि अध्यात्म इतर पांचपन्नास गुणांवर भर देवोत किंवा न देवोत परंतु सत्य हा मुख्य गुण किंवा वस्तु आहे हें त्यांनीं सांगितलें च पाहिजे.

## सत्य काय वस्तु आहे ?

केव्हां केव्हां सत्याची व्याख्या काय असें विचारण्यांत येतें. परंतु हा प्रश्न च चूक आहे. एकदां एकानें मला विचारलें कीं ' सत्य काय आहे ? ' मीं म्हटलें, ' सत्य खजूर आहे.' त्याला वाटलें मी त्याची थट्टा करीत आहें. मीं त्याला पुन्हां म्हटलें कीं तुम्हांला सत्य खजूर आहे असें वाटत नसेल तर सत्य बदाम आहे समजा. ही हि गोष्ट त्याला पटली नाहीं. त्याला नंतर मीं म्हटलें कीं ' सत्य काय वस्तु आहे हें तुम्हांला माहीत असलें पाहिजे असें दिसतें. कारण कीं मी ज्या वस्तूचें नांव घेतों ती तुम्हांला पटत नाहीं. तेव्हां तुम्ही सांगा कीं सत्य काय वस्तु आहे तें ! त्याप्रमाणें मी व्याख्या करीन.' सत्याची व्याख्या सुद्धां सत्याचे कसोटीला लावावी लागेल. सत्याची कोणती हि व्याख्या होऊं शकत नाहीं. सत्य हें स्वतः स्पष्ट च आहे. दुनियेंत इतकें स्पष्ट असें दुसरें तत्त्व नाहीं. अहिंसा कशाला म्हणावें याची

व्याख्या करायला गेलें तर वरें च कठीण जाईल. परंतु सत्याचे बाबतींत तशी गोष्ट नाहीं.

सत्य असा गुण आहे कीं लहान मूल हि तें समजूं शकेल. परंतु लहान मुलांना सत्य बोलावें म्हणून आम्ही जेव्हां शिकवितों च तेव्हां तें असत्य काय वस्तु आहे हें शिकतात. कारण ते विचारतात कीं ' सत्य बोलणें म्हणजे काय ? ' तेव्हां त्याला असत्याची ओळख करून द्यावी लागते इतकें सत्य स्वयंस्पष्ट आहे. परंतु आम्ही त्याला छपविण्याचा प्रयत्न करतों. व्यापार-व्यवहार प्रत्येक जागीं असत्याची जरूरी आहे असें म्हणतात. म्हणजे कोणत्या वस्तूला महत्त्व द्यावें व कोणती वस्तु गौण मानावी हें आम्ही जाणत नाहीं. म्हणून आपल्या दृष्टीनें मी असें म्हणेन कीं आध्यात्मिक असो किंवा व्यावहारिक असो, दोन्ही दृष्टींनीं सत्याला प्रथम स्थान दिलें च पाहिजे. आमचेकरितां सर्वांत प्रथम जर कोणती गोष्ट असेल तर ती सत्य च आहे. आम्हांला त्याची च उपासना करायला पाहिजे.

**सत्य आणि निर्भयता**

सत्याची पूर्ति झाली म्हणजे इतर गुण त्यांत आपोआप येतात. पण आज असें होत नाहीं. कारण आम्ही जर आपल्या वाईट खोडी किंवा अपराध उघड केले तर समाजांत निंदा होते. ती निंदा किंवा नालस्ती सहन करण्याची हिंमत आपल्यांत पाहिजे. म्हणून सत्याचें रक्षण करण्याकरितां आम्हांला निर्भय होण्याची जरूरी भासत आहे. जें कांहीं होणार तें होवो, कोणी आमची किती हि नालस्ती करो, मी सत्य च बोलेन असा निश्चय करण्याची आज गरज आहे. परंतु वस्तुतः सत्य तर स्वाभाविक आहे. आज समाजाची परिस्थिति उलट आहे. म्हणून सत्याकारितां निर्भयतेची गरज आहे. म्हणून तर निर्भयतेचें महत्त्व उगीच च वाढलें आहे. विनाकारण म्हणा किंवा सकारण म्हणा निर्भयतेशिवाय सत्य प्रकट करतां येत नाहीं. म्हणून निर्भयतेला महत्त्व द्यावें लागतें. म. गांधींनीं हि त्याला महत्त्व दिलें आणि गीतेनें तर ' अभया 'ला सर्व गुणांचा सेनापति केलें आहे. पण बारीक दृष्टीनें विचार केला तर निर्भयता ही सत्याचें रक्षण करण्याची एक युक्ति आहे. अभयाशिवाय सत्य राखलें जाऊं शकत नाहीं. म्हणून त्याला

स्थान मिळालें आहे. समाजाची आज आहे अशी जर परिस्थिति नसती तर 'अभया 'ला इतकें महत्त्वाचें स्थान मिळालें नसतें.

**भय आणि अभय**

खरें पाहतां जीवनांत भय व अभय या दोहोंची गरज असते. जर फक्त अभयानें च चाललें तर मूर्खता पदरीं येईल. समजा, साप आहे आणि आम्ही जर त्याला भ्यालों नाहीं तर ती चूक होईल. जेथें भिण्याची गरज आहे तेथें भ्यालें पाहिजे. जेथें भिण्याची गरज नाहीं तेथें निर्भय झालें पाहिजे. आगगाडी येत आहे आणि मी रुळावरून जात आहें आणि भीत नाहीं तर हा मूर्खपणा होईल. म्हणून कांहीं ठिकाणीं भिण्याची आवश्यकता असते आणि मुलांना अशा तऱ्हेनें भीति शिकविली तर हें ज्ञान देणें होईल. जास्त खाल तर त्रास होईल, विस्तवावर पाय ठेवाल तर तो भाजेल, पुरांत जाशील तर बुडशील हें सर्व शिकविणें म्हणजे ज्ञान देण्याचे च प्रसंग आहेत. म्हणून या प्रयोगांत कोणतें काम केल्यानें धोका असतो हें सर्व शिकविलें पाहिजे. ती भीति हि ज्ञानाचें च रूप आहे. या दृष्टीनें जर पाहिलें तर भय व अभय या दोहोंची आपल्या जीवनांत जरूरी आहे. गीतेनें सुद्धां म्हटलें आहे कीं कोठें भ्यावें, कोठें भिऊं नये, हें दोन्ही समजलें पाहिजे.

**सत्य हा सर्वांत प्रथम गुण आहे**

परंतु आज उलट स्थिति आहे. मुलांनीं आईबापांना भ्यायला नको तर तीं त्यांना च भितात. मूर्ख मित्रांपासून भ्यायला पाहिजे तर त्यांना मुलें भीत नाहींत आणि त्यांचेजवळ आपलें अंतःकरण उघडें करून सांगतात. म्हणजे असें उलटें चालत आहे. आज अभयाला जें इतकें सार्वभौम महत्त्व दिलें गेलें याचें कारण हें च आहे कीं त्याशिवाय समाजांत सत्याचें रक्षण होऊं शकत नाहीं. अभयाला सर्वप्रथम गुण समजलें आहे पण वास्तविक सत्य हा च सर्वप्रथम गुण आहे.

**दातन, मेदिनीपूर**

२५-१-'५५

# उत्कल-पुरी संमेलनापर्यंत

[ २६ जानेवारी '५५ ते ३१ मार्च '५५ पर्यंत ]

मी अखेर या भूमीवर येऊन पोहोंचलों. याचा मला आज फार आनंद वाटत आहे. जिनें चक्रवर्ति अशोकाला अहिंसेची दीक्षा दिली ती ही भूमि. तिनें 'चंड अशोक' चें परिवर्तन 'धर्म अशोक' मध्यें केलें. गांधीजी म्हणत असत कीं गरीबांची सेवा करण्याला धांवून जावयाचें असेल तर तें उत्कलला च. परंतु भारतांत मीं इतर हि अनेक देश पाहिले आहेत कीं जे दारिद्र्यांत उत्कलची बरोबरी करूं शकतात.

### स्वराज्याचे दोन भाग

मला विशेष आनंद होतो कीं आज स्वराज्याचे प्रतिज्ञेचा दिवस आहे आणि त्या च दिवशीं मी येथें येत आहें. या च दिवशीं हिंदुस्थानानें स्वराज्याची प्रतिज्ञा घेतली होती. आणि आज त्याचा एक भाग पुरा झाला. परंतु हा पुरा झालेला भाग लहानसा आहे. आणि पुरा व्हावयाचा अंश फार च मोठा आहे. आम्ही कोणाचा जुलूम सहन करणार नाहीं हा एक अंश व कोणावर हि जुलूम करणार नाहीं हा दुसरा अंश. आम्ही कोणाला दबणार नाहीं व कोणाला दाबणार नाहीं. कोणाला भिणार नाहीं, कोणाला भिवविणार नाहीं. हे दोन्ही अंश मिळून निर्भयता आणि स्वराज्य होतें. जंगलांतील वाघ जुलूम सहन करीत नाहीं पण त्याला स्वातंत्र्याचें प्रेम नसतें. कारण तो इतर जनावरांवर जुलूम करतो. म्हणून मी म्हणतों कीं ज्याचे घरीं पोपट पिंजऱ्यांत ठेवलेला असतो त्या मनुष्याला स्वातंत्र्याचें मुळीं च प्रेम नसतें.

### अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे

इंग्रजांची सत्ता तर आम्हीं दूर केली. पण पूर्ण स्वातंत्र्य मिळालें अशी गोष्ट नाहीं. आज सुद्धां येथें गुलामीचे अनेक प्रकार आहेत. म्हणून आज सर्व लोकांना दुसऱ्यांदा प्रतिज्ञा घ्यावयाची आहे, फिरून प्रतिज्ञा करावयाची

आहे, कीं देशांत आम्ही कोणते हि प्रकारची गुलामी राहूं देणार नाहीं. आज मला आमच्या हरिजनबंधूंचें विशेष स्मरण होत आहे. त्यांच्याशीं असलेला अस्पृश्यतेचा व्यवहार आम्हीं अजून सोडला नाहीं. आम्हीं प्रतिज्ञा करायला हवी कीं आपल्या मंगल देशांत अस्पृश्यतेचा अमंगल डाग एक दिवस सुद्धां राहूं देणार नाहीं. जे अधिकार किंवा हक्क इतर सर्वांना आहेत ते सर्व हरिजनबंधूंना देऊं तेव्हां च आम्ही पूर्ण स्वतंत्र होऊं. हा तर सामाजिक गुलामीचा एक प्रकार आहे. आणि तो सर्वांत वाईट आहे.

## मालकी हक्क नष्ट करायचा आहे

दुसरा आर्थिक गुलामीचा प्रकार म्हणजे भूमिहीन मजूर आणि शहरांत गिरणी मजूर. आपल्याला माहीत आहे कीं ज्याला लोक 'भूदान-यज्ञ-आंदोलन' म्हणतात त्याला मी 'मजुरांचें आंदोलन' म्हणत असतों. त्यांची गुलामी नाहींशी करण्याकरितां तर आतां आम्हीं भूदान-यज्ञ आणि संपत्ति-दान-यज्ञाचें काम सुरू केलें आहे. पण ही फक्त सुरुवात च आहे. आम्हांला तर भारतांत कोणीं हि मालकीहक्क सांगूं नये असें करायचें आहे. मालक हा एकटा परमेश्वर राहील. तो च मालक व स्वामी आहे. आम्ही सारे त्याचे सेवक आहोंत. आम्ही सर्व बरोबरीचे च आहोंत. आम्हांला संपत्तीचा व कारखान्यांचा मालकीहक्क नष्ट करायचा आहे. सर्व समाजाची संपत्ति समाजांत वाहूं लागेल आणि सर्वांना तिचा फायदा समानतेनें मिळेल असें आम्हांला करायचें आहे. आमचे देशांत स्त्री-पुरुषांत असमानता बरी च आहे ही सुद्धां नष्ट करून स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य द्यायचें आहे. तेव्हां च स्वराज्याचा एक अंश पुरा होईल. या देशांत 'अहिंसक समाजवादी रचना' करायची आहे अशी घोषणा ऐकून मला आनंद होत आहे. हिंदुस्थानांतील समाजवादांत आम्हीं विचारपूर्वक निर्णय केला आहे कीं ह्यांत मनुष्याबरोबर गाई आणि बैल यांचा हि समावेश व्हावा. म्हणून आपण आपल्या देशांत जनावरांवर हि प्रेमाचा वर्षाव करावा. त्यांच्यावर कोणत्या हि प्रकारें अन्याय होतां कामा नये. आदिवासी लोकांना इतर दुसऱ्या लोकांबरोबर आणावें लागेल.

ह्या सर्व प्रतिज्ञा आतां आपल्याला तडीस न्यायच्या आहेत. म्हणून च आजच्या दिवसाचें विशेष महत्त्व आहे.

मी तर आणखी खोलांत जाऊन असें म्हणूं इच्छितों कीं आमचीं इंद्रियें आणि मन आमचे स्वाधीन राहतील; आम्ही त्यांचे गुलाम राहणार नाहीं. म्हणून च प्राचीन काळीं वैदिक ऋषीनें मंत्र दिला '**यते महि स्वराज्ये**' आम्ही स्वराज्याकरितां प्रयत्न करूं. अशा रीतीनें आम्हांला सर्व प्रकारची गुलामी नष्ट करायची आहे. आणि भूदानयज्ञ हा त्याचें प्रतीक मात्र आहे. हें सर्व काम अहिंसक क्रांतीशिवाय होऊं शकत नाहीं. म्हणून च आम्हीं अहिंसक क्रांतीची घोषणा केली आहे. भूदान-यज्ञांत जी जमीन मिळेल तिचा निदान एकतृतीयांश हिस्सा हरिजन लोकांत वांटला जाईल असें आम्हीं बरे च पूर्वीं जाहीर केलें आहे.

## भूदानयज्ञ आणि सामाजिक, आर्थिक विषमता

आजच्या दिवशीं आपण सर्व प्रतिज्ञा करूं कीं आम्ही आपल्या देशांत कोणत्या हि प्रकारची सामाजिक वा आर्थिक गुलामी राहूं देणार नाहीं. प्रत्येक मनुष्य आपली संपत्ति व जमीन यांचा सहावा हिस्सा देऊन च बाकीचा हिस्सा उपभोगील. संपत्ति व जमीन खेड्याखेड्यांतून वांटली जाईल आणि सर्व खेड्यांत गोकुळ स्थापन होईल. म्हणून मी माझें मोठें भाग्य समजतों कीं राजकीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाबरोबर च हें काम करण्याची संधि परमेश्वरानें मला दिली. आपण सर्व मोठे भाग्यवान् आहांत कीं असें काम केल्यानें धर्मकार्यांत मदत करण्याची संधि आपल्याला मिळत आहे. पहिलें पाऊल म्हणून मी आज सहावा हिस्सा मागतों. परंतु शेवटीं आम्हांला सर्व जमीन गांवाचे मालकीची करायची आहे.

**लक्ष्मणनाथ रोड**

२६-१-'५५

## अपरिग्रह समाजाचीं पांच लक्षणें : ८ :

मीं स्पष्ट उघड उघड सांगून टाकलें च आहे कीं 'हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें हवा, पाणी व सूर्यप्रकाश सर्वांना मिळूं शकतात त्या च प्रमाणें जमीन हि सर्वांना मिळाली पाहिजे.' हें मीं पूर्वीं च जाहीरपणें सांगितलें आहे. माझी खुबी एवढी च कीं मला हें काम लोकांकडून लोकांना समजावून त्यांचे हृदयांत पालट करून मी करूं इच्छितों. मी त्यांना समजावूं इच्छितों कीं जमीनमालक आणि भूमिहीन या दोघांचें हि कल्याण व्हावें म्हणून जमीनमालकांनीं आपापल्या जमिनीचा सहावा हिस्सा भूमिहीनांना द्यावा. मी हें हि सांगतों कीं धनवानांनीं आपल्या धनाचा सहावा हिस्सा धनहीनांना प्रेमपूर्वक द्यावा. हें काम करण्याचें आमचें एक शस्त्र आहे. आणि तें म्हणजे प्रेमानें समजाविणें. म्हणून जेथें जेथें मी जातों तेथील लोक माझेसमोर शंका मांडतात व मी त्यांना उत्तर देत असतों. पुष्कळ ठिकाणीं लोक ती च ती शंका वारंवार विचारतात. तरी फिरून फिरून उत्तर देण्यास मला थकवा येत नाहीं; उलट माझा उत्साह वाढतो. लोक विचारतात आणि आज एकानें विचारलें कीं शेवटीं तुम्ही जो सर्वोदयसमाज करण्याची इच्छा करतां त्यांत संपत्ति वाढेल किंवा कमी होईल ? त्यांत संग्रह राहील किंवा नाहीं ? लोक समजतात कीं 'बाबा' पायीं फिरतो, जास्त कपडा घालीत नाहीं, आणि त्यानें संग्रह सोडून दिला आहे. तेव्हां सर्व समाजाला असें च बनविण्याची त्याची इच्छा आहे. सारांश, त्यांना असें वाटतें कीं सर्वोदयसमाजांत कमींत कमी संग्रह आणि बहुतेक संपत्ति सुद्धां कमींत कमी राहील आणि म्हणून सर्व च मला ही गोष्ट विचारतात. परंतु मी त्यांना समजावून सांगूं इच्छितों कीं आम्हांला समाज तर 'असंग्रहा'चे तत्त्वावर उभा करावयाचा आहे. पण असंग्रहाचा अर्थ लोकांना समजला नाहीं. आज मी तें च समजावून सांगणार आहें.

### अपरिग्रह म्हणजे अत्यंत परिग्रह पण विभाजित

आज तर हिंदुस्थानांत सर्वोदयसमाज कुठें च नाहीं. मोठे मोठे श्रीमंत आहेत आणि लोकांना संग्रह वाढविण्याची धुन लागली आहे. आणि

इतकी संग्रहनिष्ठा असून सुद्धां किती संग्रह झाला? प्रत्येक घरांत दर मनुष्याला अडीच छटाक दूध मिळूं शकतें ही तर आज संग्रह करणाऱ्या समाजाची स्थिति आहे. परंतु बाबा जो असंग्रही समाज बनवूं इच्छितो त्यांत दर मनुष्याला एक शेर दूध मिळेल. आजच्या संग्रही समाजांत देशांत वर्षभर पुरूं शकेल इतकें धान्य आहे किंवा नाहीं याबद्दल शंका आहे.

परंतु बाबा जो असंग्रही समाज करूं इच्छितो त्यांत कमींत कमी दोन वर्षें पुरणारा धान्याचा पूर्ण सांठा राहील. बाबाचे समाजांत प्रत्येक घरांत धान्य राहील आणि भुकेलेल्याला प्रत्येक घरीं जाऊन मागण्याचा हक्क राहील. जसा तहानेला कोणाचे हि घरीं जाऊन पाणी मागतो, त्याला कोणी हि पैसे न मागतां पाणी पाजतात, तसाच भुकेला कोणत्या हि घरीं जाईल आणि लोक त्याला जेऊं घालायला तयार होतील. त्याला जेऊं घालण्या-पुरतें प्रत्येक घरीं धान्य असावें असा आहे बाबाचा असंग्रही समाज. बाबा ही गोष्ट नवीन सांगत नाहीं. बाबाचे बाबा परम गुरु उपनिषदानें हि हा च मंत्र दिला आहे कीं अन्न पुष्कळ वाढवा. उपनिषद् म्हणजे ब्रह्म-विद्या. ती सर्वांना समजावते कीं जगत् मिथ्या आहे. म्हणून आसक्ति ठेवूं नका. ती असें हि शिकविते कीं '**अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्**' अन्न पुष्कळ वाढवा. बाबा म्हणतो कीं अन्न वाढवाल तर प्रत्येक घरांत पुष्कळ अन्न राहील; इतकें राहील कीं कोणी त्याची किंमत च करणार नाहीं. त्याला मिथ्या समजतील. आणि मग जर कोणी भुकेला राहिला तर लोक त्याला खायला देतील. पण अन्न कोणी विकणार नाहीं.

आपण विचाराल कीं यांत असंग्रह तो काय झाला? हा तर संग्रह च आहे. परंतु यांत विशेष हा कीं भुकेल्याला प्रत्येकजण खायला देईल. जे लोक 'डालडा' खातात त्यांना शुद्ध तूप खायला मिळेल. बाबाचे समाजांत पुष्कळ तूप, भाजी मिळेल. कोणत्या हि घरीं आपण जाल तर घर-मालक म्हणेल, 'यावें. दोन तास जरा शेतांत काम करूं, अकरा वाजतां भोजन करूं. आतां तर नऊ च वाजले आहेत.' आणि बाबाचे समाजांत लोक मांस, मच्छी खाणें सोडून देतील आणि म्हणून गाईचें दूध पुष्कळ

पितील. आज तर गाईचें दूध मिळणें कठीण झालें आहे. पण बाबाच्या योजनेंत अपरिग्रह समाजांत मधाची महानदी वाहील. जशी महानदी जंगलांतून येते तशी च मधाची येईल. अशा तऱ्हेनें अपरिग्रह समाजांत इतका परिग्रह वाढविण्याची माझी इच्छा आहे. पण लोकांना हें समजत नाहीं. मी संग्रह वाढवूं इच्छितों. पण तो प्रत्येक घरांत वांटून देऊं इच्छितों. अशी माझी इच्छा नाहीं कीं कोणाचें शरीर मजबूत आणि कोणाचें अशक्त. हातांपायांच्या काड्या व पोटाचा नगारा व्हावा असें मी इच्छीत नाहीं. प्रत्येक अवयवांत शक्ति पाहिजे. सारांश, अपरिग्रह समाजांत संपत्ति चांगली वाढेल. याचें कारण अपरिग्रह म्हणजे अत्यंत संग्रह परंतु विभागलेला.

## व्यर्थ वस्तूंचा संग्रह होणार नाहीं

तिसरी गोष्ट ही कीं कोणत्या हि व्यर्थ वस्तूंचा संग्रह होणार नाहीं. असंग्रहाचे कसोटीवर आम्ही सिगारेटसारख्या वस्तूंना होळींत जाळून टाकूं. व्यर्थ वस्तूंचा संग्रह समाजांत होणार नाहीं असें असंग्रहाचे तीन अर्थ झाले. पहिला हा कीं समाजांत संपत्ति पुष्कळ वाढणें, दुसरा हा कीं संपत्ति घरोघरीं वाढणें, आणि तिसरा हा कीं व्यर्थ वस्तूंचा संग्रह न वाढविणें. दारूच्या बाटल्या व सिगारेटचीं बंडलें संपत्ति नव्हेत.

## क्रमयुक्त संग्रह

अपरिग्रहांत चौथी गोष्ट ही असेल कीं चांगल्या वस्तूंत सुद्धां क्रम पहावा लागेल. आज तर क्रमाचें भान न राहतां लोक विनाकारण वस्तु वाढवीत चालले आहेत. हा क्रम खालीलप्रमाणें असेल:—

(१) जेवण उत्तम मिळालें पाहिजे.

(२) प्रत्येकाला कपडा मिळाला पाहिजे.

(३) चांगलें घर मिळालें पाहिजे.

(४) ( शेतीचीं ) अवजारें मिळणें.

(५) ज्ञानाचीं साधनें, पुस्तकें वगैरे उत्तम मिळालीं पाहिजेत.

(६) मनोरंजनाचीं साधनें, संगीत वगैरे उपलब्ध झालें पाहिजे.

असा वस्तूंचा क्रम लावला आहे त्याप्रमाणें वस्तूंत वाढ व्हायला पाहिजे. एका बंधूनें म्हटलें कीं सभेंत लोक चांगले कपडे घालून येतात म्हणजे दारिद्र्य आतां नाहीं. मी म्हणतों कीं दारिद्र्य तर आहे आणि अक्कल पण कमी आहे. शहरांत ही स्थिति असते कीं खायला मिळत नाहीं तरी पण लोक उत्तम उत्तम कपडे घालतात. तूप मिळत नाहीं पण 'डालडा' खातात. कांहीं घरांत जेवणाच्या वस्तू मुबलक नसतील तरी कपडे पुष्कळ असतील. टूथ ब्रश, पेस्ट, लिपस्टिक-सारख्या वस्तू आणि हार्मोनियम सुद्धां असतो. अरे भल्या माणसा, बाजा वाजव पण पहिल्यांदा जेव तर खरा! मग वाजव. अशा रीतीनें कोणती वस्तु प्रथम व कोणती मागाहून प्राप्त करायला हवी हें हि पहावें लागेल. समजा कीं माझे घरांत पुरें दूध नाहीं, तूप नाहीं, तर पहिल्यांदा मी ह्या वस्तू आणीन. सारांश, असंग्रह याचा अर्थ क्रमाप्रमाणें संग्रह.

६८६५

**पैसा कमींत कमी राहील**

अपरिग्रही समाजांत पैसा कमींत कमी राहील. पैसा ही लक्ष्मी नाहीं; पिशाच्च किंवा राक्षस आहे. वास्तविक केळीं, आंबे, भाजी, धान्य ही च लक्ष्मी आहे. पैसा तर नाशिकच्या छापखान्यांत तयार होतो. ज्याप्रमाणें रिव्हॉल्वर दाखवून केळीं घेऊन जाणें ही चोरी, दरोडेखोरी आहे त्या च प्रमाणें पांच रुपयांची नोट दाखवून तूप घेऊन जाणें ही दरोडेखोरी आहे. पैसा हा राक्षसांचें हत्यार आहे. परंतु लक्ष्मी ही देवता आहे. ती भगवान् विष्णूचे आश्रयाला राहते '**उद्योगीनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः।**' उद्योग करणारांना लक्ष्मी मिळते. आणि पैसा तर छापखाना चालवून मिळतो. "**कराग्रे वसते लक्ष्मीः**" लक्ष्मी आमचे हातांचे बोटांत राहते. भगवंतानें आम्हांला दहा बोटें दिलीं आहेत. त्यांनीं परिश्रम केल्यावर लक्ष्मी मिळेल. सारांश, अपरिग्रही समाजांत सगळ्यांत कमींत कमी वस्तु राहील पैसा.

कारण पैशानें चोरी सुलभ होते. ती रात्रीं हि करण्याची गरज नाहीं. दिवसा हि होऊं शकते. हा पैसा लोकांजवळ आला आणि त्यानें च लोकांना

श्रमांत पाडलें. आज जो गरीब आहे तो श्रीमंत बनला व जो धनवान् आहे तो दरिद्री बनला आहे ज्याचेजवळ दहीं, दूध, भाजी, धान्य आहे त्याला म्हणतात गरीब व ज्याचेजवळ ह्यांपैकीं एक हि वस्तु नाहीं, फक्त पैसा आहे, त्याला म्हणतात 'धनी' किंवा 'श्रीमान्.' हे श्रीमंत लोक बिचारे श्रम करणाऱ्याजवळ जातात आणि पैसा देऊन त्यांचेकडून वस्तु घेतात. असा संग्रह म्हणजे पैशांचा संग्रह अपरिग्रही समाजांत कमींत कमी होईल. म्हणून त्याला मी अपरिग्रही समाज म्हणतों. अशा तऱ्हेनें अपरिग्रही समाजाचीं पांच लक्षणें आहेत. (१) या समाजांत लक्ष्मी पुष्कळ वाढेल म्हणजे तिची समृद्धि होईल. (२) लक्ष्मी घराघरांत वांटली जाईल म्हणजे तिचें समान वांटप होईल. (३) निरर्थक वस्तूंचा संग्रह होणार नाहीं. (४) क्रमाप्रमाणें संग्रह होईल. (५) पैसा कमींत कमी राहील.

**जामझूली** (बालेश्वर)
२९-१-'५५

## भारतांतील श्रीमंतांनीं गांधीजींची अपेक्षा पुरी करावी : ९ :

आपण सर्व जाणतां कीं आज म. गांधींचा प्रयाण-दिन आहे. ती गोष्ट तर दिल्लीचे प्रार्थनासभेंत घडली आणि त्या दिवशीं मी पवनारचे आश्रमांत होतों घटना घडल्यानंतर दोन तासांनीं मला कळविण्यांत आली. ऐकल्याबरोबर माझे मनांत हें च आलें कीं, 'आतां बापू अमर झाले.' आणि त्या क्षणापासून आजच्या ह्या क्षणापर्यंत मला असें सतत वाटत राहिलें आहे. बापू शरीरधारी होते तेव्हां त्यांना भेटण्यास किंवा त्यांचे-जवळ जाण्यास कांहीं वेळ लागत होता. परंतु आज त्यांची भेट घेण्यास एका क्षणाची हि आवश्यकता नाहीं. जरा डोळे मिटून विचार केला कीं भेट होते. त्यांना 'राष्ट्रपिता' म्हणत असत आणि ती च पदवी त्यांना सर्व तऱ्हेनें योग्य आहे. आम्ही सर्व त्यांचे आसपासचे आणि कांहीं भारतवासी त्यांना 'बापू' म्हणून ओळखत असत. 'बापू'चा अर्थ आहे 'पिता'.

## व्यापक ईश्वरांत संतांचें स्वतंत्र ध्यान

गेल्या वर्षीं आमची सतत यात्रा झाली. पूरग्रस्त प्रदेशांत हिंडत होतों. परंतु मनांत एक क्षणभर सुद्धां आलें नाहीं कीं आम्ही कोणत्या अवघड रस्त्यावरून चालत आहोंत. आम्ही फक्त परमेश्वराचें नांव घेतों तर त्या-बरोबर दुसरें कोणतें नांव घेणें बाकी रहात नाहीं. परमेश्वर इतकें व्यापक स्वरूप धारण करतो कीं त्यांत असंख्य सत्पुरुष, ज्याप्रमाणें डाळिंबाचे फळांत असंख्य दाणे असतात, त्याप्रमाणें जमलेले असतात. म्हणून मी जेव्हां परमेश्वराचें स्मरण करतों तेव्हां त्यांत 'बापूं'चें स्मरण येतें च. मी जाणतों कीं अशा तऱ्हेची गोष्ट ईश्वरासमोर बोलणें हास्यास्पद आहे. एक त्याचें च अस्तित्व आहे. दुसरें कोणाचें हि अस्तित्व या दुनियेंत नाहीं. तरी हि माझे भक्तीमुळें अंतःकरणांत असा भास होतो कीं संतांना स्वतःचें अलग स्थान आहे. त्यांची शक्ति ईश्वरशक्तींत असूं शकेल. पण त्यांचें एक स्वतंत्र स्थान अवश्य आहे.

भूदान-यज्ञ, संपत्ति-दान-यज्ञ, श्रम-दान-यज्ञ वगैरे कामें चालत असतांना च त्यांतून जीवनदान निघालें. ह्या कार्यक्रमामुळें माझे अंतःकरणांत अत्यंत आनंद होत आहे. सतत समाधान असतें कीं मी निरंतर बापूंचे बरोबर रहात आहें. आज माझ्यांत लोकांना उपदेश देण्याची वृत्ति नाहीं. जें कांहीं बोलणार आहें तें मी अशा तऱ्हेनें बोलेन, जसें मी स्वतःशीं च बोलत आहें. मी असें च बोलणार आहें. तसें पाहिल्यास मला व्याख्यानांत शब्द सहज च सुचतात. परंतु आज माझे शब्द इतके सहज निघणार नाहींत.

## भारतांतील श्रीमंतांना आवाहन

मला आनंद वाटतो कीं आज सात वर्षांनंतर देश हळूं हळूं बापूंच्या उपदेशाजवळ येत आहे. आपण ऐकलें असेल कीं आमची सर्वांत मोठी संस्था 'कॉंग्रेस' आतां म्हणूं लागली कीं 'हिंदुस्थानांतील गरिबांची स्थिति सुधारणें हा च आमचा उद्देश राहील आणि आम्ही समाजवादी रचना करूं.' मी तर 'साम्ययोगी समाज' हा शब्दप्रयोग अधिक पसंत

करतों, हा साम्यवाद शब्दापेक्षां निराळा आहे. पण त्याचें सारसर्वस्व ह्यांत येतें. 'समाजवादी रचना' म्हणण्यांत हि पुढाऱ्यांचा हा च आशय दिसतो कारण कीं त्याबरोबर च त्यांनीं 'अहिंसा' हि जोडली आहे. शेवटीं 'अहिंसक समाजवाद' म्हणण्याचा अर्थ 'साम्ययोगी समाज' च होतो. आणि त्याचा च अर्थ आहे 'सर्वोदय.' परंतु मला सर्वांत उत्तम 'साम्ययोग' शब्द वाटतो. कारण कोणते हि प्रकारचा विचारदोष ह्यांत रहात नाहीं.

असें दिसून येतें की 'समाजवादी रचना' म्हणण्यांत लोकांचे मनांत अशी शंका येते कीं त्यांत व्यक्तिगत कर्तृत्व (प्रायव्हेट सेक्टर) ला काय स्थान राहील ? यावर असें सांगण्यांत येतें कीं खाजगी प्रयत्नाला हि यांत पुरेसें स्थान मिळेल. भांडवलवाल्यांना जरा भीति वाटते कीं 'समाजवाद' शब्द उच्चारल्यामुळें कदाचित् येथें दुसरी च व्यवस्था उत्पन्न होईल. परंतु आजच्या पवित्र दिनीं मी स्पष्ट सांगूं इच्छितों कीं भारताचे श्रीमंत जर भूदान आणि संपत्तिदानांत सामील होतील तर त्यांना वाटणारी भीति मुळीं च राहणार नाहीं. ते जर 'सर्वोदय' याचा अर्थ समजावून घेतील तर 'प्रायव्हेट' आणि 'पब्लिक' सेक्टरची भीति नाहींशी होईल. म्हणून ज्यांच्याजवळ कांहीं संपत्ति आहे त्यांना माझें आज आवाहन आहे कीं त्यांनीं आपले जीवनांत सर्वोदयाचे विचाराप्रमाणें परिवर्तन करावें. मी या च आशेनें पायीं फिरत आहें. म्हणजे माझा आज जो सत्याग्रह चालला आहे त्याचा परिणाम म्हणून जमीनवाले आणि संपत्तिवाले ही चळवळ स्वतः च सुरू करतील आणि ती स्वतःची च चळवळ समजतील कारण त्यांच्या अंतःकरणांत सद्भावना आहे. अशी माझी श्रद्धा नसती तर या चळवळींत माझा विश्वास च राहिला नसता. गेल्या चार वर्षांचे अनुभवानें माझी ही श्रद्धा अधिक पक्की झाली आहे. आणि असें दिसून येतें कीं हळूं हळूं जमीनमालक या चळवळीला अनुकूल होत आहेत.

**तीन अपेक्षा**

आज सबंध हिंदुस्थानच्या श्रीमंत मित्रांना माझी विनंती आहे व भारताच्या सर्व मोठमोठ्या मालकांना माझी प्रार्थना आहे कीं त्यांनीं तीन गोष्टी कराव्यात म्हणजे त्यांना समाजसेवा करण्याचें बरेंच मोठें श्रेय मिळेल.

पहिली गोष्ट मी इच्छितों ही कीं त्यांनीं नफेबाजी आणि व्याज घेणें सोडून द्यावें. त्यामुळें त्यांची कांहीं च हानि होणार नाहीं उलट त्यांची इज्जत वाढेल. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनीं आपले संपत्तीचा उपयोग ट्रस्टी या नात्यानें करण्याची जबाबदारी घ्यावी आणि त्याप्रमाणें देशासमोर जाहीर करावें आणि तिसरी मागणी ही कीं सर्वोदयसमाजाला मान्यता देऊन त्याचें प्रेमचिन्ह म्हणून त्यांनीं आपले संपत्तीचा सहावा हिस्सा द्यावा त्यामुळें गरीब व भूमिहीनांना लवकर मदत मिळेल. ह्या तीन गोष्टी जर ते करतील तर त्यांना समाजवाद शब्दापासून भिण्याचें कांहीं च कारण उरणार नाहीं. यामुळें त्यांची प्रतिष्ठा वाढेल. गांधीजींना आशा वाटत होती कीं हिंदुस्थानांतील श्रीमंत आपल्या श्रीमंतीचा ट्रस्टी या नात्यानें उपयोग करण्याचें कबूल करतील. मी हि या च आशेनें फिरत आहें. परंतु मी इतकें च म्हणतों कीं आतां फारसा अवकाश राहिला नाहीं. हे विज्ञानाचे दिवस आहेत. आणि जें करायचें तें लवकर केलें पाहिजे. ते जर संपत्तिदानांत हिस्सा देतील, ट्रस्टी होण्याची प्रतिज्ञा करतील आणि नफेबाजी सोडतील तर त्यांचे धर्म, अर्थ व काम तीन हि साधतील.

**सामान्य जनतेनें सहयोग करावा**

सर्वोदयाचे कार्यक्रमांत चित्तशुद्धि ही मुख्य गोष्ट आहे. तो कार्यक्रम सर्वांकरितां आहे. फक्त संपत्तिवाल्यांना च नाहीं तर गरीबांसह सर्व जनतेला तो कार्यक्रम लागू आहे. माझी तर मागणी सर्व आम जनतेला च आहे. मग तो श्रीमंत असो, गरीब किंवा मध्यम स्थितींतला असो. त्यांनीं आपल्या जमिनीचा किंवा संपत्तीचा जी असेल तिचा सहावा हिस्सा देऊनच टाकावा. अशा तऱ्हेनें आपण जितके पुढें जाल तितक्या च प्रमाणांत मोठ्या लोकांवर त्याचा चांगला परिणाम होईल. आणि मोठे लोक या कार्यांत ज्या प्रमाणांत पाऊल टाकतील तितका च उत्साह जनतेंत वाढेल. असें कोणी विचारील कीं पहिलें पाऊल कोणीं टाकावें, गरिबांनीं का श्रीमंतांनीं ? मला वाटतें या बाबतींत पहिली उडी तो च घेईल कीं ज्याचेवर परमेश्वराची पहिल्यांदा कृपा होईल. जनतेंत मी कोणता च फरक करीत नाहीं. सर्वांच्यासमोर हा कार्यक्रम ठेवला आहे. त्याचा मुख्य आधार आहे हृदयपरिवर्तन. आम्ही जर हृदय-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28922 दि: 15-9-63
7206 नों: दि:

परिवर्तनावर विश्वास ठेवणार नाहीं तर आमचा अहिंसेचा मार्ग सुटेल व हिंसेनें काम करण्याची प्रवृत्ति होईल. आम्ही तोंडानें अहिंसेचा जप करूं आणि त्याबरोबर च हृदयपरिवर्तनावर विश्वास न ठेवूं तर आपण दुबळे होऊं. असें द्विविध मन ठेवल्यानें नैतिक बळ येऊं शकत नाहीं. म्हणून आम्ही आज सर्व–गरीब, मध्यम व श्रीमंत–लोक असा संकल्प करूं या कीं आम्ही भूदान, संपत्तिदान व श्रमदान या कार्याला वाहून घेऊं.

हा कार्यक्रम जसजसा वाढत जाईल तसतशीं देशांत निर्भयता आणि सुखाचीं साधनें उपलब्ध होतील यांत मला मुळीं च संशय नाहीं. त्यानें च धर्म वाढेल आणि सुख हि मिळेल. मोठे लोक किंवा भांडवलवाले लोक हिंदुस्थानवर प्रेम करीत नाहींत अशी माझी भावना नाहीं. मध्यम स्थितींतील लोक देशावर प्रेम करणें समजूं शकत नाहींत असें हि मला वाटत नाहीं. किंवा आज जनता जी परिश्रम करून उत्पादन करण्यांत गुंग आहे तिला देशाबद्दल ममता नाहीं असें हि मी समजूं शकत नाहीं. अशा तऱ्हेनें जेथें सर्वांच्या मनांत देशावरील प्रेम जागृत आहे आणि परमेश्वर-कृपेनें स्वराज्य मिळाल्यावर समाजरचना करण्याची संधि आली आहे तर मला आशा आहे कीं सर्व लोक हें कार्य तात्काळ हातीं घेतील.

## देशाला आणि जगाला वांचवा

आतांपर्यंत जवळपास छत्तीस लक्ष एकर जमीन भूदानांत मिळाली. त्यांत बरीच अशी आहे कीं ती नांगरावी लागेल आणि तींत पाण्याची सोय करावी लागेल. भांडवलवाले लोकांनीं हें काम जर आपले अंगावर घेतलें तर ते त्यामुळें साऱ्या हिंदुस्थानांत प्रेमाचे धनी होतील असा माझा विश्वास आहे. त्याचा हा हि परिमाण होईल कीं अहिंसेवर साऱ्या दुनियेचा विश्वास वाढेल. आज सारी दुनिया भयभीत आहे. कोणत्या दिवशीं काय होईल हें सांगतां येत नाहीं. आम्ही दररोज वर्तमानपत्रें वाचतों. कधीं कधीं बातमी येते कीं आतां कदाचित् दुनियेंत शांति होईल असें वाटतें. पण लगेच एके दिवशीं अशी खबर येते कीं कदाचित् दुनियेंत अशांति वाढेल. या दुनियेची स्थिति एखाद्या आजारी मनुष्यासारखी झाली आहे.

त्याचा ताप वाढत आहे, पण मधूनमधून कमी हि होत आहे. कधीं कधीं डॉक्टर जाहीर करतो कीं आज स्थिति चांगली आहे, तर कधीं म्हणतो कीं आज जरा बिघडली आहे. अशी भीतिदायक रोग्यासारखी दुनियेची स्थिति आज झाली आहे. तिला प्रेमाशिवाय, अहिंसेशिवाय किंवा विश्वासाशिवाय आरोग्य मिळूं शकणार नाहीं. हिंदुस्थानचे मोठे लोक जर आमच्या सर्वोदयाचें काम उचलून धरतील आणि ते 'बाबा'ला आपल्या प्रेमानें थोडासा आराम देतील तर मला वाटतें कीं ते स्वतःला वांचवितील च पण त्यामुळें देश आणि दुनिया हि अरिष्टांतून वांचतील.

## आम्हीं गांधीजींच्या श्रद्धेला योग्य व्हावें

आज गांधीजींचे प्रयाणाचे दिवशीं मी त्या सर्व मित्रांना प्रेमपूर्वक प्रार्थना करतों कीं गांधीजींनीं आमच्यावर जो विश्वास ठेवला होता त्याला योग्य असें आम्हीं काम करावें. गांधीजी साक्षी आहेत. आम्ही बालक कसें काय करीत आहोंत हें ते पहात आहेत. इतकें काम जें मीं देशासमोर ठेविलें आहे तें जर आम्ही पुरें करूं तर त्यांचा आत्मा अत्यंत संतुष्ट होईल यांत मला मुळीं च संशय नाहीं. आपणां सर्वांचा आत्मा संतुष्ट होणें हा च त्यांचा आत्मा संतुष्ट झाल्याचा पुरावा.

मथानी
३०-१-'५५

## मालकी सोडण्यानें च आनंद-वृद्धि : १० :

जसजसें भूदान-यज्ञाचें काम वाढत आहे व त्याचा प्रसार होत आहे तसतसें लोक मला विचारतात कीं 'आपण संपत्तिवानांना कां सोडतां?' आपण भूमिमालकांकडून ज्या सिद्धान्ताप्रमाणें जमीन मागतां त्या च सिद्धान्ताप्रमाणें संपत्तिवाल्यांकडून संपत्तीची मागणी करायला पाहिजे. त्यांना हि संपत्ति-दान-यज्ञामार्फत जनसेवा करण्याची संधि मिळाली पाहिजे. वास्तविक माझे मनांत हा विचार पूर्वींपासून च आहे.

### जमिनीची किंमत वास्तविक आणि संपत्तीची काल्पनिक

तसें म्हटलें तर जमीन व दुसरी संपत्ति यांत मी विशेष फरक करीत नाहीं. परंतु सर्व च जाणतात कीं संपत्तीची जी किंमत आहे ती काल्पनिक आहे. सर्व लोकांनीं मिळून त्याला किंमत दिली आहे. परंतु जमिनीला खरी किंमत आहे. समजा कीं लोकांनीं असें ठरविलें कीं आम्हांला कोणीं संपत्ति किंवा सोनें दिलें तरी आम्ही दूध, तूप, भाज्या देणार नाहीं, तर आज रुपयाला असलेली किंमत उतरून जाईल. परंतु जमिनीची स्थिति अशी नाहीं. जमिनीची जी किंमत आहे ती स्वतंत्र आहे. आणि जोंपावेतों मनुष्याला अन्न वगैरेंची गरज आहे तोंपर्यंत ती कमी होऊं शकत नाहीं. म्हणून हवा, पाणी व सूर्यप्रकाश यांची जी योग्यता ती च जमिनीची. सर्वांना जमिनीची तशी च आवश्यकता आहे. जशी हवा, पाणी व सूर्यप्रकाशाची. म्हणून च आम्हीं भूदानयज्ञापासून आरंभ केला. लोकांजवळ जमीन मागावयास गेलों व त्यांनीं दिली. जसजसें भूदान-यज्ञाचें काम वाढत गेलें तसतसा मी विचार करूं लागलों कीं संपत्तिवाल्यांना हि आपल्या संपत्तींतील एक हिस्सा देण्याची संधि मिळाली पाहिजे. धार्मिक दृष्टीनें आणि जेव्हां लाखों एकर जमीन दान मिळूं लागली तेव्हां संपत्तीची हि लागली च आवश्यकता उत्पन्न झाली. कारण संपत्तीशिवाय लाखों एकर जमिनींत पीक काढणें कठीण जाईल. अशा रीतीनें भूदान-यज्ञाला फळ

येण्याकरितां संपत्ति-दान-यज्ञ आवश्यक झाला आहे. शिवाय संपत्तीला स्वतःचें स्थान आहे च. कारण संपत्ति ही समाजांत सहयोगानें च उत्पन्न होत असते. म्हणून त्यावर मालकी समाजाची म्हणजे परमेश्वराची च असावयाला पाहिजे.

## अहिंसक समाजवाद कसा येईल ?

काँग्रेसनें जाहीर केलें कीं हिंदुस्थानांत समाजरचना समाजवादी रचने-प्रमाणें होईल. आणि तो समाजवाद अहिंसक राहील. मी मान्य करतों कीं जेव्हां 'समाजवाद' शब्द उच्चारला जातो तेव्हां त्याबरोबर च किती तरी विचार मनांत येतात. कारण युरोपांत समाजवाद निरनिराळ्या प्रकारचा चालू आहे. म्हणून च म्हटलें आहे कीं येथें जो समाजवाद येईल तो आपले भारतीय पद्धतीचा राहील. म्हणजे अहिंसेच्या साधनानें च येईल. 'समाजवाद' याचा एक अर्थ लोक असा समजतात कीं सर्व कारखाने आणि धंदे सरकारचे अथवा स्टेटचे व्हावेत.' असा च जर त्याचा अर्थ केला तर तो सरकारी भांडवलवाद किंवा स्टेट कॅपिटॅलिझम होईल. खाजगी भांडवलवादापेक्षां सरकारी भांडवलवाद खात्रीनें कल्याणकारी होईल हें मी म्हणूं शकत नाहीं. लोकांचें नियंत्रण जितकें सरकारी भांडवलवादावर राहूं शकेल तितकें व्यक्तिगत भांडवलवादावर राहणार नाहीं हें खरें आहे. तरी पण समाजवादाचा पाया तर हा च आहे कीं प्रत्येक व्यक्तीची सेवा समाजाला मिळेल आणि व्यक्तीला विकास करण्याला पुरा अवकाश मिळेल. केवळ समाजाची सत्ता किंवा सरकारची सत्ता झाल्यानें समाजवाद पूर्ण होऊं शकत नाहीं. समाजवादांत सर्व व्यक्ति स्वखुषीनें आपल्या सर्व शक्ति, ज्या त्याला परमेश्वरानें दिल्या आहेत, त्यांचा उपयोग समाजाकरितां च करील अशी धर्मभावना असणें अवश्य आहे.

शिवाय समाजाकडून प्रत्येक व्यक्तीला त्याची बुद्धि व आत्मा यांचा विकास करण्याला पूर्ण संधि मिळायला पाहिजे. व्यक्तीचे स्वातंत्र्याआड कांहीं अडथळा येतां कामा नये. सर्वांना विकासाची संधि देण्याचा अर्थ हा आहे : (१) प्रत्येकाची बुद्धि स्वतंत्र मानली पाहिजे व (२) सर्व मनुष्यांना

सारखी संधि मिळाली पाहिजे. आज सरकारजवळ बरीच सत्ता आहे. पण तिचा उपयोग योग्य च होतो असें मला दिसत नाहीं. आणखी जर धंदे त्यांचे ताब्यांत दिले तर त्यांचा उपयोग कल्याणकारी च होईल असें कसें म्हणतां येईल ? आजकालचीं सरकारें जीं लोकतांत्रिक समजलीं जातात तीं जोंपर्यंत केंद्रित शक्तीनें बनलीं आहेत तोंपर्यंत त्यांच्यावर लोकांचें नियंत्रण कांहीं च राहू शकत नाहीं म्हणून सरकारी सत्ता विभागली जाऊन ती गांवोगांवीं वांटली गेली पाहिजे. त्या च वेळीं अहिंसक समाजवाद होईल

## अहिंसक समाजवादांत भांडवलवाल्यांचें हि कल्याण

अहिंसक समाजवादी रचनेमध्यें भांडवलवादी आपली सर्व संपत्ति, बुद्धि व योजनाशक्ति समाजाला देऊन टाकायला तयार झाला तर त्याला कांहीं च धोका राहणार नाहीं यावर भांडवलवाले असें म्हणूं शकतात कीं आमचे हातांत मालकी राहिली नाहीं, तर आम्हांला कारखाने वाढविण्याची आणि त्यांचा विकास करण्याची प्रेरणा कोठून मिळेल ? कांहींना कांहीं स्वार्थाची लालूच असल्यानें च मनुष्याला उत्पादन वाढविण्याकरितां पुरे श्रम करण्याची प्रेरणा होत असते. आणि म्हणून च तो आपली सर्व शक्ति खर्च करतो. परंतु स्वार्थाची भावना असल्याशिवाय सेवेची किंवा उत्पादन वाढविण्याची प्रेरणा मिळूं शकत नाहीं ही कल्पना च चुकीची आहे. त्यांत मानव-स्वभावाचें स्वरूप काय आहे यावर लक्ष दिलें गेलें नाहीं. मी तर समजतों कीं मनुष्यांत जितकी स्वार्थाची भावना आहे त्यापेक्षां किती तरी जास्त त्यागाची भावना आहे. दररोज प्रत्येक कुटुंबांत प्रत्येक मनुष्य त्याग करीत च आहे. आईबाप आपल्या मुलांकरितां, भाऊ आपल्या भावांकरितां व घराकरितां मरेमरेतों कष्ट करितात. म्हणून करावयाची गोष्ट इतकी च कीं आज जी त्यांची त्यागभावना कुटुंबापुरती च मर्यादित आहे ती गांवभर पसरायची. विज्ञानाच्या युगांत या कुटुंब-भावनेला व्यापक करण्याकरितां बाहेरची परिस्थिती हि पुष्कळ अनुकूल झाली आहे. व्यापक भावनेकरितां धर्मदृष्टि तर पूर्वींपासून च अनुकूल आहे. अशा तऱ्हेनें धर्मदृष्टि म्हणते आणि विज्ञान म्हणतें कीं ' सर्व गांवाचें एक

व्यापक कुटुंब करा.' लहान लहान कुटुंबें करण्याऐवजीं एक च कुटुंब करा. आज मानवाची तयारी हि त्या च करितां होत आहे.

आज हिंदुस्थानचे मोठमोठे धनिक प्रतिपादतात कीं आम्हीं जनसेवेकरितां च काम करीत आहोंत. आम्ही हिंदुस्थानचे संस्कृतीचे वारस आहोंत. मी त्यांना समजावितों कीं सर्वोदयविचारांत आम्ही तुमच्या बुद्धीचा पूर्ण उपयोग घेऊं इच्छितों. आम्ही फक्त तुमचे संपत्तीची च वांटणी इच्छीत नाहीं तर तुमचे बुद्धीची हि वांटणी व्हावी असें इच्छितों. लोकांचा असा समज आहे कीं चांगलें काम करण्याकरितां कांहीं बाहेरची प्रेरणा पाहिजे. म्हणून भारत सरकार हि विचार करीत आहे कीं चांगलें काम करणारांना पदव्या बहाल कराव्यात. राजाजींचें च उदाहरण घ्या. त्यांनीं आपला सर्व जन्म निष्कामकर्म करण्यांत च घालविला. त्यांचे जीवनांत सेवेशिवाय दुसरी गोष्ट च नव्हती. आतां भारत सरकार त्यांना 'भारतरत्न' ही पदवी देईल. त्यामुळें त्यांना सेवा करण्याची अधिक प्रेरणा मिळेल असें नाहीं. तरी सरकार त्यांना पदक देतें आणि ते त्याचा नम्रतेनें स्वीकार करतात. त्यामुळें सरकारची इभ्रत वाढते. परंतु सरकार काय हें समजत नाहीं ? या नाटकानें काय राजाजींना उत्तेजन मिळणार होतें ? नाहीं. सरकार तर मुलांना उत्तेजन देत आहे. असें कीं तुम्ही जर राजाजींप्रमाणें सेवा कराल तर तुम्हांला हि 'भारतरत्न' पदक मिळेल. आतां प्रश्न हा आहे कीं राजाजी भारतरत्नाची पदवी मिळणार या प्रेरणेनें तर राजाजी झाले नाहींत ! त्यांना याची कांहीं अपेक्षा च नव्हती, आणखी नवीन बालकांना सुद्धां का भारतरत्न पदवीचे लालुचीनें राजाजी होण्याची प्रेरणा मिळूं शकते ? पण आम्ही जशीं मुलें तशी च जनता असें समजतों आणि त्यांना उत्तेजन देतों. मी धनिकांना हि सांगतों कीं जर ते आपली संपत्ति जनतेच्या सेवेकरितां खर्च करतील तर त्यांना हि आम्ही 'भारतरत्न' करूं. सारांश, उद्योग देशाचे मालकीचे झाल्यावर धनिक आज उद्योग वाढविण्यांत जशी चांगल्या तऱ्हेनें अक्कल चालवितात तशी चालविण्याकरितां त्यांना प्रेरणा मिळणार नाहीं असें समजणें सर्वथैव चूक आहे.

## मालकी सोडण्यानें आनंदवृद्धि व चिंतामुक्ति

आमचा सर्वोदयविचार फार च पुढें गेलेला समाजवाद आहे. त्यांत केवळ संपत्तीची मालकी नष्ट करण्याची गोष्ट नाहीं. आम्ही तर बुद्धीची हि मालकी भगवंताला समर्पण करूं इच्छितों. म्हणून च आम्ही जी भगवंताची प्रार्थना करतों—त्या गायत्रीमंत्रांत आम्ही म्हणत असतों—कीं भगवन्, आमचे बुद्धीला प्रेरणा दे. भगवंताची सेवा करण्याचे इराद्यानें जी प्रेरणा मिळूं शकते त्यापेक्षां जास्त प्रेरणा मालकीच्या इच्छेनें कशी मिळूं शकेल? मीं भगवंताचें नांव घेतलें म्हणून घाबरण्याचें कारण नाहीं. भगवान् तर जनतारूपांत आम्हांला प्रत्यक्ष दर्शन देत आहे. आईला आपल्या मुलांत आत्मदर्शन होतें तेव्हां तिला आनंद होतो. तिला तर सर्व प्रेरणा त्याचे-पासून व त्या आनंदापासून च मिळते. आईला आपल्या छोट्या बालकावर प्रेम करण्याची प्रेरणा असते तशी च प्रेरणा आम्हांला जनसेवा करण्यांत होत असते. जनसेवेंत बुद्धीचें काम नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे.

मुख्य गोष्ट ही कीं आम्ही जिला 'नफेबाजी' म्हणतों ती सोडून द्यावी लागेल. आज बिर्ला व टाटा हे आपल्या धंद्याचे मालक आहेत असें समजलें जातें. पण याऐवजीं त्यांना 'व्यवस्थापक' किंवा 'सेवक' म्हटलें तर काय बिघडेल? ही तर त्यांना अधिक उत्तम पदवी शोभेल. आज हि ते समाजातर्फें च धंद्याचा विकास करतात. या कामाकरितां त्यांना जर मजुरांप्रमाणें मेहनताना दिला तर त्यांची बुद्धि मंद होईल असें समजणें चूक आहे. जेव्हां मनुष्य आपल्या धंद्याचा किंवा संपत्तीचा ट्रस्टी होतो तेव्हां त्याचा आनंद वाढतो आणि त्याला कांहीं चिंता करावी लागत नाहीं. बाबा दररोज हिंडतो. त्याला दररोज नवीन घर मिळतें. तो स्वतःला त्या घराचा मालक समजत नाहीं. तरी पण कोणत्या हि मालकाला इतक्या घरांचा उपभोग मिळत नाहीं. मीं मोठमोठे श्रीमंत पाहिले आहेत. हिंदुस्थानांत त्यांचे १०-२० बंगले असतील. कधीं ते आपल्या दिल्लीच्या बंगल्यांत, कधीं कलकत्त्याच्या, कधीं मुंबईच्या, कधीं बनारसच्या बंगल्यांत राहिले असतील. परंतु बाबा तर दररोज निरनिराळ्या घरांत राहतो. फरक इतका च कीं ते मालक म्हणविले जातात आणि त्यांना आपल्या

घराची चिन्ता करावी लागते आणि बाबा त्या घराचा मालक म्हटला जात नाहीं आणि म्हणून त्याला चिन्ता हि कांहीं करावी लागत नाहीं. जेव्हां नेहमीं नवीन घराचा उपभोग घ्यावयाला मिळतो तेव्हां आनंद वाटतो आणि चिन्ता करावी लागत नाहीं यांत काय बिघडलें ? म्हणून हें स्पष्ट आहे कीं जे स्वतःला आपल्या धंद्याचे मालक समजतात ते जर उद्यां ‘ सेवक ’ किंवा ‘ व्यवस्थापक ’ बनले तर त्यांचा आनंद कमी होण्याचे ऐवजीं वृद्धिंगत होईल व त्यांची चिंता कमी होईल व त्यांचें चिंतन वाढेल.

चांडिलमध्यें बाबा आजारी पडला तर त्याला पाहण्याकरितां किती तरी डॉक्टर आले. बाबानें पहिल्यांदा औषध घेण्याला नकार दिला म्हणून डॉक्टर बिचारे दुःखी झाले. परंतु जेव्हां बाबानें औषध घेण्याचें कबूल केलें तेव्हां त्यांना बाबांनीं उपकार केले असें वाटलें. त्यांनीं प्रेमानें औषध दिलें आणि बाबाकडून एक कवडी हि घेतली नाहीं. पण बाबा जर कोणी लखपति असता आणि तो जर आजारी पडता तर कोणी हि डॉक्टर फी घेतल्याशिवाय त्याला पाहण्याकरितां आला नसता व त्याचे आजारांत त्यानें तोंपर्यंत मिळवलेली मिळकत अर्धी खर्चीं पडली असती. म्हणून जी व्यक्ति मालक राहणार नाहीं त्याचें कांहीं कमी होणार नाहीं, चिंता कमी होईल आणि चिंतनशक्ति वाढेल. यामुळें लखपतींना फायदा होईल. समाजाचा व देशाचा हि फायदा होईल. आणि हें तर सांगायला च नको कीं आज त्यांना जितका मान व प्रतिष्ठा आहे, जितकी कीर्ति आहे, त्यापेक्षां किती तरी ती वाढेल. कीर्ति पुष्कळ अधिक होईल म्हणून सर्वोदयामधें ज्याला अहिंसक समाजवाद म्हणतात त्यांत कोणाला हि धोका नाहीं, त्यापासून सर्वांना आनंद च मिळेल.

### ऐश्वर्याचें समान वितरण

मी तर असें म्हणतों कीं जो बाप आपले मुलाचे हातांत मिळवून ठेवलेली आयती इस्टेट देतो तो त्याचा पूर्वजन्मींचा शत्रू च असावा. त्यानें मुलाला उत्तम शिक्षण देऊन म्हटलें पाहिजे कीं आतां तूं समाजाची सेवा करून उदरनिर्वाह कर. बाप जर असें म्हणेल तर तो मुलाचा मित्र आहे.

बाबाचे वडिलांनीं बाबाकरितां कांहीं इस्टेट ठेविली नाहीं म्हणून च बाबाची बुद्धि काम करीत आहे. परंतु बाबाचे बापानें जर का इस्टेट ठेविली असती तर बाबा मूर्ख निघता आणि आज भूदान मागत नसता. खिस्तानें सांगून ठेविलें आहे कीं "सुईचे भोकांतून उंट जाईल पण संपत्तिवाल्यांना भगवंताचे राज्यांत प्रवेश मिळूं शकणार नाहीं." तसें च उपनिषदांत हि म्हटलें आहे "**अमृतत्वन्नु नास्ति वित्तेन**" म्हणजे पैशाचे बळावर जर कोणी अमृतत्व मिळूं इच्छील तर तो मरून जाईल.

मीं उपनिषदाचें नांव घेतलें कीं लोक समजतात कीं बाबा आम्हांला बैरागी-संन्याशी बनवीत आहे. परंतु मी कोणाला हि बैरागी करीत नाहीं. सर्वांना ऐश्वर्यसंपन्न करूं इच्छितों. सर्वांना सारख्या प्रमाणांत ऐश्वर्य प्राप्त व्हावें एवढी मात्र माझी जरूर इच्छा आहे. आज तर हिंदुस्थानच्या कांहीं लोकांना जेवण हि मिळत नाहीं. पण समजा कीं उद्यां सर्व लोकांना जेवायला मिळालें नाहीं आणि सर्व भुकेले राहिले तर 'आज साम्ययोग झाला' असें बाबा म्हणणार नाहीं. सर्व सारखे बुभुक्षित राहणें हा कांहीं साम्ययोग नव्हे. साम्ययोग तर तो च कीं जेव्हां सर्व लोक सारख्या प्रमाणांत पौष्टिक अन्न खातील. म्हणून उपनिषद् अगर खिस्ताचें नांव जें घेतलें तें एवढ्या च हेतूनें कीं सर्वांनीं समान प्रमाणांत ऐश्वर्यसंपन्न व्हावें अशी माझी इच्छा आहे. आपण जर सर्व लोकांनीं मिळून विचार केला तर ही गोष्ट थोड्या च दिवसांत होणें शक्य आहे.

यावर लोक विचारतील कीं भगवंतानें सर्वांना अक्कल अलग अलग दिली आहे. तर सर्वांना समान ऐश्वर्य कसें संपादतां येईल ? त्यावर माझें उत्तर असें कीं जे एकत्र कुटुंबांत राहतात त्यांना अलग अलग अक्कल नसते काय ? तरी हि ते सारखें जेवण जेवतात व सारखें ऐश्वर्य उपभोगतात. म्हणून बुद्धि स्वतंत्र असून सुद्धां प्रेम जर समान असेल तर ऐश्वर्य समान होऊं शकेल. माझें असें म्हणणें नाहीं कीं मी सर्वांची बुद्धि समान करून देईन. ती तर ईश्वराचे हातांतील गोष्ट आहे. अर्थात् प्रतिज्ञेवर मी म्हणूं शकतों कीं प्रत्येकाला शिक्षणाची चांगली संधि देण्यांत आली तर आज जी बुद्धींत विषमता आहे ती नक्की राहणार नाहीं. तरी हि मी मान्य करतों

कीं बुद्धींत फरक राहील. तरी सुद्धां सर्व एकमेकांवर सारख्या प्रमाणांत प्रेम करतील तर त्यांचें ऐश्वर्य हि समान राहील.

**भांडवलवाल्यांना मेजवानी**

म्हणून मी सर्व संपत्तिवाल्यांना मेजवानी देत आहें. त्यांना प्रार्थना करीत आहें कीं त्यांनीं संकोच किंवा भीति मुळीं च ठेवूं नये. आणि गांधीजींनीं सुचविल्याप्रमाणें ट्रस्टी होण्याला बिनदिक्कत तयार व्हावें. ‘ अहिंसक समाजवाद ’ या नांवाला भिऊं नये. त्यांत तुम्हांला विकासाला पूर्ण जागा राहील. त्यांत आपल्या बुद्धीचा चांगला उपयोग होईल. इतकें च नव्हे तर आज आपल्याला जितका आनंद, सुख आणि मान मिळतो त्यापेक्षां पुष्कळ जास्त आनंद, सुख व मान मिळेल. आत्म-समाधान जें आज आपल्याला मिळणें कठीण आहे तें विशेष रूपांत आपल्याला मिळेल. यांत तुमचें कोणत्या हि तऱ्हेनें नुकसान नाहीं. म्हणून तुम्ही लौकरांत लौकर यांत यावें म्हणजे देशाचें नेतृत्व तुमच्याकडे येईल. तुम्ही मालकी सोडून देशाची धुरा वाहण्याकरितां तयार झालांत तर मी समजतों कीं तुमची क्षमता ( एफीसिएन्सी ) देशाचे उपयोगाकरितां सार्थकीं लागेल. भांडवलवाला याचा अर्थ असा समजूं नका कीं फक्त लक्षाधीश आणि कोट्यधीशच भांडवलवाले आहेत. ज्याचेजवळ जें कांहीं आहे त्याचा तो आज मालक आहे म्हणून माझी प्रत्येकाला मागणी आहे कीं आपल्या-जवळ जी कांहीं संपत्ति–थोडी किंवा पुष्कळ–आहे तिचा सहावा हिस्सा जरूर आपण द्यावा. जे लहान आहेत त्यांनीं सहावा हिस्सा द्यावा, जे मोठे आहेत ते सहाव्या हिश्शापेक्षां जास्त देऊं शकतात. म्हणून त्यांनीं दिल खोलून दान द्यावें.

रूपसा ( बालेश्वर )
३१-१-’५५

## धर्मनिष्ठेनें संपत्ती हि वाढेल : ११ :

धर्म आणि मोक्ष या दोन्हींमुळें समाजाची मुक्ति होते. भूदानविचारांत हे दोन्ही हि विचार जुळलेले आहेत. जेथें भूतदया उत्पन्न होते तेथें सर्व प्राण्यांवर प्रेम व धर्माचा प्रादुर्भाव होतो. आणि जेथें आत्म्याचे शक्तीचें ज्ञान होतें तेथें मनुष्याला मोक्ष मिळतो, त्याची मुक्ति होते. जें हें सहाव्या हिस्साचें दान मागितलें जातें यानें धर्माचा प्रसार होतो. त्याबरोबर च आम्ही मालकी हक्क नष्ट करण्याची गोष्ट समजावून देतों, त्यामुळें समाज मुक्त होतो. वास्तविक स्वातंत्र्यमुक्ति हा महत्त्वाचा विचार आहे. आणि धर्मनिष्ठासुद्धां महत्त्वाचा विचार आहे. हे दोन्ही हि विचार या चळवळीनें प्रसृत होत आहेत. परंतु लोक याचें महत्व समजत नाहींत आणि आमचे-समोर आर्थिक प्रश्न उपस्थित करितात. पण हें समजायला पाहिजे कीं जेव्हां आत्म्याला मुक्तीची जाणीव होते आणि धर्मावर निष्ठा असते तेव्हां आर्थिक कामनेची प्राप्ति होते. हें महाभारतांत व्यास देवांनीं सांगितलें आहे.

### स्वतःपुरता च विचार केल्यानें आर्थिक प्रश्न उत्पन्न होतात

मालकी हक्काची कल्पना च नष्ट झाली आणि सर्व च दयावान् आणि धर्मनिष्ठ झाले तर सर्व च वांटणी करून खाऊं असा विचार करतील. त्यामुळें हिंदुस्थानची संपत्ति जरूर वाढेल. आणि सर्वांच्या इच्छा तृप्त होतील. लोक जर हे समजतील तर जे आर्थिक समस्या पुढें आणतात ते गप्प बसतील आणि दूरदृष्टीनें या कामांत भाग घेण्याचें पसंत करतील. आज आर्थिक प्रश्न प्रत्येकापुढें उभा आहे. कारण कीं लोकांनीं सर्वांबद्दल विचार करण्याचें सोडून दिलें. आणि प्रत्येक जण आपले स्वतःपुरता च विचार करूं लागला. स्वतःपुरता च विचार जेथें केला जातो आणि दुसऱ्याची काळजी घेतली जात नाहीं तेथें संपत्ति वाढविण्याचीं साधनें हातांत येत नाहींत.

रेमुना
५-२-'५५

## त्रिवर्गांचें समान प्रमाणांत साधन आणि अंतिम ध्येयमुक्ति : १२ :

आज मला प्रश्न विचारण्यांत आला कीं 'भूदाना'चें काम तर उत्तम आहे. परंतु मानवांत असलेले स्वार्थ, लोभ आणि सत्ता मिळण्याची प्रेरणा यांचें आपण काय करणार आहांत ? याचें उत्तर आपलेपाशीं काय आहे ! हा मोठा आणि मौलिक प्रश्न आहे. याचें जर उत्तर ठीक, समाधानकारक मिळेल तर मनुष्य परोपकाराचे कामांत पूर्ण शक्ति लावूं शकेल. नाहीं तर तो अस्थिर राहील.

### कामवासनेचें नियंत्रण

मनुष्यांत भोग आणि ऐश्वर्य यांची वासना असते. म्हणजे सत्ता प्राप्त करण्याची हि वृत्ति असते. यांत कांहीं च संशय नाहीं. ही गोष्ट मान्य च करावी लागते. गीतेनें त्याला '**भोगैश्वर्यप्रवृत्ति**' हें नांव दिलें आहे. याचा अर्थ भोग-ऐश्वर्य-सत्तेची लालसा. परंतु गीतेनें यांच्यापुढें हात टेकले नाहींत. तर त्यांना जिंकून कामाला लावण्याचा उपाय हि सांगितला आहे. एक काळ असा होता कीं ज्या वेळीं समाजांत विवाहसंस्था अस्तित्वांत नव्हती आणि कामवासना तृप्त करण्याकरितां मनुष्य जनावरांप्रमाणें वर्तन करीत असे. प्राचीन काळच्या ऋषिमुनींच्या गोष्टी आपण ऐकतों कीं मोठ-मोठे ऋषि सुद्धां कामवासनेच्या आहारीं गेल्याचें दिसून येतें. परंतु त्या वासनेचें नियंत्रण करण्याचा विचार हि मनुष्याला सुचला, कारण कीं अनियंत्रित वासनेमुळें न वासनापूर्ति होते, न समाजांत शांति राहते. अनुभवानें च त्यानें विवाहसंस्था शोधून काढली.

इतकें च नव्हे, विवाहसंस्थेचा हि सतत विकास होत गेला. प्रथम राक्षस-विवाह आणि नंतर गांधर्वविवाह यासारखे नानाप्रकारचे विवाह अस्तित्वांत आले. अशा तऱ्हेनें विकास होत होत हिंदुस्थानांत ब्राह्मविवाह निश्चित केला गेला. आणि त्याला शास्त्रविधीची मान्यता देण्यांत आली. आतां मनुष्य विवाहविधीला अनुसरून जास्त सुधारणा करण्याकरितां नियंत्रणाच्या गोष्टी-

बद्दल विचार करूं लागला. एकापेक्षां जास्त बायका करूं नयेत अशा तऱ्हेचा विचार मनुष्यांत वाढत आहे. थोड्या दिवसांत आपल्याला दिसून येईल कीं सरकारकडून एकपत्नीव्रताचा कायदा हि केला जाईल. याचें कारण मानवाचे विचार त्या दृष्टानें द्रुत गतीनें जात आहेत. रामायणांत दशरथाला तीन बायका आणि त्याच्या मुलाचें एकपत्नीव्रत सर्वश्रुत आहे. आणि मर्यादापुरुषोत्तम रामचंद्राचा च आदर्श समाजापुढें ठेवण्यांत आला आहे. अजून कायद्यानें बहुपत्नीत्वाचा निषेध केला नाहीं. परंतु थोड्या दिवसांत होईल. कारण लोकांच्या मनाची तयारी त्याकरितां होत आहे. आज हि ज्या कोणाला दोन बायका आहेत त्यांना विचारलें कीं काय? तुम्हांला दोन बायका आहेत? तर तो जरा शरमिंदा होतो आणि लज्जेनें कांहीं तरी कारण सांगतो.

कामवासनेचें नियंत्रण करण्यांत मनुष्य बरा च पुढें गेला आहे ही गोष्ट सर्वांना विदित आहे. आणि पूर्वी समाजात जितकी उच्छृंखल वृत्ति होती तितकी आज नाहीं. जरी व्यक्तिशः या बाबतींत मनुष्यानें आणखी पुढें जावयाला पाहिजे तरी एवढें तर कबूल करावें च लागेल कीं विवाहसंस्था होण्यापूर्वीचा समाज, विवाहसंस्था झाल्यानंतरचा समाज आणि विवाहसंस्थेत पूर्ण विकास झाल्यानंतरचा मानवसमाज यांत मानवस्वभाव बदलला आहे आणि बदलत राहील. मीं हें उदाहरण याकरितां दिलें कीं मानवसमाज ही कांहीं नित्य किंवा स्थिर वस्तु आहे असें नाहीं ही गोष्ट तुमचे ध्यानात यावी. तो सतत विकसित होत आहे आणि पुढें हि होत राहील. पुढें सुद्धां आपल्याला योग्य मार्गानें पाऊल उचलावें लागेल.

## प्राचीन शिक्षणशास्त्रांत मारण्याला मान्यता होती, आज नाहीं

दुसरें उदाहरण पूर्वी मुलांना शिक्षणाकरितां मार देणें योग्य असें समजत असत. पांच वर्षेपर्यंत त्याचे लाड कौतुक करणें व नंतर '**दशवर्षाणि ताडयेत्।**' म्हणजे दहा वर्षेपर्यंत मारावें. तेव्हां कोठें विद्या येत असते. येथपर्यंत कीं मनुस्मृतींत गृहस्थाकरितां असें सांगितलें आहे कीं त्याचा धर्म अहिंसा आहे आणि त्याचें पालन करायला च पाहिजे.

परंतु हें ऐकून आपल्याला आश्चर्य वाटेल कीं जेथें मनूनें लिहिलें आहे कीं गृहस्थानें कोणाला हि ताडन करूं नये, मारणें, पिटणें चांगलें नाहीं, तेथें च म्हटलें आहे कीं '**अन्यत्र पुत्रात् शिष्याद् वा दीक्षार्थम् न ताडयेत्।**' पुत्र आणि शिष्य सोडून बाकी सर्वांकरितां ताडन न करण्याचें व्रत घेतलें पाहिजे. अर्थात् पुत्र किंवा शिष्य याला शिक्षण देण्याकरितां ताडन करावें लागतें आणि तें अवश्य करावें. परंतु आजचे शिक्षणशास्त्रज्ञ हा विचार मान्य करीत नाहींत. उलट असें समजतात कीं पुत्र व शिष्य यांना मारण्याची आवश्यकता च नाहीं. कारण कीं ते अत्यंत आज्ञाधारी होऊन च आपले घरीं जन्मास आले आहेत.

मी तर असें म्हणतों कीं जोंपर्यंत मुलगा किंवा शिष्य याला मारण्याची प्रथा कायम आहे तोंपर्यंत मिलिटरीझम्–लष्करशाही–दुनियेंतून नष्ट होणार नाहीं आणि हिंसावाद चालू राहील. समजा कीं आपला मुलगा एखादें चुकीचें काम करीत आहे याकरितां आपण त्याला मारतों म्हणून तो भीतीनें तें काम सोडून देईल. तरी हि आपण त्याचें अत्यंत नुकसान करीत आहों. तो जर सकाळीं पहाटेस उठत नाहीं म्हणून त्याला मारलें तर तो लवकर उठूं लागेल, यांत तुम्हीं त्याला नियमितपणा शिकविला. परंतु त्याच्यांत तुम्ही भयभीत होण्याचा दोष हि निर्माण केला. तो दोष अति भयंकर आहे. आपण त्याला भीतीचें शिक्षण दिलें. आपण त्याला शिकविलें कीं तुझ्या शरीराला जर कोणीं दुःख दिलें तर दुःख देणाऱ्याची गोष्ट कबूल केली पाहिजे. आणि मग तो मुलगा जर त्याला कोणीं धमकी देईल तर तो त्याचे तावडींत जाईल. कारण तुम्हीं त्याला भिण्याचें शिक्षण दिलें आहे ना? निर्भयता सर्वांत श्रेष्ठ गुण आहे. म्हणून च गीतेनें सद्गुणांचे यादींत '**अभयं सत्वसंशुद्धिः**' म्हटलें आहे. म्हणजे अभयाला पहिलें स्थान दिलें आणि 'सत्वसंशुद्धि'ला जो सर्वांत पहिल्या प्रतीचा गुण म्हटलें पाहिजे त्याला दुसरें स्थान दिलें आहे. कारण त्यांनीं विचार केला कीं निर्भयता जर मनुष्यांत नसेल तर कोणत्या हि गुणाचा विकास होणें शक्य नाहीं. सत्यनिष्ठा टिकाव धरूं शकणार नाहीं आणि चित्तशुद्धी हि अविकसित च राहील. म्हणून मुलगा आणि शिष्य याला समजाविणें च

आपलें साधन होऊं शकतें. त्याला मारणें किंवा पिटणें हें साधन नव्हे. असें च या काळाचे शिक्षणशास्त्रज्ञ मानतात.

जेव्हां आईबाप मुलाला मारतात तेव्हां द्वेषानें मारीत नाहींत, सद्भावनेनें च मारतात. पण मारण्यांत किती मूर्खपणा आहे हें जरा विचार केला तर कळून येईल. आईच्या पोटीं जन्मलेला मुलगा तिची प्रत्येक गोष्ट मानतो. आईनें हा चंद्र आहे असें म्हटलें तर तो म्हणतो, 'होय, हा चंद्र आहे' आणि आईनें म्हटलें कीं 'हा सूर्य आहे' तर 'तो सूर्य आहे' असें च म्हणतो. एवढी धर्मनिष्ठा घेऊन मुलगा आईच्या पोटीं जन्म घेतो. आईला त्याला मारण्याची आवश्यकता भासावी ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. हें ठीक आहे कीं मुलगा किंवा शिष्य कोणती गोष्ट समजूं शकत नसेल तर त्याला चांगल्या तऱ्हेनें समजावून द्यावें. तरी हि जर तो समजत नसेल तर आईबाप किंवा गुरु स्वतःला कोणती हि शिक्षा देऊं शकतात हें मी समजूं शकतों. मनुस्मृति आईनें वाचली नाहीं तरी मुलानें कांहीं चुकीची गोष्ट केली तर आई त्याकरितां उपवास करते आणि त्याचा परिणाम मुलावर होतो. यावरून आपल्या लक्षांत आलें असेल कीं मानवाचे मानसशास्त्रांत बराच फरक पडला आहे आणि शिक्षणाकरितां मुलांना मारणें पिटणें ही गोष्ट आतां मुलें हि मानायला तयार नाहींत. शिक्षणाची ती मनोवृत्ति आज राहिली नाहीं. आज तो सर्व विचार बदलला आहे. आणि स्वतंत्र विकासाची आवश्यकता मानवांना जास्त भासूं लागली आहे. लहानपणापासून च स्वतंत्र विकासाला संधि दिली पाहिजे ही गोष्ट मनुष्यानें कबूल केली आहे.

## आज शिक्षा करण्यांत हि सुधारणा

तिसरें उदाहरण देतों. पूर्वीं कोणीं चोरी केली तर त्याचे हात तोडण्यांत येत असत. परंतु आज अशी शिक्षा देणें कोणाचे मनांत हि येणार नाहीं आणि आवडणार हि नाहीं. आज तर याला निव्वळ मूर्खपणा आणि मनुष्यपणाचे विरुद्ध मोठा अपराध केला असें समजलें जाईल. मनुष्य हातानें सेवा करूं शकतो. हात तोडण्यांत सेवेचें मोठें अवजार नाहींसें

करणें आणि त्यामुळें त्या मनुष्याचा सर्व भार समाजावर टाकणें असा अर्थ होतो. अशा तऱ्हेनें शिक्षा देणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे. आज मनुष्यसमाजाला ही गोष्ट पसंत नाहीं. शूर्पणखा राक्षसीनें राम-लक्ष्मणासमोर येऊन आचरट गोष्टी केल्या म्हणून लक्ष्मणानें तिचें नाक व कान कापून टाकले अशी गोष्ट रामायणांत आली आहे. यावर आजचीं शिकणारीं मुलें विचारतात कीं लक्ष्मणानें जी ही गोष्ट केली ती कितपत योग्य होती ? त्यांना मग समजून सांगावें लागतें कीं तें रूपक आहे. ती मनुष्याची गोष्ट नाहीं. राक्षसी ही कामवासना आहे. आणि तिला विद्रूप करणें म्हणजे कोणत्या हि तऱ्हेनें तिचें आकर्षण न राहूं देणें. या गोष्टीचा हा च अर्थ आहे.

दुनियेंत आज फांशीची शिक्षा रद्द करण्याची गोष्ट चालली आहे. जरी अजूनपर्यंत मानवानें त्याचेतर्फे अनुकूल निकाल दिला नाहीं तरी लवकर च तो निर्णय होईल आणि फांशीची शिक्षा मानवताहीन मानली जाईल.

## मानवाच्या मानसशास्त्राचा विकास

एक काळ असा होता कीं स्त्री ही एक जड वस्तु समजली जात असे. तिची गणना पुरुषाच्या मालकीच्या वस्तूंत होत असे. म्हणून जेव्हां युधिष्ठिर द्यूत खेळण्यांत हरला तर त्यानें द्रौपदीला हि इतर वस्तूंप्रमाणें पणाला लावलें. पुन्हां जेव्हां दुःशासनानें भर सभेंत तिला खेंचून आणलें तेव्हां तिनें भीष्म-द्रोणांना प्रश्न विचारला आणि भीष्म, द्रोण, विदुर विस्मयांत पडले आणि उत्तर देऊं शकले नाहींत. त्यांचेसमोर धर्मसंकट उत्पन्न झालें. आजच्या मुलांना हें ऐकून आश्चर्य वाटेल कीं भीष्म-द्रोणांना हा प्रश्न कठीण कां वाटला ? हा तर अगदीं साधा प्रश्न आहे. म्हणून मानवाचें मानसशास्त्र बदलत आलें आहे आणि त्याचा विकास झाला आहे.

## सत्ताविभाजनानें सत्ताभिलाषेवर नियंत्रण

पहिली गोष्ट जी समजावयास हवी ती ही कीं मनुष्य आपल्या वृत्तीचें हि नियंत्रण उत्तरोत्तर करीत आला आहे आणि करील. दुसरी गोष्ट ही कीं त्याच्यामध्यें जशी भोग-ऐश्वर्यवृत्ति आहे तशा च आणखी हि वृत्ति असतात. केवळ भोग च नाहीं तर धर्मवासना आणि धर्मप्रेरणा सुद्धां

मनुष्यांत मोठ्या बलवत्तर असतात. धर्मप्रेरणेला प्राधान्य देऊन वासनांना त्याच्या स्वाधीन ठेवण्याची बुद्धि मनुष्याला सुचली पाहिजे आणि उत्तरोत्तर सुचते हि. मनुष्याची प्रेरणा च त्याला म्हणते कीं भोग-ऐश्वर्यांच्या त्याच्यामध्यें असलेल्या वृत्तीला मानवांमध्यें प्राधान्य मिळतां कामा नये. तिचा विकास न होऊं देतां स्तंभित करण्याचा मार्ग शोधला पाहिजे. आज मनुष्याला धर्मबुद्धीचा हा मार्ग सुचला आहे. सत्ता वांटून द्यावी आणि भोग सर्वांना समान प्रमाणांत मिळावा. हा च तो मार्ग. तो असा प्रयत्न करील तर भोगवासना नियंत्रित व कुंठित होईल. आणि मग त्यांना सत्तेची आकांक्षा हि राहणार नाहीं. ह्या दोन्ही गोष्टी आजचें सरकार सुद्धां मानतें. म्हणून च त्यानें प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ इतका च कीं सत्ता सर्वांत विभागण्याचा आरंभ झाला. लोक ज्याला निवडून देतील तो नोकरी करील आणि लोकांची सेवा करील. आपल्याला तो सत्ताधारी म्हणवील. पण त्याचे हातांत सेवा करण्याचा च अधिकार राहील, असा विचार लोकशाहीला मान्य झाला आहे.

परंतु केवळ मतदानाचा अधिकार मिळाल्यानें सत्ता विभागली जात नाहीं. त्याकरितां च आमचा प्रयत्न सुरू आहे. आणि वास्तविक प्रत्येक मनुष्यांत सत्ता वांटली जाईल. त्याकरितां चळवळ सुरू आहे. भूदान-आंदोलन हा त्याचा च मार्ग आहे. माझी इच्छा आहे, आमचा प्रयत्न हि आहे. आणि सर्वोदयाचा मुख्य आधार हि आहे कीं प्रत्येक गांवांत सत्ता वांटली जावी. गांवांत काय पेरलें जावें आणि काय पेरलें जाऊं नये, गांवांत कोणती वस्तु आणूं द्यावयाची आणि कोणती येऊं न द्यावयाची, त्यांना पसंत असेल तसलें शिक्षण देण्याचा अधिकार गांवाला असला पाहिजे. वरचे अधिकारी फक्त सूचना देऊं शकतील. गांवाचा न्यायनिवडा गांवांत च झाला पाहिजे. गांवांतलें भांडण गांवाचे बाहेर मुळीं च जातां कामा नये. माझें तर येथपर्यंत मत आहे कीं अपील सुद्धां जातां कामा नये. दोन गांवांचें भांडण असेल तर गांवाचे बाहेर ती गोष्ट जाईल. परंतु गांवांत च जर गोष्ट झाली येथपर्यंत कीं गांवांत जर खून झाला तर त्याचा निकाल गांवचे लोकांनीं च लावायला हवा. कदाचित् थोडा उशीर

लागण्याचा संभव आहे. परंतु असें व्हायला च पाहिजे. मत देण्याचा हक्क म्हणजे सत्ता विभाजनाचा फक्त आरंभ आहे. पण तो पूर्ण तेव्हां च होईल कीं जेव्हां ग्रामराज्य स्थापन होईल आणि गांवकरी त्यांत भाग घेतील.

## स्वार्थाच्या नियंत्रणाकरितां सुखसाधनांचें विभाजन

सत्तेचें विभाजन आणि सत्तेचा एक अंश आपल्याजवळ च आहे असा दृढ विश्वास हा सत्तेची वासना नियंत्रण करण्याचा किंवा बंद करण्याचा एक मार्ग आहे. त्या च प्रमाणें मनुष्यांत असलेली स्वार्थबुद्धि नियंत्रित किंवा नाहींशी करण्याचा उपाय मनुष्याचे सुखाचीं सामान्य साधनें सर्वांना समान प्रमाणांत उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणें हा आहे. मनुष्याचे सर्व स्वार्थांचा आधार जमीन च आहे. म्हणून च मीं जमिनीपासून सुरुवात केली आहे आणि म्हणतों आहें कीं प्रत्येक भूमिहीनाला जमीन मिळाली पाहिजे. त्याचा हक्क मान्य केला च पाहिजे. हा एक अगदीं मूळ विचार आहे, आणि तो समाजासमोर मीं ठेवला आहे.

आज ज्यांचे हातांत सरकारी सत्ता आहे आणि दुसरे हि जे त्यांचे विरुद्ध राजकीय पार्टी करून उभे आहेत त्यांच्यामधें एकवाक्यता आहे कीं जमिनीची ‘ सीलिंग ’ ठरली पाहिजे. असा विचार सर्वत्र चालू आहे. जास्तींत जास्त किती जमीन ठेवतां येते हें कायद्यानें निश्चित करून बाकीची वांटली जावी. कोणी २० एकरांची गोष्ट करतो तर कोणी ३० एकर तर कोणी ५० एकर असें म्हणतात. याचा अर्थ असा होतो कीं भूमिहीनांना कांहीं जमीन मिळूं नये. सर्व ‘ मिड्ल् क्लास ’ मध्यमवर्गाला मिळावी आणि गरीब तसे च राहावेत. परंतु मी म्हणतों कीं जमीन कसण्याचें ज्ञान असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जर त्याची जमीन कसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या हिशेबानें त्याचे हिश्शांत जी जमीन येईल त्याला ती दिली च पाहिजे. त्यानंतर जर जमीन बाकी राहिली नाहीं तर न राहो. त्याची मी कांहीं च चिंता करणार नाहीं. गांवांत जितकें धान्य उत्पन्न झालें असेल त्यापैकीं कमींत कमी किती धान्य गांवकऱ्यांपैकीं प्रत्येकाचे वांट्याला येईल याचें रेशन व्हायला पाहिजे. फक्त तीस एकरांचे सीलिंग करून

हिंदुस्थानची ३० कोट एकर जमीन अशा तऱ्हेनें कुटुंबांत वांटून दिल्यानें हिंदुस्थानची ही समस्या सुटणार नाहीं. २०–३० एकर जमीनवाले जरी हिंदुस्थानांत एक कोट लोक होतील तरी हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाहीं. त्यामुळें भूमिहीनांचें समाधान होणार नाहीं. तशानें साम्य-युग येणार नाहीं आणि भोगवासनेचें नियंत्रण होणार नाहीं.

व्हायला तर असें पाहिजे कीं गांवची सर्व जमीन गांववाल्यांत वांटली पाहिजे. प्रत्येकाला त्याचे कुटुंबाप्रमाणें जमीन मिळावी. सर्व मिळून शेती करायची किंवा अलग अलग, हें गांववाले च निश्चित करतील. परंतु मालकीहक्क कोणाचा हि राहणार नाहीं. मालकी गांवाची राहील. कोणी मनुष्य तहानेला आहे तर त्याला पाणी मिळण्याचा हक्क आहे आणि त्याला तें मिळालें च पाहिजे. त्याप्रमाणें जो जमीन मागतो त्याला त्याचे हिश्शाची जमीन मिळाली च पाहिजे. शर्त फक्त ही च कीं तो जमिनीची उस्तवारी स्वतः करायला तयार आहे. अशा तऱ्हेनें जमिनीपासून सुरुवात होते. परंतु बाकीच्या बऱ्याचशा वस्तु ज्या मनुष्य या नात्यानें अवश्य आहेत त्या त्याला सारख्या प्रमाणांत मिळाल्या पाहिजेत ही आमची मागणी आहे. यानें च मनुष्याच्या भोगवासनेचें नियंत्रण होतें.

### धर्मार्थ कामाः सममेव सेव्याः

समान प्रमाणांत वांटण्याचा अर्थ असा नाहीं कीं गणितांतल्याप्रमाणें समानता मी इच्छितों. मी तर बुद्धीची समानता इच्छितों. ह्यांत थोडें कमी अधिक असेल पण जसें कुटुंबांत होत असतें तसें च होईल. कुटुंबांत दहा भाकरी आहेत आणि खाणारे पांच आहेत, तर गणिती हिशेब करून प्रत्येकाला दोन दोन वांटत नाहीं. प्रत्येकाला जितकी अवश्य आहे त्या च हिशेबानें त्याला मिळते. इतकें च नव्हे तर सर्व मिळून त्या भाकरी खातात. कुटुंबांतील हा च न्याय आम्हांला गांव व समाजाला लागू करायचा आहे. भोगवासनेचें नियंत्रण करण्याचा हा च उपाय आहे. म्हणून जरी प्रत्येक प्राण्यांत सत्ता व भोग यांची थोडी ना थोडी इच्छा असते तरी तिला नाहींसें करण्याची पूर्ण शक्यता मानवांत आहे.

शास्त्रकारांनीं म्हटलें आहे कीं '**धर्मार्थ कामाः सममेव सेव्याः ।**' धर्म, अर्थ आणि काम यांचा उपभोग सर्वांनीं मिळूनमिसळून समान प्रमाणांत घेतला पाहिजे. कांहीं लोकांना धर्माचें शिक्षण मिळावें आणि कांहीं लोकांना मिळूं नये असें होऊं शकत नाहीं. सर्वांना धर्माचें शिक्षण मिळालें च पाहिजे. आणि प्रत्येकाला गुणाचा विकास करण्याची संधि मिळाली पाहिजे. धर्माचा समान प्रमाणांत उपभोग हा च याचा अर्थ आहे. अर्थाचा समान प्रमाणांत उपभोग म्हणजे प्रत्येकाला आवश्यक वस्तु समान प्रमाणांत मिळणें. थोडीशी विषमता राहूं शकेल पण ती इतकी थोडी कीं जशी पांच बोटांत असते तशी. त्यापेक्षां जास्त राहणार नाहीं. त्या च प्रमाणें कामवासनेचा सम प्रमाणांत उपभोग म्हणजे प्रत्येकाला कामवासनेचा उचित मर्यादेंत भोग भोगण्याला अवसर मिळाला पाहिजे. '**धर्मार्थ कामाः सममेव सेव्याः**' हें सामाजिक जीवनाचें सूत्र आहे. अशा तऱ्हेनें धर्मशिक्षण, अर्थलाभ व कामतृप्ति यांची अशी व्यवस्था करण्यांत आली तर समाजाच्या पुष्कळशा समस्या सुटूं शकतात. शिवाय कामवासना, अर्थप्रेरणा यांचें समान प्रमाणांत विभाजन झाल्यावर समाजाला हें शिक्षण द्यायला हवें कीं अर्थ आणि काम ह्या क्षुल्लक वस्तु आहेत, मुख्य वस्तु नाहींत. मुख्य वस्तु ही आहे कीं प्रत्येकाला आत्मदर्शन व्हावें. त्याला मी मोक्ष म्हणतों. हा सर्वांना मिळाला पाहिजे आणि सर्वांनीं त्याकरितां प्रयत्न करायला हवा.

## समाज मोक्षपरायण होवो

पहिली गोष्ट ही आहे कीं समाजाला मोक्षपरायण केलें पाहिजे. धर्मार्थ-कामपरायण नाहीं. म्हणजे अंतिम ध्येय धर्मार्थकामाचें सेवन नाहीं, मोक्ष-प्राप्ति हें आहे. या गोष्टीचा समाजासमोर नेहमीं आदर्श ठेविला पाहिजे. दुसरी गोष्ट ही कीं समाजांत धर्मार्थकामाचा उपभोग समान प्रमाणांत करण्याची योजना समाजांत झाली पाहिजे. या तिन्हींचा उपभोग घेण्याची समान संधि सर्वांना मिळाली पाहिजे. तिसरी गोष्ट ही कीं मानवसमाज दिवसेंदिवस बदलत आहे. आणि आम्ही त्याला उचित दिशेनें बदलूं शकूं

असा विश्वास आमच्यांत उत्पन्न झाला पाहिजे आणि त्याकरितां आम्हीं तसा प्रयत्न करायला पाहिजे.

सामाजिक जीवनाकरितां ह्या तिन्ही गोष्टी अत्यंत सुव्यवस्थित आधारस्तंभ आहेत असें मला वाटतें. स्वराज्यप्राप्तीनंतर हिंदुस्थानला आपला समाज बनविण्याची संधि मिळाली आहे तेव्हां कोणचे दिशेनें काम करायला पाहिजे ह्याचें हें एक चित्र मीं आज आपल्यासमोर रेखाटलें आहे.

बालेश्वर
६-२-'५५

## चरखा अहिंसक क्रांतीचा झेंडा : १३ :

गांधीजींच्या स्मृतीला हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीनें आपल्या हातानें कांतलेल्या सुताची एक गुंडी अर्पण करावी अशी गांधीजींच्या सहचाऱ्यांनीं राष्ट्रासमोर योजना ठेविली आहे. त्याला अनुसरून ज्या दिवशीं गांधीजींच्या अस्थि भारताच्या नदींत विसर्जन करण्यांत आल्या त्या आज १२ फेब्रुवारीचे दिवशीं आम्ही परमेश्वराची प्रार्थना करून आपली सूतांजलि अर्पण करण्याकरितां एकत्र जमलों आहोंत. आज मला सात वर्षांपूर्वींच्या त्या दिवसाचें स्मरण होत आहे. पवनारला आमच्या आश्रमासमोर 'धाम-गंगें'त त्या अस्थि विसर्जन केल्या गेल्या. आणि हजारों लोकांचेसमोर ईश्वराला साक्षी ठेवून आम्हीं प्रतिज्ञा घेतली कीं जो आदर्श आम्हांला गांधींनीं शिकाविला आणि ज्याला आपल्या या देशांत ऋषिमुनींनीं तसें च दुनियेंतील सर्व वली व पैगंबरांनीं आदर्श ठेविला तो च आदर्श समोर ठेवून त्याच्या अनुरोधानें भारतांत सर्वोदयसमाजाची स्थापना करूं. अशा तऱ्हेची मनःपूर्वक प्रतिज्ञा आम्हीं घेतली. त्याला आज सात वर्षें झालीं आहेत. आज आम्ही ही च प्रतिज्ञा पूर्ण करण्याकरितां पायीं हिंडत आहोंत.

## एकाचें पोषण करण्याकरितां दुसऱ्याचें शोषण न व्हावें

आम्हांला सर्व दुनियेकरितां जी समाजरचना करावयाची आहे त्यांत मुख्य गोष्ट कोणती हें पाहिलें पाहिजे. सर्वांना माहीत आहे कीं आज साऱ्या दुनियेंत मोठी ओढाताण चालू आहे. सर्वत्र अशान्तीची भीति पसरली आहे. कधीं 'कोल्ड वॉर' थंडी लढाई होते तर कधीं 'कोल्ड पीस' थंडी शांति. दोन्ही कोल्ड च कोल्ड. आणि सारी दुनिया एका च मार्गाचे शोधांत आहे कीं ज्यामुळें दुनियेंत सर्वांना विकासाची संधि मिळेल आणि शांति स्थापन होईल. ही तळमळ सर्व दुनियेला लागली आहे. तरी पण आज दुनियेची दशा जितकी भयभीत आहे तितकी कधीं च नसेल. या अशांतीचें मूळ कारण कोणतें याचा जेव्हां विचार करतों तेव्हां लक्षांत येतें कीं मनुष्यानें आपलें मूळ कर्तव्य ओळखलें नाहीं आणि दुसऱ्याचें शोषण करून तो आपलें पोषण करूं पहात आहे. ही जिवंत राहण्याची व्यवस्था फार च भयावह समजली पाहिजे. जंगलांतील एक प्राणी दुसऱ्या प्राण्याला खाऊन जिवंत राहतो, तसें च जर मानवसमाजांत हि एकाचे शोषणावर दुसऱ्याचें पोषण होत राहिलें तर ती फार च भयंकर अवस्था होईल. मग त्या समाजाला मानवसमाज न म्हणतां पशुसमाज समजावा लागेल. पशूपेक्षां त्याची स्थिति वाईट होईल. 'मानव-बुद्धि' बरोबर 'पशु-हृदय' असेल तर दोन्ही मिळून सर्वनाश च करतील. ही अवस्था फार च भयंकर आहे. यांतून बचावण्याकरितां जीवनाची अशी योजना शोधावी लागेल कीं ज्यांत कोणाचे हि पोषणाशीं दुसऱ्याचे शोषणाचा संबंध राहणार नाहीं. याला आमच्या शास्त्रकारांनीं 'अविरोध' हें नांव दिलें आहे. त्यांनीं आमचेसमोर एक सूत्र ठेविलें आहे. '**सर्वेषाम् अविरोधेन**' कोणाला हि विरोध न करितां आम्हांला आमचें जीवन जगलें पाहिजे.

### अविरोधी उत्पादक श्रम

आजकाल राष्ट्रांतील व्यवहाराकरितां 'co-existence' शब्द उपयोगांत येत आहे. त्याचा अर्थ हा च आहे कीं एकाशीं दुसऱ्याचा अविरोध असावा. एकाचे 'पुष्टी'त दुसऱ्याला 'तुष्ट' झालों असें वाटावें. ह्याकरितां उपाय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 2/722 विः [illegible]
क्रमांक 92०६ नों: दिः 12/2/45

हा च कीं जो मनुष्य खातो त्यानें उत्पादक परिश्रम—शरीरपरिश्रम—करावेत. रवींद्रनाथ ठाकुरांनीं म्हटलें आहे कीं आम्ही सर्व लोक 'डिव्हाइड' करतों. 'मल्टीप्लाय' करीत नाहीं. म्हणजे संपत्तीची वांटणी तर प्रत्येक जण करतो. खातो तर खरें, प्रत्येक जण संपत्ति खर्च करण्याचा प्रयत्न करतो, पण ती वाढविण्याकरितां, त्याचें उत्पादन वाढविण्याकरितां, कोणी च प्रयत्न करीत नाहीं. पहा कीं आज विद्यार्थी निरोद्योगी आहेत. असें म्हणतात कीं विद्यार्थी तर 'विद्यार्थी' च आहेत अध्ययन करताहेत. त्यांच्यावर उत्पादनाची जबाबदारी नाहीं. म्हणून ते उत्पादन करण्यांत भाग घेणार नाहींत. व्यापारी हि उत्पादन करण्यांत भाग घेणार नाहींत. पोलिस शिपाई, भिक्षुक, योगी, संन्यासी, भक्त सर्वच्या सर्व च उत्पादनांत भाग घेणार नाहींत. आजारी आणि लहान मुलें यांना तर अनुत्पादक जीवन जगण्याचा अधिकार च आहे. अशा तऱ्हेनें पाहिल्यावर सर्व मिळून फार थोडे लोक बाकी राहतात कीं जे उत्पादन करण्याचा भार अंगावर घेतील आणि बाकीच्या लोकांचा बोझा त्यांच्या च अंगावर पडतो. म्हणून च आम्ही जरी इतर दुसरे उद्योग करीत असलों तरी त्याबरोबर च कांहीं ना कांहीं शरीरपरिश्रम करण्याचें व्रत सर्वांनीं घेतलें पाहिजे. याला राष्ट्रीय व्रत आणि मानवतेचें व्रत समजलें पाहिजे. आम्ही जर खातों तर आम्हीं उत्पादनांत हि व्रत समजून भाग घेतला पाहिजे. ज्या परमेश्वरानें इतकें उत्पादन केलें, सारी सृष्टि आणि समाज बनवला त्याला काय अर्पण करावयाचें? वेदांत म्हटलें आहे कीं "**चक्रिम विश्वानि चक्रयेत**" ज्यानें विश्व निर्माण केलें त्याला उत्पादन च अर्पण करावयाचें असतें. जो सर्व विश्व बनवितो त्याला जर आम्हीं कोणती वस्तु अर्पण करावी तर उद्योग करून उत्पन्न केलेली वस्तू च अर्पण करायला पाहिजे. त्या च प्रमाणें आमचा तो उत्पादक उद्योग 'अविरोधी' असायला पाहिजे. जर उत्पादक श्रम विरोधी असतील तर त्यानें नुकसान होईल. आणि जर श्रम अनुत्पादक असतील तरी हि नुकसान होईल.

### चरखा अहिंसक क्रांतीचा झेंडा

म्हणून च आमचें जीवन अनुत्पादक नसावें आणि वृत्ति अविरोधी

असावी. अशी दुहेरी जबाबदारी आमच्यावर आहे. हा चरखा जो महात्मा गांधींनीं आम्हांला दिला आहे तो अविरोधी श्रमांचें चिन्ह आहे. म्हणून तो क्रांतीचें प्रतीक हि आहे, अहिंसक क्रांतीचा झेंडा आहे. आम्हांला समाजांत जी अहिंसक क्रांति आणावयाची आहे त्याकरितां हें प्रतीक मिळालें आहे. हा चरखा लहानसा दिसतो परंतु यांत फार मोठी अविरोधी दृष्टि भरली आहे. हा च एक श्रम आहे असें नाहीं. कोणी भाजी चिरूं शकतो, लाकडें तोडूं शकतो, जात्यानें दळूं शकतो, किंवा शेती करूं शकतो. परंतु कांहीं ना कांहीं काम कमींत कमी अर्धा तास तरी केल्याशिवाय कोणीं हि राहूं नये. अशा तऱ्हेचें ब्रह्मव्रत आम्हांला घेतलें पाहिजे, अशा तऱ्हेचें प्रेमव्रत आम्हांला घेतलें पाहिजे. प्रेमव्रत म्हणजे उत्पादनाचें व्रत. प्रेम म्हणजे वृद्धि करणें, वाढविणें. सृष्टींत आपल्याकडून कांहीं ना कांहीं नाश होत असतो तो भरून काढण्याकरितां कांहीं ना कांहीं वृद्धि करायला हवी. याला शास्त्रकारांनीं ' यज्ञ ' हें नांव दिलें आहे.

### ' मीं चोवीस हि तास क्रांति पांघरली ! '

चरखा तर प्रत्येकजण चालवूं शकतो. आजारीसुद्धां चालवूं शकतो. किशोरीलालभाई मश्रुवाला नेहमीं आजारी असत. पण नेहमीं चरखा च चालवीत असत. प्रवासी आणि पांथस्थसुद्धां चालवूं शकतात. शेतकरी शेतावर जायला निघाला आहे आणि तितक्यांत पाऊस सुरू झाला आणि त्याला १५ मिनिटें थांबावें लागलें. ह्या १५ मिनटांत तो हि चरखा चालवूं शकतो. चरखा सोडून असें कोणतें हि सोपें साधन असेल असें मला तर वाटत नाहीं कीं जें त्यापेक्षां जास्त उत्पन्न देतें आणि ज्याला कोणी हि आपल्या हातांत किंवा खांद्यावर घेऊन जाऊं शकतो. हायस्कूल व कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक जर हें व्रत घेतील तर ते स्वावलंबी होतील आणि आपले शरीरावर यापासून बनलेला कपडा हि घालतील तर प्रत्येक व्यक्ति अहिंसक क्रांतीचा प्रतीक बनेल. प्रत्येक व्यक्ति म्हणूं लागेल, ' चोवीस हि तास मीं क्रांतीला पांघरलें. झोपतांना व जागतांना सुद्धां क्रांति माझे चार हि बाजूंला राहील. हें कापड माझे हातानें बनविलें आहे. याचें सूत मीं कांतलें आहे.' अशा तऱ्हेनें प्रत्येक मुलाचे मनांत क्रांतीची भावना उत्पन्न होईल. म्हणून

च गांधीजींनीं आम्हांला इतकें सोपें साधन दिलें आहे. यापुढें त्यांच्या स्मरणानिमित्तानें दरवर्षीं प्रतीक म्हणून एक गुंडी ज्याप्रमाणें निवडणुकींत एक च मत देतात त्याप्रमाणें द्यावी. राष्ट्राला उपासना म्हणून गांधीजींचे स्मृतीला दरवर्षीं आपल्या हातानें कांतलेली एक गुंडी अर्पण करावयाची आहे. या कामांत कोणी हि भाग घेऊं शकतो.

## चरखा आमचा आधार

गांधीजींनीं आम्हांला जी शिकवण दिली तिचें चरखा हें चिन्ह आहे. त्यांनीं शेवटचे क्षणापर्यंत सूत कांतलें. ते म्हणत कीं, 'चरखा हिंदुस्थानला वांचवील.' त्यांची चरख्यावर मोठी अढळ श्रद्धा होती. जेव्हां कधीं आम्ही या विषयासंबंधीं गोष्टी करीत असूं आणि नैराश्येचे प्रसंग हि आले आहेत— स्वातंत्र्याचे लढ्यांत देशाला हिंमत खचण्याचे कितीतरी प्रसंग आले आहेत— तेव्हां गांधीजी म्हणत असत, 'निराश होण्याची कोणती गोष्ट आहे? चरखा आहे च. यांत हिंमत आहे व ताकद आहे. समजा कीं कोणी रिव्हाल्वर व रायफल घेऊन हल्ला करावयास आला तर आम्ही सर्व बंधु-भगिनी एकत्र होऊन चरखा कांतू आणि गोळ्यांना तोंड देऊं. आम्ही भिणार नाहीं आणि पळून हि जाणार नाहीं. हा चरखा आम्हांला मदत देईल.' भगवान् बुद्धाचे एका शिष्याची गोष्ट सांगतात. ते फार मोठे होते. त्यांनीं दारिद्र्याचें व्रत च घेतलें होतें. पैशांचा संग्रह करीत च नसत. त्यांचे पत्नीला त्याचें फार दुःख होई. मृत्यूची वेळ येऊन ठेपली तेव्हां मात्र त्याला त्याबद्दल दुःख वाटूं लागलें. तेव्हां पत्नीनें म्हटलें कीं, 'आपण माझी काळजी मुळीं च करूं नये. मोठ्या प्रेमानें निश्चिन्त होऊन भगवानांत लीन व्हावें. माझेजवळ चरखा आहे. म्हणून माझी चिंता करण्याचें कांहीं कारण नाहीं.'

आमच्या शास्त्रकारांनीं यज्ञोपवीत धारण करण्यास सांगितलें आहे. त्याचा विधि हा कीं तें यज्ञोपवीत स्वतःचे हातानें कांतलेल्या सुताचें असावें. त्यामुळें भगिनींना घरबसल्या उद्योग मिळत होता. लोक म्हणतात कीं हें तर यंत्रयुग आहे. तरी बाबा पायीं प्रवास

करतो. त्याला कोणी अडवीत नाहीं आणि लाखों एकर जमीन त्याला मिळत आहे. यंत्रयुगांत हि मी दिल्लींत होतों तर जात्यावर दळत असें. यंत्रयुग होतें म्हणून जात्यानें मीं कणीक दळून देणार नाहीं असें म्हटलें नाहीं. जात्यापासून कणीक या युगांत हि बनूं शकते त्या च प्रमाणें चरख्याचें सूत या युगांत हि बनूं शकतें.

## हिंदुस्थानची मुख्य शक्ति हात

हिंदुस्थानची मुख्य ताकद हात आहेत. आम्हांला हें च शिकविलें आहे कीं भाऊ, दोन हात आहेत, दोन आणखी मिळतील. चार होतील — चतुर्भुज होऊं आणि आणखी चार मिळतील तर अष्टभुज होऊं. अशी अनंत शक्ति हिंदुस्थानांत आहे. आतां जर ही हाताची शक्ति निरोद्योगी राहिली आणि आम्ही यंत्र यंत्र म्हणून जप करत बसलों तर यंत्राचे जपानें कांहीं च काम होणार नाहीं. परंतु चरखा हातांत घेऊन जर कापड विणत गेलों तर हातांत क्रयशक्ति हि येईल. तुम्हीं या दृष्टीनें या चरख्याकडे पहावें. एक तर तो अविरोधी श्रमाचा प्रतिनिधि आहे. त्याचेमुळें च दुनिया हिंसेपासून मुक्त होणार आहे. दुसरें असें कीं समोर जें मोठें भयंकर युग आलें आहे कीं ज्यांत एकजण दुसऱ्याचें शोषण करून आपलें पोट भरतो त्याविरुद्ध होणाऱ्या क्रांतीचें हें प्रतीक आहे. या दृष्टीनें जर तुम्ही पहाल तर ती कल्पना तुम्हांला पटेल आणि त्यानें देशाचें स्वरूप पालटेल.

भद्रक
१२-२-'५५

## शिक्षणाची योजना



अलीकडे शिक्षणासंबंधानें बरा च ऊहापोह होत आहे. विचारवंत विचारप्रवाहांत आहेत. परंतु गोष्ट तर अगदीं सरळ आहे. आपली पुष्कळशी जनता खेड्यांत राहते. तेव्हां सर्व जनतेचें शिक्षण खेड्याशीं संलग्न कीं ज्यामुळें खेड्याची उन्नति होईल अशा रीतीनें झालें पाहिजे. जे शहरांत राहतात त्यांची दृष्टी हि खेड्याकडे असायला पाहिजे. त्यांच्यांत आणि खेड्यांतल्या लोकांत उत्तम तऱ्हेनें सहकार असायला पाहिजे. अशा तऱ्हेचें शिक्षण शहरवासीयांना मिळायला हवें. शहरवासी यांचे शिक्षणाची तऱ्हा निराळी आणि ग्रामवासीयांची निराळी आणि दोहोंत विरोध असेल तर असला विरोध देशाला संकटांत टाकील.

### जीवनाची मूलभूत समता

खरें पाहिलें तर सर्वांचे जीवनाचे राहणीचा बराचसा भाग सारखा च असतो. मग राहणी शहराची असो कीं खेड्याची. पंचभूतांचा परिणाम जो खेड्यांतील लोकांवर होतो तो च शहरांतील लोकांवर होतो. त्यांत कांहीं फरक नसतो. स्वच्छ हवेची आवश्यकता शहरवाल्यांना व खेड्यांतील लोकांना सारखी च असते आणि असायला हवी. सृष्टीचा संबंध दोघांना हि फायदेशीर आहे. शहरवाल्या लोकांना ही गोष्ट जरी थोडी कठीण असली तरी ही व्यवस्था त्यांचेकरितां व्हायला च पाहिजे. आरोग्यशास्त्राची आवश्यकता दोघांना हि सारखी आहे. फक्त शहरवाल्यांकरितां आरोग्याचे दृष्टीनें एक प्रकारची व्यवस्था आणि खेडेवाल्यांकरितां दुसऱ्या प्रकारची करावी लागेल. परंतु आरोग्याची आवश्यकता दोघांना सारखी च राहील. परस्परसहयोग, प्रेम, त्यागभावना इत्यादि धर्मविचार दोघांना हि सारखे च लागू आहेत. फरक इतका च कीं खेड्यांत जीवनांतील मुख्य वस्तू निर्माण होतात म्हणून खेड्यांतील मुलांचें शिक्षण अत्यंत सोप्या रीतीनें होईल. आणि शहरांत मुख्य वस्तू निर्माण न होतां गौण वस्तू निर्माण होतात

म्हणून तेथील शिक्षण त्या वस्तूंच्या आधारावर राहील. त्यामुळें त्या शिक्षणांत गौणपणा येईल. शहरांतल्या शिक्षणांत जो कमीपणा येईल तो तेथल्या राहणीमुळें च असल्याकारणानें त्याला जोंपर्यंत शहरांना आम्ही खेड्यां-सारखें रूप आणीत नाहीं तोंपर्यंत टाळतां येणार नाहीं.

## सृष्टिपूजक गांव–ग्रामोन्मुख नगर

शहरांतील शिक्षणांत थोडा गौणपणा राहील हें कबूल परंतु त्यांत जर दोन गोष्टींचा समावेश झाला तर तो भरून हि काढतां येईल. एक तर शहरवाल्यांचें तोंड गांवांकडे असावें आणि दुसरें त्यांना परदेशांसंबंधीं पुरेशी माहिती असावी. शहरवासीयांनीं परदेशी भाषा थोडीबहुत शिकावी ही अपेक्षा त्यांचेविषयीं राहील च म्हणून त्या भाषेंत ज्या नवीन नवीन गोष्टी येतील त्यांनीं त्या आपले साहित्यात आणाव्यात. ही अपेक्षा त्यांचे-जवळून केली जाईल. त्यांची दृष्टि जर गांवांकडे असेल तर ते ग्रामीण लोकांची सेवा करणें हा आपला धर्म समजतील. मीं एक सूत्र च केलें होतें. ‘ ग्रामीण होतील सृष्टिपूजक किंवा परमेश्वरसेवक. आणि शहरवाले होतील ग्रामसेवक.’ ही जर दृष्टि राहिली तर दोन्ही ठिकाणचा विकास अशा रीतीनें करतां येईल कीं एक दुसऱ्याचा विकास करण्याकरितां दुसऱ्याला मदत देईल.

## प्रत्येक गांवांत विद्यापीठ

प्रत्येक गांवांत संपूर्ण शिक्षण असलें पाहिजे अशी माझी कल्पना आहे. ज्याला आपण ‘ युनिव्हर्सिटी ’ किंवा ‘ विद्यापीठ ’ म्हणतों तें प्रत्येक गांवांत असलें पाहिजे. कारण प्रत्येक गांव तो किती हि लहान असो सर्व दुनियेचा प्रतिनिधि आहे आणि सर्व दुनिया छोट्या रूपांत तेथें असते. म्हणून त्या ठिकाणीं पूर्ण शिक्षण मिळालें पाहिजे. प्रत्येक गांवाचा सृष्टीशीं प्रत्यक्ष संबंध असतो आणि त्यामुळें मनुष्याला तेथें सर्व तऱ्हेनें सृष्टिविज्ञान मिळूं शकतें. असंख्य प्राणी, पक्षी, पशु इत्यादींचा संबंध असतो. म्हणून मानवाला प्राणिशास्त्राचें पूरक ज्ञान तेथें मिळूं शकतें. तेथें शेती होईल, कापड बनेल, रस्ते तयार होऊं शकतील आणि गांवांतील इतर धंदे होतील.

म्हणून त्या सर्व वस्तूंमार्फत आणि त्या वस्तूंकरितां ह्या ज्ञानाची आवश्यकता आहे. हें सर्व ज्ञान गांवांत च मिळायला हवें आणि मिळूं शकतें. गांवांत प्राचीन काळापासून मानवसमाज रहात आला आहे. म्हणून तेथें इतिहास आहे आणि समाजज्ञान सुद्धां आहे. शहरांत एकमेकांशीं संबंध जितका येतो त्यापेक्षां गांवांत अधिक संबध येतो. यास्तव तेथें नीतिशास्त्र आणि धर्म-शास्त्र यांचा जास्त विकास होऊं शकतो. आत्म्याचें व्यापकत्व, एकमेकांशीं सहयोग करण्याची वृत्ति, सत्यनिष्ठा इत्यादि जे नीतिधर्म आहेत ते गांवांत चांगल्या तऱ्हेनें दिसून येतात. ग्रह, नक्षत्र, तारे वगैरे आकाशांत दिसतात. शहरांत कदाचित् त्यांचा प्रकाश चांगल्या तऱ्हेनें पोंहचूं शकत नसेल म्हणून गांवांत काव्यसाहित्याचा जितका विकास होऊं शकतो तितका शहरांत होणें कठीण आहे.

## सज्जन ग्रामनिष्ठा वाढवोत

अलिकडे आपण शहरांत व्यास-वाल्मीकि ऋषींची कल्पना हि करूं शकत नाहीं त्याची कल्पना तर गांव किंवा गांवाशेजारीं च करणें शक्य आहे. शूर व त्यागी पुरुष–जे जंगलांत हिंस्र पशूंशीं सामना करतात ते तर गांवांत च होऊं शकतात. म्हणून पराक्रमी पुरुषांची सेवा गांवांतून च मिळूं शकते. राष्ट्राच्या सैन्यातील सैनिक गांवांतून च मिळत आले आहेत. असें जर सर्व आहे तर गांवांत शिक्षण देण्याकरितां अवश्य अशीं सर्व साधनें आम्ही गावांत बनवूं शकणार नाहीं काय, एवढा च प्रश्न आहे. गांवांतील वस्तू-तूनच आम्ही कांहीं साधने गांवांत तयार करूं शकतों हें याचें उत्तर आहे. पुष्कळ आधिक साधनांची तर नाहीं पण निरीक्षण आणि प्रयोग यांची अधिक आवश्यकता राहील. यास्तव कधीं कधीं गांवांतील मुलांना शहरी युनिव्हर्सिटींत जाऊन थोडें पाहण्याची संधि द्यावी लागेल. त्या च प्रमाणें शहरांतील मुलांना हि गांवांत जाऊन तेथें कांहीं गोष्टी शिकण्याची संधि द्यावी लागेल. परंतु या सर्व गोष्टींकरितां मला जी अवश्य गोष्ट वाटते ती ही कीं सज्जन आणि विद्वान लोकांनीं गांवांत राहण्याचें पसंत करावें. सत्पुरुषांत ग्रामनिष्ठा वाढून जें काम होईल तें दुसऱ्या कोणत्या हि रीतीनें होऊं शकणार नाहीं. युनिव्हर्सिटीकरितां अवश्य गोष्ट तर ही आहे कीं प्रत्येक

गांवांत विचाराप्रमाणें आचरण करणारे कांहीं सज्जन असायला पाहिजेत. कमींत कमी एक एक सज्जन प्रत्येक गांवांत येऊन वस्ती करील तर त्या गांवाचे शिक्षणाची सोय करण्याला कांहीं हि कठीण जाणार नाहीं.

## संन्याशी म्हणजे चालतेंबोलतें विद्यापीठ

याशिवाय निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान, जें गांवचा कोणी इसम किंवा सज्जन हि मिळवूं शकत नाहीं, तें गांवाला मिळावें अशी हि एक योजना आमचे पूर्वजांनीं केली होती. ती आम्हांला हि चालू करावी लागेल. ती म्हणजे परिव्राजक संन्याशांची योजना. संन्याशी या गांवांतून त्या गांवांत फिरत राहील आणि दोन-चार महिने कोणत्या एका ठिकाणीं हि राहील तर त्याचा पुरा फायदा गांवच्या लोकांना मिळेल. तो सर्व दुनियेचें आणि आत्म्याचें ज्ञान सर्वांना देत च राहील. संन्याशी म्हणजे 'वॉकिंग युनिव्हर्सिटी' (चालतेंबोलतें विद्यापीठ). तो प्रत्येक गांवांत आपल्या इच्छेनुसार जाईल. तो स्वतः च विद्यार्थ्यांचेजवळ जाईल आणि सर्वांना फुकट शिक्षण देईल. गांवांतील लोक त्याला सात्त्विक, स्वच्छ, निर्मळ भोजन देतील. यापेक्षां त्याला कशाची हि आवश्यकता नाहीं. त्याचेकडून जें जें ज्ञान मिळूं शकतें तें गांवांतील लोक मिळवू शकतील. ज्ञान प्राप्त करण्याकरितां एक कवडी हि खर्च करावी लागली तर यापेक्षां अधिक दुःखदायक गोष्ट कोणची हि असूं शकणार नाहीं. ज्याचेजवळ ज्ञान असतें, त्याला तें दुसऱ्याला लाभावें अशी अत्यंत तळमळ असते, त्याला आपलें ज्ञान दुसऱ्याला मिळावें अशी उत्कट इच्छा असते. लहान अर्भकांना जितकी आईचें स्तनपान करण्याची इच्छा असते तितकी च आईला हि आपल्या बालकांना पाजण्याची इच्छा होत असते. कारण तिचे स्तनांत भगवंतानें दूध भरून दिलें आहे. उद्यां जर असें झालें कीं माता मुलापासून फी घेतल्याशिवाय त्यांना दूध देणार नाहींत तर दुनियेची काय परिस्थिति होईल ?

## वानप्रस्थ शिक्षक

उच्च शिक्षणाकरितां शहर युनिव्हर्सिटींत जावें लागतें. तेथें शंभर शंभर दोनदोनशें रुपये खर्च केल्याशिवाय चालत नाहीं. ह्याप्रमाणें पैसा खर्च

करून जें ज्ञान प्राप्त होतें तें ज्ञान च नव्हे हें समजायला पाहिजे. पैशानें विकत घेतलेलें ज्ञान हें 'अज्ञान' च आहे. प्रेम व सेवा करून च ज्ञान मिळूं शकतें. म्हणून ज्ञानी पुरुष जे गांवोगांवीं फिरत असतील व ते ज्या गांवीं जातील त्या गांवच्या लोकांनीं त्यांना २–४ दिवस ठेवून घ्यावें. त्यांची भक्ति करावी. त्यांचेजवळ जें ज्ञान आहे तें ज्ञान तें प्राप्त करून घ्यावें. ही च योजना होऊं शकते. जशी नदी सेवा करण्याकरितां गांवोगांव आपण च धांवत जाते, जसें वनांत खाऊन पिऊन स्तनभर दूध घेऊन गाई वासरांना पाजण्याकरितां आपण होऊन च धांवत जातात, त्या च प्रमाणें ज्ञानी पुरुष गांवोगांव ज्ञान घेऊन धांवतील. 'परिव्राजकां'ची ही संस्था पुन्हां स्थापन झाली पाहिजे. याप्रमाणें प्रत्येक गांवांत युनिव्हर्सिटी होऊं शकते आणि विश्वाचें ज्ञान प्रत्येक गांवांत पोहोंचूं शकतें.

वानप्रस्थाश्रमाची संस्था पुनरुज्जीवित करायला पाहिजे. त्यामुळें प्रत्येक गांवांत राहणारा शिक्षक मिळूं शकेल आणि त्याचेकरितां विशेष खर्च पडणार नाहीं. प्रत्येक गृहस्थाचें घर हें 'स्कूल' आहे आणि त्याचें शेत आहे 'प्रयोगशाळा'. प्रत्येक वानप्रस्थ आहे 'शिक्षक' आणि प्रत्येक परिव्राजक संन्याशी 'युनिव्हर्सिटी'. विद्यार्थी आहेत 'आजचीं जिज्ञासू मुलें.' प्रत्येक गांवांत असे लोक असावे जे १-२ तास शिकतील आणि बाकी दिवसभर काम करीत राहतील. अशी जी चार आश्रमांची आमची योजना आहे ती पूर्ण योजना आहे. लहानपणापासून मरणकाळपर्यंतच्या शिक्षणाची ती योजना आहे असें मला वाटतें.

### कृष्ण-सुदामा यांची प्रतिमा

गांव आपल्या संपूर्ण जीवनाचे प्रश्न आपल्या बळानें सोडवील ही सर्वोदयाची दृष्टि आहे. म्हणून गांवचें सर्व धन कोणा एका व्यक्तीचें न राहतां तें सबंध गांवचें होईल. तेव्हां च गांवांतील सर्व मुलांकरितां सारख्या शिक्षणाची व्यवस्था होऊं शकेल. आम्ही जर प्रत्येकाला सारख्या प्रमाणांत पौष्टिक व सात्त्विक जेवण देऊं शकत नाहीं तर समान प्रमाणांत शिक्षण कसें देऊं शकूं? सुदामा गरीब ब्राह्मणाचा मुलगा होता आणि श्रीकृष्ण

होता राजाचा मुलगा. दोघे हि गुरुगृहीं गेले होते. दोघांना हि सारखें च जेवण मिळत असे. सारख्या परिश्रमांचें काम मिळत असे आणि दोघांना हि एकसारखी च विद्या दिली जात होती.

कोणत्या गांवांत जर आमचें विद्यालय सुरू झालें आणि तेथें एक गरिबाचा मुलगा आला व त्यानें फाटके कपडे घातलेले असतील आणि दुसरे चांगले कपडे घालून आले, एकाला सकाळीं जेवण न मिळेल आणि दुसरा बसल्या बसल्या च खाईल व त्यामुळें आळशी होईल, तर शाळा कशी चालेल ? म्हणून सर्वांना योग्य तऱ्हेनें शिक्षण मिळालें पाहिजे अशी जर आमची इच्छा असेल तर गांवांतील जीवन एका कुटुंबाप्रमाणें व्हावें आणि गांवाचें सर्व धन, सर्व बुद्धि आणि सर्व शक्ति सर्वांच्या उपयोगीं पडावी हा च त्याला उपाय आहे.

ज्या अहिंसेचा प्रकाश भू-दान, ग्रामदान यांच्या साह्यानें पसरत आहे त्या अहिंसेंत मी म्हणतों ती ' नई तालीम ' लपलेली आहे. परमेश्वर करो आणि असे ज्ञानी व वात्सल्यपूर्ण गुरू हिंदुस्थानच्या प्रत्येक गांवाला लाभोत.

**असुरेश्वर**
६–३–'५५

## [ उत्कल विधान सभेचे सभासदांबरोबर एक संभाषण ]

आजची सभा प्रार्थनेनंतर संध्याकाळीं ठेवण्याचा विचार चालू होता. पण मीं म्हटलें कीं, 'नको. दिवसा केव्हां हि ठेवा.' कारण दिवसा सर्वांच्या चेहऱ्यांचें दर्शन होतें. रात्रीं चेहरे दिसूं शकत नाहींत.

### दर्शन मोठी सूक्ष्म वस्तु आहे

आपल्या देशांत हा एक वेडेपणा च आहे. बऱ्याचशा लोकांना जेवढी दर्शनाची अभिलाषा असते तेवढी श्रवणाची नाहीं. गांवोगांवचे लोक दर्शनाकरितां येत असतात. खरोखरीं च दर्शन ही मोठी सूक्ष्म वस्तु आहे. दर्शनापासून जो लाभ होतो तो श्रवणापासून मिळत नाहीं. दुनियेंतील इतर देशांत कशी स्थिति आहे हें मला माहीत नाहीं. पण आपल्या या देशांत मात्र ती निश्चित आहे. कोट्यवधि ग्रामीण जनता–बंधु व भगिनींना दर्शनानें च समाधान वाटतें. ही फक्त एक कल्पना च नाहीं पण एक गूढ अनुभव आहे. वाटल्यास आपण त्याला मिस्टिसिझम् ( Mysticism ) म्हणा किंवा गूढवाद म्हणा. परंतु हा गूढवाद नाहीं. गूढ अनुभव आहे. माझी मनोवृत्ति हि अशी च आहे. म्हणून मला चेहरे पाहून जेवढी प्रसन्नता वाटते तशी चेहरे न पाहतां व्याख्यान देण्यांत वाटत नाहीं. त्यामुळें मीं मुद्दाम च म्हटलें कीं ही सभा दिवसा ठेवण्यांत यावी. तेव्हां आपल्या सोयीनुसार ही वेळ ठरविण्यांत आली.

उपनिषदांत हि आत्म्यासंबंधीं जेथें निवेदन केलें गेलें आणि '**श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः**' अशी आज्ञा दिली गेली. म्हणजे आत्म्याचें श्रवण करायला पाहिजे. मनन आणि निदिध्यास करायला पाहिजे. तेथें त्याचे पूर्वीं च म्हटलें आहे कीं, '**आत्मा वारे द्रष्टव्यः**' अर्थात् श्रवण, मनन, निदिध्यास अवश्य झाला पाहिजे. त्याचें महत्त्व आहे च. परंतु

आत्म्याचें दर्शन झालें पाहिजे. म्हणून मीं पहिली जागा दर्शनाला दिली. मला आपणां सर्वांना पाहून फार च प्रसन्न वाटतें.

## मुनि मनुष्यांचे मार्गदर्शक

आपण सर्व लोकांचे केवळ सेवक च नाहीं तर प्रिय सेवक आहांत. त्यांनीं निवडून दिलेले निवडक सेवक आहांत. लोकांचे विश्वासू होणें, प्रिय होणें म्हणजे मोठी जबाबदारी आहे. लोक आपल्यावर भरंवसा ठेवतात. आपल्याला प्रिय सेवक या नात्यानें सरकारांत काम करण्याकरितां म्हणजे सरकारसमोर आपलीं गाऱ्हाणीं मांडण्याकरितां आणि जरूर पडल्यास विरोध हि करण्याकरितां पाठविलें आहे. आपण सर्व मिळून देशाचे कारभाराची योजना आणि नियंत्रण करण्याकरितां जनतेनें पांच वर्षांकरितां आपल्याला निवडलें आहे आणि विश्वस्त ह्या नात्यानें आपल्याला अधिकार दिला आहे.

आमच्याकडे सुर, नर, मुनि असे तीन विभाग मानण्यांत आले आहेत. साधारण जनतेला ‘ नर ’ शब्दानें आणि चिंतनशील व विचारशीलांना ‘ मुनि ’ शब्दानें गौरविलें जातें. निरपेक्ष, स्वतंत्र, तटस्थ, सर्वलोक-हितकर्ता, निःस्पृह, राग द्वेष-रहित सतत शोधांत मग्न अशा वर्गाला ‘ मुनि ’ म्हणतात. जेव्हां लोक आपल्या समस्या त्यांचेसमोर ठेवतात तेव्हां ते खोलवर विचार करून आपल्या प्रतिभेचा प्रकाश तटस्थ वृत्तीनें त्यांना देतात. त्यांचेवर सत्याचा शोध लावण्याची जबाबदारी असते. जनता त्यांचेकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करते आणि ते मार्गदर्शन करूं शकतात. म्हणून च त्यांना ‘ मुनि ’ म्हणतात.

## सुरांना दमनाची आवश्यकता

तिसरा वर्ग आहे सुरांचा. सुर म्हणजे अधिकृत सेवक. त्यांचेवर समाजातर्फे जबाबदारी सोंपविली गेली आहे. अर्थात् आजच्या शब्दांत बोलायचें म्हणजे ‘ निवडले गेलेले प्रतिनिधी. ’ यांना ‘ सुर ’ ही संज्ञा आहे. याप्रमाणें आपली गणना देवतांत होते. देवतांकरितां मोठी महत्त्वाची गोष्ट —ज्याची फारच आवश्यकता आहे ती— म्हणजे सावधानता. ह्याकरितां सुद्धां

आमच्या समाजशास्त्रकारांनीं सूचना देऊन ठेविली आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं 'देवता तर मोठ्या प्रकाशमान असतात.' सामाजिक समस्यांवर ते प्रकाश पाडूं शकतात. जबाबदारी समजून समस्यांचा ऊहापोह करूं शकतात. ह्या सर्व शक्ति त्यांच्यांत असतात. आजची जनता त्यांना निवडते आणि अधिकार देऊन कोणत्या तरी पदावर त्यांना बसविते. परंतु सुर बहुधा भोगपरायण होण्याची भीति असते. म्हणून च त्यांचेकरितां फार च अवश्य गुण 'दमन' मानला गेला आहे. तसें म्हटलें तर दमन हा क्षत्रियांचा गुण आहे. ब्राह्मणांचा तर तो आहे च म्हणा. गृहस्थ व यति यांच्याकरितां हि तो अवश्य आहे. वास्तविक तो सार्वजनिक, सार्वकालिक, सार्वदेशिक गुण आहे कीं ज्यापासून सर्वांना लाभ च लाभ होईल. असा हा गुण आहे. परंतु त्या गुणाची विशेष आवश्यकता देवांना असते.

उपनिषदांत एक सुंदर गोष्ट आहे. ती मीं गीता-प्रवचनांत दुसऱ्या एका प्रसंगानें सांगितली आहे. देव, दानव आणि मानव विद्याभ्यास करण्याकरितां प्रजापतीचे घरीं गेले. विद्याभ्यास झाल्यावर प्रजापतीनें एकेकाला जाण्यास सांगितलें. शेवटचा उपदेश म्हणून त्यांनीं प्रत्येकाला बोलावून कांहीं गोष्टी सांगितल्या. गोष्टी कोणत्या सांगितल्या ? एक मंत्र च--एकाक्षरी मंत्र—दिला. पहिल्यांदा देवतांना बोलाविलें. देव आले तर त्यांनीं म्हटलें, उपदेश तर तुम्हीं अध्ययनाचे वेळीं पुष्कळ ऐकला. आतां तुम्हांला शेवटचें अक्षर देत आहें— 'द.' आणि विचारलें, 'अर्थ समजला ना ?' ते म्हणाले, हो. समजला. काय समजलें ? उत्तर मिळालें कीं 'द' म्हणजे 'दाम्यत'—दमन करा. गुरूनें म्हटलें 'ठीक' आणि ते चालते झाले. नंतर दानव असुर आले. त्यांनीं हि विद्याभ्यास केला होता. त्यांना हि तें च अक्षर 'द' दिलें. आणि विचारलें तुम्ही याचा अर्थ काय समजलां ? त्यांनीं म्हटलें कीं आम्ही असें समजलों 'दयध्वम्' दया करा. गुरुजी म्हणाले, तुम्ही बरोबर समजलां. जा. नंतर मानव आले. त्यांना हि जाण्याचे वेळीं तो च एकाक्षरी मंत्र दिला आणि विचारलें कीं तुम्ही याचा अर्थ काय समजलां ? त्यांनीं म्हटलें कीं आम्ही समजलों कीं 'दत्त' दान करा. गुरुजींनीं म्हटलें तुम्ही बरोबर समजलां.

तेव्हां श्रुति म्हणतात '**दमम् दानम् दयामिति**' दम, दान आणि दया हे तीन प्रकारचे धर्म आहेत. त्यामुळें एकूणएक भूतांचें कल्याण होतें, समाजाची धारणा होते. श्रुति फिरून हा आदेश देते कीं प्रजापतीनें आपल्या शिष्यांना हा जो 'द' रूपी मंत्र शिकविला त्याची आपण उपासना करावी. मेघगर्जना आम्हांला सतत हें च शिकविते. पावसाळा सुरू होण्यापूर्वी मेघगर्जना होते तेव्हां ऋषीनें त्या गर्जनेवर आपल्या विशिष्ट दृष्टीनें त्यापासून संदेश मिळविला. 'दाम्यत दत्त दयध्वम् इति' 'द द द द द द' मेघांतून असा च आवाज निघतो. अशा रीतीनें दमन, दान आणि दया ह्या तीन हि गोष्टी सर्वांना च फायदेशीर आहेत, आवश्यक आहेत आणि लाभदायी आहेत. पुन्हां देवांना त्यांतून असा अर्थ मिळाला 'दमन करा' कारण कीं देवांनीं अंतःपरीक्षण करून पाहिलें कीं आम्ही भोगपरायण, भोगासक्त, भोगलोलुप आहोंत. म्हणून गुरुजींनीं आमचे हिताची गोष्ट सांगितली असेल तर ती दमन च असेल. म्हणून च देवांनीं त्यांतून 'दमन' अर्थ घेतला. दानवांनीं, जे मोठे निष्ठुर आणि क्रूर असतात, आपले दोष पाहिले आणि समजून घेतलें कीं गुरुजीनें आमचे दोषनिवृत्तीकरितां च उपदेश दिला आहे. तेव्हां अवश्य 'दया' च म्हटलें असेल. अशा तऱ्हेनें त्यांनीं आपलेकरितां 'दया' अर्थ घेतला. आणखी मानव तर लोभी होते च. लोभ मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रु आहे. ते समजले कीं गुरुजीनें आमचा हा च दोष लक्षांत घेऊन आणि त्याला अनुसरून कांहीं उपाय सांगितला असेल. तेव्हां तो अर्थ 'दान' च असला पाहिजे. अशा रीतीनें तिघांनीं हि आपलें आत्मपरीक्षण व अन्तर्निरीक्षण करून स्थिति पाहिली आणि निरानिराळे अर्थ घेतले. सारांश, सुर म्हणजे देव यांकरितां दमनाची आवश्यकता फार च समजली गेली आहे. कारण कीं ते भोगपरायण असतात.

### जनकाचा आदर्श

ऐश्वर्यानंतर भोग साहजिक च येतो. परंतु राजा जनक महालांत राहून सुद्धां अत्यंत अलिप्त रहात असे. त्याची वृत्ति अशी च होती कीं 'मिथिला नगरीला आग लागली तरी त्यांत माझें कांहीं जात नाहीं.' '**मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन**' प्रजेच्या सेवेकरितां तर मी धांवून

जाईन परंतु माझें असें त्यांत कांहीं नाहीं— अशा निर्लिप्त वृत्तीनें ते राहत असत. असें वर्णन जनक राजासंबंधानें आहे. वैभवांत राहून सुद्धां कोणी इतकें वैराग्यशील रहावें, जल-कमलाप्रमाणें निर्लिप्त रहावें ही सोपी गोष्ट नाहीं. जसें लक्ष्मीची सतत सेवा लाभत असतांना भगवान् विष्णु अत्यंत निर्लिप्त किंवा अत्यंत वैराग्यशील आहेत त्या च प्रमाणें किंवा महाराजा जनका-प्रमाणें वैभवांत वैराग्यवृत्तीनें राहणें कांहीं सोपी गोष्ट नाहीं. म्हणून जे लोक देवाप्रमाणें आहेत, निवडलेले अधिकृत सेवक आहेत, त्यांनीं आपलेसमोर महाराज जनकाचा आदर्श ठेवला पाहिजे.

## दरिद्र्यांचे सेवकांनीं शंकरासारखें रहावें

कांहीं लोक सर्व जनतेची सेवा करतात म्हणजे आपला विचार लोकांना समजावून सांगतात. लोकांनीं त्यांना निवडलें नाहीं किंवा लोकांकडून निवडलें जाण्याची इच्छा ते ठेवीत नाहींत त्यांनीं लोकांची सेवा करावी म्हणून आपल्या स्वतःला च निवडलें आहे. त्यांनीं आपल्यावर स्वतः च ही जबाबदारी लादून घेतली आहे. ते स्वाधिकृत आहेत. लोकांकडून अधिकृत नाहींत. त्यांचे-संबंधीं मी अशी च इच्छा बाळगेन कीं त्यांनीं शुकदेवाला आदर्श ठेवलें पाहिजे. शुकाप्रमाणें वैराग्यशील वृत्तीनें त्यांनीं व्यवहार केला पाहिजे. अशा तऱ्हेनें एकाचे समोर शुकाचा आदर्श तर दुसऱ्याचे समोर जनकाचा आदर्श.

आज मी भुवनेश्वरांत आहें. तेव्हां सहज च उदाहरण सुचतें कीं या ठिकाणीं जे जनतेंत अनधिकृत सेवा करणारे सेवक आहेत त्यांनीं भगवान् शंकरांचा आदर्श आपल्या जीवनांत ठेवला पाहिजे. शंकर वैराग्यशील '**महोक्षः खट्वांगः**' आहे. खाट पडली आहे तर ती हि नीट नाहीं, तोडकीमोडकी आहे. त्याला नीट करून च संध्याकाळीं उपयोग केला जाईल. आणि पुढें त्याचेजवळ कोण आहे तर बैल च. भिक्षेकरितां कवटी च आहे. अशा परम वैराग्यांत राहणारा शिव त्यांचा आदर्श असला पाहिजे. जे अधिकृत सेवक आहेत त्यांनीं भगवान् विष्णूचा आदर्श आपलेसमोर ठेवायला हवा. त्याची लक्ष्मी सतत सेवा करते तरी तो निर्लेप असतो. आपलेकडून समाजाची ही च अपेक्षा राहील. कारण समाज दरिद्री आहे

आणि आपण आहांत दरिद्यांचे प्रतिनिधी. जितके म्हणून येथें आले आहेत ते सर्व च दरिद्यांचे प्रतिनिधी आहेत. कारण आज हिंदुस्थान च अत्यंत दरिद्री देश आहे. तेथें फार च थोडे लोक श्रीमंत आहेत. साधारणतः हा दरिद्री च देश आहे. याकरितां दरिद्यांचे प्रतिनिधी म्हणून च आम्हीं काम करावयाला हवें.

गांधीजी इंग्लंडला गेले तेव्हां जेथें लंडनमधले गरिबांत गरीब लोक राहत असत त्या भागांत राहिले. तेथून राऊंड टेबल कॉन्फरन्स ( गोलमेज परिषद् ) ला जाण्याकरितां एक तास सव्वा तास लागत असे. इतर जवळ च राहत असत तसे ते हि राहूं शकत होते. त्यांत थोडा वेळ सुद्धां वांचला असता. परंतु त्यांनीं बारकाईनें विचार केला आणि गरीब लोकांत च ते जाऊन राहिले.

भगवान् श्रीकृष्ण पांडवांचे प्रतिनिधी म्हणून दुर्योधनाकडे गेले तेव्हां त्यांनीं त्यांचेकरितां आपले महालांत जागा ठेविली होती. परंतु त्यांनीं तेथें जाण्याचा इनकार केला आणि विदुराची झोपडी पसंत केली. म्हणून च भगवान् श्रीकृष्णाचें चरित्र गाऊन लोक नाचतात. ‘ गोपाल ’ चें नांव सर्वांना माहीत आहे. लोक समजतात कीं गोपाल तर आमचा च आहे. सतत आमचें काम करणारा, आमच्या घोड्यांची सेवा करणारा, आमच्या गाईचें शेण उचलणारा, आमच्या भगिनींची सेवा करणारा, कोणत्या हि कामांत स्वतः धोका पत्करणारा, कधीं हि राजसत्तेचा अधिकारी न होणारा आणि युधिष्ठिरासमोर सेवक या नात्यानें उभा राहणारा एक श्रेष्ठ सेवक हिंदुस्थानांत होऊन गेला. तो श्रेष्ठ ब्रह्मज्ञानी असून सुद्धां साधारण मनुष्याप्रमाणें राहत असे. लोक आज सुद्धां त्याचें स्मरण करतात. सारांश, अशा लोकोत्तर श्रेष्ठ सेवक श्रीकृष्णानें विदुराचे घरीं राहण्याचें पसंत केलें तेथें च त्यांना अत्यंत आनंद आणि समाधान मिळालें. आपल्यासारख्या लोकांसमोर याप्रमाणें आदर्श असला पाहिजे कारण कीं आपण दरिद्यांचे प्रतिनिधी आहांत. भगवान् श्रीकृष्णानें हि मी तर वनवासी पांडवांचा प्रतिनिधि आहें हा च विचार केला म्हणून मीं त्या च नात्यानें रहायला पाहिजे.

## जनता थर्मामीटर आहे

आमचे लोक हिंदुस्थानचे प्रतिनिधी होऊन इतर देशांत जातात व राहतात. तेथें ते आपले बुद्धीनुसार कोणती गोष्ट करीत असतील. राजनीति-शास्त्राचें त्यांना जें ज्ञान असेल तें तेथें चालवीत असतील. परंतु लोक हें च पाहतात कीं दरिद्री भारताचा हा प्रतिनिधी जीवन कसें घालवीत आहे. लोक मूर्ख नाहींत. सर्व दुनियेची पारख साधारण जनता चांगल्या तऱ्हेनें करूं शकते. मी पुष्कळदां उदाहरणार्थ सांगितलें आहे कीं जनता थर्मामीटर आहे. तसें पहाल तर थर्मामीटर जड आहे, त्यांत चैतन्य नाहीं. परंतु तो बरोबर उष्णता मोजून देतो. त्या च प्रमाणें जनता उत्तम पारख करून टाकते. जरी ती जड आहे तरी तिला पारख आहे. आमचे जितके प्रतिनिधी परदेशांत, पार्लमेंटांत अथवा असेंब्लींत जातात त्यांचें जीवन व राहणी पाहून च जनता त्यांची पारख करून चुकते. बरें, जनता कांहीं हि करो पण परमेश्वर तर त्यांची पारख त्यांचे जीवनमानावरून करील च यांत बिलकुल संशय नाहीं. तेव्हां पहिली गोष्ट मी आपल्याला सांगूं इच्छितों ती ही कीं आपण अधिकृत सेवक आहांत. म्हणून ज्यांनीं आपल्याला निवडून दिलें त्यांचे हृदयाशीं आपलें हृदय मिळालें पाहिजे. त्यांचा व आपला आवाज एकसारखा च असायला पाहिजे. हें ध्यानांत ठेवा कीं आपणाकरितां कांहीं सोयी दिल्या जातात. त्या ह्याकरितां च कीं आपण शांत चित्तानें सल्ला-मसलत करूं शकूं. याकरितां घरें सुद्धां अशीं असतात कीं जेथें थोडा एकान्त असूं शकतो. कारण आपण तेथें कांहीं अभ्यास हि करूं शकाल. आणि कांहीं पगार हि त्याकरितां च दिला जातो. जरी साधारण सभासदांना जो पगार मिळतो तो जास्त आहे असें तर म्हणतां येणार नाहीं तरी हि सर्व जनतेच्या रहाणीमानापेक्षां थोडा अधिक पगार जो दिला जातो तो या उद्देशानें कीं ते आमचे सेवक आहेत. त्यांनीं घराची कांहीं चिंता करूं नये. आणि सेवक या नात्यानें निश्चिंत होऊन काम करावें. सारांश, जरी साधारण जनता आपली राहणी विशेष सोईची आहे असें समजते तरी हि आपण सर्व तपस्या—ही कठीण जबाबदारी—आनंदानें च मनःपूर्वक, ज्या-प्रमाणें एखादा गरीब आपल्या झोपडींत नाइलाज म्हणून करीत असतो

त्याप्रमाणें पार पाडावी. असें जर झालें तर हिंदुस्थानची पुष्कळ उन्नति होईल आणि आपल्यावर जो विश्वास ठेवला गेला त्याला तुमची पात्रता सिद्ध होईल.

## भरताप्रमाणें तपस्या करावी

सुखसोयींनीं युक्त अशा जीवनांत आम्ही कोणाचे प्रतिनिधी आहोंत ही नेहमीं आठवण रहावी. आपण जर सतत त्यांचे परिस्थितीचा विचार कराल तर आपलें जीवन भरताप्रमाणें ठेवाल. रामचरित्रांत भरत आला आहे. रामचंद्रानें त्याला म्हटलें कीं 'नाहीं, ही जबाबदारी तुला घ्यावी च लागेल. राज्यकारभार करावा च लागेल.' शेंवटीं रामाज्ञा म्हणून भरतानें तिचा स्वीकार केला आणि रामचंद्र वनवासांत निघून गेले. चौदा वर्षें तपस्या करून रामचंद्र परत आले आणि त्यांना इच्छा झाली कीं प्रथम भरताला भेटावें. ते भरताला भेटण्याकरितां जातात. कवि म्हणतात, 'दोन भाऊ एकमेकांना भेटत आहेत आणि ओळखतां येत नाहीं कीं दोघांतून कोण वनांत गेला होता.' अर्थात् एक भाऊ वडील होता व दुसरा धाकटा यावरून च वडील भाऊ वनांत गेला होता हें तर समजतां येतें च. तरी हि रूप, आकृति पाहून यांच्यापैकीं कोण जंगलांत गेला होता, चौदा वर्षें जंगलांत कोणीं काढलीं, हें ओळखतां येत नव्हतें. ही तपस्या यांच्यापैकीं कोणीं केली हें ओळखतां येत नव्हतें. सारांश, भरत अयोध्येंत राहून सुद्धां तपस्या करीत होता.

## भारताची अद्वितीय विचारसंपत्ति

येथें आपण निरनिराळ्या विचारांचे प्रतिनिधी उपस्थित आहांत. कोणी स्वतःला कम्युनिस्ट म्हणवितो, कोणी सोशालिस्ट, कोणी कॉंग्रेसी, कोणी कोणत्या इतर पक्षाचा तर कोणी स्वतंत्र. हे सर्व च आहेत. ज्याला आपण 'आइडियॉलॉजी' अथवा संप्रदाय म्हणूं शकतों त्यांच्या प्रचारार्थ देशांत सर्वांना स्वतंत्रता पाहिजे हें मी मानतों. विचार-प्रचार अनिर्बंध झाला पाहिजे. त्याला कोणतें हि बंधन नको. विचारमंथन सतत होत राहील तर समाजाकरितां तें चांगलें आहे असें मला वाटतें. तरी हि माझें हें स्पष्ट

मत आहे कीं जो देश मागासलेला आहे आणि जेथें सर्वसाधारण मानव-जीवनाकरितां आवश्यक वस्तू हि मिळत नाहींत तेथें ऐश्वर्य व भोगाची लालसा तर सोडा च, साधारण मानवजीवन जगण्याकरितां आवश्यक, कमींत कमी वस्तू तर पाहिजेत च.

मला वाटतें कीं आमच्या पूर्वजांनीं मोठमोठे सुंदर ग्रंथ आम्हांला दिले आहेत. यापेक्षां उत्तम वारसा कोणत्या हि देशाला मिळाला नाहीं. हिंदुस्थानासंबंधानें असें निश्चयपूर्वक सांगतां येईल कीं तो एक मोठा वैभवशाली देश आहे. येथें सुंदर सुंदर शेंकडों नद्या वाहतात व हिमालया-सारखा पर्वत आमची सेवा करतो. आमचा देश अत्यंत सुजल व सुफल आहे. परंतु हिंदुस्थानपेक्षां हि अधिक सुजल व सुफल देश जगांत आहेत. या गोष्टींत हिंदुस्थान अद्वितीय नाहीं. त्याचा क्रमांक थोडा खालीं च येईल. अमेरिकेंत फार सुंदर जमीन आहे. ती चारशें वर्षांपासून लागवडींत आहे. परंतु हिंदुस्थानची जमीन दहा हजार वर्षांपासून लागवडींत आहे आणि तिचा कस कमी झाला आहे. जरी मानवजीवनाला आवश्यक वस्तू देण्याची शक्ति हिंदुस्थानांत पुरेशी आहे तरी हि आम्ही हिंदुस्थान च अद्वितीय, वैभवशाली देश आहे किंवा होऊं शकतो हें निश्चयपूर्वक म्हणूं शकत नाहीं.

भारत भविष्यकाळांत अद्वितीय व समृद्धशाली होऊं शकेल अशी मी आशा करूं शकत नाहीं. परंतु येथें जी विचारसंपत्ति आम्हांला मिळाली ती अद्वितीय आहे हें निश्चयपूर्वक सांगतां येतें. मी हें विधान कोणत्या हि अभिमानानें करीत नाहीं. मी आजच्यासारखा निःपक्षपाती व तटस्थ राहून दुसऱ्या देशांत जन्मलों असतों तरी हि मीं हिंदुस्थानसंबंधीं असें च म्हटलें असतें कीं हिंदुस्थानचें विचारवैभव निःसंशय अद्वितीय आहे. याचें कारण हें नव्हे कीं येथें नाटकें व चरित्रें लिहिलीं गेलीं किंवा साहित्य रचलें गेलें. या तर किरकोळ गोष्टी आहेत. ह्यानंतर जगांतल्या बऱ्याचशा देशांत चांगली उन्नति झाली आहे. परंतु मौलिक वस्तु आहे "आध्यात्मिक विचारसंपदा." तिला आम्ही "जीवनाची शिदोरी" म्हणूं शकतों. ती च आम्हांला अद्वितीय. पूर्वी गांवोगांवीं परिव्राजक हिंडत होते. तो हि एक काळ होता. भगवान् बुद्धाचे काळांत किती भिक्षु हिंडत असत.

महावीरस्वामींचे संघ किती हिंडत असत. शंकराचार्यांचे यति किती हिंडत असत. सतत हिंडत राहत. श्रुतीनें आज्ञा केली कीं " **चरैवेती चरैवेती** । " त्यांनीं तर येथपर्यंत म्हटलें आहे कीं हिंडणारा कृतयुगांत, उभा राहाणारा त्रेता युगांत, बसणारा द्वापार युगांत आणि निजणारा कलि युगांत राहत असतो.

## देशाची आजची दुर्दशा

परंतु आज तसें कांहीं च नाहीं. येथील लोक या आध्यात्मिक विचार-संपदेला जाणत नाहींत, वाचत नाहींत आणि वाचून ऐकविणारे हि नाहींत. ज्ञानाचे दृष्टीनें जर पाहिलें तर आज आमच्या देशाची जनता अत्यंत अडाणी आहे. तिचेजवळ हजारों वर्षांचें कांहीं अनुभवशीर ज्ञान आहे हें खरें. लोक त्याला पुष्कळ जास्त किंमत देतात. आणि म्हणून च येथल्या निवडणुकी वगैरे सफल होतात. लोकांना मोठा संशय होता कीं या देशांत निवडणुकीचा प्रयोग कोट्यवधि लोकांचीं मतें नोंदविण्यामध्यें न जाणों किती अडचणी येतील. किती दंगेधोपे होतील. पण तसें कांहीं हि झालें नाहीं. हें पाहून जग आश्चर्यचकित झालें. याचें कारण हिंदुस्थानच्या लोकांचा हजारों वर्षांचा अनुभव च. यामुळें जनता सहज च 'दान्त' अथवा दमनशील म्हणजे च सभ्य आहे. येथें या अनुभवाखेरीज जनतेला ज्ञान देण्याची कांहीं योजना नाहीं. संपत्ति तर शोषण्यांत च आली. दोन-तीनशें वर्षांपासून संपत्तीचें शोषण होत आहे. आणि शारीरिक शक्ति तरी कोणती आहे ? हिंदुस्थानी लोकांचें शरीर अत्यंत अशक्त. हाडांमांसाचा सांपळा च पाहत आहोंत. या बाबतींत आम्ही दुनियेंत अद्वितीय ठरूं कीं काय माहीत नाहीं. आज आमचे देशाची दशा अशी आहे. आम्ही इथल्या जनतेची उन्नति करूं इच्छितों; तिचें जीवन सुखी, संपन्न, समृद्ध व समानतेवर आधारलेलें रचूं पाहतों.

## समान कार्यक्रम पाहिजे

आम्ही जर या सर्व 'आयडियालॉजी' वर जोर देऊन जनतेंत फक्त

भेद च निर्माण करीत जाऊं आणि प्रत्येक जण दुसऱ्याचे दोष पाहून ते च समाजासमोर ठेवण्याचें कार्य करूं तर कोणत्या पक्षाचें कल्याण होणार आहे, हें पुष्कळ विचार करून सुद्धां मला समजत नाहीं. शेवटीं आम्हांला काय करायचें आहे ? जनतेची सेवा करायची आहे. समाजाचें जीवन उन्नत आणि समानतेवर आधारलेलें करायचें आहे. आणखी आम्हां लोकांचे विचार निरनिराळे असले तर परस्पर सल्लामसलत करून हि कधीं समाजासमोर ठेवावे लागले च तरी ते सुद्धां शांतीनें च व्हावयाला पाहिजे. उन्नति करण्याकरितां सर्व पक्षांचा कोणता साधारण कार्यक्रम होऊं शकतो किंवा नाहीं ? कोणत्या एका प्रश्नावर सर्व पक्षांचे लोक एकमत होऊं शकतात किंवा नाहीं ? आज लोक फक्त मरणानें च एक होत असतात. कोणी मरूं द्या कीं लौकर च येथले सर्व लोक सहानुभूति, आदर दाखवतील. त्यांच्यांत जे थोडे गुण असतील त्यांची प्रशंसा करतील. मेल्यावर त्यांचेबद्दल सर्वांच्या सहानुभूतिगंगेला पूर येतो. पांचपन्नास लोक येऊन सांत्वन करतील. हें सर्व मेल्यानंतर च होतें. परंतु हें च जर थोडें मरणापूर्वीं झालें तर काय आनंद होईल ! आपण सर्व लोकांनीं एक होऊन जर त्यांचेबद्दल सहानुभूति दाखविली तर मरणाची च काय जरूरी आहे ? म्हणून जीवनांत च आम्हांला कांहीं गोष्टी प्राप्त केल्या पाहिजेत. त्यांचा कार्यक्रम आंखून सर्व पक्षांनीं तो एकदम अंमलांत आणला पाहिजे. असें म्हणतात कीं मोठें संकट आलें तर सर्व एक होतील. म्हणजे संकटाची अपेक्षा करीत बसलें पाहिजे. वास्तविक आजसुद्धां हिंदुस्थानवर काय कमी संकट आहे ?

म्हणून माझी अशी प्रार्थना आहे कीं आपण सर्व निरनिराळ्या पक्षांचे लोकांनीं वाटल्यास आपआपले विचार आपलेजवळ असूं द्यावेत. असेंब्लींत त्या भिन्न भिन्न विचारांवर चर्चा होऊं द्या. त्यामुळें चांगले ठराव आणि योग्य निर्णय होतील. होयबा झाल्यानें कांहीं काम होत नाहीं. तरी हि असें एखादें सामाजिक सेवाकार्य असूं शकतें कीं जें सफल करण्यांत सरकार सुद्धां पूर्ण सहयोग देईल. तेव्हां सर्व पक्षांनीं आणि सर्व पक्षांचे कार्यकर्त्यांनीं जनतेला पूर्ण सहकार्य देण्याला सांगावें. सर्व पक्षांचे कार्यकर्त्यांनीं स्वतःला त्यांत वाहून घ्यावें. समाजाकरितां अशी सर्वसाधारण गोष्ट ( कॉमन फॅक्टर )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...



मिळायला पाहिजे. असें जर झालें नाहीं तर मी म्हणेन आम्ही सर्व लोक दुर्जन आहोंत, नालायक आहोंत. म्हणून आपण यावर विचार करावा.

मी नम्रपणें पण निश्चयानें सांगतों कीं भूदानाचा कार्यक्रम हा असा कार्यक्रम आहे. त्याकरितां जनता फार आतुर आहे. जेथें जेथें मी गेलों तेथें तेथें मीं हें च पाहिलें. ह्या बाबतींत थोडे मतभेद हि दिसले हें खरें. परंतु मतभेद प्रत्येक कामांत असतात च. तेव्हां येवढ्या मोठ्या कामांत हिंदुस्थानांतील सर्वांत कठीण अशा जमिनीचे प्रश्नावर थोडा मतभेद असला तर मोठी गोष्ट आहे असें नाहीं. भूमिहीनांना भूमि मिळाली च पाहिजे. ती जर प्रेमानें मिळाली तर उत्तम. अर्थात् या बाबतींत अजून सुद्धां ज्यांनीं विचार आणि चिंतन केलें आहे अशा लोकांत मतभेद असूं शकेल असें मला वाटत नाहीं. अशा तऱ्हेचा दुसरा कोणता कार्यक्रम असूं शकतो ? असा एखादा साधारण कार्यक्रम आपलेसमोर ठेवण्यांत यावा. सरकारची ही अशी योजना आहे. ती अंमलांत आणण्यांत आली तर आपण आणि जनतेनें ती मान्य करावी आणि सर्वांनीं त्यांत भाग घ्यावा असें झालें पाहिजे.

### संपत्तिदान द्यावें

तिसरी गोष्ट मी ही सांगूं इच्छितों कीं संपत्ति-दानाशिवाय भूमिदान एकांगी होईल. आरंभ फक्त भूदानानें च झाला. तें योग्य च झालें. गंगा सुद्धां गंगोत्रीपासून एकटी च निघते. नंतर ह्या गंगेंत कोठें तरी यमुनेचा संगम झाला च पाहिजे. नाहीं तर काम कसें होऊं शकेल ? म्हणून भूदाना-बरोबर च संपत्तिदान जोडलें गेलें पाहिजे. पहिल्यांदा दोन्ही गोष्टी आम्हीं सुरू केल्या नाहींत. आणि त्या वेळीं तें होऊं पण शकत नव्हतें. परंतु वेळ आली आहे कीं आतां संपत्तिदान सुद्धां फार जोरानें च व्हायला पाहिजे. प्रत्येकानें आपले संपत्तीचा सहावा हिस्सा द्यावा ही आमची मागणी आहे. लोक कमी जास्त देऊं शकतात. आम्ही कांहीं टॅक्स गोळा करीत नाहीं. आपआपल्या शक्तिनुसार कमी अधिक देऊं शकतों. परंतु एखादा तुकडा दानांत देऊन टाकला असें होतां कामा नये. तुकड्याचें दान होऊं नये.

आपले संपत्तीचा लहान मोठा हिस्सा गरीब असो किंवा श्रीमंत असो, सर्वांनीं देत च राहिलें पाहिजे. हें नित्य दानाचें कार्य आम्हांला हिंदुस्थानांत रूढ करावयाचें आहे. सार्वजनिक कार्याकरितां जर इतकी संपत्ति मिळूं शकेल तर योजना अंमलांत आणण्याला मोठ्या अडचणी येणार नाहींत. तें काम सहज होईल. म्हणून माझे सहावे हिश्शाचे मागणीवर हि आपण जरा विचार करावा.

आपल्याजवळ पुष्कळ संपत्ति आहे असें मी म्हणत नाहीं. थोड्या च लोकांजवळ पुष्कळ मोठी संपत्ति असूं शकते पण सर्वांपाशीं तर थोडथोडी आहे च. ह्यामुळें आपल्यावर संपत्ति-दानाची जबाबदारी येते. कारण आपण लोकांनीं निवडलेले सेवक आहांत. आपलें आचरण समाजापुढें एक आदर्श सहज च होत असतें. आम्ही कांहीं हि म्हणूं परंतु जनतेनें ज्या अर्थीं आपल्याला निवडलें आहे त्या अर्थीं आम्हांला आपला श्रेष्ठपणा कबूल करायला च पाहिजे. पुन्हां '**यद्यदाचरति श्रेष्ठः**' हें गीतावचन स्पष्ट च आपल्याला हा आदर्श ठेवण्याची प्रेरणा देत आहे. म्हणून मीं आशा करितों कीं येथें जितके लोक आले आहेत आणि जे आले नाहींत त्या सर्वांचे कानांवर माझी ही गोष्ट पोंहचेल.

ह्यांत आपण कोणत्या हि प्रकारची अथवा समाजाची सुद्धां जबरदस्ती समजूं नये. माझ्याजवळ दुसरें कोणतें च दडपण नाहीं. मजजवळ कोणती सत्ता हि नाहीं. मी सत्ता इच्छीत नाहीं. आणि अशा कामांत माझा सत्तेवर भरंवसा नाहीं. 'कुराणा'मध्यें महंमद पैगंबरानें स्पष्ट च म्हटलें आहे व ज्याचा मुसलमानांनीं पुष्कळदां भंग हि केला तें हें कीं "लाइकराह फिद्दीन" म्हणजे धर्मांत जबरदस्ती होऊं शकत च नाहीं. म्हणून यांत कोणती जबरदस्ती नाहीं. सामाजिक जबरदस्तीनें हें काम केलें जावें अशी हि माझी इच्छा नाहीं. या गोष्टीवर आपण शांत चित्तानें विचार करा. आपण आपला सहावा हिस्सा देऊन बाकीचे संपत्तीचा उपभोग घेतला तर काय आपलें जीवन जास्त दुःखी होईल? भौतिक दृष्टीनें हि मला वाटत नाहीं कीं हें आपल्याला अत्यंत कष्टदायक होईल. याशिवाय आपल्याला

त्यानें आध्यात्मिक सुख तर पुष्कळ च मिळेल आणि हिंदुस्थानची सेवा करण्याचें लोकांना मोठें प्रोत्साहन मिळेल.

## ' नित्यदानां 'त सम विभागणी

भारतांत नित्यदानाची प्रवृत्ति सुरू झाली पाहिजे अशी माझी इच्छा आहे. जेव्हां मी दान शब्दाबरोबर नित्य शब्द जोडतों तेव्हां त्यांतली परोपकाराची भावना निघून जाते. नित्यदान याचा अर्थ दान नित्य देत असलें पाहिजे. आणि त्यामुळें शंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'समविभाजन' होत असतें. भगवान् बुद्धांनीं हि म्हटलें आहे कीं **' यं समविभागं भगवो अवण्णई. '** भगवान् बुद्धांचे शिष्य लोकांना हें च समजावून सांगत असत कीं सम-विभाजन करा. भगवान् बुद्ध ज्याला सम विभाजन म्हणत असत त्याला च मी अशा प्रकारचें दान म्हणतों. खरोखरी च सम-विभाजन हा फार च सुंदर शब्द आहे. अत्यंत प्राचीन काळापासून—वेद-काळापासून आणि बौद्ध, जैन, शंकर वगैरेंच्या काळापासून—हा शब्द चालत आला आहे. नित्यदानाचे प्रवृत्तीनें हें समविभाजन होऊन जाईल.

आपण म्हणाल आज मी येथें चांगल्या जागेवर आहें. कांहीं थोडी मिळकत आज आहे. उद्यां या जागेवर न राहतां दुसऱ्या ठिकाणीं राहिलों तर मिळकत इतकी राहणार नाहीं. मग कसें द्यावें ? पण मला याची कांहीं फिकीर नाहीं. आपली जी कांहीं मिळकत असेल–मग ती थोडी किंवा जास्त असो–दरवर्षी आपल्याला तिचा हिस्सा द्यावा लागेल. आपण जर हा विचार मान्य कराल तर फार चांगलें होईल.

## देशांत कोणीं हि निरक्षर राहूं नये

आणखी एक गोष्ट. भारताची सर्वांत मोठी देणगी म्हणजे त्यांचें साहित्य अथवा विद्या. परंतु लोक तें वाचूं शकत नाहींत तरी मला असें वाटतें कीं मनुष्य लिहिण्या-वाचण्याशिवाय हि उन्नति करूं शकतो. तरी पण लिहिणें-वाचणें शिकणें हें एक मोठें शक्ति देणारें साधन आहे ही गोष्ट कोणी अमान्य करूं शकत नाहीं. म्हणून आमचे देशांतील प्रत्येक

८७१५

मनुष्याला लिहिणें वाचणें आलें च पाहिजे. जुन्या काळांत एका राजानें सांगितलें होतें कीं माझे राज्याचें काय वैभव आहे ? त्यांनीं उत्तर दिलें—

**' न मे स्तेनो जनपदे न कदर्यः न मद्यपः ।**

**न अनाहिताग्निः न अविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः ॥ '**

राजा म्हणतो कीं **' न मे स्तेनो जनपदे '** म्हणजे माझे राज्यांत कोणी चोर नाहीं. पहिल्या वाक्यांत चोर नसण्याची गोष्ट सांगितली आहे. आणि लगेंच दुसऱ्या वाक्यांत म्हटलें **' न कदर्यः '** कोणीं कंजूष नाहीं. दोघे हि एकमेकांचे बाप-बेटे आहेत. जेथें कंजूष आहेत तेथें चोर असणें शक्य आहे. आपल्याला चोर नको असतील तर आपण कंजूष नसलें पाहिजे. त्या-बरोबर च **' न मद्यपः '**. म्हणून त्या राजानें जणूं काय आपल्या सर्व राज्यव्यवहाराकरितां कार्यक्रम च आंखून दिला. (१) कुठें हि चोरी होतां कामा नये. (२) कुठें हि कंजूष नसला पाहिजे. (३) कोणीं दारू दिऊं नये किंवा कोणीं व्यसनी असूं नये. पुढें तो राजा म्हणतो कीं **' न अना-हिताग्निः '** माझ्या राज्यांत परमेश्वराची भक्ति न करणारा कोणी हि नसो. त्या दिवसांत परमेश्वराची भक्ति अग्नीमार्फत होत असे. म्हणून तेथें अग्नि शब्दाचा उपयोग केला आहे. म्हणजे ईश्वराची उपासना करणारा कोणीं च नाहीं. प्रत्येक जण ईश्वरभक्त आहे. आणि पुढें तो काय म्हणतो– **' न अविद्वान् '** अविद्वान् कोणीं च नाहीं. म्हणजे माझे राज्यांत सर्व विद्वान् आहेत. साधारण लिहिणें-वाचणें सर्वांना च येतें. सर्व ' साक्षर ' होते. 'साक्षर'चा अर्थ हा नाहीं कीं त्यांना फक्त अक्षर च येत होतें. किंबहुना पूर्ण अक्षर व अर्थ दोन्ही हि त्यांचे जीवनांत दिसत होतें. त्या च प्रमाणें आमच्या राज्यांत प्रत्येक व्यक्ति विद्वान् असली पाहिजे. राजानें शेवटीं म्हटलें कीं **' न स्वैरी स्वैरिणी कुतः '** विचित्र श्लोक आहे. माझ्या राज्यांत दुराचारी पुरुष नाहींत आणि जेथें दुराचारी पुरुष नाहींत तेथें दुराचारी स्त्री राहूं च शकत नाहीं. दुराचाराचा सर्व बोझा पुरुषांवर च टाकला आहे. स्वैरी पुरुष च नाहीं तर स्वैरिणी राहूं च कशी शकेल ?

ह्याप्रमाणें एक आदर्श राज्य त्यानें आमचेसमोर ठेवलें आहे. त्यांत ही च कल्पना होती कीं आमच्या राज्यांतील प्रत्येक व्यक्ति विद्वान् असली पाहिजे. या देशांतील प्रत्येक स्त्रीपुरुष विद्वान् असला पाहिजे असें मला नेहमीं वाटतें. दुसरें कोणतें हि वैभव असो किंवा नसो, मला त्याची काळजी नाहीं. परंतु विद्या तरी आमचेजवळ असली च पाहिजे.

## विचारप्रचारांत सर्वथा निराग्रह

आपण मला आपले विचार आपणासमोर मांडायला संधि दिली त्याबद्दल मला आभार मानले पाहिजेत. आमच्यासारख्या स्वतंत्र विहार करणाऱ्यांना बंधन घालणारी अशी कोणती च वस्तु दुनियेंत नाहीं परंतु ते सुद्धां प्रेमानें बांधले जातात. त्यांनीं लोककल्याणकारक जो ज्ञानसंग्रह केला आहे तो लोकांना देऊन च त्यांनीं मरावें ही उत्सुकता त्यांना असते. जसजसा वृद्धापकाळ जवळ येतो व मृत्यूची जाणीव होत असते, तसतशी अशी इच्छा वाढत जाते कीं हा सारा संग्रह एकदां समाजाला द्यावा आणि नंतर आपल्या मूळ घरीं, जेथें जाण्याची फार च ओढ लागली आहे तेथें, जावें. खरोखरी च त्याचे केवळ स्मरणानें च मला इतका आनंद होत आहे कीं एक वेळ येईल कीं ज्या वेळीं मी हें शरीर फेंकून प्रभूचे पाळण्यांत जाऊन बसेन. परंतु तें संचित— जें ज्ञान वा अज्ञान कांहीं असो पण ज्याचें विज्ञान म्हणून संग्रह केला— समाजाला देऊन च मोकळें व्हावें ही च इच्छा राहिली आहे.

म्हणून आपल्यासारखे श्रोते जेव्हां मिळतात तेव्हां मला ही संधि दिली गेली म्हणून माझे मनांत मोठी उपकाराची भावना येत असते. या कारणामुळें च औपचारिक रीत्या नाहीं परंतु अंतःप्रेरणेनें मी म्हणतों कीं आपले मजवर पुष्कळ उपकार आहेत. मी आपलें दर्शन घेतलें, चेहरे पाहिले, त्यामुळें च फक्त मी आपले विचार इतक्या तन्मयतेनें मांडूं शकलों. परंतु त्यानंतर ह्या वेळपावेतों बोलण्यांत मला दुनियेची कांहीं जाणीव नव्हती. आणि सहजासहजीं जे शुद्ध विचार सुचले ते आपलेसमोर ठेवले. कोणत्या हि विचाराचा मी आग्रह धरीत नाहीं. उलट तर असें असलें

पाहिजे कीं कोणा हि व्यक्तीनें विचार पसंत असल्याशिवाय अंमलांत आणूं नयेत. अंमलांत आणीत असेल तर मी त्याची ही चूक आहे असें समजेन. मला हें चांगलें वाटत नाहीं. माझा हुकूम म्हणून कोठें हि मानला जाऊं नये अशी माझी हार्दिक इच्छा आहे. विचारमंथन सुरू व्हावें. लोकांनीं ते समजावे आणि नंतर ते अमलांत आणावे म्हणून विचार समजावून देण्याचे बाबतींत मी अगदीं निराग्रही असतों.

## ' शास्त्रं ज्ञापकं न तु कारकम् '

कालची किंवा परवांची गोष्ट मी विसरलों. एक गृहस्थ मला हें सांगायला आले कीं आपण इतके हिंडतां त्यापेक्षां २५-५० गांवें घेऊन स्वराज्य किंवा रामराज्य म्हणतां येईल अशा धर्तीचें कांहीं करून दाखवा. फिरणें तर पुष्कळ झालें. आतां कांहीं करून दाखवाल तर बरें होईल. याला मीं जरा थट्टेनें च पण यथार्थ उत्तर दिलें कीं बाबाला दुनियेंत कांहीं च करावयाचें नाहीं. त्याला तर फक्त फिरणें आहे. आणि विचार आपल्यासारखे लोकांसमोर ठेवून द्यावयाचे आहेत. आपल्याला जर ते बरे वाटले तर त्याप्रमाणें करावें; नाहीं तर करूं नये. यांत च आपलें कल्याण आहे.

मीं त्यांना एक उदाहरण दिलें कीं ' साइन पोस्ट ' आपला हात पकडून मुक्कामावर पोंचवत नाहीं. तो फक्त सांगतो कीं हें भुवनेश्वर, हें कटक आणि ही पुरी. तो इतकें च सांगतो. आपल्याला जर पुरीला जावयाचें असेल तर जावें, जावयाचें नसल्यास जाऊं नये. भुवनेश्वराला जावयाचें असेल तर जावें, जावयाचें नसेल तर तेथें हि जाऊं नये. शास्त्रकारांची वृत्ति ही अशी च असते. ' **शास्त्रं ज्ञापकं न तु कारकम्** ' म्हणजे शास्त्र फक्त ज्ञान सांगतें; तें स्वतः कांहीं च करीत वगैरे नाहीं. तेव्हां माझी वृत्ति ही शास्त्रासारखी च झाली आहे. म्हणून मी समजतों कीं त्यांनीं जी वृत्ति स्वतःची ठेवली आहे ती च मीं ठेवणें श्रेयस्कर. कोणती हि गोष्ट समाजावर लादली जातां कामा नये. याच्यावर माझा दृढ विश्वास आहे. त्याकरितां जे विचार मीं आपल्यासमोर ठेवले ते आपण चांगले समजून घेऊन च स्वीकाराल

तर फार उत्तम होईल. आणि आपल्याला जर ते निरर्थक वाटले तरी हि उत्तम; मी आपल्याला भक्तियुक्त अंतःकरणानें प्रणाम करतों.

**भुवनेश्वर**
१५-३-'५५

## धर्मस्थानांना तुरुंग बनूं देऊं नका : १६ :

बऱ्याचशा लोकांना माहीत झालें असेल कीं आम्ही आज सकाळीं जगन्नाथाचे दर्शनाकरितां मंदिरापर्यंत गेलों आणि तेथून आम्हांला परतावें लागलें. आम्ही तर मोठ्या भक्तिभावानें गेलों होतों. आमचेबरोबर एक फ्रेंच भगिनी हि होती. ती जर मंदिरांत जाऊं शकत नाहीं तर आम्ही हि जाऊं शकत नाहीं असें आमचा धर्म सांगत होता. मीं लहानपणापासून आजपर्यंत हिंदुधर्माचें अध्ययन केलें आहे. ऋग्वेद वगैरेपासून रामकृष्ण-परमहंस आणि महात्मा गांधींपर्यंत धर्मविचारांची जी परंपरा येथें चालत आली आहे त्या सर्वांचें मी मोठ्या भक्तिभावानें अध्ययन केलें आहे. मी नम्रतापूर्वक पण निश्चयानें म्हणूं शकतों कीं ज्याप्रमाणें मी हिंदु धर्म समजतों त्या च प्रमाणें नित्य आचरण करण्याचा माझा नम्र प्रयत्न असतो. आज मला वाटतें कीं त्या फ्रेंच भगिनीला बाहेर ठेवून मीं आंत गेलों असतों तर तो मीं मोठा अधर्म च केला असता. आम्हीं तेथल्या अधिकाऱ्याला विचारलें कीं या भगिनीबरोबर आंत प्रवेश मिळूं शकेल काय? उत्तर मिळालें कीं मिळूं शकत नाहीं. तेव्हां भगवानाऐवजीं त्यांना च प्रणाम करून आम्ही परत फिरलों.

**संस्कारांचे प्रभावांत**

ज्यांनीं आम्हांला आंत प्रवेश करण्याची मनाई केली त्यांचेकरितां मीं कोणता शब्द योजावा हें सुचत नाहीं. एवढें च म्हणतों कीं त्यांचेबद्दल आमचे मनांत कोणत्या हि तऱ्हेची हीन भावना नाहीं. मी जाणतों कीं त्यांना हि दुःख झालें असावें. परंतु ते एका संस्काराचे पगड्याखालीं

दडपले गेले होते म्हणून त्यांचा निरुपाय होता. त्यामुळें च मी त्यांना जास्त दोष देत नाहीं. एवढें च म्हणतों कीं आमचे देशाचे दृष्टीनें आणि आमचे धर्माचे दृष्टीनें ही एक अत्यंत दुःखदायक घटना आहे. मीं कालचे व्याख्यानांत च सांगितलें कीं बाबा नानक यांना येथें या मंदिरांत जाऊं देण्यांत आलें नव्हतें आणि त्यांना बाहेरून च परत जावें लागलें. ही घटना जुनीपुराणी झाली. याला चार-साडेचारशें वर्षें होऊन गेलीं. आम्हांला आशा होती कीं अशी गोष्ट फिरून होणार नाहीं.

### हिंदु धर्माला धोका

आमचेबरोबर जी फ्रेंच भगिनी आली ती कोण आहे हें आपण समजून घेतलें पाहिजे. ती अहिंसा आणि मानवप्रेम यांवर विश्वास ठेवणारी एक भगिनी आहे. आणि गरिबांची सेवा करण्याकरितां जें भूदान-यज्ञाचें कार्य चालू आहे त्यासंबंधीं तिचे मनांत पुष्कळ आदर आहे. म्हणून तें पाहण्याकरितां ती आमचेबरोबर फिरत आहे. आपल्याला माहीत आहे कीं महाराज युधिष्ठिरांना जेव्हां स्वर्गाचा दरवाजा खुला झाला आणि त्यांचे साथीदाराला आंत जाण्याची मनाई करण्यांत आली तेव्हां ते हि आंत गेले नाहींत. आम्हांला वाटतें कीं जी भगिनी आमचेबरोबर फिरत आहे तिचे मनांत ईश्वराची भक्ति दुसऱ्या कोणाच्या हि पेक्षां कमी नाहीं. आमच्या भागवतधर्मानें तर निश्चयपूर्वक सांगितलें आहे कीं ज्याचे हृदयांत ईश्वराची भक्ति आहे तो ईश्वराचा लाडका— मग तो कोणत्या हि जातीचा अगर धर्माचा असो. ब्राह्मण असो आणि साऱ्या दुनियेंतील गुण त्याच्यांत असोत पण त्याचेजवळ जर भक्ति नसेल तर त्याचेपेक्षां ज्याचे हृदयांत भक्ति आहे असा चांडाल श्रेष्ठ आहे. भागवतधर्म व त्याची प्रतिष्ठा उत्कल प्रांतांत सगळीकडे आहे. उडिया भाषेंतील सर्वांत उत्तम ग्रंथ जगन्नाथदासाचें भागवत. जगन्नाथाचे मंदिराची अशी हि — नानकाची जुनी गोष्ट सोडून द्या — प्रसिद्धि आहे कीं येथें मोठा उदार वैष्णव धर्म चालत आहे. अलीकडे प्रत्येक जातीची आणि धर्माची परीक्षा होत आहे, हें आपल्याला समजायला पाहिजे. जो संप्रदाय, जो धर्म, ह्या परीक्षेला उतरेल तो च फक्त टिकूं शकेल, बाकीचे टिकणार नाहींत. आम्ही

जर चार भिंतींचे आंत स्वतःला कोंडून घेऊं तर आमची उन्नति होणार नाहीं आणि ज्या औदार्याचा हिंदु धर्मात विस्तार झाला तें संपुष्टांत येईल. धर्मविचारांत औदार्य पाहिजे. हें समजायला पाहिजे कीं जो कोणी जिज्ञासु असेल त्याचे समोर आपला विचार ठेवणें आणि प्रेमानें त्याच्याशीं संभाषण करणें हें भक्ताचें लक्षण आहे. इतर धर्मांचे लोक येथपर्यंत पुढें जातात कीं आपले धर्मांतील गोष्टी दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादतात. तसें तर आम्हांला करावयाचें नाहीं परंतु आमचीं देवळें, आमचे ग्रंथ, सर्व जिज्ञासूंना खुले असायला पाहिजेत. आमचें हृदय सर्वांकरितां उघडें असलें पाहिजे. तें मोकळें असलें पाहिजे. आमच्या धर्मस्थानांना तुरुंग बनविणें आम्हांला फार हानिकारक होईल. आणि सज्जनांना तेथें प्रवेश मिळवून देण्यांत जर कांकूं करण्यांत आली तर देवळांसंबंधीं जी थोडीबहुत श्रद्धा आज आहे ती हि नष्ट होईल.

### सनातन्यांकडून धर्महानि

आम्हांला समजायला हवें कीं शेवटीं धर्माचा संदेश कोणाकरितां आहे? कांहीं थोड्या लोकांकरितां कीं सर्व दुनियेकरितां? मी आपणांला सांगूं इच्छितों कीं मला जेव्हां वेदांचें अध्ययन करण्याची इच्छा झाली तेव्हां ऋग्वेदाची उत्तम आवृत्ति सायणभाष्यासहित मॅक्समुल्लरनें केलेली मला मिळाली. त्याचेइतकी उत्तम दुसरी आवृत्ति कोणीं केलेली मिळाली नाहीं. ही गोष्ट असेल ३०-३२ वर्षांपूर्वींची. आतां पुण्याचे टिळक विद्यापीठानें सायणभाष्यासहित ऋग्वेदाची उत्तम आवृत्ति काढली आहे. पण त्या दिवसांत मात्र मॅक्समुल्लरची उत्तम आवृत्ति मिळत असे. त्यामधें फार च थोड्या चुका, उत्तम छपाई, शुद्ध स्वरांसहित उच्चार हि होते. एका काळीं वेदाध्ययन करण्याला येथें थोडा प्रतिबंध होता. त्या वेळीं लेखनकला नव्हती. छापण्याची कला तर मुळीं च नव्हती. त्या काळांत उच्चार बरोबर व्हावे, निरनिराळे पाठ होऊं नयेत आणि वेदांचें रक्षण व्हावें, या दृष्टीनें तसें केलें गेलें असेल. त्या काळांतली गोष्ट जर कोणी या हि काळांत करील आणि म्हणेल कीं वेदाध्ययनाचा अधिकार फक्त ब्राह्मणांना च आहे, इतरांना नाहीं, तर तो मूर्खपणा होईल. वेदांचें चांगलें

अध्ययन जर्मनींत झालें आहे. रशियांत, फ्रान्स व इंग्लंडांत हि झालेलें आहे. फक्त ऋग्वेद च नाहीं तर सर्व वेदांचे सर्व मंत्रांची सूची व संग्रह ब्रूमफील्ड नांवाच्या लेखकानें फार च उत्तम तऱ्हेनें केला आहे. त्याचे इतका उत्तम ग्रंथ मिळणार नाहीं. अशा तऱ्हेच्या आणखी अनेक ग्रंथांचीं नांवें मीं सांगूं शकतों. हे सर्व ग्रंथ हातांत घेऊन त्यांचे आधारावर ऋग्वेदाचें अध्ययन करण्याला मला मदत झाली आहे. या काळांत जर कोणी जुनी गोष्ट करील तर त्याचा अर्थ एवढा च कीं आजचा काळ काय आहे हें आम्हांला समजत नाहीं. जसजसा काळ बदलतो तसतसा बाह्य रूपांत हि बदल करावा लागतो. परंतु आमच्या सनातनधर्मी लोकांनीं आपल्या संकुचित वृत्तीनें सनातन धर्माचें जितकें नुकसान केलें तितकें नुकसान क्वचित च इतर कोणीं केलें असेल.

जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. शेंकडों काश्मिरी लोक जबरदस्तीनें मुसलमान केले गेले. ती तर जबरदस्ती होती आणि त्या लोकांना पश्चात्ताप झाला. त्यांनीं पुन्हां हिंदुधर्मांत परत येण्याची इच्छा दाखविली. त्यांनीं काशीचे ब्राह्मणांना विचारलें तर त्यांना त्यांनीं परत येण्याची मनाई केली. आणि म्हटलें कीं अशा भ्रष्ट लोकांना आमच्या धर्मांत स्थान नाहीं. आम्ही त्यांना घेऊं शकत नाहीं. परंतु नौखाली वगैरे ठिकाणीं जो भ्रष्टाकार झाला त्यांत शेंकडों हिंदु जबरदस्तीनें मुसलमान झाले तर त्यांना धर्मांत परत घेण्याला काशीच्या पंडितांना शास्त्रांत आधार मिळाला आणि ते त्यांना परत घेण्यास उत्सुक झाले. ही च गोष्ट आम्हांला शंभर वर्षांपूर्वीं सुचली नव्हती. आतां सुचली आहे. ज्याची ऐन वेळेवर बुद्धि काम करते त्यांना च ज्ञानी म्हणतात आणि ते च धर्माचें रक्षण करूं शकतात.

### मनूचा धर्म सर्व मानवांकरितां

हिंदु धर्माचा खरोखरी च उत्तम आदर्श ज्यांनीं आपल्या जीवनांत ठेविला अशा लोकांना, म. गांधीजींना, या काळांत सनातनी लोक धर्म-विरोधी म्हणतात ही मोटी आश्चर्याची गोष्ट आहे. मला वाटतें हिंदु धर्माचें

रक्षण आणि त्याची प्रतिष्ठा जितकी गांधीजींनीं केली तितकी या हजार वर्षांत दुसऱ्या कोणीं हि बहुतेक केली नसेल. परंतु अशा व्यक्तीला सनातनी लोक धर्मविरोधी समजतात आणि स्वतःला समजतात धर्मरक्षक. ही फार च भयंकर स्थिति आहे. ह्या सनातनीयांनीं हें समजायला पाहिजे कीं ज्या धर्मावर ते प्रेम करितात त्या धर्माचें ते असल्या कृत्यांनीं मोठें नुकसान करीत आहेत. हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त झालें व हिंदुस्थानच्या प्रत्येक गोष्टीकडे सर्व दुनियेचें लक्ष वेधलें जात आहे. हिंदुस्थानपासून सर्व दुनिया जेव्हां आशा करीत आहे त्या वेळीं अशी गोष्ट होणें म्हणजे त्याचा परिणाम सर्व जगावर काय होईल याचा जरा आपण विचार करा. मनु महाराजांनीं आशा केली होती आणि मी काल च त्यांचा हा श्लोक सांगितला होता.

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥**

पृथ्वीवरील सर्व मानवजात जर या देशांतील लोकांचे चारित्र्यापासून शिक्षण घेणार तर तें अशा च तऱ्हेनें मिळेल काय कीं ते आमचे निकट येण्याची इच्छा करीत असतांना आम्ही त्यांना दूर ढकलावें ? मनु महाराज '**पृथिव्यां सर्वमानवाः**' म्हणतात तेव्हां त्यांनीं आपल्या अंतःकरणांतील औदार्य च दाखविलें. मनूनें जो धर्म सांगितला त्याला मानवधर्म म्हणतात. तो धर्म सर्व मानवजातीकरितां आहे. आम्ही आमची गोष्ट दुसऱ्यावर लादणार नाहीं हें खरें परंतु दुसरे जर आमचेजवळ येण्याची इच्छा करीत असतील आणि आम्ही त्यांना येऊं देणार नाहीं तर त्याला काय म्हणावें ? या गोष्टीचा आमचे लोकांनीं चांगला विचार करून भागवतधर्माची प्रतिष्ठा कशांत आहे ह्याचा हि विचार करावा असें मला वाटतें.

**क्रोध नव्हे, दुःख**

कांहीं दिवसांपूर्वीं मी उडिया भाषेंतील सालबेगचें एक भजन वाचीत होतों. त्यांत म्हटलें आहे कीं मी दीन जातीचा यवन आहें आणि मला श्रीरंगाचे कृपेची इच्छा आहे. असें भजन ज्यांत आहे त्या भागवत-

धर्माला हें शोभतें काय कीं एका स्वच्छ, शुद्ध, निर्मळ अंतःकरणाच्या बहिणीला मंदिरांत येण्याला मनाई करावी ? त्या भगिनीच्या जाण्यामुळें काय तें मंदिर भ्रष्ट होईल ? तिला तेथें जाण्याला मनाई झाली त्याचा मला राग आला नाहीं पण मला अत्यंत दुःख झालें. आज दिवसभर ती गोष्ट माझे मनांत घोळत होती. अशा तऱ्हेच्या संकुचित वृत्तीनें हिंदु धर्म कसा वाढेल किंवा त्याची उन्नति कशी होईल हें समजत नाहीं.

## देशाचें सुद्धां नुकसान

आपण सर्व लोक जाणतां कीं वैदिक काळांत पशुहिंसा करून यज्ञ होत असत. परंतु पुढें भागवतधर्मानें त्याचा निषेध केला व ते बंद केले. जगन्नाथदासाच्या भागवतांत हि ती गोष्ट आहे. भगवान् बुद्धांनीं तर सरळ सरळ यज्ञसंस्थेवर च हल्ला केला. तेव्हां ती गोष्ट थोडी वाईट वाटली असेल परंतु त्यानंतर हिंदूंनीं तर त्यांची ती गोष्ट कबूल केली. आणि विशेषतः भागवतधर्मानें तर त्याचा अंगीकार केला. अशा तऱ्हेनें जुन्या कल्पनेंत सतत सुधारणा होत आहे. आजचा हिंदु धर्म व भागवतधर्म प्राचीन वैदिक धर्मांत ज्या चुकीच्या समजुती होत्या त्यांची सुधारणा करून च झाला आहे. अशा कल्पनेला तर वेदांत मला कांहीं च आधार मिळाला नाहीं. तरी पण हें खरें कीं त्या काळांत पशुहिंसा चालू होती. यज्ञांत पशुहिंसा होत असे. ह्या यज्ञसंस्थेवर भगवान् बुद्धानें एक प्रकारचा हल्ला चढविला. परंतु गीतेनें तर त्याचें स्वरूप बदलून त्याला आध्यात्मिक स्वरूप दिलें. आणि आज तर ते जप-यज्ञ, तप-यज्ञ, दान-यज्ञ, ज्ञान-यज्ञ इत्यादि नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. तेव्हां धर्म म्हणून जुन्या संकुचित कल्पना समजणें हें धर्माचें लक्षण नाहीं. हिंदु धर्माचा तर सतत विकास होत आला आहे. एवढा विकसित होणारा धर्म दुसरा कोणता च नसावा. ज्या धर्मांत सहा सहा परस्परविरोधी दर्शनांचा संग्रह आहे, ज्यांत द्वैत-अद्वैताचा समावेश आहे, ज्यांत निरनिराळ्या प्रकारच्या देवतांना स्थान दिलें आहे, आणि ज्यांत कोणत्या हि एका प्रकारचे आचाराचा आग्रह नाहीं, अशा धर्मासारखा उदार धर्म दुसरा कोणता असूं शकेल ? हिंदु धर्मांत एका जातींत एक प्रकारचा असेल तर दुसऱ्या जातींत ह्यापेक्षां निराळा च आचार

असेल. एका प्रदेशांत एक आचार तर दुसऱ्या प्रदेशांत निराळा आचार. एवढा निराग्रही, सर्वसंग्रही आणि व्यापक धर्म मिळून हि आम्ही त्याला संकुचित करूं तर त्यांत आम्ही आपल्या देशाचें नुकसान च करीत आहोंत.

ह्या गोष्टीबद्दल आपण सर्वांनीं विचार करावा अशी माझी इच्छा आहे. ज्या विचारांवर माझी श्रद्धा आहे त्या विचारांप्रमाणें आचरण करण्याची शक्ति मला तो देतो हे त्या परमेश्वराचे माझेवर उपकार आहेत. अशा तऱ्हेनें परमेश्वर मला निरंतर चांगल्या विचारांचें आचरण करण्याची शक्ति देईल ही आशा आहे. आज मंदिरांत जाण्याची मनाई केल्यामुळें मला जें सौभाग्य, जो लाभ, मिळाला असता त्याचा मीं त्याग केला हें मला कबूल आहे. एका श्रद्धाळू मनुष्याला आज मंदिरांत प्रवेश मिळाला नाहीं ही गोष्ट परमेश्वराचे दरबारांत निवेदन करण्याची माझी इच्छा आहे. आपणां सर्वांना माझे भक्तिभावपूर्वक प्रणाम.

पुरी
२१-३-'५५

: १७ :

## खरी धर्मदृष्टि

काल मीं मंदिरप्रवेशाचा लाभ घेण्याचें नाकारलें ही गोष्ट फार विचार करण्यासारखी आहे. त्यांतले जे कांहीं विचार राहून गेले त्यांकडे आज मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. त्या गोष्टीचा क्षुब्ध अंतःकरणानें विचार करण्यांत यावा अशी माझी इच्छा नाहीं. त्याचा शांत वृत्तीनें च विचार झाला पाहिजे. कारण ज्यांनीं आम्हांला प्रवेश देण्यास मनाई केली त्यांचे मनांत हि धर्मदृष्टि होती आणि आम्हीं जो प्रवेश नाकारला त्यांत हि धर्मदृष्टि च होती. म्हणजे दोन्ही हि बाजूंला धर्मदृष्टि असूं शकते. आतां विचार हा च करावयाचा आहे कीं ह्या काळांत आणि ह्या परिस्थितींत धर्माची दृष्टि काय असायला पाहिजे.

## गूढवाद हा रूढवाद बनला

कोणा एका विशिष्ट काळांत उपासनेचीं स्थानें आपल्यापुरतीं च मर्यादित होऊं शकतात हें मी कबूल करतों. कधीं एकांतांत ध्यान होऊं शकतें. मीं काल सांगितलें कीं एका जमान्यांत वेदरक्षणाकरितां त्याचे पठन-पाठनाबद्दल मर्यादा घालण्यांत आली होती. पण आतां या काळांत त्याची आवश्यकता नाहीं. आज जर तसें करण्यांत आलें तर वेदांचे अध्ययनावर च प्रहार होईल. हा च न्याय सार्वजनिक उपासनास्थानांना हि लागू होईल. जसा नदीचा उगम कठीण स्थानापासून किंवा दुर्गम गुहेंतून होतो तसा च धर्माचा उदय. वेदांची प्रेरणा कांहीं व्यक्तींच्या अंतःकरणांतून च झाली. अनादि कालापासून कांहीं विशिष्ट मानवांना ऋषिमुनींची दृष्टि–धर्मदृष्टि होती. त्याचें संगोपन करण्याकरितां विशेष एकान्तस्थानाची इच्छा ते करीत असतील. त्यांनीं त्या काळांत असा च विचार केला असेल कीं ज्यांना समजू शकतें अशा च लोकांना ती धर्मदृष्टि समजाविण्यांत यावी. नाहीं तर चुका च चुका होतील आणि कांहीं गैरसमज होतील. त्यामुळें अधर्म होईल. याचा परिणाम असा झाला कीं अति प्राचीन काळांत, ज्या वेळीं वेदांचा आरंभ झाला त्या वेळीं, लोक समजत असतील कीं ही उपासना कांहीं विशेष मंडळींकरितां च असावी. आणि अशा तऱ्हेनें ती उपासना मर्यादित झाली. परंतु नदी जशी दुर्गम गुहेंतून, त्या अज्ञात स्थळापासून, उगम पावते व वाढत वाढत पुढें मैदानांत वाहूं लागते, तसतशी ती लोकांना सुगम होते. त्याप्रमाणें आपल्याला समजलें पाहिजे कीं वैदिक धर्माची नदी त्या दुर्गम स्थानापासून बरीच पुढें आली आहे. आणि विशेषेंकरून वैष्णवांचे काळानंतर ती लोकांना फार च सुलभ, सुगम झाली आहे. नदीच्या उगमाजवळ तिच्या थोड्या पाण्याचे पावित्र्यासंबंधीं जशी काळजी घ्यावी लागते तशी ती उगमापासून दूर वाहत आल्यावर समुद्राचे जवळ आली म्हणजे करावी लागत नाहीं. म्हणून मध्यंतरींच्या काळांत जो वाद हिंदुस्थानांत होता तो गूढवाद होता. तो च नंतर रूढवाद झाला. त्यानंतर गूढवाद नाहींसा झाला आणि एकान्त ध्यानचिंतन यांची जागा सामूहिक भजन, कीर्तन यांनीं घेतली. प्राचीन ग्रंथांत हि लिहिलें आहे कीं सत्य-

युगांत एकान्त ध्यानचिंतन करणें धर्म आहे. आणि कलियुगांत सामूहिक भजन, नामसंकीर्तन करणें हा धर्म आहे.

## भक्तिमार्गाचा विकास

शेवटीं भारतासंबंधानें बोलावयाचें तर येथें भक्तिमार्ग इतका व्यापक झाला कीं त्यांत सर्वांचा समावेश झाला. भक्तीचे जितके प्रकार होऊं शकतात त्या सर्वांचें स्वरूप भक्तिमार्गांत प्रकट झालें. अद्वैत आलें, द्वैत आलें, विशिष्टाद्वैत आलें, शुद्ध अद्वैत आलें, केवळ अद्वैत आलें, द्वैताद्वैत आलें, संकेत आला, पूजा आली, मूर्तिपूजा आली, नामस्मरण आलें आणि जपतप हि आलें. अशा तऱ्हेनें भक्तिमार्गांचे जितके म्हणून भाग होऊं शकतात ते सर्वच्या सर्व हिंदु धर्मांत विकास पावले आणि मानवतेंत थोडा सुद्धां फरक होऊं शकत नाहीं या मुख्य गोष्टीवर भागवतधर्माचें अधिष्ठान झालें व तो दृढ झाला. केवळ ध्यानमय जो धर्म होता तो कृष्णार्पणमय होऊन फलत्यागयुक्त सेवामय झाला. याकरितां च भगवान् श्रीकृष्णानें म्हटलें आहे कीं '**ध्यानात् कर्मफलत्यागः**' म्हणजे ध्यानापेक्षां सेवामय फलत्यागाची भक्ति श्रेष्ठ आहे. परंतु एक काळ असा होता कीं जेव्हां ध्यानधारणा च करावी लागत होती. त्याशिवाय धर्माचा आरंभ च होऊं शकत नव्हता. त्या ध्यानधारणेपासून च नामसंकीर्तनमूलक भक्तिमार्ग व फलत्यागयुक्त सेवामार्ग उत्पन्न झाले. म्हणून ज्या काळांत हीं मंदिरें बांधण्यांत आलीं त्या काळांत कांहीं विशिष्ट उपासकांना च येथें जाण्याला मिळत असावें हें शक्य आहे. धर्मदृष्टीनें हें च योग्य आहे असें ते समजत असतील.

## आपल्या पायांवर कुऱ्हाड

आम्हांला विचार करण्याची गोष्ट ही आहे कीं आज जेव्हां हिंदुस्थानचा भक्तिमार्ग इतका व्यापक झाला आहे, त्याचा इतका विकास झाला आहे कीं त्यांत सर्व धर्मसंप्रदायांचा समावेश झाला आहे, त्या परिस्थितींत आपल्याला आपापलीं उपासनास्थानें सर्वांकरितां खुलीं करण्यांत आलीं पाहिजेत कीं नाहीं ? माझ्या मतें हिंदु धर्म जर त्या वेळीं आपल्याला मर्यादित

ठेवण्याचा प्रयत्न करील, आपल्याला संकोचित करील, आपल्याला कांहीं लोकांपर्यंत मर्यादित करील तर तो स्वतः च आपल्यावर प्रहार करील व नष्ट होईल, नामशेष होईल. म्हणून वैदिक धर्माचें जें रूप वैदिक काळांत होतें त्याला छंदोबद्ध म्हणजे झांकलेलें म्हणत असत. आतां तसें व्हायला नको. आतां तें उघड झालें पाहिजे. प्राचीन काळीं जे गुप्त मंत्र होते त्यांऐवजीं कलियुगांत राम, कृष्ण, हरि हीं नांवें च उघड मंत्रांचे रूपांत आलीं आहेत. हा च उत्तम भक्तिमार्ग आहे असें भक्त म्हणतात. आतां ज्या सगुण मूर्तींसमोर राम, कृष्ण असे खुले मंत्र चालतात, त्यांचा उद्देश च जर आम्ही समजूं शकलों नाहीं तर आम्ही आपल्यावर च आघात करूं. म्हणून जगन्नाथ-मंदिराचे जे अधिकारी आहेत आणि मंदिराची जबाबदारी जे आपल्यावर आहे असें समजतात त्यांनीं हि ह्या गोष्टीचा विचार करावा अशी माझी त्यांना नम्र विनंति आहे. ते जर या दृष्टीनें विचार करतील तर त्यांचे लक्षांत येईल कीं आम्हीं काल त्या फ्रेंच बहिणीला सोडून मंदिरांत जाण्याचें कां नाकारलें आणि त्यांना हें हि कळून येईल कीं आम्हांला मंदिरप्रवेश करण्याला त्यांनीं जी मनाई केली तें धर्मदृष्टीनें योग्य नव्हतें. ते विचार करतील तर त्या मंदिराचें पावित्र्य जे भक्तिभावानें जाऊं इच्छितात त्यांना प्रवेश देण्यांत च आहे आणि तेव्हां च त्याचें पतितपावन नांव सार्थ होईल, हें त्यांना कळून येईल.

पुरी
२२-३-५५.

## समन्वयावर प्रहार होऊं देऊं नका : १८ :

आम्ही सर्वोदयाचे विचारक म्हणवितों आणि सर्वोदयाचे कामांत गुंतून त्याचे च चिंतनांत आमचा दररोजचा वेळ जात असतो हें आपणां सर्वांना माहींत आहे. आम्हांला असें विचारलें जाईल कीं आम्ही या प्रश्नाला इतकें महत्त्व कां बरें देतों. आणि त्या विषयावर तीन तीन व्याख्यानें कां देतों. याचें उत्तर हें आहे कीं हा विषय सर्वोदयाकरितां च नव्हे तर धर्म-विचाराकरितां अत्यंत महत्त्वाचा आहे. याचा निश्चित निर्णय जर आम्हीं मनानें केला नाहीं तर धर्म च नाहीं तर सर्वोदय हि नाहींसा होईल. समजा मी देशाभिमानाची गोष्ट करीत आहें तर तें देशप्रेम फार व्यापक आहे पण मानवतेच्या दृष्टीनें तें संकुचित च ठरतें. परंतु ज्याला आम्ही धर्मभावना म्हणतों ती मानवतेपेक्षां लहान नाहीं, मोठी आहे. धर्माचे नांवावर जर आम्ही मानवतेपेक्षां कमी दर्जाचे होऊं तर आम्ही धर्माला हि संकुचित करूं. धार्मिक पुरुषाचे धर्मभावनेंत फक्त मानवाविषयीं व्यापक प्रेम असतें एवढें च नव्हे तर प्राणिमात्रांवर प्रेम असतें. आपापले बुद्धीनें आणि मनानें संतोषाकरितां मनुष्य निरनिराळी उपासना करतो. अशा तऱ्हेनें उपासना निरनिराळी होते. त्या उपासनांच्या मुळाशीं जी भक्ति आहे ती सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे, मानवतेपेक्षां हि व्यापक आहे. लोक मला विचारतात कीं काय सर्वोदयसमाजांत मुसलमान राहणार नाहींत? हिंदु राहाणार नाहींत? ख्रिस्ती राहाणार नाहींत? तर मी सांगतों कीं हे सर्वच्या सर्व राहातील आणि ते सर्व सर्वोदयाचे अंश आहेत. याचा अर्थ हा नाहीं कीं हिंदु, मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्मांचे नांवावर ज्या चुकीच्या कल्पना चालू आहेत त्या हि यांत असूं शकतील. त्या तर राहाणार च नाहींत परंतु उपासनेच्या भिन्न भिन्न प्रणाली आहेत आणि जी व्यापक भावना आहे ती सर्वोदयाला अमान्य नाहीं. परंतु एका तऱ्हेनें उपासना करण्याच्या प्रकाराला दुसऱ्या कोणा उपासनास्थानांत, मंदिरांत उपासना करण्याकरितां मनाई करणें हें सर्वोदयांत चालणार नाहीं. वाटल्यास भिन्न

उपासना कोणी करूं इच्छील तर त्याला मनाई होतां कामा नये. मग तें हिंदूंचें मंदिर असो, मुसलमानांचें मंदिर असो, खिस्ताचें मंदिर असो किंवा आणखी कोणाचें मंदिर असो. जो उपासनेकरितां एका मंदिरांत जाऊं इच्छितो तो उपासनेकरितां दुसऱ्या कोणत्या हि मंदिरांत जाऊं नये असें म्हणता येत नाहीं. आवड असेल तेथें लोक जातील. अशा तऱ्हेनें भिन्न भिन्न उपासनामंदिरांत लोक जातील आणि सर्वोदयसमाजांत दाखल झाल्यावर अमक्या च मंदिरांत गेलें पाहिजे असें म्हणणें कोणाला हि उचित होणार नाहीं. एका मंदिरांत जाऊन प्रेमानें उपासना करणारा जर दुसऱ्या मंदिरांत हि जाऊं इच्छीत असेल, प्रेमानें त्या उपासनेंत भाग घेऊं इच्छील, प्रेमानें ती उपासना जाणूं पाहील, तर त्याला मनाई करणें अत्यंत चुकीचें आहे.

## उपासनेला बंधन नाहीं

रामकृष्णपरमहंसांचें नांव आपण ऐकलें असेल आणि आपल्याला माहीत आहे कीं मागल्या शंभर वर्षांत हिंदु धर्मांत जे मोठे सत्पुरुष होऊन गेले त्यांतल्या अग्रगण्य पुरुषांत त्यांची गणना आहे. त्यांनीं निरनिराळ्या धर्मांतील उपासनांचें अध्ययन केलें होतें आणि त्या उपासनेंतून त्यांना जो अनुभव मिळाला त्याचें ते चिंतन मनन करीत असत. मी स्वतःची च गोष्ट सांगतों. मीं जास्तींत जास्त अध्ययन जरी हिंदु धर्माचें केलें असलें तरी दुसऱ्या धर्मांचें हि प्रेमपूर्वक व सूक्ष्म दृष्टानें अध्ययन केलें आहे. त्यांच्यांतील वैशिष्ट्यें शोधून काढण्याचा मीं प्रयत्न केला आणि त्यांत जें सार असेल त्याचें मीं ग्रहण केलें आहे. हें जें रामकृष्णपरमहंसांनीं केलें आणि जी गोष्ट मी माझे जीवनांत करीत आहें ती जर आम्हां लोकांची चूक नाहीं, तर कोणत्या हि उपासनेचें अध्ययन, त्याचा अनुभव व फायदा घेण्याकरितां मनाई करणें चूक आहे हें समजायला हवें. प्रथम तुम्ही रामाची उपासना करणार कीं कृष्णाचें नांव घेणार, इस्लामचें नांव घेणार कीं खाइस्टचे पाठीमागें जाणार, हें निश्चित करा आणि मग दुसऱ्या कोणत्या मंदिरांत जाऊं नका असें आम्ही म्हणूं शकत नाहीं. असें म्हणणें म्हणजे मानवतेपेक्षां उपासनेला संकुचित करणें होय. उपासना

ही मानवतेपेक्षां लहान नाहीं. मानवतेच्या पोटांत ती मावूं शकत नाहीं. किंबहुना, मानवतेपेक्षां ती फार मोठी आहे, लहान नाहीं. या दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत पहिल्या प्रतीचा व महत्त्वाचा होतो. आणि या प्रश्नाचा लोकांनीं अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें विचार करावा अशी माझी इच्छा आहे.

आतां च ओरिसांत प्रवेश करतां च एका खिस्ती बंधूनें मला प्रेमपूर्वक 'न्यू टेस्टामेंट'ची देणगी दिली. 'न्यू टेस्टामेंट' मीं कितीतरी वेळां वाचलें आहे. परंतु त्यांनीं प्रेमानें दिलें म्हणून मीं पुन्हां एकदां वाचून टाकलें. वाचण्याचा अर्थ हा तर होत नाहीं कीं त्यांत जें चांगलें असेल तें ग्रहण न करणें किंवा त्या पद्धतींत जें सार आहे त्यापासून फायदा न घेणें. ज्या उपासनेंत आम्ही वाढलों त्याचा परिणाम आमच्यावर असतो आणि त्याला नष्ट करणें योग्य नाहीं. परंतु दुसऱ्या उपासनेचा फायदा न घेणें ही चूक आहे. उपासनेला संकुचित करितां कामा नये. त्यामुळें त्यांच्यांत कमीपणा येतो. आम्ही हरिजनांना मंदिरप्रवेश देण्याला कबूल आहोंत असें कांहीं लोक म्हणतात पण किरिस्तावांना, मुसलमानांना काय म्हणून येऊं देऊं असें ऐकतों पण उपासनेंत अशा तऱ्हेनें मर्यादा घालणें योग्य नाहीं हें समजायला पाहिजे. उपासना एकमेकांना पूरक होतात. जीवनांत एक च मनुष्य पित्याचे नात्यानें वागतो, भावाचे नात्यानें वागतो मुलगा या नात्यानें हि वागतो. त्या च प्रमाणें ज्यांना निरनिराळे अनुभव आहेत ते परमेश्वराला पिता समजून पित्याचे नात्यानें त्याची उपासना करूं शकतात, भावाचे नात्यानें करूं शकतात, मुलगा समजून हि उपासना करूं शकतात. परमेश्वराची उपासना पित्याचे रूपांत, आईचे रूपांत करूं शकतात.

"त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।"

त्याला तुम्ही पिता च म्हण, माता च म्हण किंवा मुलगा च म्हण असें म्हणूं शकत नाहीं. परमेश्वर एका च वेळीं तिन्ही कसा होऊं शकतो असें जर म्हटलें तर एक सामान्य मनुष्य सुद्धां बाप, मुलगा व भाऊ होऊं शकतो तर परमेश्वर त्याप्रमाणें कां नाहीं होऊं शकणार? ह्याप्रमाणें

परमेश्वराची अनेक प्रकारांनीं उपासना होऊं शकते. म्हणून समन्वयाची कल्पना सर्वोत्तम समजून सर्व धर्म मान्य करण्यांत येतात. ज्या वेळीं ह्या घटनेसंबंधीं वरील दृष्टीनें आपण विचार करूं तेव्हां अशा संकुचितपणामुळें समन्वयावर च आणि समन्वयावर प्रहार झाला कीं सर्व तऱ्हेच्या उपासनांवर प्रहार होणार हें आपल्याला समजून येईल.

पुरी
२३-३-५५

## अहिंसेचे राज्याची स्थापना कशी होईल ? : १९ :

पक्षी आपल्या उपजीविकेच्या शोधार्थ आकाशांत इतस्ततः फिरतात, धांवतात, उडतात आणि शेवटीं थकूनभागून विश्रांतीकरितां घरट्यांत परत येतात हें आपण दररोज पाहतों. वेदांत म्हटलें आहे कीं ह्याप्रमाणें च सर्व जीवमात्र संसाराचीं विविध कामें करून, अनेक प्रयोग करून, कर्मफलाचा उपभोग घेऊन थकतात व मग शांतीकरितां नवीन उत्साह मिळावा म्हणून आणि आत्मपरीक्षणाला वाव मिळावा म्हणून एका स्थानावर येतात. '**यत्र विश्वं भवति एक-नीडम्**' असें एक स्थान असतें.

महात्मा गांधींचे प्रयाणानंतर अहिंसेचा विचार ज्यांना मान्य आहे त्यांना त्या आकाशांत संचार करणाऱ्या पक्ष्यांना सर्वोदयसमाज एक विश्रांतिस्थान झालें आहे. असें स्थान जर नसतें—वर्षांत एक वेळ आम्हांला एकत्र होण्याची योजना जर नसती—तर आकाशांत आम्ही अवश्य संचार करीत राहतों. परंतु जाणतां अजाणतां आमच्या शक्तींची एकमेकांशीं टक्कर झाली असती आणि अहिंसेचा जप चालू असतांना हि आम्ही हिंसेच्या मार्गावर खेचले जाण्याचा संभव होता. तेव्हां आम्हांला एक घरटें मिळालें हें आमचें सद्भाग्य आहे. आम्ही वर्षांतून एकदां एके ठिकाणीं जमतों आणि कांहीं विचारविनिमय करतों. मोकळेपणीं चिंतन,

एक दुसऱ्याशीं सल्लामसलत आणि शंकररावजी म्हणतात त्याप्रमाणें सत्संग करीत असतों. अशा स्थानावर जें कांहीं बोलावयाचें असतें, जी कांहीं चर्चा होत असते, तें सर्व मोकळे मनानें व्हावयाचें असतें. त्यांत कांहीं छपवाछपवी असावयाला नको. त्यांत आवेश दाखविण्याची हि आवश्यकता नाहीं.

तरी सुद्धां परस्परविरोधी हि ज्या विचारप्रणाली असतील त्या सर्व आम्ही तेथें विचाराकरितां ठेवूं शकतों. ज्याप्रमाणें एक नदी पूर्वेला वाहते व दुसरी पश्चिमेला अशा परस्परविरुद्ध दिशेला वाहून सुद्धां शेवटीं समुद्रांत मिळून एकरूप होतात त्या च प्रमाणें निरनिराळ्या विचारप्रणाली आणि कधीं कधीं परस्परविरोधी विचारप्रणाली ज्या परस्परविरुद्ध दिशेनें जात असल्या तरी त्या सर्व चर्चेंत समाविष्ट होऊन मिळून गेल्या पाहिजेत. म्हणून आतां जो विचार मी आपणांसमोर ठेवणार त्यासंबंधीं माझी स्वतःची किती हि निष्ठा असली तरी मी त्याबद्दल आग्रह धरणार नाहीं. विचाराकरितां, विवेकपूर्ण चर्चा करण्याकरितां, ज्या गोष्टी मला सुचतात, ज्यांचा मला भास होतो, त्या मी आपणांसमोर ठेवणार आहें. इतकें कार्य तरी सर्वोदयसमाजांत झालें च पाहिजे. आणि त्याशिवाय ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी आम्ही करीत आहोंत त्या बाबतींत हि कांहीं विचार मी बोलेन.

### साम्यवादी लोकांचा विचार

आमच्यापैकीं बरेचसे लोक मान्य करितात कीं समाजाचा विकास होतांना अशी एक स्थिति यावयाला पाहिजे कीं ज्या वेळीं शिक्षेच्या आधारावर अवलंबून असणाऱ्या शासनाची आवश्यकता राहणार नाहीं. हें अंतिम ध्येय साम्यवादी सुद्धां कबूल करतात. इतकें च नव्हे तर त्यांचा असा विश्वास आहे कीं त्या ध्येयप्राप्तीकरितां आतां अधिकांत अधिक मजबूत मध्यवर्ति सत्ता असली पाहिजे आणि त्याचे बळावर आम्ही दुसऱ्या अन्यायी सत्ता मोडून टाकूं शकूं. त्यानंतर लाकूड जळून नाहींसें झाल्यावर प्रज्वलित अग्नि स्वतः च नष्ट होतो त्याप्रमाणें लोकांतर्फे प्रकट झालेली केन्द्रित सत्ता इतर त्या च प्रकारच्या सत्तेला हिंसेनें अर्थात् आवश्यक असेल तर नष्ट करील आणि नंतर स्वतः च शांत होईल. ती

शांत करण्याकरितां कांहीं च करावें लागणार नाहीं. फक्त त्याचे विरुद्ध जितक्या म्हणून शक्ति आहेत त्यांचा नायनाट करावा लागेल. जेव्हां हें कार्य संपूर्ण होईल तेव्हां कांहीं करावयाचें राहाणार नाहीं. आणि म्हणून ती शक्ति स्वतः च शांत होईल. थोडक्यांत, हा एक विचार मीं मांडला आहे. त्याचा त्या लोकांनीं पुष्कळ विस्तार केला आहे. त्याचें एक निराळें उत्तम शास्त्र बनविलें आहे. त्याचें हि चिंतन व मनन आम्हांला केलें पाहिजे.

## अहिंसक रचनेला काँग्रेस अडथळा आणते काय ?

याशिवाय आणखी कांहीं लोक आहेत त्यांना असें वाटतें कीं शासन हें कोणत्या हि परिस्थितींत कांहीं ना कांहीं असलें पाहिजे. शासन म्हणजे शिक्षा अवश्य असलेलें शासन. समाजांत सत्त्वगुण, रजोगुण, तमोगुण जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत शिक्षेची पद्धत चालू रहाणें आवश्यक. अशी परिस्थिति होऊं च शकत नाहीं कीं जेव्हां रजोगुण व तमोगुण नाहींसे होतील. म्हणून प्रत्येक अवस्थेंत शिक्षेची आवश्यकता राहील च. मग ती कमी किंवा जास्त. शिक्षेचें मान थोडें सौम्य असेल ही दुसरी गोष्ट आहे. परंतु शिक्षेची आवश्यकता राहील च असें समजणारे कांहीं लोक आहेत. अशा तऱ्हेनें निरनिराळे विचार त्या अंतिम ध्येयासंबंधीं होऊं शकतात. परंतु सर्व च लोक जाणतात व समजतात कीं परिस्थितींत शिक्षेचा वापर करणाऱ्या सत्ता आहेत आणि त्या राहणार च. हिंसक समाजव्यवस्थेंत तर आज आणि पुढें सुद्धां दंडशक्ति चालू राहील. तिला आधार हि राहील. परंतु अहिंसक समाजांत आजच्याप्रमाणें दंडशक्ति राहील असें आम्हांला कबूल करावें लागतें. परिस्थिति पाहतां दंडशक्तीला एक स्थान आहे हें मानणें भाग आहे. तरी पण अहिंसक समाजाचें हें लक्षण राहील. त्यांत दंड व सत्तेला स्थान राहील. त्यांना अवसर मिळेल परंतु तें स्थान अत्यंत गौण राहील. सर्वांत मुख्य स्थान सेवेला मिळेल. सर्वांत मोठी संस्था सेवासंस्था राहील. ह्या दृष्टीनें जेव्हां जेव्हां मी माझे मनांत विचार करतों तेव्हां मला वाटतें कीं देशाची अहिंसक रचना करण्यांत सर्वांत अधिक अडथळा आणणारी संस्था आजची काँग्रेस तर होणार नाहीं ? ही संस्था देशांतली सर्वांत मोठी संस्था आहे आणि आजच्या परिस्थितींत ती निवडणूकप्रधान आहे, म्हणजे

तिचें मुख्य लक्ष निवडणुकीकडे आहे. निवडणुकीमार्फत सत्ता व सत्तेमार्फत सेवा अशी तिची व्यवस्था आहे.

तेव्हां ज्या देशाची सर्वांत मोठी संस्था निवडणूक-प्रधान असेल त्या देशांत अहिंसेच्या प्रगतीला ती संस्था एक मोठी धोंड आहे असा भास होतो. चर्चा करण्याकरितां, विचाराकरितां मी ह्या गोष्टी सांगत आहें. मनानें सुद्धां मीं कांहीं निर्णय याबाबत घेतला नाहीं. आपण यावर विचार करा. जे आमचे राष्ट्रपिता होते त्यांनीं त्याचा उपाय हि सांगितला आहे. ते द्रष्टे च नव्हे तर उपद्रष्टे सुद्धां होते. दूर व नजीक अशा दोन्ही प्रकारची त्यांची दृष्टि होती. त्यांचा असा विचार होता कीं आमची सर्वांत मोठ्या समूहाची संस्था म्हणजे कॉंग्रेस. तिनें या देशाचे डोक्यावर जें मोठें ओझें होतें आणि ज्यानें साऱ्या देशाला दाबून टाकलें होतें, त्याला उचलून फेकलें. ती कार्य पूर्ण झाल्यावर 'लोक सेवक संघ' होईल. मला वाटतें कीं ते चतुर बुद्धीचे होते. ती जर गोष्ट घडली असती तर देशांतील सर्वांत मोठी संस्था 'सेवक संस्था' झाली असती. आतां तशी परिस्थिति नसल्या-मुळें असें वाटतें कीं सेवा करण्याकरितां एक 'भारत सेवक समाज' निर्माण करण्यांत यावा. भारत सेवक समाज सेवा करील पण ज्या परिस्थितींत सर्वांत मोठी शक्ति सत्ताभिमुख आहे, निवडणूक-प्रधान आहे त्या परिस्थितींत भारत सेवक समाजाला फार मोठा आधार मिळूं शकत नाहीं, तो गौण च राहील. सेवा करणाऱ्या गौण संस्था हिंसक समाजांत सुद्धां राहूं शकतात. कारण समाज हिंसक असो किंवा अहिंसक असो, जेव्हां तो समाज म्हणविला जातो तेव्हां सेवेची आवश्यकता प्रत्यक्ष असते च. म्हणून च त्या समाजांत सुद्धां सेवा करणें चालूं असतें च. सेवा करणाऱ्या संस्था असतात परंतु अहिंसक समाजांत जी सेवामय आहे ती च सर्वांत मोठी संस्था असावयास पाहिजे. सेवाप्रधान म्हणून माझें समाधान होत नाहीं. म्हणून मी 'सेवामय' म्हटलें.

### लोक-सेवक-संघ

लोक-सेवक-संघाची जी कल्पना होती त्यांत सत्तेवर सत्ता चालविण्याची गोष्ट होती. एक सत्ता म्हणजे आजच्या आवश्यकतेप्रमाणें राज्य-शासन

करणारी. तिच्या हातांत दंड राहील आणि बाकीचा सर्व समाज दंडरहित होईल. परंतु ज्या अर्थीं ती संस्था दंडसत्ता हातीं ठेवणारी असल्यामुळें तिच्यावर तिच्यापासून अलिप्त असणाऱ्या समाजाची सत्ता राहिली असती. म्हणजे सेवा सार्वभौम व सत्ता सेविका झाली असती. सत्तेचें नियंत्रण करण्याचें सामर्थ्य त्या समाजांत राहिले असतें. लोक त्या समाजाचा आशीर्वाद मिळवून निवडणुकींत उभे राहिले असते आणि समाजसेवेच्या दृष्टीनें सज्जनांची निवड झाली असती. अशा रीतीनें सर्व गोष्ट झाली असती. परंतु बऱ्याच करणांमुळें ही गोष्ट घडली नाहीं. आणि कॉंग्रेस मुख्यतः 'इलेक्शनियरिंग बॉडी' (निवडणूक करणारी संस्था) झाली. याचा परिणाम असा झाला कीं ज्याप्रमाणें मी गमतींत म्हटलें कीं समाजाचें भूत, भविष्य व वर्तमान या तीन हि अवस्था म्हणजे प्री-इलेक्शन पीरीयड, इलेक्शन पिरीयड आणि पोस्ट इलेक्शन पिरीयड झाल्या आहेत. याचा अर्थ हा च कीं सर्व कालात्मा या तीन च काळांत संपूर्ण झाला.

असें कां करण्यांत आलें त्याची चर्चा मी करूं इच्छित नाहीं. पुढाऱ्यांनीं ज्या तऱ्हेनें विचार केला त्याला कांहीं च आधार नव्हता असें हि मी म्हणत नाहीं. आम्हांला वाटलें कीं जी बलवान् संस्था आहे ती जर निवडणूकींत भाग घेईल तर कदाचित् नवीन राज्याची सुरक्षितता अधिक होईल. कारण निरनिराळ्या पक्षांचें एक राज्य समाप्त झाल्यानंतर लवकर च त्या राज्यावर कबजा करण्याकरितां दुसरे टपलेले असूं शकतात. इतिहासावरून असें दिसतें कीं असें कधीं कधीं होतें. त्याचा प्रतिकार करण्याकरितां म्हणून त्यावेळीं तसें करण्यांत आलें असेल. त्याला कांहीं पाठींबा हि देतां येईल. पण जास्त खोलांत मी जाऊं इच्छित नाहीं. परंतु ही एक घटना अशी आहे कीं ज्यामुळें आमचे देशांत अहिंसेच्या मार्गानें शेंकडों अडचणी उभ्या राहिल्या हें आम्ही समजायला पाहिजे.

## नवीन सेवासंस्थेची जबाबदारी

म्हणून आमचेवर एक नवीन संस्था बनविण्याची विनाकारण जबाबदारी आली आहे. गांधीजींनंतर ती यावयाला नको होती. ह्या देशांत आम्ही

अशी एक संस्था बनवायची कीं जी सेवामय आणि सर्वांत मोठी असावी. अत्यंत कठीण समस्या आहे. जी संस्था ५०-६० वर्षे काम करीत आहे, जिच्याशीं आम्हीं सर्वांनी भक्तिपूर्वक सहकार्य केलें, जिनें इतिहासांत नमूद करण्यासारखें एक मोठें कार्य केलें तिला यःकश्चित् समजून कोणी पुढें जाईल हें अशक्य आहे. तरी हि ही जबाबदारी विनाकारण लहान लहान सेवकांवर टाकण्यांत आली आहे. ज्यांचे खांदे इतके बलवान् नाहींत आणि ज्यांची बुद्धी हि बहुधा तीक्ष्ण नाहीं, आणि जे एक महान् नेता गमावून थोडे चलबिल हि झाले आहेत, अशांच्यावर विनाकरण जबाबदारी टाकण्यांत आली कीं तुम्ही एक स्वतंत्र अशी संस्था बनवा. सेवेकरितां लहान लहान संस्था तर आम्ही बनवितों च. तें कार्य आमच्या योग्य आहे. आम्ही लहान आहोंत तेव्हां लहान लहान संस्था आम्ही सहज निर्माण करूं शकतों. मग त्याचे विरुद्ध कांग्रेस किंवा महा कांग्रेस कां न उभ्या राहोंत. इंग्रज सरकार असतांना सुद्धां आम्ही सेवेच्या लहान लहान संस्था बनविल्या तर हें सरकार तर कोणत्या हि स्थितींत आम्हांला पोषक च राहील. मदत देणारें होईल. कांग्रेससुद्धां प्रत्येक परिस्थितींत आमच्या सेवेचा गौरव करील. यास्तव लहान लहान संस्था बनविणें आम्हांला कठिण नव्हतें. परंतु आमच्यावर ही जबाबदारी टाकण्यांत आली कीं आम्ही सेवेच्या संस्था न बनवतां अशा संस्था बनवाव्या कीं ज्या सेवा हि करतील आणि सेवेमार्फत राज्यकारभारावर सत्ता चालविण्याचें सामर्थ्य हि प्राप्त करतील. खरोखरी च मोठी कठीण जबाबदारी आमच्यावर टाकण्यांत आली. परमेश्वर सहाय्य करील तर त्यापेक्षां लहान व क्षुल्लक अशा साधनद्वारां हें कार्य सफल करील. ही त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. पण ती दुष्कर आहे.

### खरें सामर्थ्य कशांत ?

ह्या परिस्थितींत आमचे जे मित्र जिकडे तिकडे निरनिराळ्या राजकीय संस्थांत आहेत त्यांच्यावर ही जबाबदारी आहे कीं त्यांनीं कृपा करून आम्हांला थोडी मदत द्यावी. ते ज्या संस्थेंत आहेत त्यांत च सेवा कोणत्या योगानें श्रेष्ठ होऊं शकेल या बाबतींत त्यांनीं प्रयत्न करावा. मग ते प्रजासमाजवादी पक्षांत असोत किंवा कॉंग्रेसमध्यें आणि इतर कोणत्या हि

राजकीय संस्थेंत असोत. त्यांनीं त्या त्या संस्थेंत राहून निवडणुकीचे जाळ्यापासून अलग राहणारी एक संस्था निर्माण करण्याचा पुरा प्रयत्न करावा. एका संस्थेंत च निरनिराळे ग्रुप तयार होणें म्हणजे राजकीय दृष्टीनें ही एक मोठी धोक्याची गोष्ट मानली गेली आहे. राजकीय क्षेत्रांत काम करणाऱ्यांना आपापल्या संस्थेंत दुसरा, तिसरा ग्रुप बनवावा असें मी सुचवीत नाहीं. अशा तऱ्हेची कोणती गोष्ट करण्यास मी सांगत नाहीं. या संस्थेची शक्ति ज्याला शक्ति असें समजण्यांत येतें ती कमी व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. जेव्हां त्यांच्या अनुभवाला येईल कीं ज्याला ते शक्ति समजत होते ती शक्ति नाहीं, तेव्हां ते स्वतः च तिला सोडून देतील. त्या च वेळीं त्यांना खरी शक्ति प्राप्त होईल. परंतु त्या शक्तीचे बाबतींत जोंपर्यंत त्यांचा विश्वास आहे तोंपर्यंत ती कमी व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. म्हणून मी हें सुचवीत आहें कीं निरनिराळ्या संस्थेंतील आमचे बंधु, ज्याला ते अहिंसात्मक रचनात्मक कार्य समजतात त्याला त्यांनीं त्या त्या संस्थेंत महत्त्व द्यावें आणि इतर गोष्टी गौण समजाव्यात असा प्रयत्न करतील.

निवडणुकीला किती हि महत्त्व दिलें जावो शेवटीं ती अशी कांहीं गोष्ट नाहीं कीं ज्यामुळें समाजाचे उन्नतीकरितां आम्ही कांहीं मदत करूं शकूं. तें 'डेमॉक्रसी' मध्यें उभें केलेलें एक यंत्र आहे. एक 'फॉर्मल डेमॉक्रसी' (औपचारिक लोकसत्ता) आली आहे. राज्यकारभारांत प्रत्येक मनुष्याचा भाग असला पाहिजे ही तिची मागणी आहे. म्हणून प्रत्येकाला मत विचारलें पाहिजे व त्यांची मोजणी करायला पाहिजे. प्रत्येक जण हें जाणतो कीं ज्याचे आधारावर एका मनुष्याला जसें एक मत राहील तसें च दुसऱ्या हि मनुष्याला राहील आणि म्हणून आम्हीं त्याचें समर्थन करावें अशी कांहीं समानता परमेश्वरानें निर्माण केली नाहीं. परंतु हें स्पष्ट आहे कीं पंडित नेहरूंना जर एक मत आहे तर त्यांचे चपराशाला हि एक मत आहे. ह्यांत काय बुद्धि आहे हें समजत नाहीं. मला असा मनुष्य माहीत नाहीं कीं जो मला हें समजावूं शकेल. परंतु मी जेव्हां त्याचें मनांत समर्थन करतों तेव्हां मला मोठा च आनंद होतो. तें समर्थन हें आहे कीं त्यांत माझे वेदान्ताचा प्रचार होत आहे. यांत आत्म्याची समानता मानली गेली

आहे. बुद्धि निरनिराळी आहे. कमीअधिक प्रमाणांत आहे. शरीरशक्ति कमीअधिक आहे. आणि शक्ति प्रत्येकाच्या अलग अलग असतात. तरी हि आम्ही प्रत्येकाला एक एक च मत देतों. याचें ह्या च विचारानें समर्थन होईल कीं याला मानणारे लोक वेदान्ताला मानतात. ही फार च चांगली गोष्ट आहे. या च आधारावर मी हि त्याचें समर्थन करतों. मला फार च छान वाटतें कीं मला एक लांकडाचा ठोकळा मिळाला, त्याचा मोठा आधार मिळाला, ज्यावर आम्ही साम्यवादी समाजाची स्थापना करूं शकूं.

## मूल्यपरिवर्तन प्रमुख आणि निवडणूक गौण

परंतु विचार करा कीं व्यावहारिक दृष्ट्या मतमोजणी करून आम्ही एक राज्य चालवितों तेव्हां त्याचें विशेष महत्त्व नाहीं. समाजाचें परिवर्तन होईल असें त्यांत कांहीं नाहीं. म्हणून त्याला महत्त्व नाहीं. समाजांत आज लोक काय इच्छितात हें समजून घेतल्यानंतर च परिवर्तन कोणत्या दिशेनें होईल याचा विचार करावयाला कदाचित् मदत मिळूं शकेल. पण एवढ्यानें च समाजाचें परिवर्तन करण्याचे क्रियेंत कांहीं मदत पोंचूं शकेल अशी गोष्ट नाहीं. म्हणून व्यवहारांत निवडणुकीला किती हि महत्त्व असलें तरी जेथें मूल्य-परिवर्तनाचा प्रश्न आहे, आणि मूल्यपरिवर्तनाशिवाय समाज पुढें जाऊं शकत नाहीं, तेथें ती गौण ठरते. इतकें समजून घेतल्यावर आमचे जे लोक तेथें आहेत त्यांनीं हें च करावें कीं तेथें बसून रचनात्मक कार्यावर पुष्कळ जोर द्यावा. किंवा त्यांना असें वाटत असेल कीं ‘ नाहीं, तेथें अशा तऱ्हेचें वातावरण आहे कीं ज्यामुळें त्यांचे सर्व प्रयत्न शून्य वा विफल होतात ’ तर त्यांनीं तेथून निघून बाहेर यावें. असें जर त्यांनीं केलें तर आमच्या-सारख्या कमी शक्तीचे लोकांना, ज्यांना मोठी जबाबदारी उचलावी लागली आहे, कांहीं मदत मिळेल.

## अहिंसेची धोक्याची व्याख्या

दुसरी विचार करण्याची गोष्ट ही आहे कीं गांधीजी प्रत्येक बाबतींत अहिंसेचें च नांव घेत तेव्हां आम्हां सर्व लोकांना अहिंसेचें बाळकडू च आहे. परंतु आमच्यापैकीं कांहीं सरकारांत गेले आहेत, कांहीं बाहेर आहेत.

म्हणून अलीकडे अहिंसेचा सरकारी अर्थ हा झाला कीं समाजाला कमींत कमी दुःख देणें, समाजांत दुःख निर्माण न होणें. हल्लीं आमची जी व्यवस्था आहे तींत पुष्कळ अडचणी न येणें याचें नांव आहे अहिंसा ! आज जेव्हां असें म्हटलें जातें कीं समाजाचें 'सोशॅलिस्टीक पॅटर्न' (समाजवादी रचना) करावयाची आहे तेव्हां त्याबरोबर च असें हि म्हटलें जातें कीं 'आमचा प्रगति करण्याचा प्रकार अहिंसेचा राहील.' जेव्हां हे दोन्ही हि शब्द एकदम ऐकतों तेव्हां माझे मनांत सत्याग्रहाशिवाय, सर्वोदयाशिवाय, दुसरा कोणता च अर्थ येत नाहीं. परंतु कांहीं लोक त्याचा इतका च अर्थ समजतात कीं आम्हांला समाजवादी रचनेकरितां जें परिवर्तन करावयाचें आहे तें अत्यंत हळूहळू करावें लागेल. हाताला एखादी जखम किंवा फोड असला म्हणजे त्रास होणार नाहीं अशा तऱ्हेनें त्या हाताचा जसा उपयोग केला जातो तसें च अत्यंत नाजुक तऱ्हेनें समाजरचनेंत दुःख न होईल, पुष्कळ एकदम फरक न होईल अशा रीतीनें काम करण्याला अलीकडे अहिंसा समजली जाते, म्हणजे ती एक निरुपद्रवी वस्तु होते. '**न जात हार्दैन न विद्विषारदाः**' अशी स्थिति ज्यांत आहे त्यांत आम्ही पुष्कळ पुढें जात नाहीं आणि आजची स्थिति जवळ जवळ आहे तशी च राहते. त्याबरोबर च समाधान हि होतें. कारण आम्हीं एक आदर्श समोर ठेवला आणि त्याचा कांहींना कांहीं जप हि करतों. कांहीं बोलतों सुद्धां ! म्हणून जें कांहीं केलें जाईल त्यांत थोडी छटा येईल च आणि हळूहळू ती गोष्ट बनेल. मला वाटतें कीं अहिंसेची ही व्याख्या अहिंसेला मोठी धोकादायक आणि हिंसेला उपयोगी आहे. भगवान् बुद्धांनीं ही गोष्ट स्पष्ट सांगितली. त्यांनीं म्हटलें—"**मंदं पुण्यं कुर्वतः पापे हि रमते मनः ।**" आम्हीं जर पुण्याचरण आळशी होऊन थोडथोडें केलें तर पाप शीघ्रगतीनें वाढत जातें.

## अहिंसेला अत्यंत वेगाची आवश्यकता

अहिंसेचा अर्थ जर 'कमींत कमी वेगानें समाजाला पुष्कळ दुःख दिल्याशिवाय पुढें जाणें' असा केला तर तो अहिंसेच्या हिताचा नाहीं. उलट हिंसेचे हिताचा आहे. त्यानें हिंसा अत्यंत वेगानें वाढेल. जेव्हां आपण दारूबंदीला म्हणाल 'गो स्लो' तेव्हां दारू पिणें जोरांत वाढेल. दुष्टता

वाढत जाते. म्हणून कृपा करून अहिंसेकरितां ‘ गो स्लो ’ लागू करू नका. त्याला हिंसेकरितां उपयोगांत आणा. त्या ठिकाणीं ‘ गो स्लो ’ फार च उत्तम आहे. पण अहिंसेकरितां अत्यंत वेग असला पाहिजे. शास्त्रवचन आहे ‘ **तीव्रसंवेगानाम् आसन्नः ।** ’ आपण जर चांगली गोष्ट लौकरांत लौकर, जवळांत जवळ आणूं इच्छीत असाल तर त्यांत फार च वेग असला पाहिजे. अहिंसेचा अर्थ जर इतका मृदु, नरम, निर्वीर्य केला गेला तर त्याचे विरुद्धच्या शक्ति, हिंसक शक्ति आमची इच्छा नसतां वाढत जातील. याचें ज्ञान गांधीजींच्या सर्व अनुयायांना होवो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

## राजाजींचा सूचना

राजाजींनीं दोन तीन वेळां एक महत्त्वाचा विचार साऱ्या दुनियेसमोर ठेविला. ती गोष्ट ते च करण्याला समर्थ आहेत. कारण ते तत्त्वज्ञानी आहेत आणि शिवाय राजकारणपटू हि आहेत. ज्याच्यांत राजकारणपटुत्व आणि तत्त्वज्ञान या दोहोंचा संयोग होतो आणि शिवाय ज्याला शब्दशक्तीचें हि ज्ञान आहे–शब्दांचा प्रयोग कोणत्या तऱ्हेनें केला पाहिजे यांत जो प्रवीण आहे–अशा तीन प्रकारच्या शक्ति ज्याच्यांत एकत्र होतात तो च मनुष्य असें म्हणण्याला अधिकारी आहे. त्यांनीं म्हटलें कीं ‘ युनिलिटरल ऍक्शन ’ म्हणजे एकतर्फी सज्जनता प्रकट झाली पाहिजे. समोरच्या मनुष्याला जर ही अट सांगितली कीं तूं जर इतका सज्जन झालास तर मी इतका सज्जन होईन असें म्हणून सज्जन बनूं शकत नाहीं. अशा तऱ्हेनें सज्जनता वाढूं शकत नाहीं. सज्जनता तर स्वतः च वाढत असते, स्वतः च विचार करून. म्हणून त्यांनीं अमेरिकेला हा मार्ग सुचविला.

आतां अमेरिका मोठ्या अडचणींत आली आहे. अमेरिकेची सर्व जनता विद्वान आहे कारण कीं हिंदुस्थानांत जितका कागद खपतो त्याचे १६० पट कागद तेथें प्रत्येक व्यक्तीकरतां खपतो. तर जेथली सर्व जनता विद्वान आहे तेथल्या विद्वानांनीं मिलिटरी कार्यांत प्रवीण अशा एका मनुष्याचे हातांत सर्व सत्ता सोंपवून दिली आणि सांगितलें कीं फॉर्मोसाचे बाबतींत सर्व कांहीं करण्याचा पूर्ण अधिकार आम्हीं तुमच्या हातीं सोंपवून दिला आहे.

तुम्हांला सर्वाधिकारी केलें आहे. आवश्यकता असेल तर आपले हातांत जीं ब्रह्मास्त्रें व पाशुपतास्त्रें आहेत त्यांचा हि उपयोग करूं शकतां. अशा प्रकारचा साऱ्या विद्वानांचा ज्यावर इतका विश्वास आहे तो मनुष्य जर राजाजींची गोष्ट मानेल तर लोक म्हणतील कीं, 'मग आम्ही निवडणुकींत राजाजींना च कां निवडून देऊं नये ?' बिचाऱ्या लोकांची मोठी कठीण स्थिति आहे. ते काय करतील ! ज्याला ज्या बुद्धीचा परिचय आहे आणि ज्या बुद्धीला जाणून च ज्याला निवडून देण्यांत आलें त्यानें ती च बुद्धि चालवावी. असा त्याला साऱ्या जनतेनें मँडेट दिला आहे. जर ती बुद्धि खिशांत ठेवून राजाजींची बुद्धि तो कबूल करील तर त्या प्रजेचा किती विश्वासघात होईल ! ती म्हणेल कीं, "काय, तुला हें समजून निवडून देण्यांत आलें कीं तूं आपली सर्व अक्कल राजाजींचे स्वाधीन करावी ! तूं गेल्या युद्धांत बहादूर म्हणून सिद्ध झालास आणि आम्हांला वांचविलेंस म्हणून च तुला आम्हीं निवडून दिलें. तुला आमचा मदतगार समजून आम्हीं सर्व शासनशक्ति तुझे स्वाधीन केली आणि भल्या माणसा, तूं अशा तत्त्वज्ञाच्या गोष्टी ऐकतोस ?"

## सैन्य कमी करण्याची शक्ति देशाला कशी येईल ?

परंतु आम्ही आपले मनांत विचार करतों कीं आम्ही दुसऱ्या देशांना अशा प्रकारचा उपदेश करायला लायक आहोंत काय ? मीं आतां च म्हटलें कीं राजाजींत तीन प्रकारच्या शक्ति एकत्रित असल्यामुळें अशा प्रकारचे उद्गार प्रकट करण्यास ते सर्व प्रकारें अधिकारी आहेत. साऱ्या दुनियेला ते बुद्धि देऊं शकतात. पण दुनिया मानत नाहीं हें दुनियेचें च दुर्दैव आहे. परंतु ते ज्या देशाचे म्हणवितात तेथें तरी त्यांना इतका पाठिंबा आहे काय ? पाकिस्तानची कोणती हि परिस्थिति असो पण आमच्या देशाची ही भूमिका आहे काय कीं तो आमचा वैरी नाहीं ? पाकिस्तान आपलें सैन्य वाढवीत आहे. त्याऐवजीं आमचे लोकांना असें वाटतें काय कीं आम्हीं आमचें सैन्य कमी करावें ? तेथें फार च अंधार वाढत आहे. एका साध्या लालटेननें काम भागणार नाहीं. म्हणून आम्ही त्याकरितां आपलें सैन्य मोडून जरा जोरदार अहिंसा स्थापन करण्याची आवश्यकता नाहीं काय ?

पाकिस्ताननें अमेरिकेपासून मदत मागितली त्यावरून मला हे विचार सुचले. कारण आमचा शेजारी इतका भयभीत झाला आहे तर त्या परिस्थितींत आम्हीं साऱ्या दुनियेला आणि विशेषतः आमच्या शेजाऱ्याला निर्भय करावयाला पाहिजे. तर चला, मी असा ठराव करतों कीं आजपर्यंत सैन्यावर ६० कोट रुपये खर्च होत असत. परंतु पुढचे वर्षाकरितां त्यासाठीं १० कोट रुपये खर्च करूं आणि ५० कोट रुपये त्या खर्चांतून कमी करूं. हें करण्याची आमची ताकद आहे काय? स्पष्ट आहे कीं नाहीं. शेवटीं ही शक्ति केव्हां येईल? ती यावयाला पाहिजे कीं नाहीं? आली जर पाहिजे तर ती लवकर यावयाला पाहिजे. या कामांत उशीर व्हायला नको. आमच्या देशाला लवकर अहिंसेचा पुढारी व्हावें लागेल. म्हणून जे लोक जी सावकाश चालते ती अहिंसा अशी तिची व्याख्या करतात तो अहिंसेला मोठा धोका आहे. ती 'स्टेटस् को 'ला उचलून धरणारी होते. थोडथोडी प्रगति तर होत च राहील. तुम्ही करा किंवा नका करूं, विज्ञानयुग आहे येथें ढकलून च प्रगति होते. आणि तें च आम्हांला प्रगतिपथावर ढकलतें. म्हणून अहिंसेची व्याख्या आज धोक्याची झाली आहे हा आमचे देशानें विचार करण्याचा विषय आहे.

### लोकतंत्र आणि सत्याग्रह

तिसरी गोष्ट ही आहे कीं या देशांत 'सत्याग्रह' शब्दाची पुष्कळांना भीति वाटते. आम्हांला हा काळजीचा विषय वाटतो. कारण आम्ही हा नवीन मंत्र शिकलों आणि आम्ही हा दुनियेला तारक मंत्र मानतों. आम्ही तर असें हि म्हणतों कीं मानवाच्या इतिहासांत आजपर्यंत जो अनुभव आला त्याचें फळ म्हणून हा सामूहिक सत्याग्रहाचा एक मंत्र मिळाला. आतां ह्यानें अहिंसा बळकट होईल. परंतु अलीकडे तर सत्याग्रह शब्दाची भीति वाटायला लागली आहे. लोक तर असें हि म्हणतात कीं 'डेमॉक्रसी'त सत्याग्रहाला स्थान नाहीं. लोकसत्तेंत सत्याग्रहाला स्थान नाहीं. वास्तविकपणें जेथें प्रत्येक निर्णय 'युनॅनिमस' म्हणजे एकमतानें होतात तेथें सत्याग्रहाला स्थान नाहीं. सर्वांच्या संमतीनें निर्णय होतील अशी जेथें समाजव्यवस्था

असेल तेथें स्वतंत्र सामूहिक सत्याग्रहाची आवश्यकता नाहीं. त्या समाजांत मुलाचे विरुद्ध आईचा सत्याग्रह आणि आईचे विरुद्ध मुलाचा सत्याग्रह असूं शकतो. एका शेजाऱ्याविरुद्ध दुसऱ्या शेजाऱ्याचा सत्याग्रह होऊं शकेल. येथें विरुद्धचा अर्थ हिंसेचे अर्थाप्रमाणें 'विरुद्ध' नाहीं; तर तो त्याचा मदतगार होईल. त्याचे शुद्धीकरितां प्रेमानें व त्यागपूर्वक जें केलें जाईल त्या च अर्थाचें प्रकटीकरण करण्याकारितां आतां सुद्धां विरुद्ध शब्दाचा प्रयोग केला जातो. सारांश, शेजाऱ्यावर विशेष प्रकारचें प्रेम प्रकट करण्याकारितां व्यक्तिगत सत्याग्रह शेजाऱ्याशीं होईल. परंतु जेथें सर्वांच्याकरितां निर्णय सर्वांचे संमतीनें होईल त्या समाजांत सामूहिक सत्याग्रहाला जागा राहणार नाहीं ही गोष्ट समजून येईल. म्हणून मी वारंवार म्हणतों कीं ही 'डेमॉक्रसी' कांहींशी दोषपूर्ण आहे. ह्यांत अहिंसेचें तत्त्व कांहीं मर्यादेपर्यंत येतें, जास्त नाहीं. म्हणून आपले सारे निर्णय सर्वसंमतीनें करण्याची तयारी केली पाहिजे.

परंतु या विषयासंबंधीं माझे साथीदार मला म्हणतात कीं कां हो, ही कशी अव्यावहारिक गोष्ट सांगतां? अशानें व्यवहार कसा चालेल? अशा तऱ्हेनें ही गोष्ट कांहीं नवीनशी आहे. म्हणून या संबंधांत चांगला विचार करावा लागेल. आपलें जीवन व बुद्धि अशी बनवावी लागेल कीं त्यामुळें सर्व-संमतीनें काम झालें तरी ती (अहिंसा) पुढें च राहील. समाजानें अशा तऱ्हेनें विचार करावा. कार्यहानि न होतां सर्वांबरोबर कसें काम करतां येईल हें समाज शिकेल. हें सर्व करावें लागेल. त्यांत कांहीं अडचणी अवश्य आहेत. म्हणून जर आम्हीं विचार करणें सोडून दिलें तर मी समजतों कीं हा नवा विचार, नवें मत कीं 'डेमॉक्रसींत सत्याग्रहाला स्थान नाहीं' तर तें अहिंसेला धोकादायक आहे. यासंबंधीं आम्हांला निर्णय केला पाहिजे.

### गांधीजींचे वेळेचा सत्याग्रह

ही जी सत्याग्रहासंबंधीं भीति उत्पन्न झाली याचें एक कारण मी आतां सांगणार आहें. आणि तें अहिंसेला हि धोका आहे. तें हें कीं सत्याग्रहाची एक अभावात्मक (निगेटिव्ह) व्याख्या मनुष्याच्या मनांत ठाण मांडून बसली आहे. सत्याग्रह म्हणजे अडथळा करण्याचा एक प्रकार कीं ज्याला

जास्त अनुचित दबाव टाकण्याचा एक प्रकार म्हटला जाईल. लोकांचे मनांत आतां सुद्धां सत्याग्रहाचा हा च अर्थ आहे. आणि म्हणून च कांहीं लोकांना त्याचें आकर्षण हि आहे. सत्याग्रह शब्दाची जशी भीति कित्येकांना वाटते तसें कित्येकांना आकर्षण आहे असें दिसतें. लोक म्हणतात कीं बाबा कोठपर्यंत जमीन मागत फिरणार ? शेवटीं वैष्णवास्त्र काढील किंवा नाहीं ? समजा कीं ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र इत्यादि हिंसेचीं शस्त्रें आहेत. परंतु वैष्णवाचें अस्त्र जें अहिंसेचा रामबाण आहे तें तर बाबा काढतील किंवा नाहीं ? लोक मला असें वारंवार विचारतात तेव्हां त्यांना समजवावें लागतें कीं हें जें चाललें आहे ह्यांत सत्याग्रहाचें च एक रूप प्रकट होत आहे. म्हणून गांधीजींचे वेळीं केलेल्या सत्याग्रहाला जर सत्याग्रहाचा आदर्श समजून चाललों तर आम्ही चूक करूं असा माझ्या मनांत विचार येतो. त्यांचा एक काळ होता, त्यांची एक परिस्थिति होती. त्या परिस्थितींत कार्य च 'निगेटिव्ह' (निषेधात्मक) करावयाचें होतें. तरी हि त्या कार्यांचे बरोबर त्यांनीं बऱ्या च रचनात्मक आणि विधायक प्रवृत्ति जोडून दिल्या होत्या. त्यांची प्रतिभा होती कीं जी त्यांना सांगत होती कीं एक निषेधक (अभावात्मक) कार्य करीत असतांना सुद्धां जर आम्ही विधायक वृत्ति ठेवणार नाहीं तर अभावात्मक (निगेटिव्ह) कार्य संपल्यावर आणखी किती तरी संकटें निर्माण होतील.

लोक त्यांना वारंवार विचारीत होते कीं चरखा कां चालवावा हें जरा आम्हांला समजावून सांगा. इंग्रजांना येथून घालवावयाचें आहे तर त्यांच्याशीं चरख्याचा संबंध कसा आला हें समजत नाहीं. तरी हि लोक गांधीजींचे नेतृत्वाशीं स्वराज्याचा संबंध आहे म्हणून त्यांच्याकरितां चरख्याला मान्यता देत. त्यांना उत्तर मिळत असे 'जनतेंत जागृति झाल्याशिवाय, जनतेंत स्वराज्याची भावना उत्पन्न झाल्याशिवाय, काम कसें होईल ? इंग्रजांवर परिणाम कसा होईल ? काय केवळ माझ्या शब्दांचा होईल ? म्हणून आम्हांला रचनात्मक कार्यानें आपले विचारांचा प्रसार करून जनसंपर्क वाढविला पाहिजे. त्यामुळें जनसंपर्काकरितां आम्हांला चांगलीशी संधि मिळते. त्यांना थोडी सुखसोय, मदत हि मिळते. आमची त्यांना

सहानुभूति आहे. हें दृश्य त्यांना दिसतें आणि त्यांची हि सहानुभूति आम्हांला मिळते. अशा तऱ्हेनें आमचें राजनैतिक कार्याचे मागें एक नैतिक बळ उभें राहतें.' अशा रीतीनें त्यांना लोकांना समजवावें लागत असे.

### विधायक सत्याग्रह

परंतु तो काळ असा होता कीं लोकांना अभावात्मक कार्य करावयाचें होतें. म्हणून च त्या काळीं झालेले सत्याग्रह अत्यंत आदर्श होते असें आम्हीं समजतां कामा नये. लोकसत्ता स्थापित झाल्यावर हि सत्याग्रह करण्याची जरूरी पडेल तर त्याचें स्वरूप सुद्धां कांहीं निराळें होईल हें आमच्या लक्षांत आलें पाहिजे. 'डेमॉक्रसी' म्हणजे लोकसत्तेंत सत्याग्रहाला अवसर नाहीं असें समजणें तर फार चुकीचें होईल. परंतु त्या वेळीं जे निगेटिव्ह (अभावात्मक) प्रकारचे सत्याग्रह केले गेले त्यांच्याकरितां डेमॉक्रसींत फार पुष्कळ 'स्कोप' (संधि) आहे आणि त्याचा परिणाम लोकशाहींत मोठा प्रभावशाली होईल असें समजणें चूक आहे. लोकशाहींत ज्या सत्याग्रहाचा प्रभाव पडेल तो अधिक प्रभावशाली पाहिजे, अर्थात् अधिक विधायक पाहिजे. ह्या दृष्टीनें हि आम्हांला आमच्या चळवळीकडे पाहिलें पाहिजे कीं भूदान-यज्ञाचें कार्य ज्याप्रमाणें आम्ही करीत आहोंत तो अहिंसेचा च एक प्रकार आहे. परंतु तो च एक प्रकार अहिंसेंत आहे असें नाहीं. दुसरे हि प्रकार आहेत. यापेक्षां हि शक्तिशाली प्रकार आम्हांला मिळूं शकतात आणि आम्ही ते अमलांत आणूं शकतों. या प्रकाराचा जर आम्हीं पुरा उपयोग केला आाण त्याचा परिणाम पूर्ण पाहिला तर आम्हांला विचार करण्याची संधि मिळेल.

### भूदानांत पूर्ण शक्ति लावा

आज भूमिदानाप्रमाणें लोकांना समजाविणें, गरिबांपासून जमीन घेणें, सतत फिरणें हा आमचा सत्याग्रह च चालला आहे. हा एक सर्व विशाल सत्याग्रह आहे, रचनात्मक सत्याग्रह आहे. परंतु ह्या कामांत आम्ही पूर्ण शक्ति लावूं आणि थोड्या वेळांत त्याचा परिणाम काय असूं शकतो हें पाहूं. तेव्हां यापुढें सत्याग्रहाचें आणखी हि शक्तिशाली स्वरूप असूं शकतें किंवा नाहीं हें शोधून काढण्याची संधि मिळेल. आम्हीं जर ह्याची परीक्षा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत,
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि. ....................

केला नाहीं, त्यांत पुरी शक्ति लावली नाहीं, आणि १९५७ हें वर्ष निघून गेलें तर पुढचा मार्ग कोणता हें शोधून काढण्यांत आम्ही योग्य ठरणार नाहीं, अयोग्य ठरूं. ह्या परिस्थितींत त्याचा अर्थ होईल कीं आम्ही जीं सर्व कार्यें आरंभ केलींत त्याला पुढें चालविण्याची शक्यता कमी होईल. त्या थोड्या काळांत आज उपयोगांत आणलेल्या प्रकारांत पुरी शक्ति लावून त्यापासून कोणतें कार्य होऊं शकतें याचा अंदाज घ्यावा लागेल. म्हणून आपणां सर्वांवर ही जबाबदारी आली आहे.

माझा व्यक्तिशः विश्वास आहे कीं हा प्रकार फार च सामर्थ्यशाली आहे. आम्हीं जर याकरितां सामर्थ्य एकवटलें तर आमचें कार्य निःसंशय ठरीव काळांत संपूर्ण होऊं शकतें. हें मीं बिहारमध्यें पाहिलें आणि येथें ओरिसांत हि पाहत आहें. आश्चर्य हें कीं मीं बंगालमध्यें सुद्धां हें च पाहिलें. लोक म्हणत होते आणि आज हि कांहीं म्हणतात कीं बंगालमध्यें भूदानाकरितां सवड च नाहीं. तेथें भूदानाची आवश्यकता च नाहीं. तेथें तीस एकरांचे ' सीलिंग ' चा कायदा झाला आहे. त्यापुढें याची आवश्यकता च नाहींशी झाली. मग बाबा कां विनाकारण हिंडत आहे ? असें हि म्हणणारे कांहीं लोक तेथें अवश्य आहेत. कारण ते सत्ताकेंद्रांत आहेत. म्हणून त्यांचे बाजूला कांहीं व्यावहारिक आधार आहे. परंतु आम जनता व कार्यकर्त्यांचा प्रश्न आहे तोंपर्यंत आम्हीं पाहिलें कीं ते सर्व तयार असले आणि गांवोगांवीं जाऊन लोकांना समजावून देणारे मिळाले तर मी निश्चित सांगतों कीं तेथें सुद्धां बिहारप्रमाणें भूदानाचें पूर्ण चित्र आमचे डोळ्यांसमोर प्रत्यक्षांत उतरूं शकेल. समजा कीं पूर्ण शक्ति लावून सुद्धां तें कार्य झालें नाहीं तर आम्ही असे योग्य व असे सामर्थ्यशाली बनू कीं यापुढें कोणता मार्ग आंखावा याचा विचार करूं शकूं. तो विचार आम्हांला सुचेल. परंतु आम्हीं जर पुरी ताकद लाविली नाहीं आणि त्यामुळें हें कार्य पूर्ण झालें नाहीं तर आम्ही असा विचार करूं शकणार नाहीं. विचार आम्हांला सुचणार नाहीं व आम्ही विचार करण्यास पात्र होणार नाहीं. एक तर हें कार्य पुरी ताकद लावून १९५७ चे पूर्वीं पूर्ण झालें पाहिजे किंवा पुरी ताकद लावून १९५७ चे पूर्वीं अपूर्ण च राहील हें सिद्ध झालें पाहिजे. या

दोहोंपैकीं एक गोष्ट झाली पाहिजे. परंतु पूर्ण शक्ति न लावतां १९५७ पर्यंत जर आम्ही कार्य करीत राहूं तर आमचे हातांत कोणती निर्णय करण्याची शक्ति राहणार नाहीं. म्हणून सर्व बंधूंना आज ही विचार करण्याची संधि आली आहे कीं या वेळीं आम्हीं आपल्या शक्ति ज्या दुसरीकडे लागल्या आहेत त्या ह्या कामीं लावायच्या किंवा नाहींत ?

कांहीं लोकांच्या मनांत विचार येतो आणि तो हि विचारांत घेण्यासारखा आहे कीं शेवटीं आम्ही येथें आलों कशाकरितां ? आम्ही ह्याकरितां आलों कीं जें मीं पहिल्यांदा सांगितलें कीं विरुद्ध विचारप्रवाह असले तरी हि युक्तिवाद करूं, वादविवाद करूं. कुराणांत म्हटलें आहे कीं भक्तांचें हें च लक्षण आहे कीं ते आपसांत सल्लामसलत करीत असतात. तर सल्लामसलतीकरितां च आम्ही एकत्र जमलों आहोंत. याकरितां विचार करण्याला दुसरा पक्ष समोर ठेविला पाहिजे. तो म्हणतो कीं 'स्वराज्यानंतर असें एकांगी होऊं तर तें चालणार नाहीं. आम्ही जर स्वराज्यापूर्वी एकांगी नसतों तर काम चाललें नसतें. कारण त्या वेळीं आमचेसमोर एक च 'फ्रंट' ( मोर्चा ) असायला हवा होता. आणि तो म्हणजे हा कीं परकी सत्तेला येथून घालवून लावणें. ही च एक गोष्ट समोर असायला हवी होती. म्हणून स्वराज्यपूर्वी सर्व शक्ति एकांगी म्हणजे एका च उद्देशानें बनविणें जरूर होतें. परंतु आज जेव्हां स्वराज्य हातीं आलें आहे त्याला चालविणें आणि समाजाचें सर्व तऱ्हेनें भलें करण्याचा विचार करायचा आहे. तेव्हां विचार सर्व तऱ्हेनें व्हायला हवा. आम्ही जर एका च बाजूला ताकद लावूं तर ती चूक होईल. परंतु ह्या विचारांत कांहीं अर्थ नाहीं. आम्हांला विचार करण्याची गोष्ट ही च आहे कीं निरनिराळ्या प्रकारचें कार्य करण्याची जबाबदारी आमचेवर कोणीं टाकली ? जे लोकांसमोर निवडणुकीकरितां उभे राहिले नाहींत, ज्यांनीं लोकांना मागितलें नाहीं आणि लोकांनीं त्यांना मतें दिलीं नाहींत, त्यांचेवर जबाबदारी कोणीं टाकली कीं त्यांनीं सर्व हिंदुस्थानच्या समस्यांवर विचार करावा ?

### आमचेवर जबाबदारी कशी ?

शेवटीं ही जबाबदारी आमच्यावर टाकली कोणीं ? ती तर ज्यांनीं

निवडणुकींत लोकांचीं मतें मिळवलीं आणि जे शासन चालवीत आहेत त्यांचेवर च आहे. त्यांच्यावर ही जबाबदारी आहे कीं त्यांनीं सर्व बाजूंनीं विचार करावा, सर्व तऱ्हेनें आपलें अंदाजपत्रक त्या च प्रमाणें कार्यक्रम आंखावा आणि निरनिराळ्या क्षेत्रांत चळवळ करीत रहावें. अशी जबाबदारी घेणारा जर एखादा वर्ग अस्तित्वांत आहे आणि त्याचेवर लोकांचा विश्वास आहे, तर आम्हीं कबूल करायला पाहिजे कीं त्यांच्यामध्यें पुष्कळ सज्जन लोक हि आहेत. तर मग ती जबाबदारी आमचेवर कशी येते ?

एका बंधूनें म्हटलें कीं, ' कलकत्त्यांत दररोज गाईची हत्या होते ! —मला माहीत नाहीं कीं रविवारीं खिस्ताच्या कृपेनें सुट्टी असते किंवा नाहीं— तर शहरांना दूधपुरवठा कसा केला जाऊं शकेल याचा जरा आम्हांला नमुना दाखवून द्या. ' मी विचारतों कीं हा नमुना दाखविण्याची जबाबदारी आमचेवर कशी आली हें आम्हांला जरा समजावून द्या. काय आम्ही बेकार आहोंत ? आम्हांला कांहीं काम नाहीं ? काय हें च काम होतें ? असें जर असतें तर कोणीं हें हि विचारता कीं खादीमार्फत हा विषय कसा सुटूं शकतो हें जरा आम्हांला समजावून द्या. गिरण्यांनीं कापडाचा प्रश्न कसा सुटतो याचा एक प्रकार सिद्ध आहे. आम्ही जर ह्या प्रकाराचे विरुद्ध बोलत असतों तर लोक आम्हांला विचारूं शकतात कीं आपण जरा दहा वीस गांवांत दाखवा कीं खादीनें हा प्रश्न कसा सुटूं शकतो तें. परंतु शहरांना दूधपुरवठा करण्याचा हा काय सुव्यवस्थित प्रकार आहे कीं गाईची हत्या केली जावी ? एक वर्ष गाईनें दूध दिलें आणि दूध कमी झालें कीं तिला कत्तलखान्यांत पाठवावें अशी एक योजना आहे. ज्याप्रमाणें कपडा पुरवठा करण्याची मिलची एक व्यवस्था आहे तसें च शहरांना दूधपुरवठा करण्याची हि एक सुव्यवस्थित, वैज्ञानिक, यंत्रयुगानुकूल योजना आहे. आम्ही जर त्याला विरोध करीत असूं तर आम्हांला विचारायला पाहिजे कीं आपण तर ग्रामोद्योगी लोक आहांत ! आम्हांला गाईची हत्या केल्या-शिवाय कलकत्त्याला दूधपुरवठा केला जाऊं शकतो हें सांगा.

### आतां एकाग्रतेची च जरूरी

परंतु काय ही योजना आहे ? ही तर खरोखरी च मनांत आणण्यासारखी सुद्धां नाहीं आणि हा विचार च नव्हे. आणि हें चिंतन हि नाहीं. ह्या बाबतींत चालत आलेली गोष्ट च चालू आहे. परंतु आमचेसमोर लोक ही गोष्ट ठेवतात. आमच्यांत असे भोळसर लोक आहेत कीं ज्यांना गोसेवेची थोडी माहिती आहे. त्यांना वाटतें कीं होय, हें दाखविण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. आम्हीं जर दाखविलें तर उत्तम. एका बंधूनें म्हटलें कीं आम्हीं वर्ध्याला थोडें दाखविलें आहे. परंतु वर्ध्यांत नाहीं; दिल्लींत दाखवावें लागेल. प्रत्येक गोष्ट आम्हांला दिल्लींत दाखवावी लागेल. अशा तऱ्हेनें जर आम्ही विचार करूं लागलों तर स्वराज्याचें हें सर्व निरानिराळे कार्यांचा विचार करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे तर त्याचा अर्थ हा च कीं आम्हीं सर्वसामान्य सेवा करावी. परंतु ज्या प्रतिज्ञेवर आम्हीं हें कार्य अंगावर घेतलें आहे—अहिंसेला सर्वांत श्रेष्ठ स्थान देऊं आणि अहिंसेचें राज्य करूं—ही जी आमची प्रतिज्ञा त्याला योग्य हें काम राहणार नाहीं. त्याकरितां आम्ही व्यापक विचार अवश्य करूं. तरी हि ह्या वेळीं एका कार्यांत एकाग्र होण्याची आवश्यकता आहे. कमींत कमी दोन वर्षांकरितां— १९५७ चे अखेरपर्यंत समजावें.

### मालकांजवळ जावें कीं नोकरांजवळ ?

ह्या कामांत अधिकांत अधिक शक्ति लावण्याची आवश्यकता आहे असें मला वाटतें. त्यावर हि आपण विचार करायला हवा. कांहीं लोक म्हणतात कीं आतां पार्लमेंटांत, असेंब्लींत आमचे लोक आहेत. आम्ही तेथें कांहीं चांगली गोष्ट मांडूं शकतों. आणि आमचा आवाज सरकारचे कानांवर पोचवूं शकतों. ते हें हि म्हणतात कीं तेथें आमचा आवाज कांहीं जास्त करूं शकत नाहीं. तेथें कांहीं अल्पमतांत आहेत व कांहीं बहुमतांत. जे बहुमतांत आहेत ते चाबकाखालीं असतात. त्याला इंग्रजींत ' व्हिप ' म्हणतात. आणि जे अल्पमतांत आहेत ते तर थोडे च आहेत. त्यांचें काय चालणार ! त्यांचेकरितां चाबकाची हि जरूरी नाहीं. त्यांचेकरितां हरभरे हि नाहींत— फक्त तबेल्यांत च ते आहेत. तरी हि दोन्ही प्रकारचे लोक पार्लमेंटमध्यें

जाऊन बोलतात तर खरे ! परंतु सरकार काय इतकें बहिरें झालें आहे काय कीं बाहेर सभेंत जी गोष्ट सांगितली जाते ती त्यांस ऐकूं जाणार नाहीं आणि पार्लमेंटमध्यें कानांवर पडल्यावर च ती ते ऐकतील ? जर लोक तेथें बोलतील तर च का ते आवाज ऐकतील ? नाहीं तर ऐकणार नाहींत ? काय आपण असें समजतां कीं आम्हीं एक काम करीत रहावें, जनतेंत प्रवेश करावा, जनतेची शक्ति वाढवावी आणि अशा परिस्थितींत प्रार्थना-सभेंत किंवा आणखी कोठें व्याख्यान द्यावें तर त्याचा जो परिणाम होईल त्यापेक्षां जास्त परिणाम पी. एस्. पी. किंवा कॉंग्रेसमध्यें प्रवेश करून पार्लमेंटांत जाऊन एक व्याख्यान देण्यानें होईल ? आपलें मतप्रदर्शन करण्याचें योग्य स्थान कोणतें ह्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. ह्या नोकरांकडे जाऊन आम्हीं आपली रडकथा काय सांगावी ? त्यांचे मालका-कडे च कां न पोंचावें ? हिंदुस्थानांत आज मालक आहे जनता ! तर सरळ आम्हीं मालकांजवळ च जावें आणि आपली गोष्ट त्यांचे कानांवर घालावी. म्हणजे त्याचा सरळ परिणाम नोकरावर होईल आणि तो काम करील.

आम्ही तेथें नोकरांजवळ गेलों तर ते म्हणतात कीं ‘ आपण म्हणतां परंतु लोकमत काय आहे ? लोकमत जर तसें असेल तर आम्ही करूं. परंतु याला लोकमत अनुकूल नाहीं.’ ह्याप्रमाणें प्रत्येक गोष्टींत लोकमताचें नांव घेतील आणि आमचा व तुमचा विचार उत्तम आहे हें हि त्याबरोबर म्हणत जातील. त्यांनीं जर आमचे विचाराला चूक म्हटलें तर आणखी बरें झालें असतें, जरा वादविवाद तरी झाला असता. परंतु जेव्हां म्हणतात कीं आपला विचार उत्तम आहे तेव्हां बोलणें च खुंटतें. जेव्हां आमचे विचाराला उत्तम म्हटलें तेव्हां आमचें तोंड बंद होतें. आणि त्यांचा तर हात कांहीं करूं शकत नाहीं. कारण ते म्हणतात कीं आमचा हात अशा यंत्रांत सांपडला गेला आहे, आणि तें यंत्र चालविण्याचें जनतेनें तर आम्हांला मॅंडेट ( आदेश ) दिला आहे, तर त्या वेळीं आमचें बोलणें च खुंटतें. म्हणून मला असें वाटतें कीं आम्हीं लोकमत तयार करण्याला च लागावें. आमचें बोलणें, आमची बुद्धि, आमची शक्ति जी आमचे हातांत आहे, ती सर्व सरळ लोकांजवळ

पोंहचून त्यांना जागृत करण्याला लावावी. म्हणून या वेळीं आमची मागणी आहे कीं इकडे तिकडे विखुरलेले जे आमचे बंधु, अशी कोणती महत्त्वाची जागा असेल कीं जेथें ते राहून त्यांना आशा असेल कीं ते कामाची वृद्धि करूं शकतील तर ते तेथें खुशाल राहोत. परंतु जे दुसरे आहेत, जे एक, दोन, तीन चारचे वर जाऊं शकत नाहींत, त्यांना माझी प्रार्थना आहे कीं आपली सर्वांची बुद्धि व शक्ति तेथें कामाला येणार नाहीं. आतां जर इकडे खेड्यांत याल तर आपला पुष्कळ जयजयकार होईल, स्वागत होईल, सन्मान होईल आणि पुष्पमाला सुद्धां आपल्याला मिळतील. शक्ति वाढेल. लोकांचा पुष्कळ उत्साह वाढेल. लोक वाट पहात आहेत. आपण येथें याल तर किती उत्तम होईल आणि ते प्रेमानें स्वागत करतील.

## सात्त्विक लोक निवडणुकींत पडत नाहींत

कांहीं लोकांनीं एक नवीन च तऱ्हा काढली आहे. ती हि विचार करण्यासारखी आहे. असें म्हणतात कीं सात्त्विक लोकांना आजच्या निवडणुकी पसंत नाहींत. हा अंदाज आल्यावर हा प्रकार कसा बदलेल, सात्त्विक लोकांना ह्यांत भाग घेण्याची प्रेरणा होईल अशा प्रकारच्या विचाराला स्फूर्ति व्हावयाला पाहिजे. पण त्याप्रमाणें ते विचार करीत नाहींत. ते समजून तर चुकले च कीं सात्त्विक लोकांना निवडणुकींत भाग घेणें आवडत नाहीं. तरी हि ते निवडणुकीची पद्धति बदलूं शकत नाहींत. कारण पाश्चात्यांकडून एक पद्धति आली आणि जोंपर्यंत त्याऐवजीं दुसरी सुचत नाहीं तोंपर्यंत तो चालू राहील. हा त्यांनीं एका गोष्टीचा विचार केला आहे. ते मला तर विचारीत नाहींत पण ते आमच्या साथीदारांना विचारतात कीं आपण कॉंग्रेस महासमितींत येणें पसंत कराल काय ? म्हणजे सात्त्विकांना सहन होणार नाहीं असें दुःख आम्ही आपल्याला देत नाहीं. निवडणुकींत येऊन, लोकांचे समोर उभें राहून, निवडून येण्याचे तसदीपासून आपल्याला आम्ही वांचवूं इच्छितों. परंतु आपण जर ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत येण्याचें पसंत कराल तर आमची इच्छा आहे कीं आपण तेथें यावें व आपल्या सल्लामसलतीचा फायदा आम्हांला द्यावा. मग आम्ही जेव्हां विचारतों कीं ‘ आम्हांला कॉंग्रेसमन तर व्हावें लागणार नाहीं ना ? येऊं आणि सल्ला देऊं.’ तर ते

म्हणतात कीं नाहीं. कॉंग्रेसमन तर व्हावें च लागेल. दहा रुपये दक्षिणा हि द्यावी लागेल.

## हें मोहचक्र आहे

जे असें म्हणतात ते आमचे मित्र आहेत. पण आम्ही त्यांना समजावितों कीं त्यांत काय भलाई आहे ? ह्यांत जर भलाई असेल तर आम्ही कबूल करायला तयार आहोंत. इकडे तर अशी स्थिति होते कीं ते लोक नेहमीं भीत असतात. म्हणतात तर खरे लोकशाहीकरतां एक चांगलासा विरोधी पक्ष असला पाहिजे. परंतु तो पक्ष कमजोर असला तरी हि भितात आणि बलवान् झाला तरी हि भितात. ह्या ' डेमॉक्रसी 'नें आमची बुद्धि इतकी दुबळी केली आहे कीं ती कांहीं च विचार करूं शकत नाहीं. चक्रांत सापडली आहे. आपल्याला जर अशी भीति वाटते तर विरोधी पक्षांतले लोक आपली बुद्धि बदलल्याशिवाय आपल्याजवळ आले तर काय ते आपल्याला अथवा समाजाला अनुकूल आहेत याचा आपण जरा विचार करा. मला वाटतें कीं हा असा एक प्रकार आहे कीं ज्यामुळें सात्त्विक लोक निःसत्त्व होतील. सात्त्विक लोकांत अशी धमक पाहिजे कीं सत्त्वगुणाचा प्रभाव आम्ही इतका वाढवूं कीं निवडणुकीवर त्याचा परिणाम होईल आणि ती दुसरें रूप घेईल. एक तर त्यांच्यांत हि हिंमत असायला पाहिजे कीं आम्ही ही निवडणूक बंद च करूं आणि आम्हांला त्यांत जाण्याची आवश्यकता च पडणार नाहीं. किंवा जे जे निवडून येतील त्यांच्यावर आमचा प्रभाव राहील. या दोहोंपैकीं एकाची हि हिंमत नसेल आणि कोणी आमच्या-वर कृपा करण्याकरितां म्हणेल कीं आपण ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत यावें, आम्ही आपणाला घेण्याला तयार आहोंत, आणि आम्ही हि जाण्याची इच्छा करूं, तर मी समजतों कीं आम्ही मोहचक्रांत सांपडत आहोंत.

## कोणता हि पक्ष कमजोर होऊं नये

हे अगदीं उघड उघड विचार आज मीं आपलेसमोर ठेवले आहेत. त्या-बरोबर मी हें हि म्हणूं इच्छितों कीं माझे विचारांचा मी मुळीं च आग्रह धरीत नाहीं. पी.एस्.पीं.त माझे मित्र आहेत. कॉंग्रेस आणि रचनात्मक

संस्थेंत सुद्धां माझे मित्र आहेत. जे माझ्याशीं शत्रुत्व करूं पाहतात ते हि आमचे मित्र आहेत आणि म्हणून माझी स्थिति कठिण होते. सारी दुनिया च मित्रांनीं भरलेली आहे. म्हणून माझी गोष्ट आणखी च कठिण होते. परंतु तें सोपें हि आहे. कारण कीं मीं मोकळ्या अंतःकरणानें विचार करतों आणि मी तर आग्रह करीत च नाहीं. म्हणून वादविवादाकरितां म्हणून एक विषय मिळतो. आपण माझी स्थिति कोणती असायला पाहिजे यावर हि चर्चा करावी. मीं पहिल्यांदा च सांगितलें आहे कीं कोणता हि राजकारणी पक्ष ज्याचा लोकशाहीवर विश्वास आहे तो आमचे मताप्रमाणें कमजोर होण्यांत देशाचें भलें नाहीं. परंतु काँग्रेसवाले जर बदलले, त्यांचे विचार त्यांना चूक वाटले आणि त्यामुळें च त्यांचा पक्ष मोडला, तर त्यांत देशाचें नुकसान नाहीं. पी.एस.पी.चे लोक जर आपल्या विचारांना चूक समजतील आणि त्यामुळें च त्यांचा पक्ष मोडला तर त्यांत हि देशाचें नुकसान नाहीं. परंतु हे दोन्ही पक्ष अथवा डेमॉक्रसीला मानणारे आणखी कोणते हि पक्ष आपापले विचार मानत राहून कमजोर झाले तर ह्यांत देशाचें हित आहे असें मी मानतों. अर्थात् मी कोणाला हि कमजोर करूं इच्छीत नाहीं.

### विनोबा काँग्रेसमन होण्यांत कोणाचें भलें नाहीं

परंतु मी कमजोर राहण्यांत हि कोणाचें हित आहे काय असें मी विचारतों. समजा उद्यां विनोबा कबूल झाले आणि त्यांनीं म्हटलें कीं ठीक आहे, मी काँग्रेसमन होऊं इच्छितों. काँग्रेसमन होण्यांत फार जास्त सोडावें तर मुळीं च लागत नाहीं. त्यांत प्रश्न येवढा च येतो कीं माझी जी कांहीं श्रद्धा आहे तिला कांहीं एक मर्यादेपर्यंत वाव आहे आणि कांहीं मर्यादे-पर्यंत नाहीं. ज्या मर्यादेपर्यंत नाहीं त्याकडे मुळीं च लक्ष न देऊन ‘ आहे तितकें च चांगलें ’ असें समजून मनुष्य तेथें जाऊं शकतो. मला माहीत आहे कीं काँग्रेसमध्यें सुद्धां सज्जनांची संगति मिळूं शकते. ज्याप्रमाणें शंकर-रावजीनें म्हटलें येथें एक सत्संग आहे त्या च प्रमाणें तेथें हि पुष्कळ सज्जन लोक आहेत आणि ते तेथें एकत्र होतात तर तेथें हि सत्संगतीचा लाभ मिळूं शकतो. काँग्रेसमध्यें, प्रजासमाजवादी लोकांमध्यें, पुष्कळसे सज्जन

आहेत. त्यांच्यांत कांहीं बाबी आहेत कीं त्या मला कबूल आहेत आणि कांहीं अशा आहेत कीं ज्या मला कबूल नाहींत. ज्या बाबी कबूल नाहींत त्यांची उपेक्षा करून ज्या कबूल आहेत त्यांचेकडे लक्ष देऊन व्यावहारिक बुद्धीनें समजा मी काँग्रेसमन झालों तर ह्यांत काँग्रेसचें भलें होईल काय ? विचार करण्यासारखी गोष्ट आहे. मला वाटतें कीं ह्यांत काँग्रेसचें भलें होणार नाहीं. काँग्रेसची गोष्ट अलग ठेवा. ह्यांत देशाचें हि भलें नाहीं. कोणाचें च भलें नाहीं असें मला वाटतें. निरनिराळ्या विचारांचे लोक आपल्या विचारांत कमजोर झाले तर ह्यांत कोणाचें हि भलें नाहीं हें च समजायला पाहिजे. ही मुख्य गोष्ट लक्षांत ठेवून आम्हीं विचार करावा.

तेव्हां आमचे जे लोक भिन्न भिन्न पक्षांत वांटले गेले आहेत आणि निरनिराळ्या ठिकाणीं आहेत त्यांनीं समजायला पाहिजे कीं आतां संधि आली आहे कीं ज्या वेळीं आम्हीं ह्या कामांत सहयोग दिला पाहिजे. कारण कीं त्या ठिकाणीं राहून च जर अशी सेवा होत असेल कीं ज्यामुळें ह्या कामाची पुष्कळ प्रगति होऊं शकेल, तर त्या ठिकाणीं च ते राहिले तर बरें. तेव्हां त्यांच्या श्रद्धेंत तेथें अडथळा येत नाहीं. परंतु त्यांना जर असें वाटत असेल कीं तेथें जी सेवा आज होऊं शकते ती जितकी ह्या कार्यांत येऊन होऊं शकेल तितक्या सन्मानाची नाहीं तर आमची सर्वांना मागणी आहे कीं ह्या कार्यांत आपण यावें आणि आम्हांला थोडी मदत करावी. सर्व मिळून जोर लावूं आणि सन १९५७ पर्यंत पुरा प्रयत्न करून पाहूं.

## सूतांजलीची मागणी

मला जें म्हणायचें होतें तें संपलें. एक च गोष्ट मी त्याला जोडणार आहें. ती लहानशी च आहे. दरवर्षीं आम्ही तिची पुन्हां पुन्हां उजळणी करीत असतों. या वर्षीं हि मी पुन्हां सांगूं इच्छितों. गांधीजींनीं मीराबाईचें एक भजन म्हटलें होतें ' **काचे तातणे रे मने हरिये रे बांधी जेम ताणे तेम रहिये रे** '– 'एक कचें सूत आहे. त्या कच्च्या सुतांत मला बांधलें आहे. तें इतकें मजबूत आहे कीं त्याचे बळावर भगवान् मला ओढीत आहे. त्यानें च मी ओढली जातें.' असें मीराबाई म्हणते. गांधीजींनीं म्हटलें होतें कीं देशासमोर असें

एक व्रत पाहिजे कीं देशाकरितां प्रत्येक मुलगा म्हणेल कीं मी कांहींतरी करीत आहें. लहान मुलगा हि म्हणेल कीं देशाकरितां मीं कांहीं केलें. नंतर भोजन केलें. असें एखादें राष्ट्रीय व्रत पाहिजे धार्मिक, पांथिक व्रतें तर असतात च. तीं भेद उत्पन्न करतात. परंतु सर्व राष्ट्रांत अभेद उत्पन्न करणारें एखादें व्रत पाहिजे. ह्याचा विचार करून त्यांनीं आम्हांला कांतण्याचें व्रत सांगितलें. ही इतकी सोपी गोष्ट आहे कीं किशोरीलालभाई-सारखा मनुष्य सुद्धां जो दररोज संध्याकाळपावेतों मरून जाईल असें सकाळीं समजत असे अशा स्थितींत ज्यानें वीस पंचवीस वर्षें काढलीं, कांहीं ना कांहीं उत्पादन करीत गेला. मला वाटतें कीं ते आपले कपड्यां-करितां पुरेसें सूत कांतीत होते. तर असा आजारी, अशक्त माणूस सुद्धां उत्पादक होऊं शकतो. असें एक सुंदर साधन त्यांनीं आमचेसमोर ठेविलें आणि म्हटलें कीं ही च राष्ट्रीय उपासना व्हावी.

आम्हीं सुद्धां गांधीजींचे स्मरणाचे निमित्तानें ६४० तारांची एक गुंडी प्रत्येकाकडून मागितली आहे. आतां याचा प्रचार आपण सर्वांनीं कां करूं नये? यावर थोडा विचार करा. पार्लमेंटचे इतके सभासद आहेत. ते आम्हांला एक एक गुंडी कां नाहीं देत? जर अशी गोष्ट असेल कीं ते त्याला मानीत च नाहींत, शरीर-परिश्रमाचा तिटकारा च करीत असतील, या विचाराला ते चूक समजत असतील, तर त्यांनीं देऊं नये. परंतु या विचाराला ते चूक समजत नसतील तर सर्व सभासदांकडून आम्हांला एक एक गुंडी कां मिळूं नये? आणि सर्व देशांत अशा तऱ्हेचें वातावरण कां पसरूं नये? लहानशी गोष्ट आहे ही. परंतु ती पुष्कळ बलशाली आहे असें मला वाटतें. म्हणून माझी प्रार्थना आहे कीं आपण सर्व लोकांनीं या गोष्टीचा प्रसार करावा. भिन्न भिन्न पक्षांत जितके आमचे लोक आहेत त्या सर्वांनीं आपआपल्या पक्षांतील लोकांना त्या गोष्टीला उत्तेजन द्यावें. ह्यांत काय चूक किंवा दोष आहे? सर्व पक्षांतले लोक जर एक एक गुंडी गांधीजींच्या स्मृतीला देतील तर देशांत एक भावना उत्पन्न होईल आणि त्यापासून पुष्कळ फायदा मिळेल.

## प्रत्येक दानपत्र हें विश्वशांतीकरितां मतदान : २० :

आमचा हा मानवसमाज जेव्हांपासून अस्तित्वांत आहे— केव्हांपासून आहे हें कोणी च जाणत नाहीं—तेव्हांपासून प्रेमाबरोबर भांडणें हि होत आलीं आहेत. त्या प्राचीन काळीं ज्याला मानवसमाजाचा आरंभकाळ मानला गेला आहे, मन मानेल ती हिंसा होत असे आणि त्याची निरवानिरव सूड किंवा तशा च तऱ्हेच्या स्वैर हिंसेनें केली जात असे, त्यामुळें समाजाची स्थिति कांहीं सुधारत होती तर कांहीं बिघडत होती. शेंवटीं समाजाला अशी एक युक्ति सुचली कीं मन मानेल तशी स्वैर हिंसेऐवजीं व्यवस्थित हिंसा केली तर ती आटोक्यांत येईल. परिणामतः मी ज्याला दंडशक्ति किंवा शासन हि म्हणतों, तिचा आरंभ झाला. व्यवस्थित हिंसा अर्थात् दंडशक्ति पहिल्यापहिल्यांदा प्रभावशाली ठरली. तिनें अव्यवस्थित हिंसेला ताब्यांत आणलें. कांहीं दिवसपर्यंत ती मर्यादित स्थितींत राहिली आणि फायदेशीर ठरली. म्हणून मानवानें तिला धर्माचा अंश मानलें. संस्कृतांत स्मृतीमध्यें मला असें हि वचन मिळालें कीं "**दंडं धर्मं विदुर्बुधः**" शहाण्या लोकांनीं दंडाला धर्म मानलें— अर्थात् त्या वेळच्या शहाण्या लोकांनीं. परंतु ही दंडशक्ति जी व्यवस्थित आणि आरंभीं मर्यादित हिंसा होती ती नंतर मर्यादित राहिली नाहीं. हळूं हळूं तिची मर्यादा विसरत गेली, पसरत गेली, विशाल रुंद होत गेली. तरी पण ती व्यवस्थित तर राहिली च. व्यवस्थित जर राहिली नसती तर ती राज्यकारभार करूं शकली नसती, किंवा तिला दंडशक्ति म्हटलें नसतें. होतां होतां तिनें आज अतिहिंसेचें रूप घेतलें आहे. आज व्यवस्थित आणि मर्यादित हिंसा किंवा दंडशक्तीचें रूपांतर अतिहिंसेंत झालें आहे. आज मानव भयभीत झाला आहे. या वेळीं मानवसमाज जितका भयभीत आहे तितका मानवी इतिहासांत तो बहुधा कधीं च राहिला नसेल असें म्हणण्यांत कोणत्या हि तऱ्हेनें कल्पनाविलास होणार नाहीं. कारण कीं मी जाणतों तोंपर्यंत इतक्या व्यापक प्रमाणांत मानवसमाज कधीं हि पसरलेला नव्हता.

दुनियेंत इतक्या व्यापक शक्ती हि त्याला बहुधा प्राप्त झाल्या नव्हत्या. म्हणून मानवाच्या आजच्या भयभीत स्थितीबरोबर नैसर्गिक कारणांमुळें उद्भवलेली भीति असेल तर गोष्ट निराळी.

## मानवमनाचें यंत्र पाठीमागें येऊं शकत नाहीं

मोठमोठे भूकंप, प्रलय वगैरे झाले. परंतु मानवाला मानवाचे हिंसेची जितकी भयंकर भीति उत्पन्न झाली आहे तितकी यापूर्वीं कधीं हि झाली असेल असें दिसत नाहीं. भयभीत मानव आतां कांहीं विचार करूं लागला आहे कीं त्या भयंकर हिंसेची जी आत्यंतिकता आहे ती कमी केली जावी आणि फिरून मर्यादित व्यवस्थित हिंसा चालू करावी. जरी सारे नाहीं तरी कांहीं थोडे वैज्ञानिक जेव्हां असें म्हणूं लागले कीं ह्या अणुशक्तीला नियंत्रित करावें आणि राजाजींसारखे महर्षि असें स्पष्ट सांगत आहेत कीं अणुशक्ति बंद करावी, यावरून हिंसेची आत्यंतिकता नाहींशी झाली पाहिजे असें मानवमात्र हि इच्छीत आहे असें समजलें पाहिजे. जशी ती दंडशक्ति मध्यंतरींचे काळांत मर्यादित व व्यवस्थित होती तशी च ती रहावी. परंतु प्रगतीची चाल पाहतां ह्या गोष्टीचा जरा विचार करून मानसशास्त्रज्ञांना कळून येईल कीं या प्रगतीचें चक्र कधीं पाठीमागें येऊं शकत नाहीं, तें पुढें च जाईल. स्वैर हिंसेची प्रगति दंडशक्तींत झाली, मर्यादित व्यवस्थित हिंसा उत्तरोत्तर विशाल होत गेली आणि आतां ती अति-हिंसेच्या रूपांत प्रकट झाली आहे. तेव्हां ती त्याचे पलीकडे च जाईल; ह्याचे मागें येऊं शकत नाहीं. यंत्रांत अशी शक्ति नाहीं. सामूहिक मानवमनाचें यंत्र असें नाहीं कीं त्याला कोणी एखादा मनुष्य प्रतिबंध करूं शकेल आणि मागें ओढूं शकेल. कारण तें सामूहिक मानवांचे मनाचें यंत्र बनून गेलें आहे. तें ज्या गतीनें पुढें गेलें आहे त्या च गतीनें तें आणखी पुढें जाणार आहे. आतां त्याला एक तर स्वतःला अहिंसेंत विसर्जन करावें लागेल किंवा त्यापेक्षां हि विक्राळ स्वरूप धारण करून मनुष्य-समाजाला नष्ट करून कृतार्थ व्हावें लागेल. ह्या दोहोंपैकीं कोणती एक गोष्ट त्याला करावयाची आहे हें समजण्याची आवश्यकता आहे.

## रायफल क्लबवाली भयकारी निर्भयता

म्हणून भयभीत मानवाचा हा हिंसेचा अतिरेक थांबविण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. ही गोष्ट जर लक्षांत येईल तर यानंतर दोन च परिणाम होऊं शकतात. एकांत मानवाचा पूर्ण नाश व दुसऱ्यांत मानवाला पूर्ण विकास होण्याला संधि. अहिंसा जर येत असेल तर आम्हांला थोडें बळ येईल. ज्यांचा मानवतेंत विश्वास आहे त्यांना हि स्वतः थोडें शक्तीचें भान व्हायला पाहिजे.

आतां टंडनजी रायफल क्लबसंबंधीं बोलले. तें थोडें त्याच्या अनुकूल बोलले. त्यांत हि पुष्कळ अर्थ आहे, रहस्य आहे. जेव्हां मनुष्य निर्बल होतो तेव्हां तो थोडें साहस करीत असतो. परंतु त्या धैर्याकडे जर बारकाईनें पाहिलें तर तें भयाचें च रूप असतें. त्यांतली निर्भयता वीर्यशाली किंवा उत्तम निर्भयता नसते. ती डरणारी निर्भयता आहे. त्यांत कांहीं साहस किंवा धैर्य असतें ह्याप्रमाणें त्याचें समर्थन करण्यांत येतें. आणि पुढें हि करतां येणें शक्य आहे. ही जरी गोष्ट कबूल केली तरी अशा लहान लहान हिंसा आतां आपला वचक बसवूं शकतील हें शक्य नाहीं. समाजावर जर कोणाची सत्ता चालेल तर तिला पूर्ण नष्ट करणारी अतिहिंसा चालेल, किंवा पुन्हां ती विसर्जन होऊन अहिंसेंत ती परिणत होईल.

## मध्ययुगांतील कल्पनेपेक्षां पुढें जावें

म्हणून आपल्याला ह्या पुराण्या कल्पना सोडून द्यायला हव्यात. मध्य-युगांतील काळांत लोकांनीं ज्या गुणांचा गौरव केला त्यांच्या मर्यादेंत राहण्याऐवजीं जरा धैर्य धरून थोडें अधिक बल प्राप्त केलें पाहिजे. आणि ह्या अतिहिंसेला नष्ट करून अहिंसेची तयारी केली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत बोलायचें म्हणजे दंडमुक्त, शासनमुक्त समाजाची गोष्ट आम्ही म्हणतों त्या-करितां कंबर कसली पाहिजे. त्याकरितां बुद्धि तयार केली पाहिजे आणि हृदयांत प्राण ओतला पाहिजे.

## कालचक्र अहिंसेकडे च

ही माझी श्रद्धा आजची नाहीं. बऱ्या च अनुभवानंतर तिनें माझ्यांत

ठाणें दिलें आहे. किती वर्षांपासून मी हें मानत आहें. परंतु मला वाटत होतें कीं दंडमुक्त समाज व शासनमुक्त समाज होण्याकरितां बरा च कालावधि लागेल. परंतु जेव्हां अतिहिंसेचें रूप प्रकट झालें तेव्हांपासून मला मोठा उत्साह आणि आशा वाटूं लागली कीं दंडमुक्त समाज आतां लवकर च येऊं शकेल. ही आशा जर आपणांस समजावूं शकलों आणि त्याचा स्पर्श जर आपल्या हृदयाला झाला तर आपणां सर्वांचें अत्यंत शुद्ध, निष्ठावान, आत्ममय मानवतेंत रूपांतर होईल. म्हणून जेव्हां कधीं ॲटम व हैड्रोजन बॉंबची गोष्ट निघते तेव्हां मला वाटतें कीं ही ईश्वराची प्रेरणा च आहे. सर्व समाजरचना आतां माझे हातांत येणार आहे. ती आमचेकडे येत आहे. ती ओरडून सांगते कीं हे अहिंसादेवी, तूं यावेंस आणि ह्या शक्तीला वांचवावेंस म्हणून आम्हांला ही विचार करण्याची गोष्ट आहे कीं आमचें काम यापुढें सोपें आहे किंवा कठीण ! परंतु हें काम आम्हांला सोपें च आहे. कालचक्र च ह्याला सोपें करीत आहे हें च लक्षांत आणायला पाहिजे. ह्या च दृष्टीनें धैर्य धरून आम्हांला पुढची सारी व्यवस्था करायला हवी. आतां शासन-मुक्त समाजाकरितां च तयारी होत आहे.

## १९५७ मध्यें समाज शासनमुक्त कां होणार नाहीं ?

मला कधीं कधीं असें वाटतें कीं आमच्यापैकीं कांहीं लोक हा कठिण प्रश्न सुटेल कीं नाहीं, ह्या दोन वर्षांचे आंत पांच कोट एकर जमीन मिळेल किंवा नाहीं ह्या संशयाचे फेऱ्यांत सांपडले आहेत. मला ही शंका शिवत सुद्धां नाहीं. मला तर वाटतें कीं १९५७ मध्यें साऱ्या दुनियेंत शासनमुक्त समाजाची स्थापना च कां होऊं नये ? ही केवळ एक कल्पना नाहीं. आम्ही जर योग्य हिंमत धरून थोडें ह्या दृष्टीनें आणि खोलवर विचार करूं तर आपल्याला कळेल कीं शेवटीं आम्ही मानवतेला नष्ट तर करूं इच्छीत नाहीं ना ? मानव किती हि मूर्ख झालेला असो शेवटीं तो इतका मूर्ख तर होणार नाहीं कीं जो आपल्या जातीचा नाश करण्याला प्रवृत्त होईल. मी कांहीं ईश्वराची इच्छा जाणत नाहीं. परंतु जें दिसतें— जें सर्व नाटक आहे— त्यावरून असें दिसत नाहीं कीं मानवाला नष्ट करण्याची कोणती योजना होत आहे. ईश्वर आतां च प्रलय इच्छीत नाहीं. मानवाचे

ह्यातून मानवाचा नाश इच्छीत नाहीं. असें आम्हांला तशी प्रेरणा होत आहे यावरून च वाटतें. असें जर नाहीं म्हणावें तर भगवान् आम्हां सर्वांना मूर्ख करता आणि आपण व मी त्या ठिकाणीं दंडमुक्त समाज व शासनमुक्त समाजरचनेची गोष्ट च करूं शकलों नसतों. भगवानाला जेव्हां प्रलय करायचा होता तेव्हां यादवांना काय सुचलें ? प्रत्येकानें दारू पिऊन लाठ्या हातांत घेतल्या आणि एकमेकांना मारूं लागले. शेवटीं भगवानानें म्हटलें कीं, 'बरें बाबा, मी तरी तुमच्यापासून वेगळा काय म्हणून राहूं ?' म्हणून प्रहार करून चालते झाले. तेथें सर्वांचा संहार झाला अशी कथा आहे.

### ईश्वर प्रलय इच्छीत नाहीं

भगवंताची जर मुळीं च इच्छा नसती तर दंडमुक्त, शासनमुक्त समाज करण्याची प्रेरणा मला कां झाली असती ? आम्ही सर्व येथें एकत्र कां येतों ? ह्याकरितां आम्ही एकत्र होऊं च शकत नव्हतों. कोणी जर असा अहंकार ठेवील कीं मी ईश्वराचे इच्छेविरुद्ध प्रत्येक काम करणार आहें, दुर्दैवी प्राण्या, ईश्वर तर प्रलयाची इच्छा करणारा दिसत आहे, परंतु आम्हीं ठरवलें आहे कीं आम्ही प्रलय होऊं देणार नाहीं. अशा तऱ्हेनें ईश्वराचे मर्जीविरुद्ध आम्ही कांहीं करणार असूं तर तें अशक्य आहे. म्हणून ज्या अर्थीं मला व आपल्याला अशी प्रेरणा होत आहे तर निश्चित च समजायला पाहिजे कीं ईश्वर ह्या वेळीं प्रलय इच्छीत नाहीं. आणि तो जर प्रलय इच्छीत नाहीं तर हें हि स्पष्ट आहे कीं लवकरांत लवकर हिंसेपासून त्याला मुक्त करणें इच्छीत असला पाहिजे. म्हणून मी म्हणतों कीं आम्हांला विश्वास ठेवायला पाहिजे कीं सत्ययुग फार च जवळ येत आहे. परंतु सत्य-युग केव्हां येतें ? जेव्हां कलियुगाचा पूर्ण अतिरेक होतो, त्याचा घडा भरत येतो, तेव्हां जेव्हां इतकी अतिहिंसा समाजांत पसरली आहे आणि समाज भयभीत झाला आहे तेव्हां यापुढें लवकर च सत्ययुग येत आहे हें आपल्याला समजलें पाहिजे.

### मानवाला सर्वत्र समान प्रेरणा

आज मला हें उद्यांचें दर्शन होत आहे. चार वर्षांत आम्हांला इतकी

जमीन मिळाली तर पुढील दोन वर्षांत किती जमीन प्राप्त होईल वगैरे गणित करून विचार करणें योग्य नाहीं. आम्हीं विचार करायला हवा कीं साऱ्या दुनियेंत एक मोठी प्रेरणा काम करीत आहे. आणि त्याकरितां मी निमित्त झालों आहें. ती प्रेरणा माझेकडून कांहीं करवूं इच्छीत आहे. सर्व इतिहासांत दिसून येतें कीं सर्व मानवाचा इतिहास दैवी प्रेरणेनें घडलेला आहे. आपण पहा कीं एक काळ होता, एक युग होतें, जेव्हां इकडे भगवान् बुद्ध होते, तर तिकडे कन्फ्युशस आणि कांहीं दिवसांनंतर जरथुस्ट्र. थोड्या दिवसांनंतर खाईस्ट आले. त्या पांचशें वर्षांत आपल्याला असे ईश्वराचे प्रेषित एकामागून एक उत्पन्न झालेले दिसतात. नंतर असा एक काळ आला कीं जेव्हां आपल्याला अनेक संतांचें दर्शन घडलें. जेव्हां इकडे वैष्णव आले तेव्हां दुसरीकडे दुसरे साधुसंत झाले. अशा रीतीनें त्या वेळीं आम्हांला सर्वत्र संत दिसतात. नंतर जिकडे पहाल तिकडे प्रत्येक देशांत स्वातंत्र्याची गोष्ट झाली. अलीकडे सर्व देशांत ही च प्रेरणा होत आहे कीं मानवसमाजांत साम्ययोगाची स्थापना व्हायला पाहिजे. कोणत्या ना कोणत्या रूपांत समता स्थापन झाली पाहिजे. स्वातंत्र्य पाहिजे.

### भौतिक विरुद्ध चैतन्य ' परमाणु '

ह्याचा अर्थ हा आहे कीं कांहीं विशेष प्रेरणा होत असतात आणि त्यामुळें मानवसमाज भारला जातो आणि प्रवृत्त होतो. तेव्हां अलीकडे ह्या प्रेरणेला आतांपर्यंतच्या प्रेरणांचें विकसित रूप समजून असें कळायला पाहिजे कीं आम्हांला शस्त्र करून ईश्वराला हें कार्य घडवून आणायचें आहे. आम्हांला जर असा प्रकाश मिळाला तर आम्ही कमी शक्तिशाली राहणार नाहीं. अणूमध्यें भयंकर संहारशक्ति आहे हें अॅटमनें सिद्ध केलें आहे. तेव्हां एक साधारण भौतिक परमाणूंत जर इतकी शक्ति आहे तर चैतन्य-परमाणूंत, ज्ञानपरमाणूंत किती शक्ति असेल हें समजायला पाहिजे.

### भारत दैवी प्रेरणेचें निमित्त

म्हणून आम्हीं भूदानयज्ञाकडे संकुचित दृष्टीनें पाहूं नये अशी माझी इच्छा आहे. आम्ही जर त्या दृष्टीनें पाहूं तर धोका होईल. परंतु जर व्यापक दृष्टीनें पाहूं तर माहीत होईल कीं सर्व दुनियेंत एक मोठा खेळ

सुरू आहे. त्याचा मध्यबिंदु पुन्हां भारत होऊं पहात आहे. आणि म्हणून च आम्हांला ही प्रेरणा मिळाली आहे. आपण पहातां कीं तिकडे पंडित नेहरू साऱ्या दुनियेंत शांति स्थापन व्हावी ह्याकरितां प्रयत्न करीत आहेत, शांतीचे विचारांची वृद्धि व्हावी ही प्रेरणा त्यांना होत आहे आणि ते ज्या पद्धतीनें काम करीत आहेत त्यांत ते आपली पराकाष्ठा च करीत आहेत. ही प्रेरणा सुद्धां हिंदुस्थानांतून च निघाली आहे. आणि आपण बघत च आहांत कीं भूदान-यज्ञाची प्रेरणा येथून च प्रकट झाली. आपण हें हि पाहिलें कीं स्वातंत्र्य मिळविण्याचा जो एक प्रकार आला तो हि हिंदुस्थानांत च. ह्याप्रमाणें सर्व गोष्टी पाहून असें भासायला लागतें कीं दुनियेंत एक ईश्वरी प्रेरणा काम करीत आहे आणि त्याकरितां पुन्हां भारताला निमित्त व्हावें लागेल. आम्ही जर ही व्यापक भावना लक्षांत घेऊं तर मग आम्ही आपलें सैन्य कसें वाढवूं ! मग त्याचा कांहीं उपयोग आहे किंवा नाहीं, पाकिस्तानचे विरुद्ध आमचा टिकाव लागेल किंवा नाहीं, रायफल क्लबचें काय होईल इत्यादि गोष्टी अगदीं क्षुल्लक होतात. ह्यांचा विचार करण्याची आवश्यकता च वाटत नाहीं.

## दुनियेला दोन वर्षांचें आव्हान

म्हणून आपलीं सर्व उत्तमोत्तम कामें हि सोडून सर्वांनीं या कामाला जोरानें लागावें असा आज जो ठराव केला त्याचें महत्त्व आपल्या लक्षांत येईल. शंकररावजींनीं म्हटलें कीं दोन वर्षें जोर लावण्याचा अर्थ जर हा केला गेला कीं आजच्या तारखेपासून त्या तारखेपर्यंत जोर लावायचा आणि मग ढिलाई तर हें योग्य होणार नाहीं. ही सावध करणारी सूचना त्यांनीं आम्हांला दिली. परंतु ठरावांत जी दोन वर्षांची गोष्ट सांगितली आहे ती ठराव करणारांनीं कांहीं पुष्कळ विचार करून केली आहे असें नव्हे. त्यांनीं असा स्थूल विचार च केला कीं १९५७ पर्यंत काम करण्याचा माझा संकल्प होता, त्याचीं आतां दोन वर्षें बाकी आहेत. तेव्हां ह्याचे-करितां तितका च वेळ दिला जावा. परंतु मी जें दोन वर्षांकरितां लोकांना आवाहन देत आहें तें फक्त हिंदुस्थानचे लोकांकरितां नाहीं. हें मी आमचे सर्वोदयप्रेमी लोकांपर्यंत च मर्यादित करून म्हणत नाहीं असें समजायला च

पाहिजे. माझा जरी त्यांचेवर हक्क आहे तरी हि; आमचें हें आवाहन येत्या दोन वर्षांत जोर लावा आणि १९५७ पर्यंत दंड-मुक्त समाज स्थापन करा असें साऱ्या दुनियेकरितां आवाहन आहे.

## विश्वशांतीकरितां मत

आज आम्ही येथून जाणार. वल्लभस्वामीनें म्हटलें कीं कांहीं लोक पायीं आले आहेत आणि परत ट्रेननें जातील. लोक आले हि पायीं आणि जातील हि पायीं च. परंतु कमींत कमी जर जाते वेळीं पायीं जाण्याची योजना असेल तर जाते वेळीं पायीं जावें. शेवटीं त्यांनीं ही गोष्ट कां सांगितली मी हि विचार करीत होतों. त्यांना हें कां सुचलें? कारण ह्या वेळीं आम्हांला एक संदेश मिळत आहे. आणि त्याचा लवकर प्रचार करण्याची आवश्यकता आहे. आम्ही जर येथून पायीं निघालों तर हा संदेश प्रत्येक ठिकाणीं ऐकवून जातां येईल. म्हणू कीं 'बंधूंनो, पहा दोन वर्षांत मानवाचा उद्धार होणार आहे. मुक्ति माझ्या अगदीं जवळ आली आहे अशी जेव्हां मानवाला तीव्र जाणीव झाली तेव्हां च असें उत्थान झालें. जेव्हां मानवांत अशी प्रखरता आली तेव्हां च धर्माचा उदय आणि पुष्कळ महत्त्वाचीं कार्यें झालीं आहेत हें आम्ही सर्व जाणत आहोंत. म्हणून दोन वर्षांत मानव असा प्रयत्न करून कांहीं जमीन मिळवील एवढें च पुरें नाहीं तर दोन वर्षांत असा प्रयत्न करावयाचा आहे कीं दुनिया सर्व शस्त्रांना निरर्थक समजून एक नवा समाज स्थापन करण्याकरितां प्रेरित होईल. ह्या युगांत ही अशक्य गोष्ट आहे असें मानण्याची गरज नाहीं. जेव्हां एक एक वर्षाचें मूल्य आज जुन्या शंभर-शंभर दोन-दोनशें वर्षांचे मूल्याबरोबर झालें आहे, तेव्हां दोन वर्षांत होणें ही अशक्य गोष्ट आहे असें मुळीं च समजायला नको. अशी च आशा ठेवून एक प्रेरणेनें भारले जाऊन आम्हीं येथून निघावें आणि जेथें जमीन मागण्याकरितां जाऊं तेव्हां त्यांना समजवावें कीं आपण जें दानपत्र द्याल तें विश्वशांतीकरितां आहे. आपण विश्वशांति इच्छितां कीं नाहीं? जर इच्छीत असाल तर येथली जमिनीची समस्या सोडविण्याकरितां भूमिदान व संपत्तिदान यांचे योजनेंत आपला हिस्सा द्यावा. आपण जो हा हिस्सा द्याल तें विश्वशांतीकरितां मत समजलें जाईल.

## श्रद्धेशिवाय सर्व प्रकार व्यर्थ

ही च भावना ठेवून आम्ही हें काम करू तर पहा ह्यांत कोणती शक्ति भरली आहे. कांहीं हिशेबी बंधूनें म्हटलें, ज्या प्रकारानें आम्हीं हें काम चालविलें त्यावरून १९५७ पर्यंत ही गोष्ट बहुधा पूर्ण होईल असें दिसत नाहीं, म्हणून आम्हीं दुसरी कोणती तरी तऱ्हा शोधावी. परंतु मी म्हणतों कीं प्रकारांची येथें कांहीं किंमत नाहीं. प्रकार किंवा तऱ्हा ह्याला कांहीं किंमत च नाहीं. किंमत आम्ही किती श्रद्धेनें युक्त आहोंत या गोष्टीची आहे. जर आमच्यांत श्रद्धा भावनेची च कमतरता असेल तर ह्यापेक्षां उत्तम उत्तम प्रकार जरी आम्हीं शोधून काढले तरी हें पक्कें समजा कीं त्यामुळें जमिनीचा प्रश्न सुटणार नाहीं. तो प्रश्न सोडवितांना मानवाचा हा निश्चय च असला पाहिजे कीं आम्हांला शासनमुक्त, दंडमुक्त व्हावयाचें आहे. असा निश्चय झाल्यावर च हा प्रश्न अहिंसेनें सुटेल.

## आमच्या दोषांमुळें पूर्ण शक्ति कामाला लागत नाहीं

मला लोक विचारतात कीं काय आपला असा विश्वास आहे ? आज च श्री. पाटीलसाहेबांनीं विचारलें कीं प्रत्येक मनुष्य आपला सहावा हिस्सा देईल असा आपला विश्वास आहे काय ? परंतु काय हा प्रश्न बरोबर मानला जाईल ? हा प्रश्न आमची दृष्टि मर्यादित आहे म्हणून उत्पन्न होतो. आम्ही जर दृष्टि व्यापक ठेवूं आणि श्रद्धेनें प्रेरित होऊन लोकांजवळ जाऊं तर आपण पहाल कीं ही फक्त हिंदुस्थानची च भूमि-समस्या सोडविण्याची लहानशी गोष्ट नाहीं, कीं ज्यामुळें येथल्या थोड्या भूमिहीनांना थोडीशी मदत मिळेल आणि थोडी शांतता स्थापन होईल, 'लँड हंगर' म्हणजे जमिनीची भूक थोडी शांत होईल. ह्यामुळें हिंदुस्थानची नैतिक शक्ति अशी होईल कीं त्याचा परिणाम सर्व दुनियेंत शांतता स्थापन होण्यांत होईल. ही गोष्ट ध्यानांत ठेवल्यानंतर आमची ही तऱ्हा जर आजपर्यंत योग्य झाली नसेल तर मग आम्हांला संशोधन करावें लागेल. त्यांत जर कांहीं कमीपणा असेल तर कांहीं दोष आमचेकडून होत असतील असें समजायला पाहिजे. वाणी, मन आणि कृति ह्यांतील दोषांमुळें च ह्यांत पुरी शक्ति आली नाहीं.

**सत्याग्रह प्रखरांत प्रखर नाहीं, सूक्ष्माहून सूक्ष्म**

जेव्हां सत्याग्रहासंबंधीं मी विचार करतों तेव्हां जवळ जवळ अशा तऱ्हेनें विचार करतों कीं ज्याप्रमाणें मानवानें लहान हिंसेपासून मोठी हिंसा आणि मोठ्या हिंसेपासून अतिहिंसेंत पाऊल टेवलें त्या च प्रमाणें सुरुवातीला मी एक सौम्यसा सत्याग्रह करीन. आज जी मी पदयात्रा करीत आहें तो हि एक सत्याग्रह आहे असें मी म्हणतों. लोक हि असें च समजतात, आणि म्हणतात कीं हो, तो एक सौम्य सत्याग्रह आहे. परंतु ह्यानें जर काम झालें नाहीं तर यापेक्षां प्रखर सत्याग्रह करूं. जर त्यानें हि न झालें तर त्यापेक्षां हि जास्त प्रखर सत्याग्रह होईल. ह्याप्रमाणें ह्याची तीव्रता वाढवीत जाऊं. परंतु वास्तविक आमचा विचार त्याच्या अगदीं उलट असायला पाहिजे. मीं जो सत्याग्रह सुरू केला आहे त्यानें जर काम होऊं शकत नाहीं असें दिसलें तर त्यापेक्षां सौम्य सत्याग्रह शोधूं म्हणजे त्याची ताकद वाढेल. होमिओपथींत शिकविलें जातें कीं औषधीची मात्रा लहान परंतु त्याला घोंटून पुन्हां पुन्हां भावना देत जावी लागते हें आपल्याला माहीत असेल. भावनेमुळें भावित होण्यांत ती सूक्ष्मांत सूक्ष्म होत असतांना अधिकाधिक परिणामकारी होत असते. हिंसा शास्त्रांत तर मानलें जातें कीं सौम्य शस्त्रानें काम न झालें तर त्यामुळें त्यापेक्षां प्रखर शस्त्र घेण्याची शक्ति वाढेल आणि तें यशस्वी होईल. परंतु येथें तर अगदीं उलटा च कार्यक्रम असला पाहिजे. जर तें काम ह्याप्रमाणें यशस्वी होत नाहीं तर त्याचा अर्थ हा कीं आमच्या सौम्यतेंत कांहीं कमीपणा आहे. म्हणून आम्हांला सौम्यता आणखी वाढविली पाहिजे.

**सुरसा आणि हनुमानाचा दृष्टान्त**

हें च सत्याग्रहाचें स्वरूप आहे. आतांपर्यंत स्वातंत्र्याकरितां जे सत्याग्रह झाले त्यांत दबाव टाकून इंग्रजी सत्तेला घालविणें इतकें च एक निगेटिव्ह कार्य होतें, त्या वेळीं हिंदुस्थान निःशस्त्र होऊन निराश झाला होता. तो एक तर भ्रांत होऊन कुठें कुठें लहान खून करण्याला प्रवृत्त झाला होता, अव्यवस्थित हिंसेंत भाग घेत होता. अथवा निराश होऊन स्वस्थ बसून होता. त्या च परिस्थितींत अहिंसेचा हा विचार सुचला आणि लोकांनीं

त्याचें शक्य तेवढें ग्रहण केलें. अशा रीतीनें त्या काळांत सत्याग्रहाचा जो एक प्रकार चालू झाला, त्याला परिपूर्ण मानतां उपयोगी नाहीं. तो विशिष्ट परिस्थितींत उत्पन्न झालेल्या कारणांचा परिणाम होता. परंतु स्वराज्य मिळाल्यानंतर डेमॉक्रसीची आजची परिस्थिति पाहून आणि साऱ्या दुनियेंतील काम करणाऱ्या शक्तीकडे बारकाईनें पाहून आम्हांला सत्याग्रहाचें प्रमाण दिवसेंदिवस सौम्य करावें लागेल. सौम्य, सौम्यतर आणि सौम्यतम ह्याप्रमाणें जर सत्याग्रह वाढत गेला तर तो अधिकाधिक परिणामकारी आणि अधिकाधिक शक्तिशाली होईल.

तुलसीरामायणांत सुरसा राक्षसीची कथा आहे. '**सुरसा नाम अहिन की माता**' ही हनुमानासमोर उभी राहिली. तिनें आपलें तोंड पसरलें आणि एक योजन मोठें केलें तेव्हां हनुमान दोन योजनें मोठे झाले. तेव्हां तिनें दोन योजनें तोंड उघडलें. तेव्हां हनुमान चार योजनें झाले. जेव्हां हनुमान चार योजनें वाढले तेव्हां सुरसा आठ योजनें झाली. शेवटीं जेव्हां ती आठ योजनें झाली तेव्हां हनुमान सोळा योजनें झाले आणि जेव्हां हनुमान सोळा योजनें झाले तेव्हां सुरसा 'बत्तीस भयऊ' (बत्तीस योजनें) झाली. आतां हनुमानानें पाहिलें कीं ह्यानंतर ह्याप्रमाणें गुणाकार करीत जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बत्तीसचे चौसष्ट होतील. चौसष्टाचे एकशे अठ्ठावीस होतील. हें 'न्यूक्लीयर वेपन'पर्यंत पोंचेल. तेव्हां नंतर '**अति लघु रूप धरेउ हनुमाना.**' नंतर हनुमानानें अति लहान रूप धारण केलें आणि तो तिचे तोंडांत गेला आणि नाकपुड्यांतून बाहेर निघाला. असा शेवट झाला.

### पाय तुटेपर्यंत चालत रहावें

जेव्हां विशाल सुरसा येवढें भयंकर रूप धारण करून, ॲटम आणि हैड्रोजन बॉम्बचें रूप घेऊन तोंड पसरून समोर उभी आहे, तेव्हां अति लहान रूप घेऊन त्याचे आंत घुसून आणि नाकपुड्यांतून बाहेर निघून जावें. मला ही च प्रेरणा होत आहे. गुजराथचे एका बंधूनें म्हटलें कीं आतां तेथें काम पुष्कळ थंड चाललें आहे. मीं म्हटलें नाहीं. थंड नाहीं झालें. तुम्ही बाहेरून च पाहतां परंतु जरा आंत पहा कीं आपल्या हृदयांत

जी वस्तु आहे ती काय थंड पडली ? आपली नाडी थंड झाली आहे काय ? छातीवर जर हात ठेवला तर निरुत्साह दिसत नाहीं. विनोबाला तर उत्साह दिसत आहे. एकीकडे विनोबा चालत होता तर दुसरीकडे पोटांत जोरानें दुखूं लागलें. मीं म्हटलें छान झालें. त्याची लांबलचक गोष्ट मी येथें सांगत नाहीं. परंतु पोट सतत सकाळपासून संध्याकाळपर्यंत दुखत च होतें. पहिल्या रात्रीं झोप येत असे परंतु ह्या दिवसांत रात्रीं ती बहुतेक मोडत असे, परंतु मनानें म्हटलें पोट दुखत आहे, यांत पायांचा काय अपराध आहे ? पाय चालूं शकतात म्हणून यात्रा चालूं ठेवली. शेवटीं लोकांनीं फार आग्रह केला तेव्हां तीन दिवस पालखींत बसलों. एकूण सात आठ मैल पालखींत बसलों, तरी हि दररोज पांच सहा मैल चालत होतों. शेवटीं पोट बिचारें शांत झालें. हा वैचारिक चमत्कार झाला. एक लहानशी कसोटी झाली. परंतु मला असें च वाटेल कीं पाय तर परमेश्वरानें तोडले नाहींत आणि जेव्हां पाय तुटले नाहींत तेव्हां त्याचा संदेश स्पष्ट आहे कीं 'चालत रहा.' जेव्हां कधीं मला यात्रा बंद करण्याचें सुचेल तेव्हां तुझे पाय तोडून टाकीन, हा त्याचा उद्देश मी समजलों तेव्हां माझा उत्साह वाढला. मीं विचारतों कीं येथें आपल्याला किती जमीन मिळाली ? कोणी म्हणतात गत वर्षापेक्षां कांहीं तीन चार लाख एकर कमी मिळाली. परंतु ही कांहीं मोठीशी गोष्ट नाहीं. ह्यावर विचार च करूं नका. येथून आपल्या हृदयांत प्रखर भावना घेऊन जा हें च मला आपल्याला म्हणावयाचें आहे.

## हे नम्र शब्द विश्वकल्याणाकरितां

आज सर्व-सेवा-संघानें आपणां कार्यकर्त्यांसमोर जोड ठराव मांडला आहे. तो आदेश देत नाहीं. आपणां सर्वांना आज्ञा करण्याची त्याची शक्ति नाहीं. तो जर कांहीं करूं शकत असेल तर प्रार्थना करूं शकतो. आणि ती प्रार्थना सुद्धां थोड्यांकरितां नाहीं तर सर्वांकरितां च आहे. तो असा आग्रही नाहीं कीं तो कांहीं थोड्या लोकांना, ज्याप्रमाणें दांडगा मालक आपल्या नोकराला हुकूम देतो आणि त्याचेपासून आपल्या म्हणण्याप्रमाणें काम करवून घेतो त्याप्रमाणें आदेश देत नाहीं. सर्व-सेवा-संघ इतका आग्रही होऊं शकत नाहीं. तेव्हां ह्या ठरावांत सर्व दुनियेला प्रार्थना केली गेली आहे कीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक

दोन वर्षांत जोर लावा आणि ह्या अवधींत [illegible] समाज शासनमुक्त करण्याचा प्रयत्न करा. जेव्हां आम्ही समाज शासनमुक्त करूं तेव्हां अहिंसेंत प्रवेश होईल. नाहीं तर आम्हीं जर अहिंसा मर्यादित करण्याचा प्रयत्न करूं आणि त्याशिवाय शस्त्रें च क्षीण होतील अशी आशा करूं. ही गोष्ट घटना-चक्रांत बसूं शकत नाहीं असें समजून आम्ही ह्या ठरावाचा अर्थ हा च करतों कीं आम्ही सर्व दुनियेच्या हिताचे दृष्टीनें विश्वशांतीकरितां हें म्हणत आहोंत.

## सर्वभूतहिते रताः

आम्हांला आमच्या पूर्वजांनीं काय शिकविलें ह्याचा मी महारोगी-सेवा-मंडळाचे एका पुस्तकाची प्रस्तावना लिहीत असतांना विचार करीत होतों. मीं लिहिलें कीं ' ह्युमॅनिटी 'चा विकास खिस्ती धर्मांत झाला म्हणून तेथें कुष्ठरोग्यांची सेवा वगैरे चालू झाली. ह्या ' ह्युमॅनिटी ' शब्दाचें भाषांतर करणें मला कठीण वाटलें कारण आमच्या भाषेंत ' ह्युमॅनिटी 'ला कांहीं शब्द च नाहीं. आमच्या भाषेंत जो शब्द आहे तो आहे ' भूतदया ' आणि तेथें तर पाहिजे ' मानवदया.' मानवदयेसारखी मर्यादित वस्तु आम्हीं बनवली च नाहीं. आम्हीं तर भूतदया नांव घेतलें आणि म्हटलें **' सर्वभूत-हिते रताः.'** इतका विशाल शब्द आमच्या पूर्वजांनीं आमचेसमोर ठेवला आहे. यापेक्षां अधिक विशाल शब्द च नाहीं. ' सर्व ' म्हटलें ' भूत ' म्हटलें ' हित ' म्हटलें, तेव्हां आणखी म्हणायचें काय बाकी राहिलें ? म्हणजे सबंध मानवजात जितकी उंच भरारी मारूं शकते तितकी ह्या शब्दांत आहे.

**' सर्वभूतहिते रताः । '** भगवान् भाष्यकार लिहितात कीं **' अहिंसक इत्यर्थः '** अर्थात् ह्याचा अर्थ अहिंसा आहे. ह्या एका च शब्दांत सांगितला. **' सर्वभूतहिते रताः '** हा च शब्द घेऊन आम्ही संमेलनांतून जात आहोंत. आम्हीं लोकांजवळ जाऊन सांगावें कीं आम्ही हें च काम करीत आहोंत. अम्हांला फक्त येथली च भूमिसमस्या सोडवायची नाहीं. आम्हीं आपल्याला दुनियेंतील सर्व राज्यसंस्था ज्या हिंसेला काबूंत आणण्याला प्रभावशाली होऊं शकल्या नाहींत त्याला नाहींसें करण्याला आणि दुनियेंत अत्यंत परिणामकारक अहिंसेची स्थापन करण्या-

करितां, विश्वशांतीकरितां जमिनीचा सहावा हिस्सा देऊं शकत नाहीं ? काय आपण विश्वशांतीकरितां संपत्तीचा हि सहावा हिस्सा देऊं शकत नाहीं ? लोकांजवळ जाऊन आपण त्यांना हें समजवावें.

## प्रार्थना

आमचे कोणी बंधु पुष्कळशा उत्तम उत्तम कामांत लागले आहेत. आतां त्यांच्याशीं मी जरा प्रेमाची गोष्ट करूं इच्छितों. माझी एक तक्रार आहे. ती मी आपलेसमोर ठेवीत आहें. तक्रार ही आहे कीं जितक्या श्रद्धेनें मीं रचनात्मक कार्य केलें त्यापेक्षां जास्त निष्ठा माझेजवळ उपलब्ध च नाहीं. मीं लहान मोठीं असंख्य रचनात्मक कार्यें तीस बत्तीस वर्षें मोठ्या निष्ठेनें केलीं. माझा आत्मा म्हणतो कीं ह्या वेळीं जर गांधींजी असते तर तीं च लहान लहान सेवेचीं कामें चाललीं असतीं. त्यांत जें समाधान होतें तें थोडें नव्हतें. मला त्यांत च फार मोठें समाधान वाटत होतें. आज तर मी लोकांसमोर हात जोडीत आहें परंतु मी त्या दिवसांत नेहमीं आनंदांत रहात असें आणि जर कोणी माझेसमोर हि आला तरी मी मुळीं च काळजी करीत नसें. लोक म्हणत असत कीं हा कसा उद्धट मनुष्य आहे. तो आमचेकडे पहात सुद्धां नाहीं. परंतु तो च मी आज आपलेसमोर बसून विनंति करीत आहें कीं जीं हीं लहानसहान कामें आम्हीं चालू केलीं आहेत तीं दोन एक वर्षांकरितां सोडून द्यां. ह्यामुळें त्या कामांचें नुकसान होणार नाहीं. आमचें नुकसान होणार नाहीं. त्या च प्रमाणें देशाचें व दुनियेचें हि नुकसान होणार नाहीं. कारण पुढें आपल्याला इतकें काम मिळणार आहे कीं कदाचित् तें सर्व करण्याकरितां आम्ही लायक असूं हें सिद्ध हि होणार नाहीं. म्हणून थोड्या वेळेकरितां तीं सोडून देण्यांत यावीं अशी माझी त्या बंधूंपाशीं याचना आहे. रचनात्मक कार्यांत पुष्कळ श्रद्धा ठेवणारांना मी विश्वास देऊं इच्छितों कीं या आंदोलनाकरितां आपण जर तें कार्य सोडून दिलें, नेहमींकरितां सोडून दिलें, तरी कांहीं नुकसान होणार नाहीं.

पुरी
२७–३–'५५

# उत्कल : पुरी संमेलनानंतर

# भारतीय समाजशास्त्रांत दानप्रक्रियेचें महत्त्व 

एका मित्रानें असा प्रश्न उपस्थित केला आहे कीं पाश्चिमात्य देश आणि भारत यांतील समाजशास्त्रांत काय फरक आहे ? खरोखर च पाश्चिमात्यांनीं विज्ञानांत खूप च प्रगति केली आहे. त्या क्षेत्रांत आपल्याला पुष्कळ च शिकावयाचें आहे. तथापि तिथें अजून समाजशास्त्र तयार झालेलें नाहीं, त्याचा नुसता प्रारंभ झालेला आहे. आपण येथें जें भूदान सुरू केलेलें आहे हें येथील समाजशास्त्राचें एक अंग आहे. येथील समाजशास्त्र पुष्कळ च विकसित आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं यापुढें प्रगतीला मुळींसुद्धां वाव नाहीं. अजून बरी च प्रगति करावयाची आहे. तरी हि येथील समाजशास्त्राचे कांहीं मूलभूत सिद्धान्त आहेत.

## समाज समतोल ठेवण्याकरितां नित्यदान

पहिला मूळ सिद्धान्त असा कीं प्रत्येक मानवाला समाजासाठीं स्वतःच्या शक्तीचा एक हिस्सा सतत द्यावयाला हवा. आपल्याजवळ जर संपत्ति असेल तर ती आपल्यासाठीं नाहीं, समाजासाठीं आहे, हें समजून त्याचा एक हिस्सा समाजाला अर्पण करावयास पाहिजे. आपल्याजवळ जमीन असेल तर तिची मालकी समाजाची समजून, जेव्हां कधीं मागणी होईल तेव्हां तिचा एक हिस्सा समाजाला द्यावयास पाहिजे. आपल्याजवळील श्रमशक्ति, बुद्धिशक्तिदेखील समाजाच्या कामांत सतत उपयोगांत आणली पाहिजे. कारण ती समाजासाठीं च आहे. नित्यदानाच्या ह्या कल्पनेंत समाज समतोल राखण्याची जी बाब आहे, ती अजून पाश्चिमात्य समाजशास्त्रांत आलेली नाहीं. तेथें जें दान दिलें जातें त्याला 'चॅरिटी' म्हणतात. परंतु एक तर तें चर्च वगैरे धर्मकार्यासाठीं दिलें जातें किंवा दुसरें कष्टी, दुःखी इत्यादींच्या सेवेसाठीं. म्हणजे एक धर्मसंस्थेसाठीं दिलें जातें व दुसरें दयेनें प्रेरित होऊन. दोन्ही प्रकारचीं दानें हिंदुधर्मांत आहेत. तशीं च अन्य धर्मांत देखील आहेत. दानाचें परिणामस्वरूप स्वर्गप्राप्तीची इच्छा किंवा ईश्वरकृपेची आशा केली जाते. दोन्ही दानें चांगलीं आहेत.

## नवीन मूल्याच्या प्रतिष्ठापनेसाठीं

तथापि आपल्या येथें एक तिसऱ्या प्रकारचें हि दान आहे. व तें समाजशास्त्राचें एक अंग आहे. मंदिर, मशीद, मठ इत्यादिसाठीं जें दान दिलें जातें त्यांत परलोकांत फलप्राप्तीची, पारलौकिक प्रेरणा असते; आणि दयेनें प्रेरित होऊन जें दान दिलें जातें त्यांत चित्तशुद्धीची आशा असते. परंतु आपण जो भूदान आणि संपत्तिदान यज्ञ सुरू केलेला आहे तो तर समाजाच्या परिवर्तनासाठीं, समाजरचना बदलण्यासाठीं, समाजांत समतोलपणा राखण्यासाठीं आहे. दोन्हींत हि भूमि व संपत्तीची मालकी मिटविण्याचा विचार आहे. जर समजा कांहीं पारलौकिक इच्छा केली गेली तर त्याचा या यज्ञाशीं कांहीं मेळ जमत नाहीं तरी याचें फल परलोकांत मिळेल च. याशिवाय ह्यांत जी भूमि आणि संपत्तीची वांटणी होईल त्यामुळें चित्त-शुद्धिदेखील होऊं शकते. सारांश, भूदान पारलौकिक कल्याण आणि चित्तशुद्धीचें साधन असतांना हि त्याचा मुख्य उद्देश समाजांत समतोलपणा राखणें, समाजांत समत्व आणणें आणि साम्ययोगाची स्थापना करणें हा आहे. समाजांत नवीन मूल्यांची प्रतिष्ठापना करणें आणि व्यक्तीचें जीवन समाजासाठीं अर्पण करणें हा आहे. ज्यांचा परलोकावर विश्वास नाहीं ते देखील या यज्ञांत भाग घेऊं शकतात. ज्यांना चित्तशुद्धीचें अन्य साधन उपलब्ध आहे त्यांनीं हि या यज्ञांत साहाय्य द्यावयास हवें.

## भूदानाचें पूर्ण व अपूर्ण यश

भगवद्गीतेंत यज्ञ, दान आणि तप यांची जी कल्पना आहे ती ह्या च प्रकारचा सामाजिक समतोलपणा आणि साम्ययोगाच्या स्थापनेसाठीं आहे. म्हणून च या यज्ञाची मुळांतील कल्पना भारतीय समाजशास्त्राची एक मूलभूत कल्पना आहे. धर्मशास्त्रांत पारलौकिक कल्याणाची तर भक्ति-मार्गांत चित्तशुद्धीची कल्पना केली जाते. परंतु ह्यांत समाजशास्त्राची कल्पना आहे ही गोष्ट अनेकांच्या ध्यानांत येत नाहीं. आणि यामुळें च भूदान-यज्ञानें काय होईल हें त्यांना समजत नाहीं. आपले समाजवादी मित्र आक्षेप घेतात कीं समाज बदलणें आणि जमिनीचा प्रश्न सोडविणें, ही फार मोठी गोष्ट आहे व हें केवळ कायद्यानें च शक्य आहे. आणि

त्यासाठीं कायदा करण्यास सरकारवर वजन आणावयास पाहिजे. यज्ञ, दान आणि तप ह्या साधनांनीं व्यक्तीची शक्ति समाजाला समर्पित करून समाजांत स्थिर मूल्य कायम करण्याची गोष्ट ते लोक समजत नाहींत. आम्ही त्यांना सांगतों, 'बाबांनो, सरकारवर दडपण आणण्याच्या गोष्टी करीत आहांत तर या यज्ञाचा परिणाम त्याकरितां हि होईल. जर या यज्ञाला पूर्ण यश मिळालें, जर हा यज्ञ परिपूर्ण सिद्ध झाला– आपण सारे सहयोग द्याल तर पूर्ण यश अवश्य मिळेल च– तर मग कायद्याची मुळीं सुद्धां गरज भासणार नाहीं. लोकशक्तीनें च जमिनीचें वांटप होईल आणि भूसमस्या दूर होईल. परंतु जर ह्याला पूर्ण यश आलें नाहीं तर समाजवादी आणि साम्यवादी मित्र अपेक्षा करतात त्याप्रमाणें सरकारवर दडपण आणणें आणि परिणामस्वरूप सरकारला कायद्यांत बदल करावा लागणें एवढें तरी कार्य अवश्य होईल. आणि गरिबांच्या हितासाठीं कायदा करावा लागेल. असें झालें तर मग हे लोक समजतील कीं भूदानाला पूर्ण यश मिळालें. त्या लोकांत आणि आम्हांत एवढा च फरक आहे कीं आम्ही ज्याला अपुरें यश म्हणतों ते त्याला पूर्ण यश म्हणतात, आणि आम्ही ज्याला पूर्ण यश म्हणतों त्यावर यांचा विश्वास च नाहीं. ह्याव्यतिरिक्त त्यांच्याशीं आमचा कांहीं खास विरोध आहे असें मी मानीत नाहीं.

## गरिबांनीं कां दान द्यावें

काल एक कम्युनिस्ट भाई मला भेटावयास आले होते. त्यांचें माझ्याशीं बरें च बोलणें झालें, व शेवटीं माझें बोलणें त्यांच्या ध्यानांत आलें. आमचें एकत्र मिळून काम होऊं शकतें असें त्यांचें व माझें ठरलें. ते म्हणाले, 'आपण जें विश्वशांतीबद्दल सांगतां तें आम्हांला मंजूर आहे.' मी म्हणालों ठीक. ह्या बाबतींत आपलें दोघांचें मतैक्य झालें. पुढें ते म्हणाले : 'केवळ जमिनीची च मालकी न मिटतां त्याबरोबर च आम्ही असें इच्छितों कीं कारखान्यांची पण मालकी संपावी.' मी त्यांना म्हणालों कीं ठीक आहे. हें मला मंजूर आहे. ह्या बाबत हि आमचें एक मत झालें. मग ते म्हणाले कीं, 'या यज्ञानें सर्व समस्या सुटतील असें वाटत नाहीं. यासाठीं तर सरकार-

वर दडपण आणावयास पाहिजे.' मीं त्यांना उत्तर दिलें कीं, 'ठीक आहे. जरी यांत पूर्ण यश आलें नाहीं तरी सरकारवर दडपण अवश्य येईल च. यामुळें याबाबत हि आपल्या दोघांत मतभेद होण्याचें कारण नाहीं. सरकारवर दडपण आणण्यासाठीं जे कांहीं प्रकार असतील त्यांत हा देखील एक असूं शकतो. भूदानयज्ञासारखें जोरदार आंदोलन सुरू झाल्यावर त्यामुळें जें वातावरण निर्माण होईल त्याचा प्रभाव सरकारवर हि पडेल.' ते म्हणाले, 'ही गोष्ट ठीक आहे. परंतु आपण गरिबांजवळून दान कां घेतां ? याबाबत आपला आणि आमचा मतभेद आहे.'

गोष्ट अशी आहे कीं समाजांतील प्रत्येक अंगानें समाजासाठीं कांहीं ना कांहीं अर्पण करावयास पाहिजे. पण जे दानाला केवळ दयेचें साधन मानतात ते गरिबांजवळून दान कां घेतलें जातें ही गोष्ट समजूं शकत नाहींत. श्रीमंत लोकांकडून दान घेतलें पाहिजे ही गोष्ट ते मानतात परंतु जे यज्ञ, दान, तप या गोष्टींना समाजशास्त्राचें एक अंग समजतात त्यांच्या ध्यानांत ही गोष्ट येईल कीं यांत धनिक आणि गरीब या दोघांनीं हि कांहीं केलें पाहिजे. दोघे हि समाजाचे एक अंग आहेत, अवयव आहेत. आणि म्हणून च दोघांनीं हि यांत सहयोग दिला पाहिजे. हें तितकें च खरें कीं ज्याच्याजवळ जास्त जमीन आहे त्याला आम्हीं जास्त मागावें आणि ज्याच्याजवळ कमी आहे तो कांहीं थोडेंसें देईल त्यावर च आम्हीं संतुष्ट व्हावें. ज्यांच्याजवळ मुळीं च जमीन नाहीं ते श्रमदान देतील. याप्रमाणें प्रत्येकाला कांहीं तरी द्यावें लागेल. जमीन, संपत्ति, श्रमशक्ति, बुद्धि हें सर्व समाजाचें आहे, आपलें नाहीं. हें समाजसेवेसाठीं अर्पण करण्यास जो कबूल नाहीं तो समाजाचें अंग होऊं शकत नाहीं. तसें च गरीब लोक हि समाजाचें एक अंग आहे म्हणून त्यांना समाजाच्या सेवेंत कांहीं ना कांहीं हिस्स अर्पण करावयास हवा.

## ग्राममंदिराच्या पायावर विश्वकल्याण मंदिर

मीं अनेकदां सांगितलें आहें कीं हा आमचा भक्तिमार्ग चालू आहे. परंतु मुख्यतः हें समाजशास्त्राचें कार्य चालू आहे, व त्याबरोबर च भक्तिमार्ग जोडला गेला आहे. भक्तिशास्त्र कांहीं स्वतंत्र वस्तु आहे असें मी मानीत

नाहीं. समाजशास्त्र आणि मानवी जीवन यांत च तो मिळून गेला पाहिजे असें मी मानतों. म्हणून च ज्यांचे अंगीं भूतदया आहे अशांना आम्ही म्हणतों कीं ' या आणि सहकार्य द्या. ' जेव्हां लोकांना कल्पना येईल कीं माझा विचार समाजशास्त्रीय आहे तेव्हां त्यांना या यज्ञासाठीं माझ्याप्रमाणें च खूप स्फूर्ति व खूप प्रेरणा मिळेल. मी रोज फिरतों, जागोजागीं लोकांना समजावून देतों. मला विश्वास आहे कीं यामुळें ही गोष्ट साध्य होईल. कारण मी हें जाणतों कीं भारतीय समाजशास्त्रांत मुख्य गोष्ट म्हणजे संपूर्ण गांवाचा एक परिवार बनविणें आणि अखिल विश्वाचें एक कुटुंब तयार करणें ही आहे. हें कार्य आम्हांला करावयाचें आहे. आम्ही साऱ्या गांवचा एक परिवार बनवूं– तो आमचा पाया होईल, आणि साऱ्या विश्वाला एक कुटुंब बनवूं- तें ह्याचें शिखर होईल. ह्याप्रमाणें विश्वकल्याणाचें मंदिर उभारलें जाईल. मंदिर-उभारणीचा आरंभ पायापासून च होतो, शिखरापासून नव्हे. म्हणून गांवांतील संपूर्ण जमीन आणि संपत्ति हीं संपूर्ण गांवची असावयाला पाहिजे. पाया घालण्याचें हें काम आम्हांला करावयाचें आहे आणि त्याची सुरुवात सहावा हिस्सा संपत्तिदान आणि भूदान यांपासून होते.

### कम्युनिस्ट भूदानवाले होतील

यप्रमाणें जर कम्युनिस्टांनीं भारतीय परिस्थिति आणि भारतीय संस्कृतीचा कांहीं विचार केला तर त्यांच्या ध्यानांत हें अवश्य येईल कीं भारतवर्षांत हा एक खरोखर च परिणामकारक मार्ग आहे. परंतु यासाठीं अहिंसेवर नितान्त विश्वास असणें अत्यंत आवश्यक आहे. आज अहिंसेचे बाबतींत मतभेदाला मुळीं च वाव नाहीं. जेव्हां ॲटम बॉंब किंवा हैड्रोजन बॉंब तयार झाले आहेत तेव्हां अहिंसेवर विश्वास ठेवण्याखेरीज अन्य मार्ग नाहीं. म्हणून च कम्युनिस्ट भाई सुद्धां आजकाल विश्वशांतीच्या घोषणा करितात. कारण हिंसेचा विचार यापुढें टिकूं शकत नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. कम्युनिस्ट लोकांच्या मनांत गरिबांसाठीं प्रेम आहे. आतां जर त्यांना अहिंसा व विश्वशांतीची कल्पना समजली तर निकट भविष्यांत सर्व कम्युनिस्ट भूदानवाले बनतील असें दिसून येईल.

म्हणून च आमचें जें कार्य आहे त्यावर आमची अतीव निष्ठा आहे आणि विश्वास आहे.

बेगुनिया
५–४–'५५

## नई तालीमद्वारां नवा समाज : २२ :

नई तालीमकडून ज्या अपेक्षा केल्या जातात त्या पूर्णतया सफल होत नाहींत असें मला आढळून आलें म्हणून च शिक्षक आणि विद्यार्थिगण यांच्यांत कांहींसा असंतोष दिसून येतो. कांग्रेसनें आवडी येथील अधिवेशनांत नई तालीमविषयक एक ठराव पास केला. पंडित नेहरूनीं स्वतः त्या ठरावाचा प्रस्ताव केला. दहा वर्षांत सरकार नई तालीम च अंमलांत आणील असें त्यांत म्हटलें आहे. आणि म्हणून च नई तालीमच्या शाळा सध्यां अस्तित्वांत आहेत त्या नमुनेदार असणें आवश्यक आहे. तेव्हां त्यांच्याकडून जी अपेक्षा केली जाते ती पूर्ण होईल आणि अखिल भारतांत त्या अनुकरणीय अशा होतील. अन्यथा बोललें जाईल एक आणि केलें जाईल निराळें च. आमचीं ' बेसिक बायस स्कूल्स् ' अशा तऱ्हेनें चालतात कीं त्यांना नरसिंह अवतार च म्हणावें लागेल 'न पूर्णतः मानव न पशु' आणि म्हणून च आपण कांहीं नमुनेदार विद्यालयें चालविणें अत्यंत आवश्यक आहे. पण याचा मुख्य अर्थ काय आहे याबद्दल आपल्या मनांत स्पष्ट कल्पना असावयास पाहिजे.

### दूषित कल्पना

विद्यार्थ्यांना अल्पसें औद्योगिक शिक्षण दिलें, सूत कांतलें म्हणजे नई तालीम आटोपली असें अनेकांना वाटतें. कांहींना असें वाटतें कीं ज्ञानाकडे जास्त लक्ष दिलें नाहीं कीं नई तालीमचें शिक्षण आटोपलें, आणि कांहीं लोक असें समजतात कीं ज्ञानाची कार्याशीं सांगड बांधली कीं नई तालीम झाली. मग ही सांगड सहजतया बसते आहे किंवा नाहीं याकडे लक्ष देण्याची हि जरूरी नाहीं. परंतु ह्या तिन्ही कल्पना दूषित आहेत.

### उद्योगांत प्रावीण्य

नई तालीम द्वारां शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ थोडासा उद्योग देऊन भागावयाचें नाहीं. ज्याप्रमाणें मासळी पाण्यांत पोहत असते त्याप्रमाणें च नई तालीमचे विद्यार्थी उद्योगांत प्रवीण होऊन तसें च कार्य करतील. आमच्या विद्यार्थ्यांत येवढी हिंमत यायला हवी कीं केवळ चार तासांच्या उद्योगावर ते आपल्या उदरनिर्वाहापुरतें कमावतील. नमुन्यासारखें अल्पसें कांतणें, विणणें यांचें ज्ञान घेतलें तर तेवढ्यानें भागायचें नाहीं. कांहीं लोक असें हि म्हणत असतात कीं ‘ आम्हांला उद्योगांत प्रवीण होण्याची काय आवश्यकता ? आम्ही तर शाळेंत शिक्षण देणारे घेणारे आहोंत. आई जेवायचें कसें हें आपल्या लहान मुलाला शिकविते. जेव्हां तो हें शिकतो तेव्हां तो असें कधीं च म्हणत नाहीं कीं तो खाण्याची कला शिकला, त्याला आतां खाण्याची काय गरज आहे ? खाण्याचें ज्ञान आलें म्हणजे काम पूर्ण झालें असा अर्थ होत नाहीं. मनुष्याला प्रतिदिन जेवण मिळायला पाहिजे. सारांश एवढा च कीं मनुष्याला जेवण नित्याची वस्तु आहे. तसें च नई तालीमच्या शिक्षकांना आणि विद्यार्थिगणाला नित्य चार तास शरीरपरिश्रम करणें आवश्यक आहे. त्यांनीं उद्योगांत इतकें प्रवीण व्हावयास पाहिजे कीं गांवांतील सुतार, शेतकरी त्यांच्याजवळ ज्ञानार्जनासाठीं यावयास पाहिजेत. अवजारांत सुधारणा करण्याची कला पण त्यांना अवगत असली पाहिजे. त्यांनीं कृषि विषयांत आचार्यपद प्राप्त करायला पाहिजे. आज ग्रामोद्योग नामशेष झाले आहेत, म्हणून नई तालीम द्वारां ग्रामोद्योगांना पुनरुज्जीवित करायचें आहे.

### ज्ञान एक तर सोळा आणे किंवा शून्य

नई तालीममध्यें पुस्तकांना महत्त्व नाहीं आणि म्हणून कांहीं ज्ञानाची उपेक्षा करायची नाहीं. विशेषतः असें मानलें जातें कीं ह्यांत जेवढें सहजरीत्या ज्ञान मिळेल तेवढें च पुरें. तथापि हा विचार चूक आहे. नई तालीममध्यें जीवनाच्या सर्व मौलिक गोष्टींचें पूर्ण ज्ञान होणें आवश्यक आहे. लांबलचक इतिहास आणि आळशी राजांच्या नामावली लक्षांत ठेवण्याची आवश्यकता नाहीं. त्यामुळें तर विद्यार्थ्यांच्या मेंदूवर विनाकारण ओझें

होतें. परंतु जीवनाचे जे मौलिक विचार, ज्यांमुळें आमचें जीवन विकसित होतें, त्यांचें ज्ञान असणें अत्यावश्यक आहे. तत्त्वज्ञान, धर्मविचार, नीतिविचार ह्या सर्वांचें ज्ञान अवश्य आहे. आपल्या समाजांत आणि अन्य समाजांत काय वैशिष्ट्य आहे याचें हि ज्ञान होणें आवश्यक आहे. विज्ञानाचे मूलभूत विचार विद्यार्थ्यांना माहीत असावयास पाहिजेत. त्यांना आरोग्यशास्त्र, आहारशास्त्र, स्वच्छता, पाकशास्त्र इत्यादींचें परिपूर्ण ज्ञान असणें आवश्यक आहे. याप्रमाणें नई तालीममध्यें ज्ञानांत कोणती च उणीव असतां कामा नये. भाषेचें देखील उत्तम ज्ञान झालें पाहिजे. आपले विचार नीट रीतीनें प्रकट करण्याची कला अवगत झाली पाहिजे. अक्षर सुवाच्य, सुंदर पाहिजे. साहित्याचें हि ज्ञान झालें पाहिजे. याप्रमाणें आपल्या शिक्षणांत ज्ञानाची उणीव भासणार नाहीं, परंतु निरर्थक ज्ञान असणार नाहीं.

आजकालच्या युनिव्हर्सिटींत विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर अनावश्यक ज्ञानाचा बोजा घातला जातो. आणि ३३ टक्के गुण मिळविणारा यशस्वी होईल असें म्हणतात. याचा अर्थ असा कीं ६७ टक्के विसरण्याची सोय केली गेली आहे. वास्तविक कोणतें हि ज्ञान हें १०० टक्के असावयाला पाहिजे. जो स्वयंपाकी ८० टक्के चांगला स्वयंपाक करूं शकतो त्याला कोण नोकरी देईल? अर्धवट ज्ञान नको. ज्ञान एक तर आहे किंवा नाहीं, सोळा आणे आहे किंवा मुळीं च नाहीं. कोणी मनुष्य ८० टक्के जिवंत आहे व २० टक्के मृत आहे असें होऊं शकतें काय? जर तो जिवंत असेल तर तो पूर्ण जीवंत आहे किंवा मृत असेल तर पूर्णतया मृत आहे. शेंकडावारी गोष्ट ज्ञानांत चालत नाहीं ज्ञान हें पूर्ण व निश्चित असावयास पाहिजे; संशययुक्त असतां कामा नये. पण आमच्या विश्वविद्यालयचालकांनीं ६७ टक्के ज्ञान विसरण्याची सवलत दिलेली आहे; कारण ते देखील हें जाणतात कीं पुष्कळसें अनावश्यक ज्ञान विद्यार्थ्यांना दिलें जातें. नई तालीममध्यें याप्रमाणें विसरण्याची सवलत मुळीं च असतां कामा नये. जेवढें कांहीं ज्ञान दिलें जाईल तेवढें सर्व लक्षांत ठेवण्यालायक राहील. आणि विद्यार्थि देखील सर्व लक्षांत ठेवील. कारण तें ज्ञान जीवनांत उपयोगांत येईल. वास्तविकतः ज्याला आपण विद्या म्हणतों ती मनुष्य विसरूं शकत नाहीं आणि जी

विसरतो ती विद्या नव्हे. याप्रमाणें नई तालीममध्यें आम्ही असें ज्ञान देऊं कीं जें विसरूं शकणार नाहीं. नई तालीमद्वारा शिक्षण घेतल्यावर तर महाज्ञानी लोक निघायला हवेत.

## ज्ञान आणि उद्योग यांचा समवाय

आतां ज्ञान आणि उद्योग यांच्या समवायाची बाब विचारांत घेऊं. ' समवाय ' हा शब्द मीं बनविला. जसें माती आणि घर हीं दोघें हि एक दुसऱ्याशीं इतकीं एकस्वरूप आहेत कीं त्यांचा भिन्नपणा आणि अद्वैत हि दर्शवितां येत नाहीं. जिथें द्वैत आणि अद्वैत यांचा निर्णय होत नाहीं त्या संबंधाला ' समवाय ' म्हणतात. ज्या शिक्षणपद्धतींत ज्ञान आणि उद्योग यांचा समवाय होईल आणि ह्या वेळीं ज्ञान चालू आहे कीं उद्योग हें आपण सांगूं शकणार नाहीं ती च आमची शिक्षणपद्धति होईल. ज्ञान आणि कर्म किंवा उद्योग यांत फरक केला जाणार नाहीं. ज्ञानाची प्रक्रिया चालू आहे तेव्हां कर्माची हि प्रक्रिया चालू राहील आणि कर्माची प्रक्रिया चालू असेल तेव्हां ज्ञानाची पण प्रक्रिया चालू राहील. कर्म आणि ज्ञान एकमेकांशीं इतकीं दृढ संबंधित आहेत कीं कोणत्या च प्रकारचा जोड बसवण्याचा प्रयत्न करावा लागणार नाहीं, बाहेरून ज्ञान घेण्याची आवश्यकता राहणार नाहीं. उद्योगानें च ज्ञानाचा विकास केला जाईल आणि ज्ञानानें उद्योगाचा विकास केला जाईल. ही च आमची शिक्षणपद्धति. ज्ञान आणि कर्म यांचा जोड बसवून जी पद्धति तयार करण्यांत येईल ती आमची पद्धति नव्हे. आमच्या पद्धतींत ज्ञान आणि कर्म एक दुसऱ्याशीं ओतप्रोत राहतील.

## नवीन समाजरचना हें च लक्ष

नई तालीमविषयक जे गैरसमज आहेत त्यांबद्दल मीं आतां सांगितलें. आतां एक महत्त्वाची गोष्ट सांगतों. नई तालीम आजची समाजरचना कायम ठेवून दिली जाऊं शकत नाहीं. आजच्या समाजरचनेला नई तालीमचा पूर्ण विरोध आहे. जर कोणी म्हणेल कीं नई तालीम हा एक शिक्षणाचा प्रकार आहे, उद्योगांतून शिक्षण देण्याची एक पद्धत आहे, तर असें म्हणणें चुकीचें होईल. नई तालीम तर नव्या समाजाची च निर्मिति

करील. आजच्या समाजरचनेंत च जर नई तालीम सुरू केली आणि शिक्षकांच्या वेतनांत त्यानुसार फरक केला गेला, डिग्रीनुसार त्यांना वेतन दिलें, तर हें सारें नई तालीममध्यें चालणार नाहीं. जर नई तालीममध्यें शिक्षकांच्या वेतनांत फरक राहिला तर 'स्टेट' मध्यें बदल कसा होईल? आज तर 'स्टेट'ची जी सारी यंत्रणा आहे तिथें योग्यतेनुसार वेतन दिलें जातें. वर्ग पाडलेले आहेत. नई तालीम या साऱ्या गोष्टींचा नाश करील. जर नई तालीमचा याच्याशीं विरोध नसेल आणि नई तालीम त्याचा नाश जर करणार नाहीं तर ती नई तालीम च नव्हे. नई तालीममध्यें शरीरपरिश्रम आणि मानसिक परिश्रम यांची नैतिक आणि आर्थिक योग्यता समान मानण्यांत येईल. याचा च अर्थ असा कीं आजची संपूर्ण आर्थिक रचना आपल्याला बदलावयाची आहे आणि त्यासाठीं च नई तालीम आहे.

**राजसुनाखला (पुरी)**
१७–४–'५५

## सात अमोल रत्नें : २३ :

[ यात्रेंत पू. विनोबांनीं चर्चेच्या वेळीं संक्षिप्त परंतु अर्थपूर्ण अशीं सात अमोल उपदेशरत्नें प्रकट केलीं. हे सात हि उपदेश भूदानयज्ञाच्या पार्श्वभूमीवर व्यापक प्रकाश टाकतात. ]

### खाऊं घालून खा

ओरिसाच्या ज्या गांवांत सर्वस्वदान दिलें गेलें तेथील जनतेनें अजूनपर्यंत मला पाहिलें नाहीं आणि त्यांना बघण्याची पण जरूर नाहीं. क्रांति तर तेव्हां होते कीं जेव्हां अखिल समाज दान द्यावयाला तयार होतो. मी जमीन मागतों आणि जमिनीवर पायीं चालतों. पण माझी श्रद्धा हवेवर जास्त आहे. ही हवा सर्वत्र पसरेल तर आपलें कार्य बघतां बघतां पूर्ण होईल. यांत कांहीं गणित वा हिशोबाची बाब नाहीं. भारताचा प्रत्येक

चालक जाणतो कीं प्रत्येक मनुष्यांत एक च आत्मा विराजमान आहे. सर्वत्र एक च आत्मा आहे हें जेव्हां तो समजतो तेव्हां आत्म्याशिवाय अन्य कोणती हि सत्ता राहूं शकत नाहीं. सारी चिंता, क्लेश, कलह, अस्थैर्य यांमुळें च आहे कीं आपण आपल्या शिरावर मालकी हक्काचें ओझें लादून घेतलें आहे. जर आपण तें ओझें दूर फेंकून दिलें तर आपण सारे परमेश्वराचे पुत्र होऊन आनंदानें आकाशांत स्वच्छंदानें उडणारे पक्षी जसा चारा खातात त्याप्रमाणें चारा खाऊं.

याकरितां प्रत्येक कार्यकर्त्याला जरा आत्मज्ञानाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. इतकें मौलिक जीवनपरिवर्तनाचें कार्य केवळ बाह्य विचारांनीं होऊं शकत नाहीं. आपल्याला हें च समजावयाला व समजावून द्यावयाला हवें कीं एक च आत्मा अखिल मानवसमाजांत व्यापक आहे. म्हणून सर्वांना खाऊं घालून च आपण खाऊं शकतों. प्यायला देऊन च पिऊं शकतों. सर्वांना सुखी करून च सुखी होऊं शकतों. दुसऱ्यांच्या सुखानें च आपण सुखी होऊं शकतों. दुःखानें दुःखी होऊं शकतों. दुसऱ्यांना दुःखी ठेवून आपण कधीं च सुखी होऊं शकत नाहीं.

## नैतिक आणि भौतिक उन्नति बरोबर च होते

नैतिक आणि भौतिक उन्नति एकदम च होऊं शकते काय असा प्रश्न अनेकदां विचारला जातो. वास्तविक दोन्हींत हि विरोध असा नाहीं. तथापि दोन्ही मिळून एका च गोष्टीची निर्मिति होते. दुसऱ्यांना मदत करणें हें मोठें धर्मकार्य आहे. त्यामुळें चित्तशुद्धि होते. ही गोष्ट देशाला हि लागू होते. भारत जर दुसऱ्या देशांना लुटून आपल्या देशाला संपन्न करण्याचा विचार करील तर भौतिक उन्नतीबरोबर च आध्यात्मिक पतन हि होईल. आणि जेथें आध्यात्मिक पतन होईल तेथें भौतिक उन्नति हि जास्त दिवस टिकाव धरूं शकत नाहीं. नंतर देशादेशांत युद्धें सुरू होतील आणि त्याबरोबर च भौतिक अवनति पण. या उलट भूदान-यज्ञानें लोकांत सद्भावना निर्माण होईल आणि आध्यात्मिक उन्नति होईल. जेव्हां गरिबांना जमीन वांटण्यांत येईल तेव्हां ते त्यांतून भरपूर पीक काढतील; म्हणजे च भौतिक उन्नति होईल. मानव आपलें सांसारिक कर्म परमेशाला

अर्पण करील तर भौतिक उन्नतीबरोबर च आध्यात्मिक उन्नति पण होईल. ही च भक्तिमार्गाची खुबी होय.

## आत्मा : व्यापक आणि निर्भय

आजच्या वर्तमानपत्रांत इंग्लंडचे प्रधानमंत्रि चर्चिलसाहेब यांच्याबद्दल एक बातमी होती. त्यांनीं पार्लमेंटच्या सदस्यांसमोर एक पेटी ठेवून म्हटलें कीं, "ज्या देशाच्या हातांत या पेटीभर 'प्लुटोनिअम' येईल तो च देश साऱ्या जगावर राज्य करील." पण आपल्याला दोन व्रतें घ्यावीं लागतील. पहिलें असें कीं आपल्या व्यक्तिगत स्वार्थाला समाजांत लीन करणें आणि दुसरें म्हणजे मी देह नाहीं, आत्मा आहें, हें जाणणें. यासाठीं कोणीं या देहाला त्रास दिला तरी त्याला वश होणार नाहीं. भूदान-यज्ञ या च दोन सिद्धान्तांवर उभा आहे. आत्मा व्यापक आणि निर्भय आहे. जर आपण एवढें केलें तर मग कोणत्या हि देशांच्या हातांत पेटीभर 'प्लुटोनिअम' आलें तरी घाबरण्याचें कारण नाहीं.

## पक्ष्यांचा देखील हक्क आहे

जमीन ईश्वरी देणगी आहे. त्यावर मनुष्याचा च नाहीं तर पशुपक्ष्यांचा हि अधिकार आहे. भारताचा गरीब शेतकरी पण ही गोष्ट मान्य करतो. एकदां एक गरीब बिचारी विधवा बाई आपलें दुःख सांगण्यासाठीं माझ्याकडे आली. तिचा एकुलता एक मुलगा हि तिला सोडून देवाघरीं गेला होता. तिच्याजवळ एक शेतजमिनीचा तुकडा होता. त्यावर ती स्वतः राबून पीक उत्पन्न करीत असे. पण ती शेतीचें रक्षण करूं शकत नव्हती. पक्षी येऊन सारें खाऊन टाकत. आपलें दुःख सांगत असतांना तिनें पक्ष्यांची गोष्ट सांगितली. बोलतां बोलतां ती स्वतः च म्हणाली, पक्ष्यांना हि तर देवानें च निर्माण केलें. त्यांचा हि खाण्याचा अधिकार आहे.

एकदां मी सकाळीं फिरावयाला जात होतों. एक शेतकरी मचाणावर बसून पक्ष्यांपासून शेताचें रक्षण करीत होता. सूर्योदयाची वेळ होती. पक्षी दाणे खात होते आणि शेतकरी हातावर हात ठेवून बसलेला मीं पाहिला. मीं त्याला विचारलें कीं, 'अरे बाबा, त्यांना तूं उडवीत कां नाहींस?'

त्यानें लगेच उत्तर दिलें, 'आतां सूर्य उगवत आहे. हा रामप्रहर आहे. आतां थोडें त्यांना खाऊं द्या. मग त्यांना उडवितों.' हिंदुस्थानची सभ्यता किती खोल आहे याचें दर्शन ह्या गरीब शेतकऱ्याच्या उत्तरावरून होतें.

### तीन शक्ति

आपल्या भूदान-आन्दोलनामागें तीन शक्ति आहेत. पहिली शक्ति आहे सत्य. जमिनीवर मालकी असूं शकत नाहीं, जमीन सर्वांसाठीं आहे. हें सत्य आहे. यासाठीं जो कसण्याची इच्छा करतो त्याला जमीन मिळाली पाहिजे. हें केवळ मानवीय सत्य नाहीं तर ईश्वरी सत्य आहे. भगवंतानें जी संपत्ति दिली आहे तीवर त्याच्या सर्व पुत्रांचा समान अधिकार आहे. आपली दुसरी शक्ति म्हणजे जे रात्रंदिन शेतांत मेहनत करीत असतात तरी पण त्यांच्या मेहनतीचें पूर्ण फल त्यांना मिळत नाहीं अशा भूमिहीन शेतकऱ्यांची तपस्या. तपस्या कधीं हि निष्फळ होत नाहीं. तिसरी शक्ति म्हणजे भूमिवान, श्रीमान, भारतवासी यांच्या हृदयांतलें प्रेम आणि औदार्य. आम्हांला विश्वास आहे कीं ते आमची मागणी समजतील. आज ते एका प्रवाहांत वाहत असले तरी त्यांचें हृदय आंतून बिघडलेलें नाहीं. भारतांत तर दानाची एक विशाल परंपरा च आहे.

### 'मानपूर'चें ऑस्ट्रेलियावर आक्रमण

सर्वोदयविचारांची ही च खुबी आहे कीं ज्याला तो विचार पटला तो एकटा देखील त्यावर अंमल करूं शकतो. एक व्यक्ति देखील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं अखिल विश्वाच्या विरुद्ध उभी राहूं शकते. हें च सत्याग्रहाचें तत्त्व आहे. याचा उदय भारतवर्षांत झाला. अलीकडे निःशस्त्रीकरणाबद्दलचा विचार केला जातो तेव्हां प्रत्येक राष्ट्र असें म्हणतें कीं 'दुसरें राष्ट्र जेव्हां निःशस्त्रीकरण करेल तेव्हां आम्ही पण करूं.' अशा प्रकारें एकीकडे शस्त्रास्त्रांत वाढ होते आहे आणि दुसरीकडे विश्वशांतीच्या गोष्टी केल्या जात आहेत. हें दुष्टचक्र (vicious circle) तेव्हां च तुटेल कीं जेव्हां कोणी एक व्यक्ति किंवा गांव किंवा समाज हिम्मत करून पुढें येईल.

जगांतील प्रत्येक व्यक्ति ही प्रत्येक देशाची नागरिक आहे. ही भारतीय विचारदृष्टि आहे. भूदानाचा हा विचार आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत पसरेल. याचें नेतृत्व येथील गांवकरी च करतील. म्हणून मी म्हणतों कीं 'मानपूर' (ओरिसाचें पहिलें ग्रामदान) चें आक्रमण ऑस्ट्रेलियावर होणार आहे.

## मथुरेंत पैसा आहे तसा कंस हि आहे

प्रत्येक गांव गोकुळ बनावें, साऱ्या गांवचा एक परिवार मानून सारे गांवकरी प्रेमानें, मिळूनमिसळून रहावेत, अशी इच्छा आहे. गांवांतील जमीन सर्वांची व्हावी आणि सर्वांनीं सारखे भाऊ होऊन काम करावें आणि वांटून खावें. गांवांतील सर्व बालकांना गोकुळांतील बालगोपालांप्रमाणें खूप दहीं, दूध, लोणी खावयास मिळावें. आज शेतकरी स्वतः दूध, लोणी इत्यादि उत्पन्न करतात पण आपल्या बालकांना खावयाला देत नाहींत आणि स्वतः हि खात नाहींत; तें सर्व शहरांत विकून टाकतात. दूध आणि लोणी प्रथम आपल्या बालकांना खायला देऊन उरलेलें विकलें जावें अशी आमची इच्छा आहे. तथापि आज आपल्याला गांवकऱ्यांना दूध लोणी विकावें लागतें; कारण तुम्ही वस्त्रासारखी तुमच्या आवश्यकतेची वस्तु स्वतः तयार करीत नाहीं. कापूस उत्पन्न करतां परंतु तो विकून टाकतां आणि शहरवासीयांनीं तयार केलेलें गिरणीचें कापड विकत घेतां. तिळाची पैदास करतां आणि ते विकून बाहेर तयार केलेलें गिरणीचें तेल विकत घेतां. ऊंस पैदा करतां आणि तो विकून साखर विकत घेतां. व्हायला असें पाहिजे कीं कापड, तेल, गूळ इत्यादि वस्तू ह्या गांवांत च तयार व्हाव्यात. आज तुम्ही कापड तयार करीत नाहीं म्हणून तें विकत घेण्यास पैसा पाहिजे. पैसा कोठून येणार ? निरुपायानें, लाचारीनें पैशासाठीं दूध, लोणी विकावें लागतें. जर तुम्हीं तुम्हांला लागणारें कापड तयार केलें तर तुम्हांला लोणी विकावें लागणार नाहीं.

आज प्रत्येक शेतकरी पैशाच्या मागें लागून चांगल्या चांगल्या वस्तू विकून टाकतो. मथुरेंत असा च झगडा नित्य होत असे. कृष्ण भगवान्

यशोदामाईला म्हणत कीं लोणी सर्व बालगोपालांना खाण्यासाठीं आहे. तेव्हां यशोदामाई त्याला समजावीत असे कीं, ' नाहीं रे बाबा, लोणी खाण्याची वस्तु नाहीं, विकण्याची आहे. मथुरेला जाऊन लोणी विकलें तर पैसा मिळेल.' ह्यावर कृष्ण भगवान् आईला म्हणाले, ' मथुरेला पैसा आहे तसा कंस देखील आहे. कंस आवडतो तुला ? जर पैसा पाहिजे तर कंसाला हि मानावें लागेल.' आम्ही हि गांवकऱ्यांना शेतकऱ्यांना हें च समजावितों कीं, ' बाबांनो, पैशाच्या मायेंत पडूं नका. खूप दूध, तूप, फळें, भाजीपाला पैदा करा. बालकांना खाऊं घाला, स्वतः खा आणि उरलेला विकायला न्या. ' आज तर तुम्ही शहरांत दूध, लोणी विक्रीसाठीं जातां तेव्हां शहरवासी वाटेल त्या कमी किंमतींत तुमची वस्तु खरेदी करतात; कारण तुम्ही शहरांतील बाजारांत विक्रीसाठीं चार सहा मैल चालून गेल्यावर वस्तु न विकतां परत येऊं शकत नाहीं. परंतु तुम्ही संपूर्ण गांवचा एक परिवार बनवाल, एक कुटुंब बनवाल, गांवांत उद्योग निर्माण कराल, मिळून-मिसळून काम करीत रहाल, तर मग शहरवासी स्वतः तुमच्याकडे दूध-तुपासाठीं धांव घेतील. मग तुम्ही त्यांना सांगाल कीं, ' बाबा, किती हि पैसे दिलेत तरी पण तुला लोणी देणार नाहीं. तें तर आमच्या मुलांबाळांसाठीं आहे. ' नंतर ते खूप आग्रह करतील. तेव्हां तुम्ही त्यांना सांगाल कीं, ' फक्त अर्धा शेर लोणी शिल्लक आहे आणि त्याची किंमत देखील दहा रुपये शेराप्रमाणें आहे. ' याप्रमाणें आमचा विचार समजून घेऊन त्याचा अंमल कराल तर तुमची शक्ति वाढेल आणि तुम्ही सुखी पण व्हाल.

## भूदान आणि विश्वशांति : २४ :

**[ अखिल भारतीय कॉंग्रेसच्या बैठकीच्या वेळीं केलेलें पू. विनोबांचें भाषण ]**

आपल्या सर्वांच्या दर्शनानें मला अपार आनंद होत आहे. भारताच्या जनतेंत पुष्कळशा बुद्धियुक्त भावना आहेत. उलट कांहीं अशा हि आहेत कीं, ज्यांचा बचाव बुद्धीनें हि होत नाहीं. त्यांना आपण 'मूढ भावना' म्हणूं शकतों. अशा मूढ भावनांपैकीं एक भावना आहे दर्शनलालसा. हिंदुस्थानची जनता दर्शनानें तृप्त होते. जनतेची ही मूढ भावना माझ्यांत हि आहे. मला मित्रांच्या दर्शनानें अतीव आनंद होत असतो. विशेषतः कांहीं सज्जनांचें दर्शन होतें त्या वेळीं तर मनाला अत्यंत समाधान होतें. अनेक वर्षांच्या तृषार्ताला पाणी मिळालें म्हणजे त्याला जसें समाधान वाटतें तसें च मला हि आपल्या दर्शनानें समाधान वाटत आहे. म्हणून च जेव्हां या ब्रह्मपूर शहरांत आपल्यासमोर बोलण्याची मला संधि देण्याची योजना झाली तेव्हां माझ्या मनाला सर्वांत जास्त आनंद झाला तो हा कीं आतां मित्रमंडळींच्या भेटीचा सुयोग येणार, दर्शन घेण्याची संधि मिळणार.

### मैत्रीच्या गोष्टी

या विशाल संस्थेच्या परिसरांत भाषण करण्याचा हा माझा पहिला च प्रसंग आहे. हें भाग्य मला सहजगत्या प्राप्त झालें आहे. म्हणून जें कांहीं थोडेंसें मी बोलणार आहें तें मैत्रीच्या भावनेंतून च. जगांत भिन्न भिन्न पक्ष आहेत. पंथ, जाति, भाषा इत्यादींत हि भेद असतात. परंतु माझ्या मनांत या भेदांना कांहीं च किंमत नाहीं. मी मानवाला मानवाच्या नात्यानें ओळखतों म्हणून च आज आपल्याशीं जें मी बोलणार आहें तें मित्रत्वांतून च आणि आपण हि त्या च दृष्टींतून त्याचा विचार करा.

## जगाच्या आजाराचें मूळ शोधणें आवश्यक

आपण जाणत च आहांत कीं या वेळीं जगाची स्थिति अतिशय चिंताजनक आहे. मी तर त्याला एका अस्थिर आजाऱ्याच्या परिस्थितीची उपमा देतों. ज्याचें टेंपरेचर दररोज घेतलें जातें आणि त्याच्या प्रकृतीविषयीं शंकित मनानें पत्रकें काढलीं जातात, कधीं चांगलें पत्रक निघालें तर चिंता कमी होते, आणि कधीं वाईट निघालें तर चिंता वाटते, अशी परिस्थिति आज जगाची आहे. जगांत अशान्तीची ज्वाला प्रकट न होवो अशी चिन्ता जगांतील महापुरुषांना लागलेली आहे. यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत आणि त्यांत थोडेंबहुत यश हि येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु या रोग्याला जो रोग आहे तो एक मूलभूत रोग आहे. किरकोळ औषधानें आजाऱ्याला कांहीं काळ सांत्वना, आराम जरी वाटत असला तरी जोंपर्यंत या मूळ रोगाच्या नाशाचा उपाय योजला जात नाहीं तोंवर या रोगापासून मुक्ति नाहीं.

## अहिंसा हा च निर्भयतेचा पर्याय

जगांत अनेक शक्तींची वाढ होत आहे. विज्ञानाच्या युगांत तर केवळ मनुष्याच्या हातांत शक्ति न राहतां शक्तीच्या स्वाधीन मनुष्य झाला आहे. मनुष्यानें शक्तीचा उपयोग करणें ही एक परिस्थिति आहे. परंतु शक्तीनें मानवाला नाचवावें, त्यावर मानवाचें कांहीं च वर्चस्व चालूं नये, उलट शक्तीचें त्याच्यावर वर्चस्व चालावें ही दुसरी परिस्थिति आहे. आज जग या दुसऱ्या परिस्थितींत पोंहचलें आहे. मानवी इतिहासांत इतक्या प्रचंड प्रमाणावर भीतीची भावना प्रकट होण्याची ही पहिली च वेळ आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. आपणां सर्वांना हें पटलेलें च आहे कीं जनतेला सुख मिळो, त्यांना सर्व प्रकारच्या सवलती प्राप्त होवोत आणि त्यांच्यांत गुण हि असोत. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनतेंत अभय असावयास पाहिजे. आज सर्वत्र अभयाचा अभाव दिसत आहे, सारें विश्व भयग्रस्त आहे. जर मानवांत निर्भयता प्रकट झाली नाहीं तर ही भयभीतता नष्ट होणार नाहीं आणि ही निर्भयता शस्त्रास्त्रांच्या वाढीनें उत्पन्न होऊं शकणार

नाहीं. मांजर उंदरासमोर वाघाप्रमाणें भासतें, पण कुत्र्यासमोर तर मांजर च राहतें. वाघ देखील सशासमोर वाघ असतो पण कोणी बंदूकवाला भेटतां च मांजरीसारखा बनतो, पळून जातो. सारांश, निर्भयता नखें आणि दांत यांच्या आधारावर येत नाहीं तर ती आत्मिक आधारावर येते. ज्याला आपण मर्यादित भाषेंत 'नैतिक शक्ति' किंवा अधिक स्पष्ट भाषेंत म्हणावयाचें झाल्यास 'अहिंसक शक्ति' म्हणूं शकतों या च आत्मिक शक्तीनें निर्भयता निर्माण होईल. अहिंसेचा निर्भयतेशीं अतिशय गाढ संबंध आहे. दोन्ही एकरूप आहेत. जर कोणी अहिंसक वृत्तीचा भासत असेल —जरी बाह्यतः हिंसा न करणारा दिसत असेल- परंतु त्याच्या मनांत भय असेल तर तो अहिंसक च नव्हे. अहिंसा निर्भयतेचा पर्याय आहे. या-विरहित कोणी वीर पुरुष दिसत असेल, शस्त्राच्या आधारावर त्याच्या वीरत्वाचें प्रदर्शन होत असेल, तर हा देखील भित्रेपणा च होय. त्याला आत्म्याचे शक्तीचा अनुभव नाहीं म्हणून तो शस्त्रांचा आधार घेतो.

### निर्भयतेसाठीं मनपरिवर्तनाची गरज

जगाला निर्भय करण्यासाठीं आपण आपल्याला निर्भय केलें पाहिजे. हें कार्य शस्त्रास्त्रांची वाढ करून होऊं शकत नाहीं. किंबहुना याच्या विरुद्ध दिशेनें जाण्यानें होईल. 'विरुद्ध दिशेनें जाण्याचा' अर्थ कोणी एवढा च करील कीं 'आपल्याला शस्त्रास्त्रांचा त्याग करण्याचा कार्यक्रम सुरू केला पाहिजे' तर तें बरोबर होणार नाहीं. शस्त्रास्त्रत्यागाच्या या बाह्य कार्यक्रमानें निर्भयता येणार नाहीं. निर्भयतेसाठीं मानवावर आजवर झालेल्या संस्कारांत बदल करावा लागेल. जर आपण आजच्या मनोवृत्तीला प्रमाण मानून पुढें चालूं लागलों तर आजकालच्या युगांत निर्भयता उत्पन्न करूं शकत नाहीं. मग तर आपण विवश आणि व्याकुळ होऊं. आपली व्यवस्था अस्थिर होईल. म्हणून आपल्याला 'मनांत' परिवर्तन करावें लागेल. नवीन मानव निर्माण करावा लागेल. नवीन मूल्यांची स्थापना करावी लागेल. आणि आपलें जीवन बदलावें लागेल.

### नवीन शब्द आणि जीवनांत परिवर्तन

मीं असें ऐकलें कीं आवडी येथें एक प्रस्ताव झाला आणि एक शब्द Socialistic pattern of society मिळाला. मला खूप आनंद झाला. कारण ज्या लोकांना शब्दाची आवश्यकता होती आणि जे आपल्याला शब्दविहीन समजत होते त्यांना शब्द मिळाला. आतां शक्ति वाढेल. परंतु या शब्दानें शक्ति वाढेल किंवा नाहीं याची प्रचीति या शब्दाचें उच्चारण केल्यानंतर याचा उच्चार करणारा किंवा मान्य करणाऱ्यानें स्वतःच्या जीवनांत कांहीं परिवर्तन केलें वा नाहीं यावर अवलंबून आहे.

या प्रस्तावापूर्वीं माझें जें जीवन होतें तसें च जर प्रस्तावानंतर हि चालू राहिलें तर या शब्दानें हिंदुस्थान आणि इतर जग यांत कांहीं चमत्कार घडून येऊं शकेल अशी मी आशा करूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत तर मग हा असा शब्द होईल कीं जो प्रचलित स्थितीशीं आपल्याला जमवून घेईल. याचा अर्थ आपल्याला रक्षणारा उरणार नाहीं. जगांत असे कांहीं शब्द असतात कीं जे मानवाचें रक्षण करतात; पण निर्भयता आणीत नाहींत. तसा च हा देखील एक शब्द होईल. जरी यानें जगांत सुखाची प्रेरणा निर्माण होईल, सुखाची समृद्धि होईल, तरी निर्भयता निर्माण होणार नाहीं. म्हणून च आपला पहिला कार्यक्रम हा च कीं आपल्या मनांत परिवर्तन आणि दुसरा म्हणजे आपल्या जीवनांत परिवर्तन. मीं तर आपल्यासमोर एक क्षुल्लकशी कसोटी ठेवली आहे. आणि मी असें मानतों कीं या च कसोटीवर आपण आपला कस लावून घेतला पाहिजे. मी स्वतःला विचारीन कीं जेव्हांपासून हा शब्द आला तेव्हांपासून माझ्या जीवनांत किती फरक झाला? मी असा दावा करूं शकत नाहीं कीं जीवन बदलण्यासाठीं मला या शब्दाची आवश्यकता नाहीं. माझें जीवन परिपूर्ण आहे आणि या शब्दाच्या येण्याजाण्यानें यांत फरक करण्याची मुळीं सुद्धां आवश्यकता नाहीं. जर एक नवीन शब्द मिळाला आहे तर माझ्या जीवनांत लगे च परिवर्तन व्हावयास

पाहिजे. ही एक कसोटी मी मानतों. मग या शब्दाचा परिणाम जगावर होऊं शकतो.

## आमची कसोटी स्वयंशासन

आज भारतांत अनेक व्यक्ति म्हणतात कीं आम्हांला शांति पाहिजे. आमचे पुढारी शांतीच्या बाजूनें बोलतात. याचा मी गौरव करतों. आणि हें उचित हि आहे. भारत शांतीच्या पक्षांत आहे असें मानलें जातें. नीति-विशारद आणि तत्त्वज्ञानी असे आमचे राजाजी धैर्यानें जगाच्या समोर कांहीं गोष्टी मांडीत आहेत. जगाला ते सांगत आहेत कीं त्याला कोणत्या दिशेनें जायला पाहिजे, काय करायला पाहिजे.

ज्यामुळें समाजजीवनांतें हिंसक बुद्धि नष्ट होऊन समाजजीवनाचा आधार अहिंसा होईल, यासाठीं आपण आपल्या देशांत शक्ति पैदा करण्याच्या दृष्टीनें कांहीं कार्य करीत आहां का याचा आपण विचार केला पाहिजे.

याची कसोटी ही च होईल कीं समाजांतील लोक स्वयंशासित होतील. कांही विचारांचें शासन कबूल करूं आणि आपल्याला त्या शासनांत बांधून घेऊं. स्वयंशासित होण्याच्या मार्गावर आपण पावलें टाकीत आहोंत किंवा नाहीं ही च आमची कसोटी मानली जाईल.

## आक्रमणकारी अहिंसा

आज अमेरिकेच्या मनांत रशियाबद्दल भीति आहे आणि रशियाचे मनांत अमेरिकेबद्दल. आमच्या मनांत पाकिस्तानविषयीं कांहीं भय आहे, तसें च पाकिस्तानला आमचें भय आहे. सारांश, लहान असोत वा मोठे परंतु सर्व च देश एकमेकांना भीत आहेत. अशा स्थितींत कोणी देश निडर होऊं शकतो काय? होऊं शकतो. राजाजींनीं म्हटल्याप्रमाणें ‘ युनिलॅटरल ॲक्शन ’ म्हणजे आपल्या बाजूनें आक्रमणकारी अहिंसा. आपण अहिंसेनें आक्रमण करावें. जसें हिंसेनें आक्रमण होत असतें तसें च अहिंसेचें हि. आज जरी नाहीं तरी कमींत कमी दहा वर्षांत साऱ्या शस्त्रास्त्रांचा परित्याग कसा होईल या दिशेनें आपण आपल्या देशाला घेऊन जाऊं शकतों अशी

हिंमत आपण आपल्या देशांत निर्माण करूं शकतों. या दिशेनें कार्य करून आपण जगाला मार्ग दाखवूं शकतों. आपल्या नैतिक शक्तींनें जगांत शांति प्रस्थापित होऊं शकते.

## विज्ञानाची दिशा

विज्ञानाचे शोध बंद करतां येतील असें मला वाटत नाहीं. ते बंद करण्याची आवश्यकता आहे असें मी समजत नाहीं. ते नैतिक शक्तीचे मार्गदर्शनानें चालावे इतकें च मला वाटतें. विज्ञान एक शक्ति च आहे. त्यांत बुद्धि नाहीं. शक्तीनें बुद्धीचे ताब्यांत असलें पाहिजे. ही व्यवस्था जर झाली तर शक्ति किती हि वाढल्या तरी त्यामुळें संकट येऊं शकत नाहीं. उलट फायदा च होतो. म्हणून च आम्ही अहिंसा इच्छितों. दहा वर्षांपासून मी जप करीत आहें कीं अहिंसेच्या विरुद्ध कोणती गोष्ट असेल तर ती हिंसा नाहीं; आमचे मनाची भयभीत स्थिति. ह्या भयाला जर आम्ही नष्ट करूं तर अहिंसा टवटवीत होईल. या विज्ञानयुगांत दोन च मार्ग आहेत. आम्हीं विज्ञान वाढूं द्यावें किंवा बंद करावें. विज्ञान जर आम्हीं बंद केलें तर कांहीं थोडी हिंसा पण चालेल. तसें प्रत्येक स्थितींत हिंसेनें नुकसान तर होतें च तथापि पूर्वींचे काळांत त्यापासून थोडा फायदा हि होत होता. कारण त्या वेळीं हिंसेला मर्यादा होती. त्याचें प्रमाण लहान होतें. त्या वेळीं विज्ञान इतकें वाढलें नव्हतें. म्हणून त्या वेळचे साधुपुरुष सुद्धां हिंसेचा उपयोग करीत असत. जगाच्या कल्याणाकरितां हिंसेचा उपयोग करणारे किती साधुपुरुष होऊन गेले. परंतु आज जर विज्ञानाची वाढ व्हावी असें आम्ही इच्छितों तर हिंसेला बंद करावें च लागेल. कोणत्या हि परिस्थितींत विज्ञान तर वाढेल च परंतु आम्ही जर हिंसेला बंद करूं तर तें कल्याणाकडे वाढत जाईल; नाहीं तर विनाशाकडे तें जाईल.

## एक च मार्ग

म्हणून आम्हांला नैतिक शक्ति वाढवावी लागेल. परमेश्वरानें हिंदुस्थानची स्थिति अशी केली आहे कीं येथें नैतिक शक्ति वाढूं शकते; दुसरी नाहीं. आमचा इतिहास आणि संस्कृति ह्यांनीं आम्हांला कांहीं शक्ति दिली आहे.

कांहीं मर्यादा पण उत्पन्न केल्या आहेत. हें सर्व आणि हिंदुस्थानची लोक-संख्या पाहून मी असें म्हणूं शकतों कीं आजचे परिस्थितींत हिंदुस्थानला एक तर नैतिक शक्ति वाढविली पाहिजे किंवा निस्तेज झालें पाहिजे. आमचेसमोर हा च रस्ता आहे. म्हणून मी वारंवार सांगत असतों कीं आम्हांला नैतिक शक्ति वाढवावी लागेल, त्या दिशेनें काम करावें लागेल. मी कांहीं ग्रंथ वाचतों, कांहीं शब्दांचा जप करतों. यापासून कांहीं मानसिक शक्ति मिळूं शकते. परंतु तेवढ्यानें च काम होणार नाहीं. जेव्हां आमचे समाजांतील अत्यंत महत्त्वाचे मोठमोठे प्रश्न सुटतील तेव्हां च काम होईल. ते सुटल्याशिवाय मान व डोकें वर काढूं शकत नाहीं. असले प्रश्न आम्ही शांतीचे मार्गानें, प्रेमानें किंवा अहिंसेची शक्ति लावून सोडविले पाहिजेत.

## भूदानाचा इतिहास

ह्या च बाबतींत विचार करतां करतां मला भूदानयज्ञ सुचला. खरोखर च ती गोष्ट मला अनायासें सुचली. परंतु त्याबद्दल मी कैक वर्षांपासून चिंतन करीत असें. आतां मी आपल्याला थोडा इतिहास सांगणार आहें. गांधीजींचे प्रयाणानंतर मी निराश्रितांची व मेव लोकांची सेवा करण्या-करितां दिल्लीस गेलों. तेथें कांहीं अनुभव आले. त्यांत हरिजन हि पुष्कळ होते. हरिजनांनीं जमिनीची मागणी केली. त्यांना जमिनी मिळाल्या पाहिजेत ह्याबद्दल कांहीं चर्चा झाली. त्यांची मागणी मंजूर होत नव्हती. शेवटीं पंजाब सरकारकडून हरिजनांकरितां कांहीं लक्ष एकर जमीन देण्याचें आश्वासन दिलें गेलें. हें आश्वासन राजेंद्रबाबू आणि इतर सज्जन–ज्यांत मी हि एक होतों–यांचेसमोर देण्यांत आलें होतें. तो शुक्रवारचा दिवस होता. त्यानंतर मला प्रार्थनेकरितां राजघाटावर जावयाचें होतें. तेथें मीं जाहीर केलें कीं पंजाब सरकारनें हरिजनांकरितां जमीन देण्याचें कबूल केलें आहे. म्हणून मी पंजाब सरकारचें अभिनंदन करतों.

परंतु त्यानंतर एक दोन महिन्यांनीं हें होऊं शकत नाहीं असें ऐकायला आलें. त्याचीं पुष्कळ कारणें असतील. पण त्यामुळें हरिजन फार दुःखी झाले. रामेश्वरी नेहरूंना तर तीव्र वेदना झाल्या. त्या माझेकडे येऊन

म्हणाल्या, ' हरिजन सत्याग्रह करूं इच्छितात, तर त्यांना सत्याग्रह करूं द्यावा. त्यांना जमीन न देण्याकरितां पाकिस्तानमधून जे निराश्रित आले आहेत त्यांचेपैकीं ज्यांचेजवळ तेथें जमीन नव्हती त्यांना येथें हि दिली जाणार नाहीं असा युक्तिवाद करण्यांत आला होता. ज्या तऱ्हेनें तेथें ते राहत होते त्या च प्रमाणें येथें राहूं शकतात. तसें म्हणाल तर आमचेजवळ जमीन कमी आहे म्हणून तेथें ज्यांचेजवळ जितकी जमीन असेल तितकी आम्ही येथें देऊं शकत नाहीं, थोडी कमी च देऊं. म्हणून ज्या हरिजनांना तेथें मुळीं च जमीन नव्हती त्यांना जमीन देणें हा एक प्रकारें अन्याय होईल.' हा युक्तिवाद मजबूत कीं कमजोर होता ह्या वादांत मी पडूं इच्छीत नाहीं. परंतु इतकें तर खरें कीं जो एक करार केला होता, वचन दिलें गेलें होतें, तें तुटलें. मी मोठ्या विचारांत पडलों. मीं हरिजनांना म्हटलें कीं देशाचे आजचे परिस्थितींत आपल्याला सत्याग्रह करण्याचा सल्ला मी देऊं शकत नाहीं. ह्या प्रश्नाबाबत मी आतां आपल्याला मदत देऊं शकत नाहीं याचें मला दुःख होत आहे. परंतु माझे मनांत ही गोष्ट, ही सुप्त भावना, कीं भूमिहीनांना जमीन मिळेल अशी युक्ति सुचली पाहिजे, ही राहिली. ह्या च सुप्त भावनेला तेलंगणांत संधि मिळाली आणि एक आंदोलन सुरू झालें.

## भूदानानें देशाची नैतिक शक्ति वाढेल

हा एक मूलग्राही प्रश्न आहे. हिंदुस्थानांत तर आहे च पण आशियाचे इतर देशांत सुद्धां आहे. हा प्रश्न जर आम्हीं अहिंसात्मक प्रकारानें सोडवूं तर त्यामुळें अहिंसेची शक्ति, नैतिक शक्ति वाढेल. ह्या च दृष्टीनें मीं भूदानाकडे पाहिलें आहे. ह्याचे किती तरी निरनिराळे भाग आहेत. हा एक कठीण प्रश्न आहे. ह्यांतून आर्थिक प्रश्न हि उद्भवतात. मी धीरे धीरे त्याचें चिंतन करीत गेलों. प्रथम भूदान-यज्ञानें भूमिहीनांना जमीन मिळते एक प्रश्न सुटला. ह्या कामाला जितकें महत्त्व आहे त्यापेक्षां एक प्रकार हातांत आला ह्या गोष्टीचें जास्त महत्त्व आहे. अहिंसेची शक्ति उत्पन्न करण्याची एक युक्ति आमचे हाताला लागली. ह्या युक्तीला हातांतून सुटूं देतां कामा नये, त्याचा पुरा उपयोग केला पाहिजे. ह्यामुळें अहिंसेच्या

शक्तीवर विश्वास बसेल आणि त्याचा परिणाम हिंदुस्थानांत आत्मविश्वास, आत्मनिष्ठा उत्पन्न होईल. मग दुनियेवर त्याचा परिणाम होऊं शकेल. मग आम्ही हिंमतीनें म्हणूं शकूं कीं भारताचे नैतिक शक्तीचा उपयोग दुनियेला वांचविण्याकरितां होऊं शकतो. ह्या च दृष्टीनें त्याकडे पहावें.

माझेसमोर एक दृश्य च आहे. मी वारंवार म्हणतों. तें मी डोळ्यांनीं च पाहतों. कारण आतां आम्हांला दोन वर्षांचा वेळ आहे म्हणून मी असें म्हणतों. ह्या दोन वर्षांत जमिनीचा प्रश्न थोडा सुटेल. एक उपाय उत्पन्न होईल. जसें मीं म्हटलें कीं सहावा हिस्सा मिळावा, ही मोठीशी मागणी नाहीं. इतकें च जरी झालें तरी त्यामुळें आमची शक्ति वाढेल. इतर कोणत्या हि दृष्टीनें याचेकडे पाहूं नका. ह्यांत आपल्या पक्षाचा काय फायदा होऊं शकतो, व्यक्तिशः फायदा काय होऊं शकतो, ह्या तऱ्हेनें न पाहतां केवळ भावनेच्या दृष्टीनें ह्याकडे पहावें. ह्यापासून अहिंसेची शक्ति वाढेल, विश्वशांतीला मदत मिळेल. ह्या च भावनेनें देशाच्या सर्व शक्ति दोन वर्षां-करितां लावाव्या. समजा कीं ह्या प्रश्नाचा निकाल ह्या दोन वर्षांत लागला तर सारी दुनिया कबूल करील कीं अहिंसेची शक्ति सामाजिक क्षेत्रांत दिसून आली. त्याचा परिणाम हिंदुस्थानचे इतर प्रश्न हि अशा च तऱ्हेनें सुटूं शकतील असा होईल.

### भूदानापासून नवीन उत्साह

अलीकडे जे आमचे मित्र रचनात्मक कार्यांत लागले आहेत आणि माझा सल्ला घेतात, तर मी त्यांना सांगतों कीं सारें रचनात्मक काम फांद्यांचें ज्ञान आहे. त्या फांद्या आहेत आणि हा तर मूलग्राही विचार आहे. ह्या मुळाला जर आम्ही पकडून ठेवूं तर ह्याचे आधारावर बाकीचीं सारीं रचनात्मक कामें आणि सर्वोदयविचार पसरतील आणि त्यांना फळें येतील. नाहीं तर चार वर्षांपूर्वीं सर्व रचनात्मक कार्यकर्त्यांमध्यें निराशा पसरली होती हें आपण जाणत च आहांत. ह्यापासून कांहीं होणार नाहीं असें ते समजत होते. गांधीजींचा विचार आतां आमचेसमोरून तर नाहींसा झाला. पुढें कधीं तो येईल तर येऊं शकतो. परंतु आमचेकडून आतां कांहीं होणार नाहीं. कांहीं लोकांनीं तर मला येथपर्यंत म्हटलें कीं 'आम्ही ही प्रार्थना

वगैरे सोडणार नाहीं कारण कीं ती संवय झाली आहे.' परंतु आम्हीं समजतों कीं ह्या गोष्टी हिंदुस्थानांत चालणार नाहींत. परंतु आज चार वर्षांनंतर मी पाहतों कीं नैराश्य राहलें नाहीं आणि देशांत उत्साह आला आहे. आम्हीं जर या उत्साहाचा योग्य उपयोग केला आणि ह्या दृष्टीनें ह्याचेकडे पाहिलें तर यापासून देशांत एक मोठी गोष्ट होईल असें मला वाटतें.

## दानपत्र हें विश्वशांतीकरितां मत देणें आहे

जेव्हां मीं 'जो भूदानांत प्रेमानें आणि समजून उमजून जमीन देईल त्याचें दान विश्वशांतीकरितां मत होईल' असें म्हटलें तेव्हां एका पत्रानें त्यावर टीका करून लिहिलें कीं 'केव्हां केव्हां विवेकी पुरुषांचा सुद्धां विवेक सुटतो आणि ते उत्साहांत किंवा आंदोलनाचे प्रवाहांत वाहून गेल्यामुळें कांहीं अशा गोष्टी बोलतात.' विनोबानें म्हटलें कीं भूदानानें विश्वशांति स्थापन होऊं शकते. परंतु विश्वशांतीशीं भूदानाचा संबंध काय आहे ? हें तर असें च झालें कीं जसें गांधीजींनीं म्हटलें होतें कीं, 'अरे दुर्दैव्यांनो, हा जो भूकंप झाला, तो तर तुमचे आमचे सर्वांचे पापाचें फळ आहे. आणि तें पाप आहे अस्पृश्यता. म्हणून ती नष्ट करणें आमचें कर्तव्य आहे.' जशी गांधीजींनीं भूकंपाशीं अस्पृश्यता जोडून दिली त्या च कोटीचें विनोबाचें हें वाक्य आहे. ह्या भूकंपासंबंधींच्या गोष्टींत मी पडूं इच्छीत नाहीं. त्यांत सुद्धां कांहीं रहस्य आहे किंवा नाहीं हा एक गहन विचार आहे. तथापि मी नम्रतापूर्वक म्हणूं इच्छितों कीं माझें म्हणणें भूकंपासंबंधींच्या म्हणण्याचे कोटीचें नाहीं.

## भारताची शक्ति : नैतिक शक्ति

तेव्हां आतां हिंदुस्थानांत आशा उत्पन्न झाली आहे. एक तर हिंदुस्थानचा इतिहास आणि पुन्हा गांधीजींनीं आम्हांला, ज्यांनीं आमच्या स्वराज्यप्राप्ति वगैरे सर्व माहितींतल्या गोष्टी हांशील झाल्या तो प्रकार शिकविला. तशा तर स्वातंत्र्याकरितां लढाया दुनियेंतील इतर देशांत झाल्या. परंतु आमचा आपला एक वेगळा प्रकार होता. आणि परमेश्वर-

कृपेनें जें आम्हांला नेतृत्व लाभलें त्या सर्व गोष्टीमुळें हिंदुस्थानचा आवाज आज सुद्धां दुनियेंत कांहीं काम करीत आहे. दुनियेला आकार देण्याची शक्ति आमच्यांत आहे. आणि असा अहंकार हि ठेवायला नको असें मी म्हणूं शकत नाहीं. परंतु आज हिंदुस्थानचा आवाज कांहीं काम करूं शकतो हें स्पष्ट आहे. तो नैतिक आवाज च आहे. नाहीं तर हिंदुस्थानांत आज कोणती शक्ति आहे? भौतिक शक्ति आमच्याजवळ काय आहे? आमचें सैन्य किती लहान आहे. दुसऱ्या मोठमोठ्या देशांजवळ जो सर्व शस्त्रसंभार आहे, त्याचे तुलनेंत आमची शक्ति कांहीं च नाहीं. आज हिंदुस्थानजवळ पुष्कळ संपत्ति हि नाहीं. हां, हळूं हळूं वाढूं शकेल. सारांश, आमचेजवळ न भौतिक शक्ति न संपत्ति. तशा परिस्थितींत जर आमचा कांहीं ना कांहीं आवाज ऐकला जातो तेव्हां ह्याचें कारण येथें नैतिक शक्तीचा थोडासा प्रभाव झाला, ह्याशिवाय कोणतें असूं शकतें? आम्ही जर हा मुख्य प्रश्न शांतीचे प्रकारानें सोडवूं तर ही शक्ति पुष्कळ वाढेल.

### जगाचे डोळे भारताकडे

शेवटीं जगाचे लोक हें काम पहाण्यासाठीं काय म्हणून येतात? मीं तर कधीं च कांहीं प्रचार केला नाहीं. मीं कधीं च इंग्रजींत कांहीं लिहिलें नाहीं, न कधीं परदेशांशीं माझा पत्रव्यवहार झाला. परंतु आतां तर गोष्ट पसरली. काय म्हणून पसरली? कारण कीं ह्यांत अशी एक वस्तु आहे कीं त्यामुळें जगाला विश्वास वाटतो. आज जगाला तहान लागलेली आहे. आज जगांतील इतर देशांत सुद्धां असे प्रश्न पडले आहेत. ते शस्त्राशिवाय सुटूं शकत नाहींत अशी भावना प्रत्येक देशाची झाली आहे. अशांति तर कोणाला च नको. तथापि सर्व देश अगतिक होऊन शस्त्रास्त्रें वाढवीत आहेत. ह्यापासून सुटण्याची कांहीं युक्ति सांपडली तर दुनियेला ती पाहिजे. म्हणून त्यांना ही शंका येते कीं भूदानांतून अशी शक्ति उदयास येण्याचा संभव आहे. आतां तर येथें कोणतें मोठें काम झालें नाहीं. थोडकें च झालें, परंतु जें झालें तें एक विशिष्ट तऱ्हेनें झालें आहे. म्हणून दुनियेला ह्यांत कांहीं गर्भित शक्ति असावी असें वाटतें. त्याकरितां आपण—मी सर्व भाऊ भाऊ म्हणून ह्याला हातांत घेतलें, लोकां-

जवळ पोहोंचलों, आणि प्रेमानें जमीन मागितली तर किती काम होईल. आम्हांला कोणाला धमकी देऊन मागावयाचें नाहीं. प्रेमानें च मागावयाचें आहे. एक दोन ठिकाणीं मीं धमकावण्याची गोष्ट ऐकली तर म्हटलें कीं धमकावण्यानें च जर काम झालें असतें तर माझी काय आवश्यकता होती? ते करणारे बहादुर दुनियेंत पुष्कळ आहेत. त्याकरितां आम्हांला गांवो-गांवीं फिरण्याची काय आवश्यकता आहे? म्हणून आम्हीं तर लोकांना प्रेमानें, समजावून म्हटलें पाहिजे कीं यामुळें विश्वशांतीची स्थापना होईल, विश्वशांतीकरितां सहावा हिस्सा दान द्यावा.

## पूर्ण विचारानें दिलेलें दान च ग्राह्य

अशा तऱ्हेनें थोडी दूरची, विश्वव्यापक दृष्टि ठेवाल तर काम होईल. नंतर आजच्या लहान लहान गोष्टी, पक्षभेद असतात त्यांना आपण विसरूं. खरोखर त्यांची पण कांहीं किंमत आहे. परंतु ह्या वेळीं आपण जर तें थोडें विसरलों तर एक मोठी गोष्ट होऊं शकते. मीं जेव्हां ऐकलें कीं एक-दोन ठिकाणीं कांहीं कार्यकर्त्यांनीं कोणाला धमकी देऊन म्हटलें कीं दान जर देणार नाहीं तर तुमचें भलें होणार नाहीं. तेव्हां बिहारमध्यें मुंगेरच्या सभेंत—जी सर्व मोठ्या सभांपैकीं एक होती—मीं जाहीर केलें कीं आपल्याला कोणीं धाकदपटशा दाखवून जर जमीन मागेल तर आपण कदापि देऊं नये. अशा रीतीनें मी जमिनीचा लहान तुकडा सुद्धां घेऊं इच्छीत नाहीं. जें कांहीं मिळेल तें पूर्ण विचारानें मिळालें पाहिजे. तेव्हां च त्याची किंमत आहे. हें ध्यानांत ठेवून आपणां सर्वांना काम करायला पाहिजे.

## सत्याचा अधिकार

ह्या वेळीं कॉंग्रेसकडून मला एक पत्र आलें. त्यांत कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशनाला उपस्थित राहण्याचें निमंत्रण होतें. अशा तऱ्हेनें दरवर्षी निमंत्रण येत असतें. मी तर जाऊं शकत नाहीं. तरी हि त्याचें कांहीं विशिष्ट पद्धतीचें उत्तर देण्याची पण प्रेरणा होत नाहीं. ह्या वेळीं सुद्धां असें च होतें. कोणत्या विशेष सभ्यतेचें बंधन तर मीं पाळलें नाहीं. आणि गांधीजींची संगत असून सुद्धां मी असभ्य च राहिलों. परंतु ह्या वेळीं असें झालें कीं

जेव्हां आवडीला काँग्रेसचें अधिवेशन होणार होतें, त्या वेळीं एक गृहस्थ जे आवडीला जाणार होते, ते मध्यें च मला भेटायला आले. मला वाटलें कीं ईश्वरी संकेत आला आणि मला उत्तर देण्याची संधि मिळाली. म्हणून मीं एक पत्र लिहून पाठविलें. त्यांत एक वाक्य हें होतें कीं, " एक गृहस्थ आपण त्याचे मदतीला कधीं ना कधीं धांवून याल या आशेनें फिरत आहे. तो आपली मदत मिळविण्याचा हक्कदार आहे." असो. त्याचे उत्तरांत ढेबरभाईनीं म्हटलें कीं, " विनोबांना अशा तऱ्हेनें आमचेपासून मदत मिळण्याचा काय हक्क आणि काय अधिकार आहे ? " आतां पहिल्यांदा च मी ह्या सभेंत येत आहें, अशा मनुष्याला येथल्या लोकांकडून मदत मिळविण्याचा काय अधिकार असूं शकतो ? परंतु अधिकार आहे तो सत्याचा अधिकार आहे आणि तो सर्वांना कबूल करावा लागेल.

## परमेश्वराचें दर्शन

हिंदुस्थानांत आज भूमीची वांटणी विषम आहे. भूमिहीनांचा भूमीवर हक्क आहे हें सर्वांना कबूल करावें लागेल. मीं हा विचार वारंवार सांगितला आहे. आणि ह्या सभेंत हि फिरून सांगतों. कारण कीं तो माझा जपण्याचा मंत्र आहे कीं ज्याप्रमाणें हवा, पाणी आणि सूर्यप्रकाश परमेश्वरानें उत्पन्न केलीं आहेत आणि तीं सर्वांकरितां आहेत त्या च प्रमाणें जमीन पण परमेश्वरानें उत्पन्न केली आहे आणि ती सर्वांकरितां आहे. परमेश्वर च तिचा मालक होऊं शकतो, मनुष्य नाहीं. जो मनुष्य स्वतःला तिचा मालक समजतो तो परमेश्वराचा विरोध करतो. मी लोकांजवळ जातों तेव्हां हें च समजावितों. कोणत्या घरीं जर वृद्ध मनुष्य असेल तर मी त्याचा मुलगा होतों आणि म्हणतों कीं आपल्याला चार मुलें आहेत, तर मी पांचवा आहें; आणि आपल्याला पांच मुलें आहेत तर मी सहावा आहें. कोणत्या घरीं तरुण भाऊ च आहेत तर मी म्हणतों कीं मी आपला एक भाऊ आहें; मला स्वतःचा हक्क द्यावा.

एक गोष्ट आठवत आहे. मी एका मुसलमान बंधूच्याकडे जमीन मागायला गेलों होतों. त्याचेजवळ बरी च जमीन होती. आणि त्यानें कांहीं देण्याचें हि

कबूल केलें होतें. मीं त्याला समजाविलें कीं सहावा हिस्सा दिला पाहिजे. त्यानें विचारलें आपला सिद्धान्त काय आहे ? मीं समाजाविलें कीं, ' बहुधा प्रत्येक घरीं पांच भाऊ असतात असें मी समजतों. म्हणून मी स्वतःला सहावा भाऊ समजून सहावा हिस्सा मागतों. ' त्यानें म्हटलें, ' अगदीं बरोबर. आमचे घरीं आम्ही पांच च भाऊ आहोंत. परंतु आम्हां मुसलमानांत बहिणींना हि हक्क असतो. आम्हांला दोन बहिणी आहेत. ' जेव्हां ही गोष्ट त्याचे मुखांतून बाहेर पडली तेव्हां मीं त्याचे चेहऱ्याकडे पाहिलें. मला त्याचे चेहऱ्यांत अल्लाचें दर्शन झालें. त्या च क्षणीं मीं म्हटलें कीं, ' आपली गोष्ट मला कबूल आहे. आपण सात बहीण-भाऊ आहांत, तर मी आठवा झालों. मला आठवा हिस्सा द्यावा. ' त्यानें पण तें लागली च कबूल केलें आणि आठवा हिस्सा देऊन टाकला.

ही गोष्ट मीं ह्याकरितां सांगितली कीं हिंदुस्थानचें अंतःकरण किती पवित्र आहे हें ह्यावरून कळून येतें. मी सांगूं इच्छितों कीं मी अत्यंत कठोर अंतःकरणाचा आहें. माझेवर कोणाचे मृत्यूचा परिणाम होत नाहीं आणि न कोणाचे जन्माचा आनंद. कोणी आजारी झाला तर मला फार चिंता वाटत नाहीं. परंतु भूदानयज्ञांत जे अनुभव आले त्यानें मी अत्यंत कोमल झालों आहें. माझें अंतःकरण फार च थोड्यानें द्रवतें. मला भक्तीचा लाभ झाला. जी भक्ति मला एकान्तचिंतनानें आणि ध्यानसाधनानें लाभली नाहीं ती ह्यांत मिळाली. माझें हृदय कोमल आणि नम्र झालें. पुष्कळ च पवित्र अनुभव आले. लोकांचे चित्तशुद्धीचें दर्शन झालें. तर लक्षांत आलें कीं आपले देशांत एक शक्ति आहे. ती कोठून आली हें समजण्याकरितां इतिहासाकडे जावें लागेल. परंतु दिसून येतें कीं देशांत एक शक्ति आहे. त्याचे आधारावर आम्ही आपल्या देशाला मजबूत करूं शकूं. परमेश्वरकृपेनें आमचे देशांत दुसऱ्या शक्ती कमी आहेत.

**प्रत्येकजण देणारा आहे**

**' मै अरु मोर, तोर तैं माया '** मी—माझें आणि तूं—तुझें ही सर्व माया आहे. ही गोष्ट हिंदुस्थानचे कोनाकोपऱ्यांत पोंहचली आहे. येथपर्यंत कीं

ही भावना हिंदुस्थानचे स्त्रियांपर्यंत पोंहचली आहे. ते मानतात कीं आमचें जें जीवन चाललें आहे तें मिथ्या आहे आणि विनोबा म्हणतो त्याप्रमाणें मालकी हक्क चूक आहे, भूमीवर सर्वांचा हक्क आहे ही गोष्ट बरोबर आहे. मला आजपावेतों एक हि मनुष्य ज्यानें याचें खंडन केलें असा मिळाला नाहीं. मोहामुळें कोणी देणार नाहीं हें वेगळें. मला वाटतें जो आज देणार नाहीं तो उद्यां देणार आहे, म्हणून देत नाहीं. कोणी आज मेला नाहीं म्हणून मला पक्का विश्वास आहे कीं तो उद्यां मरणार आहे. म्हणून ज्यानें आज दान दिलें नाहीं तो उद्यां देणार आहे असा मला अंतःकरणांत भरंवसा आहे. ह्याकरितां दान घेणें योग्य आहे. हिंदुस्थानचें अंतःकरणांत च ही गोष्ट आहे.

## दोन वर्षांचा वेळ द्यावा

म्हणून आपल्याला माझें मागणें आहे कीं आपण पुढलीं दोन वर्षें ह्याकरितां द्यावींत म्हणजे ह्याचा प्रभाव दिसून येईल. मी प्रत्येकापासून दोन वर्षांची मागणी करीत आहें. एका मित्रानें मला विचारलें कीं ' आपण म्हणतां कीं सर्व सोडून ह्यांत यावें तर काय सर्व सोडावयाला पाहिजे ? ' मीं म्हटलें कीं, ' लेटर किलेथ स्पिरिट सेवेथ ' थोडा बुद्धीचा उपयोग करायला पाहिजे. ह्याचा अक्षरार्थ न घेतां भावार्थ घेतला पाहिजे. भावार्थानें मी म्हणूं इच्छितों कीं आम्ही जितकीं कामें आवरून घेऊं तितकें करण्यामध्यें रचनात्मक कामाचें भलें आहे. जेव्हां कोणी रचनात्मक काम करणारे मित्र मला विचारतात कीं काय आम्हीं ह्याकरितां आपलीं सर्व कामें बंद करावींत ? तेव्हां मी नम्रतेनें म्हणतों कीं मित्रा, माझें सर्व तारुण्य, जीवनाचीं तीस वर्षें रचनात्मक कामांत गेलीं तो च मी आपलेसमोर आज म्हणत आहें कीं ही मौलिक गोष्ट हातांत आली तर बाकीचीं सर्व कामें सफल होतील. ह्यांत बुद्धि नाहीं असें समजूं नका, ह्यांत खोल बुद्धीचें काम आहे. ह्यापासून शक्ति उत्पन्न होणार आहे. नाहीं तर आम्हांला विचारीत च कोण होता ! आम्ही खादीची गोष्ट करीत होतों तर आम्हांला कोण विचारीत होते ! परंतु आज विचारतात. त्या च प्रमाणें ' सर्वोदय ' शब्द जेव्हांपासून निघाला तेव्हांपासून लोक म्हणतात कीं हा फार च चांगला शब्द आहे. परंतु आज

उपयोगांत आणतां येत नाहीं. हा विचार उत्तम आहे. परंतु अव्यवहार्य आहे. परंतु आज लोकांना शंका येते आहे कीं हा चांगला कार्यक्रम तर आहे च. कदाचित् व्यवहार्य सुद्धां आहे. त्यांच्यांत ही खात्री, श्रद्धा उत्पन्न झाली आहे कीं ह्या काळांत सुद्धां ह्याला अनुसरून कांहीं होऊं शकतें. माझी अशी इच्छा आहे कीं काँग्रेसनें ह्या कामांत पडावें आणि पक्षातीत दृष्टीनें इतर पक्षांशीं सहकार्य करून ह्याला स्वतःचें काम समजून करावें. तसें पाहिल्यास काँग्रेसवाल्यांनीं बरी च मदत केली आहे. परंतु ह्या कामाला आपले स्वतःचे कार्यक्रम समजून सुव्यवस्थित रीतीनें एक 'टारगेट' ( लक्ष्य ) करून सर्व लोक ह्यांत लागले आहेत असें दृश्य पहावयाला मिळावें अशी माझी प्रार्थना आहे.

## बेदखली नष्ट करण्याचें काम हातीं घ्यावें

ह्याशीं जोडलेली एक गोष्ट आहे. त्या संबंधानें हि थोडें सांगूं इच्छितों. हिंदुस्थानांत जमीन काढून घेणें (बेदखली) वाढत आहे. ह्यांत भूदानाची कांहीं चूक नाहीं. परंतु लोकांचे मनांत भय उत्पन्न झालें आहे कीं कांहीं कायदा होईल. कोणता कायदा आणि केव्हां होणार कोणास ठाऊक? आणि त्याचा परिणाम बेदखलीच्या कारवाया सुरू झाल्या. भूदानावर ह्याची जबाबदारी येते. कारण भूदानानें आम्ही त्यांचेवर प्रभाव पाडूं शकलों नाहीं. म्हणून आम्हीं भूदानांत हा कार्यक्रम कबूल केला आहे कीं ज्या कोणीं दुसऱ्याला बेदखल केलें असेल आणि त्याचा परिणाम तो भूमिहीन होण्यांत झाला तर आम्हीं भूमिवाल्यांचे जवळ जावें आणि त्यांना प्रार्थना करावी कीं आपण भूदानांत जमीन द्यावी कारण कीं जो बेदखली-मुळें भूमिहीन झाला आहे त्याला ती जमीन देऊं शकूं. ह्यामुळें आपलेकडून जी एक चूक झाली ती दुरुस्त होईल आणि शिवाय पवित्रता हि उत्पन्न होईल–दान पण होईल. अशा तऱ्हेनें आम्हीं लोकांना समजावितों. तथापि पुष्कळ ठिकाणीं ह्याचा परिणाम झाला नाहीं. तेव्हां मला भूमिहीनांना सांगावें लागलें कीं तुम्ही आपल्या जमिनीला चिकटून रहा. तुमचें जर म्हणणें खरें असेल कीं तुम्ही त्या जमिनीवर दहा दहा वर्षांपासून काम करीत आहांत तर 'मालक कांहीं हि करो पण सत्याला चिकटून रहा.'

ह्यापासून भूमिहीनांना त्रास होऊं शकतो. परंतु असें म्हणण्याची पाळी मजवर आली आणि अगतिक होऊन मीं असें म्हटलें. म्हणून माझी इच्छा आहे कीं बेदखली थांबवण्याचें काम पण कॉंग्रेसनें हातांत घ्यावें. भूदान-यज्ञ आणि बेदखली नष्ट करणें दोन्ही मिळून एक च काम आहे. त्या च पायावर आम्हांला पुढें काम करावयाचें आहे.

## ग्रामदान

भूदानयज्ञांत एक आश्चर्याची गोष्ट झाली. त्याची आशा लोकांनीं कधीं च केली नव्हती. परंतु मला वाटत होतें कीं तें केव्हां तरी अवश्य होईल. ती गोष्ट—गांवची सर्व जमीन गांवची व्हावी ही आहे. गांवांतील सर्व लोकांनीं सर्व जमिनीचें दान, सर्वस्वदान द्यावें म्हणजे जमीन गांवची होईल, आणि गांवकरी वाटेल तसा तिचा उपयोग करतील. आम्हांला अशीं दानें मिळालीं पाहिजेत असें मी म्हणत असें आणि त्याबरोबर च सहाव्या हिश्शाची मागणी, जी प्राथमिक होती, करीत होतों. आतांपर्यंत शंभरच्यापेक्षां अधिक पूर्ण गांवें दानांत मिळालीं आहेत हें म्हणायला मला आनंद होतो. त्यांत कांहीं लहान तर कांहीं मोठीं आहेत. अशा तऱ्हेनें वातावरण आतां तयार झालें तर काम वाढूं शकतें. ह्यांत जीवनाचें अगदीं नवीन दृश्य दिसूं शकतें. भूदानाबरोबर च संपत्तिदान, कूपदान वगैरे निघालीं आहेत. त्यांना पण आम्हांला पुढें वाढवायचें आहे. प्रत्येक मनुष्याजवळ जी कांहीं संपत्ति आहे त्याचा एक हिस्सा समाजाला देऊन बाकीचे हिश्शाचा उपयोग करावयाला पाहिजे हें तत्त्व मान्य करावयाला पाहिजे. हा एक जीवनविचार आहे.

## अहिंसा आणि कायदा

मी आपल्याला दोन वर्षांची च मागणी करीत आहें. कोणी हि कबूल करील कीं जमिनीचा प्रश्न दहा वर्षांत जरी सुटला तरी लवकर च झाला असें म्हणावें लागेल. आणि मी तर दोन च वर्षांची गोष्ट करीत आहें. दोन वर्षें जोर लावल्यानंतर जें कांहीं शिल्लक राहील तें सरकारकडून होईल. तोंपर्यंत इतकें वातावरण तयार होईल कीं त्यानंतर येणारा कायदा

अहिंसेंत च येईल. त्यापासून कांहीं नुकसान होणार नाहीं. उलट लाभ च होईल. अहिंसेंत शेवटीं कायद्याची मोहोर लागते. ही गोष्ट येऊं शकते. परंतु शेवटीं सुद्धां कायदा थोडा जरी करावा लागला तरी आम्हांला पूर्ण यश मिळालें नाहीं असें आम्ही समजूं. ह्या यज्ञानें च जर हें काम झालें तर पूर्ण यश मिळालें असें मी समजेन. ह्यामुळें जर हा प्रश्न सुटला तर मी नाचेन असें मीं म्हटलें आहे. परंतु ह्यानें बरें च वातावरण तयार झालें आणि नंतर कायदा झाला तरी हि मला आनंद होईल. हा प्रश्न अशा तऱ्हेनें लोकशक्तीनें च सुटावा अशी माझी इच्छा आहे.

कांहीं दिवसांपूर्वीं कम्युनिस्टांशीं बोलण्याची संधि आली होती. त्यांनीं म्हटलें कीं आपलें काम बरोबर चाललें आहे असें आपण समजतां तर आपल्याला यश मिळावें अशी आम्ही सुद्धां आशा करतों. परंतु सरकारवर वजन यावें आणि कायदा व्हावा अशी आमची इच्छा आहे. मीं दबाव आणण्याची आवश्यकता नाहीं असें म्हटलें आहे. सरकारवर दबाव तर आज हि येत आहे. परंतु सरकारवर दबाव आला आणि सरकारी शक्तीनें काम झालें. भूदानयज्ञाचा परिणाम म्हणून सरकारला कायदा करावा लागला तर आपण त्याला पूर्ण यश म्हणाल, पण मी त्याला अर्धें यश समजतों. हा प्रश्न प्रेमानें आणि लोकशक्तीनें सुटला तर माझें यश पूर्ण होईल.

परमेश्वराचे हातानें फलदान होतें. परंतु ज्यानें प्रेरणा दिली तो फलदान हि देतो. ह्या श्रद्धेनें आपल्यापासून मित्र ह्या नात्यानें मदत पाहिजे आहे. आपण अधिकांत अधिक शक्ति ह्याकरितां लावाल तर आपल्या देशांत एक मोठें च महत्त्वाचें कार्य सिद्ध होईल.

ब्रह्मपूर
९–५–'५५

आज एका कार्यकर्त्यानें प्रश्न विचारला कीं सरकारचें स्वरूप कसें असलें पाहिजे ? परंतु हें तर लोकांचे स्थितीवर अवलंबून आहे. समजा कीं कोणा एका कुटुंबांत अगदीं लहान लहान मुलें आणि तरुण आई बाप आहेत. तेथें आईबापांची आज्ञा चालेल. आणि लहान मुलांना त्यांच्या आज्ञेंत रहावें लागेल. हें च त्या कुटुंबाचें स्वरूप असेल. ज्या कुटुंबांत मुलें अगदीं लहान नाहींत, समजूतदार झालीं आहेत, आणि आई बाप प्रौढ असून कांहीं काम करूं शकतात, तेथें दोघांचे सहमतानें काम चालेल. केवळ आईबापांची आज्ञा चालणार नाहीं, त्या कुटुंबाचें स्वरूप असें राहील. आणि ज्या कुटुंबांत मुलें प्रौढ आणि आई बाप अगदीं म्हातारे तेथें मुलें च सारा कारभार पाहतील. आई बाप फक्त सल्ला देतील—त्यांची आज्ञा चालणार नाहीं आणि मुलांच्या बरोबर त्यांचें सहकार्य हि चालणार नाहीं.

**सरकारचें स्वरूप जनतेच्या शक्तीवर अवलंबून**

अशा तऱ्हेनें कुटुंबाचें स्वरूप निरनिराळ्या प्रकारचें होईल. परंतु तिन्ही परिस्थितींत मुख्य तत्त्व प्रेम च राहील आणि त्याला आडकाठी होणार नाहीं, अशा च तऱ्हेनें त्याचे बाह्य स्वरूपांत बदल होईल. जसें कुटुंबाचें मूलतत्त्व प्रेम आहे तसें च समाजाचें मूलतत्त्व ' सर्वोदय ' असलें पाहिजे. ' सर्वोदय ' हा समाजाचें मूलतत्त्व दर्शविण्याला एक उत्कृष्ट शब्द आहे. ज्या समाजांत प्रजाजन अगदीं अडाणी आहेत, त्यांना विचार करण्याची शक्ति प्राप्त झाली नाहीं, त्या समाजाचे सरकारचे हातांत जास्त शक्ति राहील आणि लोक सरकारकडून संरक्षणाची अपेक्षा ज्याप्रमाणें लहान मुलें आई-बापांकडून करतात त्याप्रमाणें ठेवतील. जेथें प्रजेची दशा अडाणीपणाची आहे आणि स्थिति अशक्त, तेथलें सरकार सर्वोदय इच्छिणारें परंतु कल्याणकारी होईल. त्या सरकारला ' मायबाप सरकार ' चें स्वरूप येईल. परंतु जसजशी प्रजेची शक्ति, योग्यता आणि ज्ञान वाढत जाईल, प्रजेमध्यें

सहकार्यांची योग्यता वाढेल, तसतशी सरकारची आवश्यकता कमी होत जाईल. नंतर सरकार हुकूम देणारें राहणार नाहीं, परंतु सल्ला देणारी संस्था होईल. अशा तऱ्हेनें जसजशी जनतेची नैतिक पातळी उंच होत जाईल तसतशी हुकुमाची, हुकूम चालवण्याची शक्ति क्षीण होत जाईल—अधिकार कमी होत जाईल. शेवटीं तर मी आशा करतों कीं अधिकार नाहींसा च होईल.

सर्वोदयाचे शेवटले आदर्शांत मी शासन-मुक्त समाजाची कल्पना करीत आहें. मी 'शासन-हीन' शब्दाचा उपयोग करीत नाहीं. शासनहीनता तर पुष्कळ समाजांत असते. जेथें अन्यायी व अविचारी कारभार चालतो, जेथें कोणत्या हि प्रकारची व्यवस्था नसते, दुष्ट लोक वाटेल तें करूं शकतात, त्या स्थितीला 'शासनहीन' म्हटलें जाईल. असें 'शासनहीन' आमचें आदर्श नाहीं. शासनहीनता नष्ट होऊन 'सुशासन' व्हावें आणि नंतर तें जाऊन शासनमुक्त समाज व्हावा हें मी इच्छितों. शासन-मुक्त समाजांत व्यवस्था राहणार नाहीं अशी गोष्ट नाहीं. त्यांत व्यवस्था तर राहील, पण ती गांवोगांवीं वांटली जाईल. त्यांत शिक्षेची आवश्यकता राहणार नाहीं. समाजांत कांहीं नैतिक विचार इतके मानले जातील कीं ते आचरणांत येतील. समाजांतील लहान लहान मुलांना सुद्धां त्याचें शिक्षण मिळालें असेल. अशा समाजांतील लोक स्वतः होऊन च नैतिक विचारांना मानतील व ह्याप्रमाणें चालतील. तो समाज स्वयंशासित होईल.

## चोरी आणि संग्रह

आज लक्षावधि लोक चोरी करीत नाहींत कारण चोरीविरुद्ध कांहीं कायदा आहे म्हणून, ते चोरी करीत नाहींत असें नव्हे. कायदा आहे तें योग्य च आहे. परंतु 'चोरी करणें अयोग्य आहे' हा नैतिक विचार त्यांना कबूल असल्यामुळें लक्षावधि लोक चोरी करीत नाहींत. जसें चोरी करणें अयोग्य आहे हें मानलें गेलें, म्हणून सर्व लोक चोरी न करणें सहज च मानतात, म्हणून शिक्षेचें किंवा कायद्याचें भय नसलें तरी हि ते बिचारे चोरी करणार नाहींत. ह्या च प्रमाणें लोक 'संग्रहा'ला हि वाईट समजतील, तर ते आपलेजवळ संग्रह करणार नाहींत. कांहीं संग्रह होईल तर ते तात्काळ

वांटून देतील. ज्याप्रमाणें आज समाजांत व्यभिचारी अत्यंत वाईट समजला गेला आहे. लोक त्यापासून बचावण्याची च इच्छा करतात, त्याविरुद्ध कोणता सरकारी कायदा असो किंवा नसो, तरी हि लोकांचे विचारांत व्यभिचार न करणें हा कायदा मानला गेला आहे. ह्या च प्रमाणें 'संग्रह अयोग्य आहे' हा विचार समाजांत मान्य होईल, तर त्या समाजांत 'अपरिग्रह' हि मान्य केला जाईल. तेव्हां आजचे बरेचसे बखेडे सुटतील. 'चोरी करणें पाप आहे' हा विचार योग्य आहे, पण ती एक बाजू आहे. परंतु जेव्हां 'संग्रह करणें पाप आहे' हा विचार हि समाजाला मान्य होईल तेव्हां दोन्ही मिळून पूर्ण विचार होईल. तेव्हां च समाजाचें स्वास्थ्य वाढेल. आज ज्याच्याजवळ जास्त संग्रह आहे, त्याची च समाजांत प्रतिष्ठा असते. परंतु उद्यां अशी स्थिति येईल कीं ज्याचेजवळ जास्त संग्रह आहे त्याची दशा चोराप्रमाणें समजली जाईल.

### सर्वोदय समाजाकडे

ह्याप्रमाणें जेव्हां समाजरचनेचा आधारस्तंभ 'अपरिग्रह' होईल तेव्हां सरकारच्या शक्तीची कमींत कमी आवश्यकता राहील. गांवांतील लोक च आपले गांवचा सारा कारभार पहातील आणि वरिष्ठ सरकार केवळ निमित्तमात्र राहील. तें फक्त सल्ला देणारें सरकार राहील, अधिकार चालविणारें नाहीं. अशा सरकारांत जे लोक राहतील ते नीतिमान, चारित्र्यवान् आणि सदाचारी असतील. म्हणून त्यांचे हातांत नैतिक शक्ति राहील, भौतिक नाहीं. मी अशा तऱ्हेचा च सर्वोदय समाज आणूं इच्छितों. आम्हांला त्या च दिशेनें सर्व प्रयत्न करायला पाहिजे.

### सुशासनाच्या गोष्टी शासनमुक्तीचे पोटांत

अलीकडे 'समाजवादी समाजरचना' किंवा आणखी हि ज्या गोष्टी चालतात ह्या सर्व 'सुशासना'च्या गोष्टी आहेत, शासनमुक्तीच्या नाहींत, कारण त्या शासनमुक्तीचे पोटांत येतात. जसें आईच्या पोटांत गर्भ असतो तेव्हां त्याला आईपासून पोषण मिळतें – त्याला आईपासून पोषण मिळतें हें तो जाणत हि नाहीं – तसें च सर्वोदयसमाजापासून त्याचे गर्भांत असलेल्या समाजवादी समाजरचना वगैरे गोष्टींना पोषण मिळतें. ह्यांत 'अशासन' किंवा 'शासनहीनता'कडून 'सुशासना'कडे आणि सुशासन-

करून शासनमुक्तीकडे जाणें आहे. ह्याप्रमाणें आम्ही एक एक पाऊल पुढें जाऊं. परंतु अंतिम आदर्श जर शासनमुक्ति च असेल तर आम्हांला सुशासन सुद्धां शासनमुक्तीचा रस्ता मोकळा करील. अशा तऱ्हेनें चालवावें लागेल. साधारण असंयमी मनुष्याला गृहस्थाश्रमाचें शिक्षण दिलें तर तो गृहस्थ होतो आणि त्यांत संयम येत असतो; परंतु तो जर का गृहस्थाश्रमांत स्थिर झाला आणि वानप्रस्थाश्रमाकडे गेला नाहीं तर तो पुढें जाऊं शकत नाहीं. तेव्हां तर गृहस्थाश्रम जो संयमाकरितां साधन होता तो बाधक होतो. सारांश, असंयम नाहींसा करण्याकरितां गृहस्थाश्रमाची स्थापना करावी लागेल आणि गृहस्थाला आपलेसमोर वानप्रस्थाचा आदर्श ठेवावा लागेल. गृहस्थाश्रम अशा तऱ्हेनें चालवावा लागेल कीं पुढें केव्हांना केव्हां वानप्रस्थाश्रम घ्यायचा आहे. अशा तऱ्हेनें समाजाचे आजचे स्थितींत आम्हांला एका बाजूनें शासनमुक्तीकडे लक्ष देत असतांना सुशासन चालवायला पाहिजे आणि दुसरीकडे शासनमुक्तीकरितां जनशक्ति संघटित करण्याचा प्रयत्न चालविला पाहिजे.

### आमचा दुहेरी प्रयत्न

म्हणून आम्हांला भूदान-यज्ञांत जनतेची शक्ति जागृत करण्याची इच्छा आहे. जनतेला आपल्या पायावर उभें करावयाचें आहे. दुसरीकडे दारूबंदीकरितां कायदा व्हावा अशी हि अपेक्षा करतों कारण दारूबंदीचे विरुद्ध बरें च लोकमत तयार झालें आहे. अशा परिस्थितींत जर दारूबंदी झाली नाहीं तर देशांत सुशासन होणार नाहीं, दुःशासन होईल, जें शासनमुक्तीकरितां बाधक होईल. म्हणून शासनमुक्ति इच्छीत असतांना सुद्धां आम्ही दारूबंदी कायद्याची मागणी करीत आहोंत. परंतु जमिनीचे बाबतींत आमची इच्छा आहे कीं गांवची सर्व जमीन गांवचे मालकीची व्हावी. अशा तऱ्हेचें वातावरण लोकांत उत्पन्न व्हावें कीं लोक त्याला मान्यता देतील. म्हणून पहिली पायरी म्हणून आम्ही गांवचे सर्व जमिनीचा सहावा हिस्सा मागत आहोंत. माझी इच्छा आहे कीं लोकांनीं, गांवांत कोणीं हि भूमिहीन राहूं नये इतकी जमीन द्यावी. अशा तऱ्हेनें तिकडे आम्ही स्वतंत्र रीतीनें लोकशक्ति संघटित करण्याचा प्रयत्न करतों आणि इकडे शासन सुशासन व्हावें असा प्रयत्न करीत आहोंत.

### कायदा म्हणजे समाप्ति

गांवांतील सर्व जमीन गांवची व्हावी, अशा तऱ्हेचें जर सक्रिय लोकमत झालें म्हणजे लाखों लोकांनीं भूदान दिलें, तर पुढें गांवाची जमीन गांवाचे मालकीची व्हावी अशा तऱ्हेचा कायदा होईल. तो लोकमतानुसार कायदा होईल—तो लोकांना प्रिय होईल, अप्रिय नाहीं. समजा कीं प्रत्येक गांवचे शेकडा ऐंशी लोकांनीं जमीन दान दिली आणि वीस लोक देण्याला तयार नसले, त्यांना मोह पडला म्हणून ते तयार नाहींत, पण त्यांनीं विचार तर पसंत केला च. त्या परिस्थितींत हि सरकारचा कायदा होऊं शकतो. म्हणून इकडे आमचा प्रयत्न तर हा च राहील कीं सारेच्या सारे लोकांनीं हा विचार पसंत करावा म्हणजे सरकारकडे फक्त त्याची नोंद घेणें, त्यावर मोहोर करणें हें च काम बाकी राहील. आम्ही एक अध्याय पूर्ण लिहून टाकतों आणि जिथें लिहिणें समाप्त होतें तेथें शेवटीं 'समाप्त' लिहितों, तसें च जनता एक काम करून टाकते, 'समाप्त' लिहिण्याचें काम सरकारचें असतें. परंतु लोकशक्तीनें अध्याय लिहिण्याचें काम पुरें केलें नाहीं, अध्याय अर्धा च राहिला आणि त्यावर तरी हि सरकारनें 'समाप्त' लिहिलें, तर केवळ तें लिहिल्यानें अध्याय पूर्ण होत नाहीं, पूर्ण लिहिल्यानंतर च तो पूर्ण होत असतो. बाल-विवाह होऊं नये असा अध्याय आम्ही लिहीत होतों, तर तें सरकारनें मध्यें च 'समाप्त' लिहून टाकलें, परंतु तो समाप्त झाला नाहीं आणि आज हि बाल-विवाह चालू च आहेत.

सरकारचें हि एक काम असतें. शेवटचे अवस्थेंत सरकारचें कांहीं काम नसतें, मागच्या परिस्थितींत तें आहे. परंतु आज सुद्धां जनता पहिल्यांदा पुढें जाईल आणि जनतेच्या मागोमाग जाण्याचें काम सरकारचें राहील. अशा तऱ्हेनें सुशासन हि राहील आणि आम्ही शासनमुक्तीकडे पुढें जाऊं. आम्ही शासनमुक्तीचा प्रयत्न करतों तर कमींत कमी सुशासन तर होऊन च जाईल. कोट रुपये मिळविण्याची आशा ठेवूं तर लाख रुपये तर मिळतील च.

### तरुणांना आवाहन

अशा तऱ्हेनें मोठा उद्देश समोर ठेवून भूदानामार्फत जनतेंत जाऊन जनक्रांति करण्याची संधि आम्हांला मिळाली आहे म्हणून आम्हांला

अत्यंत उत्साह वाटला पाहिजे. बाबा म्हातारपणीं सुद्धां चार वर्षें फिरला आणि त्याचा उत्साह कमी झाला नाहीं. लोक विचारतात कीं आपण कोठपर्यंत फिराल ? बाबा म्हणतो कीं रामचंद्रांना चौदा वर्षें हिंडावें लागलें, बाबा तर चार वर्षें च हिंडत आहे. श्रीरामचंद्राला रावणाचा वध करण्याकरितां चौदा वर्षें लागलीं तेव्हां आम्हांला ह्या कामाकरितां इतका वेळ लागला ह्याची मला विशेष चिंता नाहीं. परंतु ह्या कामाचे मागें जें मोठें तत्त्वज्ञान आहे तें इतकें उज्ज्वल, इतकें व्यापक आणि इतकें परिपूर्ण आहे कीं त्यांत प्रत्येक तरुणाला उत्साह वाटला पाहिजे. आणि लाखों तरुणांनीं ह्या कामांत उडी घेतली पाहिजे. विचार नीट समजून तत्त्वज्ञान-पूर्वक जर तरुण ह्यांत उडी घेतील तर मी विश्वासपूर्वक म्हणूं शकतों कीं दोन वर्षांचे आंत ह्या विषयाचा निकाल लागूं शकतो.

दिगापहंडी
१४-५-'५५

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28722 वि: ...
क्रमांक 9206 नों दि: ...

## आजचा भक्तिमार्ग : २७ :

येथें चैतन्यसंप्रदायाचा एक मठ आहे. त्या संप्रदायाचे एक सेवक मला भेटायला आले होते. ते भूदानयज्ञांत कांहीं काम करण्याची इच्छा करतात. पूर्वींपासून कांहीं करीत हि आहेत. भूदानाचे बाबतींत फार च सहानुभूतीनें गोष्टी करीत असतांना त्यांनीं एक विशेष गोष्ट अशी सांगितली कीं महाप्रभु चैतन्याचा ज्याप्रमाणें दररोजचा व्यवहार होत असे आणि त्यांची जी आज्ञा असे बरोबर त्याला च अनुसरून भूदानाचें कार्य चाललें आहे. मीं तर हें म्हटलें च होतें कीं मी त्या महापुरुषांच्या पावलांवर पाऊल ठेवून चालत आहें आणि मला त्यांचेपासून च भूदानयज्ञाची प्रेरणा मिळाली. परंतु ही आनंदाची गोष्ट आहे कीं त्यांचेपैकीं एक बंधु ही गोष्ट कबूल करतात. मला माहीत आहे कीं आम्ही जे भूदानाचे कामांत पडलों आहोंत त्यांचें आचरण जसें भक्तिमार्गाकरितां पाहिजे तशा उत्तम प्रकारचें नाहीं तरी पण भक्तिमार्गाप्रमाणें चालण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत.

## प्राचीन आणि अर्वाचीन भक्तिमार्ग

एक काळ असा होता कीं ज्या वेळीं सर्व समाज आजच्याप्रमाणें व्यवहारांत गुंतला नव्हता. जमीन बरी च होती आणि लोकसंख्या कमी. त्या काळांत लोकांची घडण निराळ्या च प्रकारची होती. एक हजार वर्षांपूर्वीं हिंदुस्थानची लोकसंख्या आजच्या $\frac{१}{१०}$ असेल आणि लोकांना आज जितकी अडचण वाटते तितकी त्या वेळीं वाटत नसेल म्हणून त्या परिस्थितींत भक्तिमार्गाची जी सुरुवात झाली ती एकान्तातल्या ध्यान-साधनेपासून झाली. त्यामुळें मनाला ताबा ठेवण्याला मदत मिळत होती आणि चित्तशुद्धि होत होती. समाजासमोर एक उत्तम आदर्श उपस्थित होत असे. अशा तऱ्हेनें समाजावर आपला भार न टाकतां जे लोक मूर्तींची पूजा करीत असत, चिंतनमग्न होत असत, त्या शुद्ध पुरुषापासून समाजाला प्रेरणा मिळत असे.

परंतु आजची परिस्थिति निराळी च आहे. आज आम्ही लोकांना फक्त नैतिक उपदेश देत राहूं तर भागणार नाहीं. आज तर आम्हांला लोकांच्या अडचणी व दुःसह गोष्टी दूर कराव्या लागतील तेव्हां च त्यांच्यांत सद्‌विचार स्थिर होतील. ज्या वेळीं जवळपास आग लागली आहे त्या वेळीं आम्ही मूर्तीचें ध्यान करीत बसूं तर तें भक्तिमार्गाचें लक्षण होणार नाहीं. त्या वेळीं हातांत बादली घेऊन आग विझवण्याकरितां धांवून जाणें हें च भक्तिमार्गाचें लक्षण आहे. जेव्हां समाजांत चोहों बाजूंला दुःखाची लाट उठते, आम्ही लोकांच्या आपत्ति प्रत्यक्ष पहातों, भुकेलेल्यांना भुकेमुळें कांहीं सुचत नाहीं आणि म्हणून ते चुकीचें काम करीत आहेत, तशा स्थितीत कोणी शांत बसून ध्यान करण्याची इच्छा करील तरी पण त्याला तें सुचणार नाहीं.

म्हणून च तुलशीदासजींनीं जेथें भक्तीचें वर्णन केलें आहे तेथें त्याच्या लक्षणांमध्यें एक लक्षण गरिबांना मदत देत असावें हें पण सांगितलें आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं '**शम, दम दया, दीनपालन**' जो भक्त असतो, तो अंतःकरण शांत ठेवतो, इंद्रियांचें दमन करतो, तेव्हां च तो सेवेला पात्र ठरतो. नंतर तो अंतःकरणांत दया ठेवून गरिबांचें पालन करतो. भक्ताचें हें लक्षण सांगून तुलसीदासांनीं विचारलें कीं, अरे बाबा, तूं तर देह धारण

केला आहेस. तेव्हां सामान्य जनावराप्रमाणें तूं खाल्लेंस, प्यालेंस, भोग वगैरे क्रिया केल्यास तर नरदेहाची प्राप्ति करून काय केलेंस ? तूं जर शम, दम, दया, गरिबांचें पालन केलें नाहींस तर नरदेह घेऊन काय केलेंस ? शम आणि दम हीं तर व्यक्तिगत साधनें आहेत. आपल्या अंतःकरणाला प्रत्येक स्थितींत शांत ठेविलें पाहिजे. इंद्रियें ताब्यांत ठेविलीं पाहिजेत. त्याशिवाय मनुष्य जन-सेवा करण्याला योग्य च ठरूं शकत नाहीं. ह्याप्रमाणें स्वतःला जनसेवेला योग्य केल्यावर मनुष्य जर दया आणि गरिबांचें पालन करण्याचा कार्यक्रम हातीं घेईल तर तो भक्त होईल.

## गरिबांचें पालन नाहीं, गरिबी नष्ट करणें हें च उद्दिष्ट

भक्तिमार्गामार्फत आम्ही फक्त दीनांचें पालन करणें इच्छीत नाहीं— वेळ पडल्यास त्यांचेवर थोडी दया करूं इच्छीत नाहीं— तर त्यांची गरिबी च नष्ट करूं इच्छितों. जेव्हां आम्ही कोणाला हि कसण्याकरितां जमीन देववितों आणि त्याबरोबर च बीं-बियाणें, बैल वगैरे वस्तु पण देववितों, तेव्हां आम्ही त्या मनुष्याची गरिबी नाहींशी करतों. तें च दान उत्तम दान म्हटलें जाईल कीं जें एकदां दिल्यावर पुन्हां पुन्हां देण्याची गरज पडत नाहीं. सर्वोत्तम दानाचें हें च लक्षण आहे आणि भूदानांत तें दिसून येतें.

## गांवाचें मंदिर – किंडर गार्टन स्कूल

पुष्कळ वेळां असें दिसून येतें कीं हिंदुस्थानचा भक्तिमार्ग सेवापरायण नाहीं. आजपर्यंत तो मूर्ति आणि ध्यानपरायण होता. परंतु आतां वेळ आली आहे कीं भक्तिमार्गाला आपलें मुख्य स्वरूप सेवापरायणता हें च करावें लागेल. एक काळ होता कीं ज्या वेळीं अशी व्यवस्था होती कीं गांवांत एखादें मधोमध मंदिर असे आणि त्याची सेवा गांवासमोर आदर्श होईल अशा तऱ्हेनें होत असे. तें तर एक ‘ किंडर गार्टन ’ची शाळा च होती. ज्याप्रमाणें मंदिरांत देवाला सकाळीं उठवण्याची वेळ झाल्यावर चौघडा वाजत होता आणि गांवकऱ्यांना म्हटलें जात होतें कीं देवांनो जागे व्हा. काय दगडाचा देव निजतो किंवा जागतो ? परंतु सकाळीं सर्व लोकांना जागें करण्याकरितां एक नाटक केलें जात होतें. नंतर दुपारीं देवाला नैवेद्य दाखविण्याची वेळ असे तर आरती होत होती; तेव्हां सर्व गांवकरी तेथें येऊन दर्शन घेत असत आणि नंतर घरीं जाऊन जेवीत

वा. क्र. ८०८५

असत. अशा तऱ्हेनें गांवांतील लोकांचे जेवणाची एक निश्चित वेळ ठरली होती. नंतर संध्याकाळीं देवाची आरतीची वेळ होत होती. तेव्हां गांवकरी आपापलीं सर्व कामें बंद करून मंदिरांत जात आणि आरतीचे वेळेस सर्व गांवबंधू एकत्र येत असत. नंतर देवाची निजण्याची वेळ होत होती. तर निजविण्याकरितां गाणीं म्हटलीं जात होतीं. सर्व लोक त्यांत मिसळत असत. सारांश, निजण्याची पण एक निश्चित वेळ असे. ह्याप्रमाणें साऱ्या गांवाची जी दिनचर्या असायला पाहिजे त्याचें नियंत्रण मंदिराचे दिनचर्येनें होत असे. अशा रीतीनें मंदिराचे मार्फत लोकांना शिक्षण मिळत असे.

**आज सेवा म्हणजे च भक्ति**

परंतु आज तर असें होतें कीं मंदिरांत देवाला नैवेद्य दाखविण्याची वेळ असली तरी पण ज्याचे घरांत खाण्याच्या वस्तू च नाहींत तो देवाला काय नैवेद्य दाखवील ? जेव्हां देशांतील लोक भुकेले, नागवे आणि रोगांनीं पीडित असतील तर त्या स्थितींत त्यांची सेवा करण्यांत च भक्तिमार्गाचा सर्वोत्तम कार्यक्रम आहे. मला आनंद वाटतो कीं वैष्णवसंप्रदायाचे एका सेवकानें कबूल केलें कीं भूदान-यज्ञाचे कामाचे मार्फत भक्तिमार्गाचा योग्य मार्गानें प्रसार होत आहे. आम्ही वारंवार लोकांना हें च समजावितों कीं आमचे भोंवतालीं जितके प्राणी आहेत. ते सर्व आमचे मालक आहेत, आणि आम्ही त्यांची सेवा करण्याकरितां जन्मलों आहोंत. हा स्वामि-सेवक भाव भक्तिमार्गाचा आत्मा आहे. जेथें आम्ही भूतमात्रामध्यें हरिरूप पहातों, त्यांना स्वामी समजतों आणि स्वतःला सेवक, तेथें आमची प्रत्येक कृति भक्तिमार्गाची होते. म्हणून भक्तांनीं अत्यंत नम्र झालें पाहिजे. त्यांच्यांत परस्पर अत्यंत प्रेम असायला पाहिजे. आणि असें समजायला पाहिजे कीं मी देवाचे सेवेला लागलों आहें. म्हणून मनांत कोणत्या हि प्रकारचे राग-द्वेषाला स्थान देऊं नये. लोक आमचे जीवनाची परीक्षा भक्ताचे जीवनापासून करतील. ते पहातील कीं हे जे भूदानांत लागलेले कार्यकर्ते आहेत त्यांनीं स्वतःचें जीवन व हृदय त्याला अनुसरून केलें आहे किंवा नाहीं ! म्हणून आम्ही जर आपले जीवनांत जागृत राहूं तर भूदानाचें काम आगीसारखें पसरत जाईल याबद्दल मला मुळीं च शंका नाहीं.

**पुडामारी, १५–५–'५५**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28722 विः [illegible]
क्रमांक 9264 नोंः दिः 92/2/81

REFBK-0009795